म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू प्रवास
सं. क्र. ५८२

# वाळवंटातील चंद्रकोर

ले – श्रीपाद [illegible]

REF-K 0021791
REFBK-0021791

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

:— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे,
केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे
णी भरावी लागेल.

| | |
|---|---|
| SEP 1977 | 10 DEC 1978 |
| OCT 1977 | 25 APR 1979 |
| 1977 | 29 MAY 1979 |
| 0 OCT 1977 | 1 JUL 1979 |
| NOV 1977 | 8 JUL 1979 |
| DEC 1977 | 15 JUL 1979 |
| DEC 1977 | 26 SEP 1979 |
| DEC 1977 | 3 FEB 1980 |
| JAN 1978 | 27 FEB 1980 |
| JAN 1978 | |
| FEB 1978 | |
| FEB 1978 | |

[क्रु. मा. प.]

वि. क्र. ५८
अंदाजे २५/८/७५
५-४५१०

# वाळवंटातील चंद्रकोर

अरबी मुलुखातील मुशाफिरी

श्रीपाद जोशी

५८२ भ्र.प्र.
२८०९
REFBK-0021791

श्री विद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

वाळवंटातील चंद्रकार

प्रकाशक :
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

प्रकाशन दिनांक २१ एप्रिल १९७७

सर्व हक्क सुरक्षित

मुखपृष्ठ : सुभाष अवचट, पुणे

किंमत : बारा रुपये

मुद्रक
चिंतामणी सदाशिव लाटकर
कल्पना मुद्रणालय
शिव-पार्वती
टिळक रोड, पुणे ३०

सवलतीच्या दराने उपलब्ध
करून दिलेला कागद या
पुस्तकासाठी वापरला आहे

स्नेहपूर्वक समर्पित

ज्याच्या सहकार्यामुळे हा प्रवास
शक्य व सुखकर झाला त्याना

—श्रीपाद जोशी

# भूमिका

प्रवास करिताना आणि प्रवासवर्णन लिहिताना आपल्या व वाचकांच्या ज्ञानात थोडीफार भर पडावी, अशी माझी भूमिका आजवर नेहमीच राहिली आहे. वस्तुत: बहुतेक सर्वच प्रवासवर्णनकार या भूमिकेला चिकटून राहिले असल्याचे आढळून येते. परंतु कधी कधी प्रवासवर्णन हे ललित निबंधाचे किंवा मनमोकळ्या गप्पागोष्टींचे रूप धारण करते, आणि मग वाचकांना माहितीपूर्ण प्रवासवर्णनापेक्षा अशी रसाळ प्रवासवर्णने अधिक आवडू लागतात त्यातही काही आक्षेपार्ह आहे, असे नाही परंतु जेव्हा अशी केवळ लालित्यपूर्ण प्रवासवर्णने हीच खरी प्रवासवर्णने होत, आणि माहितीपूर्ण प्रवासवर्णनांना ललित साहित्यात काही स्थान नाही, अशी समजूत पसरू लागते तेव्हा ती चिंतेची बाब बनते मराठी साहित्यात अशी समजूत गेल्या काही वर्षांपासून पसरलेली आढळून येते वस्तुत: केवळ गमती-जमतीची प्रवासवर्णनेही लिहिली जाण्यास काहीच हरकत नाही. कथा कादंबऱ्याप्रमाणे ती आवडीने वाचली जातीलच पण त्यांच्यामुळे खऱ्या प्रवासवर्णनाविषयी वाचकामध्ये अरुची निर्माण झाल्यास ती गोष्ट साहित्याच्या निरोगी वाढीला बाधक ठरेल, असे मला वाटते आजवरची माझी सारी प्रवासवर्णने वाचकामध्ये अशी अरुची निर्माण न व्हावी आणि प्रवासवर्णनाचा मूळ उद्देश नजरेआड होऊ नये, याच भूमिकेतून लिहिली गेली आहेत

' वाळवंटातील चंद्रकोर ' हे पुस्तकही याच भूमिकेतून लिहिले गेले आहे. पश्चिम युरोपीय राष्ट्रे, अमेरिका, जपान वगैरे विकसित व श्रीमंत देश किंवा चीन-रशियासारखे साम्यवादी देश यांच्यापुरतेच आपले स्वारस्य आजवर मर्यादित राहिले आहे आफ्रिका, लॅटिन अमेरिका, पश्चिम आशिया या भागातील अविकसित देशांची माहिती मिळविण्याचा प्रयत्न आजवर फारच थोडा झाला आहे. या देशातील लोकांच्या सांस्कृतिक जीवनाची ओळख आपण करून घ्यावी आणि ती आपल्या वाचकांना करून द्यावी, अशी प्रेरणा निदान मराठी लेखकांना तरी झाल्याचे माझ्या आढळात नाही. आपल्याला अज्ञात असलेल्या लोकांचे

जीवन आपण जवळून पाहावे, त्याची सुखदु:खे जाणून घ्यावीत, त्यांच्याशी मैत्री जोडावी, असे मला नेहमीच वाटत आले आहे. ज्या वेळी परदेशात जाण्याची शक्यता कल्पनेनही नव्हती त्या वेळी आपल्याच देशातील विभिन्न प्रदेशात राहणाऱ्या लोकांशी ओळख करून घेण्याचा प्रयत्न मी केला. तसे पाहिल्यास बाह्य संस्कृती व संस्कार यांच्या दृष्टीने काश्मीर-पासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेल्या या खंडप्राय देशात इतक्या विभिन्न प्रकारचे लोकजीवन फुलत आले आहे की, तेवढी विविधता आफ्रिका, युरोप, आशिया वगैरे खंडांतील देशा-मध्येही प्रकर्षाने जाणवणार नाही. तरीपण आपण आपल्या या देशबांधवांची ओळख करून घेण्याऐवजी युरोप अमेरिकेतील लोकांचे भपकेबाज जीवन पाहण्याचीच अभिलाषा मनात बाळगून असतो. कदाचित दीडशे वर्षे पाश्चात्त्यांच्या गुलामगिरीत राहिल्याचा हा परिणाम असावा. स्वातंत्र्याची तीस वर्षे उलटल्यावरही आपण त्या मानसिक दास्यातून बाहेर पडलो नाही, ही खेदाची गोष्ट आहे.

भारतीय जनतेची थोडीफार ओळख झाल्यानंतर भारताबाहेरील अविकसित देशातील लोकांची ओळख व्हावी, असे मला वाटू लागले. इस्लामच्या अभ्यासात विशेष रस असल्या-मुळे पश्चिम आशियातील (किंवा मध्यपूर्वेतील) अरबी, फारसी, तुर्की वगैरे भाषा बोलणाऱ्या जनतेशी भेटता–बोलता यावे, अशी माझी इच्छा होती. त्या दिशेने थोडेफार प्रयत्नही मी केले. परंतु द्रव्याभावी ते यशस्वी होऊ शकले नाहीत. योगायोगाने गतवर्षी (१९७६ साली) असा एक प्रयत्न यशस्वी झाला, आणि ज्याला आपण सामान्यतः अरबस्तान या नावाने ओळखतो, त्या प्रदेशातील देशांना भेट देण्याची संधी मला दिल्लीच्या 'भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद' (इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्स) या संस्थेतर्फे मिळाली. याचे सारे श्रेय भारताचे माजी परराष्ट्रमंत्री श्री यशवंतराव चव्हाण यांनाच आहे. त्यांच्यामुळेच भा. सां. सं. परिषदेकडून मला हे निमंत्रण मिळाले. श्री यशवंतरावजींनी दिलेल्या या सांस्कृतिक सहकार्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. भा. सां. सं. परिषदेचाही मी मनापासून आभारी आहे.

काहीसे चाकोरीबाहेरचे असणारे हे प्रवासवर्णन प्रसिद्ध करण्यास माझे मित्र श्री. मधुकाका कुलकर्णी यांनी तयारी दाखविली; आणि ते इतक्या सुबक स्वरूपात प्रसिद्ध केले याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. त्यांच्या या उपक्रमाचे चीज वाचक करतील असा मला विश्वास वाटतो.

अक्षय्य तृतीया २१ एप्रिल १९७७ —श्रीपाद जोशी
'श्रीरघुवंश' डॉ. केतकर मार्ग,
पुणे ४

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | अनपेक्षित संधी | १ |
| २ | ओमान | ८ |
| ३ | असा हा ओमान ! | १४ |
| ४ | राजदूतांची भेट | २० |
| ५ | झोपडीतून राजवाड्यात | ३८ |
| ६ | संयुक्त अरब अमीरात | ६९ |
| ७ | असे हे अमीरात ! | ७६ |
| ८ | अबूधाबी येथील फेरफटका | ८१ |
| ९ | सऊदी अरबस्तान | १०२ |
| १० | असे हे सऊदी अरबस्तान | १०७ |
| ११ | जद्दात भेटलेली देवमाणसे | ११८ |
| १२ | कुवैत | १४० |
| १३ | असा हा कुवैत ! | १४२ |
| १४ | 'अल अरबी' ची कामगिरी | १५२ |
| १५ | उपसंहार | १६१ |

# १

# अनपेक्षित संधी

१९७२ साली जपानचा दौरा आटोपून मी परत आलो तेव्हा आपल्या पारपत्राचा (पासपोर्टचा) उपयोग पुन लौकर करण्याचा योग येईल, अशी अपेक्षा नव्हती म्हणून तो अडगळीत पडला होता 'जा जरा पूर्वेकडे' या माझ्या जपानच्या प्रवास-वर्णनाला रसग्रहणात्मक प्रस्तावना लिहिणारे माझे सन्मित्र श्री मोहनराव शहाणे यानी आपल्या प्रस्तावनेचा उपसहार पुढील परिच्छेदाने केला होता :

"श्रीपादना अरब देशात जाण्याची इच्छा आहे, व हे पुस्तक वाचून वाटते की, ती लवकर पुरी होवो स्वत'चा डका दूरवर ऐकू जाईल अशा महत्पदावर ते नाहीत, किंवा एखाद्या गटाच्या खाद्यावर ते उभे नाहीत, म्हणून त्यानी भारतदर्शनाची या ग्रथाप्रमाणे अभ्यासू, चिकित्सक वृत्तीने लिहिलेली प्रवासवृत्ते व्हावी तितक्या वाचकास परिचित नाहीत नाही तर अशा पुस्तकाच्या निर्मितीकरिता त्याच्यासारख्या लेखकास खास अनुदान देऊन शासनाने निरनिराळ्या देशात पाठविले असते"

त्याची ही सदिच्छा किंवा भविष्यवाणी खरी ठरेल अशी लक्षणे वातावरणात दिसत नव्हती म्हणून मी सालाबादप्रमाणे उन्हाळ्यातील विश्रातीसाठी, किंवा पुण्याच्या रखरखीत उन्हाळ्यापासून काही दिवस सुटका करून घेण्यासाठी सौभाग्यवतीसह मैसूरला माझ्या मुलीकडे राहावयास गेलो असता ता. ३ एप्रिल १९७६ रोजी दिल्लीच्या भारतीय सास्कृतिक सबध परिषद (इडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्स) या सस्थेच्या कार्यक्रम-सयोजक श्रीमती सुषमा सचदेव याचे ता ३० मार्चचे एक पत्र मला मिळाले त्यात त्यानी कसलीही प्रस्तावना न करिता, 'तुम्हाला मस्कत, दुबई, अबू-धाबी, जद्दा व कुवैत या देशाना (शहराना?) भेट देण्यासाठी एप्रिल महिन्यात जावयाचे आहे. तरी तुम्हाला कोणत्या तारखा सोयीच्या आहेत ते कळवावे,' अशा

अर्थाचा मजकूर लिहिला होता ते पत्र पुण्याला जाऊन मजकडे आले होते त्यात दोन दिवस गेले होते. मला तर ते सारेच अद्‌भुत वाटत होते कारण भा सा सं. परिषदेशी तोपर्यंत माझा कसलाही पत्रव्यवहार झालेला नव्हता या देशात जाऊन मी काय करावयाचे आहे, माझ्याकडून संस्थेच्या काय अपेक्षा आहेत, मी एकटाच जाणार की माझ्याबरोबर इतर कोणी मडळी आहेत, एकूण किती दिवस मला बाहेर काढावयाचे आहेत, वगैरे बाबतींत मी पूर्णपणे अधारात होतो तरीपण या प्रवासासाठी मला स्वत:ला एक पैसाही खर्च करावा लागणार नाही, एवढे आश्वासन सदर पत्रातच असल्याने निर्णय घेण्यास फारसा वेळ लागला नाही, आणि १५ एप्रिलनतर केव्हाही भारताबाहेर जाण्यास मी तयार असल्याचे श्रीमती सचदेव याना मी त्याच दिवशी कळवून टाकले.

## थोडी पार्श्वभूमी

ही सगळीच घटना अनपेक्षित असली तरी तिला एक पार्श्वभूमी होती गेली अनेक वर्षे मी इस्लाम व मुसलमान याचा अभ्यास करीत आहे १९७२ साली ' भारतीय मुसलमान ' हे माझे पुस्तक प्रसिद्ध झाले होते, आणि तत्पूर्वी ' मुस्लिम सण आणि सस्कार ' हे माझे पुस्तक पाच भारतीय भाषात प्रकाशित झाले होते पश्चिम आशियातील ( किंवा मध्यपूर्वेतील ) मुस्लिम देशामध्ये मुसलमानाची सास्कृतिक प्रगती कशी होत आहे, तेथील इस्लामवर आधुनिकतेचा प्रभाव कितपत पडला आहे, तेथील मुसलमान नव्या काळाशी आपल्या धर्मभावनाची व धार्मिक आचारविचाराची सागड घालण्यात कितपत यशस्वी झाले आहेत हे जाणून घ्यावे व ते भारतातील जनतेला, विशेषत. मुसलमानाना सागावे, असा विचार माझ्या मनात अनेक वर्षांपासून घोळत होता त्यासाठी ईजिप्त, जॉर्डन, सीरिया, इराक, लेबॅनॉन वगैरे प्रगत देशाना भेट देण्याची माझी इच्छा होती ( तिचाच उल्लेख श्री मो. ज्ञा शहाणे यानी आपल्या प्रस्तावनेत केला होता ) श्री आप्पासाहेब पत हे त्या वेळी रोममध्ये भारताचे राजदूत होते त्याच्या प्रयत्नामुळे अशा प्रवासासाठी अरब लीगचे निमत्रणही मला मिळाले होते परतु त्यासाठी मला स्वत:चा प्रवासखर्च करावा लागणार होता, आणि सुमारे सात-आठ हजार रुपये खर्च करून मला फक्त ८–१० दिवस केवळ ईजिप्तमध्ये फिरता येणार होते तो सौदा मला फार महाग वाटला, म्हणून मी तो नाद सोडून दिला तरीपण मुस्लिम देशात जाण्याची इच्छा मला स्वस्थ बसू देत नव्हती

याच सुमारास नामदार श्री यशवतराव चव्हाण अर्थमत्रिपदावरून परराष्ट्रमत्रिपदावर गेले होते त्याच्याशी माझा वैयक्तिक परिचय नसला तरी एक लेखक म्हणून ते मला ओळखत असावेत, या अपेक्षेने २७ नोव्हेंबर १९७४ रोजी त्याना सविस्तर

पत्र लिहून माझी इच्छा मी कळविली माझ्या अपेक्षेप्रमाणे त्यानी ता ५ डिसेंबर १९७४ रोजी एक छोटेखानी पत्र लिहून मला कळविले की, " आपली कल्पना चागली आहे अर्थात याबाबत निश्चित काय करता येणे शक्य आहे, याची मला कल्पना नाही. याबाबत चौकशी करून नतर आपणास लिहीन "

परतु त्यानतर देशातील परिस्थिती झपाट्याने बदलत गेली सरकार व सत्ताधारी पक्ष याची धोरणे मला चुकीची वाटल्यामुळे मी त्यावर खूप परखड व कडक टीका काही लेखातून केली त्यामुळे माझ्या योजनेविषयी भारत सरकार सहानुभूतीने विचार करील अशी अपेक्षाच मी बाळगली नव्हती त्यात पुन. आणीबाणी सुरू झाल्यानतर तर माझ्यासारख्या सत्ताधारी पक्षात सामील न झालेल्या लेखकाला सरकार बाहेर पाठवील, अशी कल्पनाच मी करू शकत नव्हतो त्यामुळे हे निमत्रण मिळताच मला आश्चर्याचा धक्का बसला एका दृष्टीने आणीबाणीतही लोकशाहीची धुगधुगी शिल्लक असल्याचे पाहून मला बरेही वाटले माझ्या माहितीप्रमाणे, परराष्ट्र मत्रालयाने भा. सा. स परिषदेमार्फत मला पश्चिम आशियातील अरब देशात पाठविण्याची इच्छा दर्शविली होती, परतु त्या देशानाच भारतीय लेखक व पत्रकार याचे त्याच्या देशातील आगमन नापसत असल्याने तो बेत सोडून देऊन ज्या देशानी मान्यता दिली त्याच्याकडे जाण्याची व्यवस्था करण्यात आली

## एक धर्मसकट

हे निमत्रण मिळाल्यानतर माझ्यासमोर एक धर्मसंकट उभे राहिले ज्या सरकारची अतर्गत धोरणे आपल्याला मान्य नाहीत त्याच्या निमत्रणाचा स्वीकार करणे म्हणजे त्या धोरणाना मान्यता देण्यासारखेच नव्हे काय? आणीबाणीला असलेला माझा तात्त्विक विरोध माहीत असणाऱ्या माझ्या मुलानी मला विचारले, " परदेशात गेल्यावर तिकडील लोकानी तुम्हाला आणीबाणीविषयी विचारले तर तुम्ही काय सागाल ? " मी म्हणालो, " मी काही राजकीय पुढारी नव्हे मी आपण होऊन प्रचलित परिस्थितीविषयी बोलणार नाही परतु जर कोणी त्या मुद्द्यावरून भारताची निंदानालस्ती करू लागले तर मी त्याला विरोध करून भारत सरकारचीच बाजू माडीन कारण हे आमच आपसातल भाडण आहे ते आम्ही आपसातच सोडवू त्यात त्रयस्थाला शिरकाव करू देण योग्य होणार नाही भारताबाहेर सरकार आणि आम्ही एकच आहोत " सुदैवाने तसा प्रसंग मजवर आला नाही जाहीर सभेत बोलण्याचा कार्यक्रमच नसल्याने तशी शक्यता निर्माण झाली नाही खासगी संभाषणातही जेथे भारतावरील टीका चुकीची व गैरसमजावर आधारलेली असल्याचे मला आढळले तेथे मी वैयक्तिक मते बाजूला ठेवून भारत सरकारचे समर्थन केले

माझी दुसरी अडचण ही होती की या आखात देशात आपल्याला पाहण्यासारखे किंवा शिकण्यासारखे काही मिळणार नाही, अशी माझी समजूत असल्याने आपला हा प्रवास निष्फळ ठरेल असे मला वाटत होते अशा स्थितीत आपण या देशात जावे किंवा कसे, हा प्रश्न मला सतावू लागला तरीपण आपण या देशासबधी जी समजूत करून घेतली आहे ती तरी कितपत खरी आहे, हे प्रत्यक्ष अनुभवाने ताडून पाहण्याचे मी ठरविले, आणि हा माझा निर्णय शहाणपणाचा होता असे मला त्या देशात गेल्यावर आढळून आले- आखात देशातील अरबाच्या सास्कृतिक जीवनाची ओळख करून घेण्यासाठी त्या देशात जाणारा मी पहिलाच भारतीय असल्याचे मला सागण्यात आले या देशाशी आपला शेकडो वर्षांचा व्यापारिक व सास्कृतिक संबध असूनही त्याच्या-जवळ तेलसपत्ती गोळा होईपर्यंत आपण त्याच्याकडे कधी विशेष लक्ष दिलेच नव्हते त्यानतरही आपण त्याचे सास्कृतिक जीवन जाणून घेण्याचा गभीरपणे व जाणीवपूर्वक प्रयत्न केला नाही हे काम किती महत्त्वाचे आहे, याची कल्पना मला तेथे गेल्यावरच आली

## घाईगर्दीने आखलेला कार्यक्रम

माझ्या दौऱ्याचा कार्यक्रम फारच घाईगर्दीने आखला असावा असे दिसते मैसूरहून मी तेथील मुक्काम आवरता घेऊन ता. १० एप्रिल रोजी पुण्यास परत आलो, आणि दिल्लीच्या पत्राची वाट पाहू लागलो विदेश–प्रवासासाठी आवश्यक असणारे कॉलरा-प्रतिबधक इनॉक्युलेशन व देवीप्रतिबधक लस टोचून घेण्याचा कार्यक्रम मी मैसुरातच आटोपून घेतला होता पिवळ्या तापावरील इनॉक्युलेशन घ्यावे लागते असे कोणीतरी सागितले पण अधिक चौकशी केल्यावर पिवळ्या तापाचा प्रश्न फक्त अफ्रिकेतील देशाच्या बाबतीत उद्‌भवतो, असे समजले आपल्याकडे परदेशप्रवास ही तशी अपूर्वाईची बाब आता उरलेली नाही परतु आपले लोक सामान्यत: इग्लड–अमेरिकेच्याच वाऱ्या करीत असल्याने परदेशप्रवासविषयक आपली माहिती बहुधा या देशापुरतीच मर्यादित असते आखात देशामध्ये जाणारे बहुसंख्य लोक केरळचेच असतात त्यामुळे त्या प्रदेशात बहुधा या देशाच्या प्रवासासंबधी अधिक माहिती लोका-जवळ असावी असो.

दिल्लीहून पुढे काहीच न समजल्यामुळे आपल्याला कोणी ‘ एप्रिल फूल ’ तर केले नाही ना, ( कारण सदर पत्र पुण्याला १ एप्रिललाच पोचले होते ! ) अशी शका मला आली आणि मी दिल्लीला एक तार ठोकली तिचे उत्तर मला ता १६ रोजी तारेनेच मिळाले त्या तारेत लिहिले होते, “ तुमचे पत्र व तार मिळाली मुबईहून मस्कतला जाण्यासाठी ता २५ एप्रिल रोजी विमानाचे रिझर्व्हेशन केले आहे त्या त्या देशाचे

व्हिसा आपणच मिळवावेत  सविस्तर पत्र व प्रवासाचा कार्यक्रम पाठवीत आहे ”

सदर पत्राची वाट पाहात मी ता  १९ पर्यंत थांबलो  ते न आल्यामुळे मी ता  १९ रोजी मुंबईला गेलो  माझ्या पारपत्रावर जे देश १९७२ साली नोंदलेले होते त्यात संयुक्त अरब अमीरात ( युनायटेड अरब एमिरेट्स ), ओमान व सऊदी अरबस्तान या देशाचा समावेश नव्हता  त्याची नोंद मी करवून घेतली, आणि मुंबई येथील ओमानच्या कौसलावासात व्हिसा मिळविण्यासाठी गेलो  तेथील अधिकाऱ्यानी मला सागितले की, “ जोपर्यंत भारत सरकारचे किंवा भा  सा  सं  परिषदेचे पत्र आमच्या नावे येत नाही, तोपर्यंत आम्ही तुम्हाला व्हिसा देऊ शकत नाही ” असे पत्र मागवून व्हिसा मिळविण्यात सहज आठ–दहा दिवस गेले असते  शिवाय सऊदी अरबस्तानचा व्हिसा मुंबईत मिळत नाही  तो दिल्लीहूनच मिळवावा लागतो  त्यात आठ–पधरा दिवस सहज गेले असते  म्हणून भा  सा  सं  परिषदेच्या मुंबई शाखेचे प्रमुख श्री वासुदेवन् याना भेटून माझ्या प्रवासाचा कार्यक्रम काही दिवस पुढे ढकलण्या-संबधी परिषदेच्या केंद्रीय कार्यालयाला कळविण्यास मी सागितले  त्याप्रमाणे त्यानी दिल्लीला दूरध्वनीवरून बोलणे केले  त्या वेळी प्रमुख कार्यक्रम सघटक श्रीमती उषा मलिक यानी त्याना असे सागितले की, “ श्री जोशी याचा  कार्यक्रम निश्चित झाला असून त्याप्रमाणे परदेशातील आपल्या दूतावासाना तसे कळविण्यात आले आहे त्यामुळे आता त्यात बदल करता येणार नाही  तुम्ही त्याचे पारपत्र व आरोग्यप्रमाण-पत्र आजच्या आज विमानाने पाठवून द्या, म्हणजे चारही देशाचे व्हिसा त्यावर नोंदवून आम्ही तावडतोब परत पाठवू ” त्याप्रमाणे पारपत्र व आरोग्य-प्रमाणपत्र श्री वासुदेवन् याच्या स्वाधीन करून मी ता  २० रोजी पुण्यास परत आलो  घरी आल्यावर मला तारेत उल्लेखिलेले पत्र व प्रवास-कार्यक्रम मिळाला.

श्रीमती मलिक यानी कितीही आत्मविश्वासपूर्वक आश्वासन दिले असले तरी सगळे व्हिसा वेळेवर मिळतील आणि माझा प्रवास ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे सुरू होईल, अशी खात्री मला वाटत नव्हती  प्रवासाची तारीख लाबणीवर पडणेही इष्ट नव्हते कारण आखात देशामध्ये आधीच उन्हाळा सुरू झाला होता आणि तेथील जीवघेण्या उन्हाळ्याची वर्णने ऐकून मी मनातल्या मनात हादरलोच होतो  ( मला तर पुण्याचाही उन्हाळा सहन होत नाही ! ) त्यामुळे जसजशी दिवसगत होत जाईल तसतसा तेथील उन्हाळा वाढत जाणार आणि तिकडील प्रवास अधिकाधिक तापदायक होणार हे उघड होते  मधूनच मनात विचार येई की, हा प्रवास पुढील हिवाळ्यापर्यंत पुढे ढकलला गेला तर बरे ! या अनिश्चिततेमुळे मी माझ्या प्रवासाची वाच्यता फारशी कोठे केले नाही, आणि कदाचित मुंबईहूनच परत यावे लागेल, असे गृहीत धरून मी ता  २४ रोजी मुंबईस गेलो

रोज वापरावयाचे खादीचे कपडे, इस्लाम व गांधीजींविषयक माझी पुस्तके आणि उदबत्तीचे पुडे, लाकडी हत्ती वगैरे काही भेटवस्तू, चिवडा-लाडू, वेळप्रसंगी लागणारी औषधे इत्यादी मोजकेच सामान मी बरोबर घेतले होते वीस किलो सामान बरोबर नेण्याची परवानगी असताही माझे सामान फक्त सोळा किलोच भरले (भारताचे भूतपूर्व राजदूत श्री आप्पासाहेब पत यांच्याकडून तीन राजदूतांच्या नावे ओळखपत्रे घेतली होती परंतु सारी व्यवस्था सरकारी असल्याने त्यांचा प्रत्यक्ष असा उपयोग करावा लागला नाही !) जपानच्या प्रवासात भेटकार्डांचा अभाव खटकला होता म्हणून या खेपेला इंग्रजी भेटकार्डे छापून घेतली होती त्यांचा मात्र जागजागी चांगला उपयोग झाला बरोबर घेतलेल्या खाण्याच्या वस्तूंचाही चांगला उपयोग अर्थात शाकाहारी असल्यामुळे मला झाला

## अखेर एकदाचा विमानाच्या बोहल्यावर चढलो

ता २४ रोजी रात्री अकरा वाजता दिल्लीहून पासपोर्ट परत आल्याची सुवार्ता ऐकावयास मिळाली मी मुंबईस ज्यांच्याकडे उतरतो ते श्री विनायकराव आठल्ये यांच्या घरी फोन असल्याने ती वातमी मला समजू शकली आणि अनेक दिवसांची अनिश्चितता संपून मला निवांतपणे झोप मिळाली

ता २५ रोजी सकाळी १० वाजता भा सा सं परिषदेचा माणूस पारपत्र, विमानाचे तिकीट, परकीय चलन परवाना, परिषदेने दूतावासांना पाठविलेल्या तारांच्या नकला, वगैरे साहित्य देऊन गेला पारपत्र उघडून पाहिले, आणि चारी देशांचे व्हिसा त्यात नोंदलेले आहेत, याची खात्री करून घेतली परिषदेला जी गोष्ट इतक्या सहजासहजी करणे शक्य होते तिची जबाबदारी माझ्यावर टाकून माझा जीव निष्कारण टांगणीला लावण्यात त्यांनी काय साधले कोण जाणे ?

एअर इंडियाच्या विमानाने जाणाऱ्यांना शंभर डॉलरचे परकीय चलन मिळते असे ऐकले होते म्हणून त्या हिशेबाने पुण्याहून जाताना पैसे बरोबर नेले होते परंतु रिझर्व्ह बँकेने मला फक्त ५३५ रुपयांचे परकीय चलन घेण्याची परवानगी दिली होती म्हणून सुमारे ६०० रुपये बरोबर घेऊन मी विमानतळावर गेलो

विमान ७ वाजता निघणार असले तरी दोन तास आधी विमानतळावर पोचावयाचे होते प्रथम पैसे वाचविण्यासाठी लोकलने जाण्याचा भटजी विचार मनात आला, पण लोक काय म्हणतील, या भीतीने टॅक्सी केली दादरहून सांताक्रूझपर्यंत मीटर भाडे रु ७·५० झाले टॅक्सीवाल्याने तेवढ्यात बनविण्याचा प्रयत्न केला त्याने १७ रु बिल झाल्याचे सांगितले टॅरिफकार्ड मागितल्यावर त्याने रु १२–५० झाल्याचे सांगितले ओझे फारसे नसल्याने हमाल करावा लागला नाही शिवाय चि राजू आठल्ये बरोबर

असल्याने त्याचीही मदत झाली

आत गेल्यावर समजले की मला सरकारने मजूर केलेल्या रकमेव्यतिरिक्त ७ डॉलर जादा मिळू शकतात परतु टॅक्सीभाडे व विमानतळ भाडे ( १५ रुपये ) दिल्यानतर माझ्याजवळ फक्त ज्यादा ४ डॉलर घेता येतील इतकेच पैसे शिल्लक असल्याचे आढळून आले मनाला उगीच हळहळ वाटली कायद्याचे काटेकोर पालन करणाऱ्याच्या वाट्याला अशी हळहळ नेहमीच येत असते मला एकूण ६१ डॉलर मिळाले त्या दिवशी डॉलरचा भाव थोडा जास्तच होता ( रु ९·२५ ) मला या डॉलराचा मुळीच वापर करावा लागला नाही

विमानतळावर मला तहान लागली पाण्याचा शोध घेत असता श्री पद्माकर साळवी नावाचे एक पोलिस अधिकारी भेटले त्यानी माझे नाव विचारले नाव ऐकताच नाटकी ढंगात वाकून नमस्कार करून ते म्हणाले, “ जोशीसाहेब, मी गणवेषात नसतो तर तुमचे पायच धरले असते मी तुमचा ‘ फॅन ’ आहे ” मी मनात ओळखल की हे गृहस्थ मला श्री ज जोशी समजले असावेत ! तरीपण कुणा का मराठी लेखकाला असेना, एवढा मान मिळू शकतो, ही कल्पना मला मोठी सुखद वाटली त्यानी स्वत मला पाणी आणून दिले, आणि काही मदत लागल्यास निःसंकोचपणे सागण्याची त्यानी आग्रहपूर्वक विनती केली

प्रतीक्षालयात बसल्या-बसल्या मी आसपास पाहू लागलो एकही ओळखीचा चेहरा दिसत नव्हता मी ज्या देशाना जात होतो तिकडे माझ्या ओळखीचे कोणी जात असेल अशी शक्यता नव्हतीच तरीपण नजर कोणाला तरी शोधीत होती ते कोणीतरी मुळातच नव्हते तर कोठून दिसणार ? विमानात बसण्यापूर्वी सामान्यत' सामानाची तपासणी होते परतु त्या दिवशी त्याची जरुरी बहुधा कोणाला वाटली नसावी मलाच गरज असल्याने मी माझा कॅमेरा माझ्या पारपत्रावर नमूद करवून घेतला, आणि ६-३० वाजता एअर इडियाच्या बोइग ७०७ ‘ त्रिशूल ’ या आलीशान विमानात जाऊन बसलो तीन आठवड्याची अनिश्चितता अशा प्रकारे सपली !

# २

## ओमान

(२५ एप्रिल ते २ मे)

### विमान की फुरसुंगीची बस ?

विमानात बसल्यावर आजूबाजूला नजर टाकली तेव्हा आपण विमानात नसून फुरसुंगीच्या बसमध्ये बसलो आहोत असा भास झाला बहुतेक सगळे उतारू ग्रामीण, बहुधा गावढळच होते सुतार, लोहार, गवंडी इत्यादींचाच भरणा प्रामुख्याने होता. माझ्या शेजारी बसलेला पंजाबी तरुण तर रात्री झोपताना घालायचा चट्ट्यापट्ट्याचा पायजमाच घालून आलेला होता अंगात एक मळका सदरा आपल्याला दरमहा तीन हजार रुपये पगार मिळणार असल्याचे त्याने सांगितले हवाई सुंदरींना इंग्रजी-शिवाय दुसरी भाषा येत नव्हती, आणि उतारूंना इंग्रजी समजत नव्हती त्यात पुन. पंजाबी ! त्यांनी त्या सुंदरींची टिंगलच चालविली शिक्षणाच्या बाबतीत ते अडाणी असले तरी दारू पिण्यात चांगलेच तरबेज दिसले स्कॉच व्हिस्कीच्या बाटल्या भरा-भर रिकाम्या होत होत्या. मणिपूरहून त्रिपुराला जाताना विमानात असे खेडवळ उतारू भेटले होते. पण तेथे तो प्रवास अपरिहार्य व जमिनीवरील प्रवासापेक्षा स्वस्त असल्याने त्याचे वैशिष्ट्य खुपले नव्हते येथे मात्र या प्रवाशाच्या संगतीत काहीसे चमत्कारिक वाटले खरे कदाचित विमानाचा प्रवास आणि तो प्रवास करणारे उतारू याच्यासंबंधी आपल्या ज्या काही कल्पना असतात त्यांना या उतारूमुळे धक्का लागल्याने तसे झाले असावे एकूण १६८ जागांपैकी ४८ जागा पहिल्या वर्गाच्या म्हणजे इंजिनजवळच्या होत्या. त्यात कदाचित नेहमीच्या उच्चभ्रू वर्गातील उतारू असावेत. माझ्या दुसऱ्या वर्गातील प्रवासाची हकीगत ऐकून एक जगप्रवासी मित्र म्हणाले, " ज्या व्यक्तीला आपण सदिच्छा दौऱ्यावर पाठवितो तिला सन्मानपूर्वक पहिल्या वर्गाने पाठविल्यास

तिच्याबरोबर आपलाही गौरव होईल, ही साधी व्यावहारिक गोष्ट भा सा सं परिषदेच्या लक्षात येईल तो सुदिन !" भारतातून श्रमिक वर्गाचे लोक किती मोठ्या प्रमाणावर आखात देशाना जात असतात त्याची कल्पना या प्रवाशावरून आली आमचे विमान दिल्लीहून आले होते व ते कुवेतला जाणार होते यामुळे त्यात पजाब्याची सख्या स्वाभाविकपणेच जास्त होती पजाब्याची या देशाना होणारी ही निर्यात अगदी अलीकडची आहे तत्पूर्वी मुख्यतः केरळचे लोक—मुसलमान व ख्रिश्चनच—या देशाना मोठ्या संख्येने जात असत महाराष्ट्राच्या कोकणपट्टीतील मुसलमानही मोठ्या प्रमाणावर या देशात गेले आहेत पुण्याची थी जी शिर्के कपनीही शेकडो मजूर दुबईला नेत आहे त्या मानाने तिकडे जाणाऱ्या पाढरपेशाची सख्या कमी आहे

## पश्चिमेचे विविध रंग

मला खिडकीजवळची जागा मिळाली होती त्यामुळे बाहेरचे दृश्य चागले दिसत होते परंतु सपूर्ण प्रवास समुद्रावरून झाल्याने विशेष प्रेक्षणीय असे काही आढळले नाही थोडा वेळ विमानाखाली पाढऱ्या ढगाचे पुजके दिसले काळ्या शेतात शुभ्र कापूस विखुरला असावा असा भास होत होता मुबईहून मस्कतचे अंतर फक्त १०१० मैल ( १६३० कि मी ) आहे हे अंतर कापण्यास २ तास ५ मिनिटे लागतात विमान ३० हजार फुटाहून ५६० मैल ( ९०० कि मी ) वेगाने जाते सायकाळची वेळ आणि पश्चिमेचा प्रवास यामुळे जणू आम्ही सूर्याचा पाठलाग चालविला होता अधारापासून प्रकाशाकडे असा आमचा प्रवास होता सुमारे तासभर मुंबईचाच संधिप्रकाश आमच्याबरोबर होता परतु आठ वाजल्यानतर अधार जाणवू लागला. सोनेरी क्षितिज पितळेचे, ताब्याचे व शेवटी लोखडाचे बनले शेवटच्या अर्धा पाऊण तास नुसता अधारच दिसत होता केवळ निळाशार समुद्र किंवा समुद्राचा आभास होता किंबहुना एका पोकळीतूनच आपण चाललो आहोत, असे वाटत होते एअर इडियाने जेवण फार छान दिले त्यामुळे रात्रीच्या जेवणाचा प्रश्न सुटला मुबईत रात्रीचे सव्वा नऊ वाजले होते तेव्हा मस्कतच्या सीब आतरराष्ट्रीय विमानतळावर मी उतरलो त्या वेळी तेथे पावणेआठ वाजले होते

## टॅक्सीवाल्यांची दादागिरी

विमानतळावर सामान तपासणीची कटकट नव्हती परतु बाहेर जाण्याचा गेटपास देणारा इसम मागून आलेल्या वशिल्याच्या लोकाना आधी मोकळे करीत बसल्याने मला ताटकळत राहावे लागले भारतीय दूतावासाचे श्री सेठ मला घेण्यासाठी आले होते, परतु ते असहाय्यपणे त्या प्रकाराकडे नुसते पाहातच राहिले इतर ठिकाणी

एअर इंडियाच्या अधिकाऱ्याची मला चांगली मदत झाली पण मस्कतला त्याचा कोणी अधिकारी मला भेटला नाही.

अखेर एकदाचे आम्ही बाहेर पडलो श्री सेठ यानी एक टॅक्सी ठरविली मला वाटेत एका हॉटेलात सोडून पुढे जावयाचे असे त्यानी त्या टॅक्सीवाल्याला सांगितले टॅक्सीवाला म्हणाला, " मी एकाच ठिकाणी जाईन दोन ठिकाणच्या दोन शिटा घेणार नाही " श्री सेठ यानी या प्रकारात होणाऱ्या पाच-दहा मिनिटाच्या खोळंब्यासाठी २०० बैझे ( सुमारे ५ रुपये ) जादा देण्याचे कबूल केले तरीही तो आपला हेका सोडीना म्हणून आम्ही टॅक्सीतून खाली उतरलो व सामान बाहेर काढून घेतले. तेथे दुसरी एक खासगी गाडी आली होती तिचे भारतीय मालक श्री सेठ याना ओळखत होते ते आम्हाला आपल्या गाडीतून घेऊन जाण्यास तयार झाले पण टॅक्सीवाल्याच्या दादाने त्याना दम भरला की या उतारूना तुम्ही नेऊ शकत नाही, नेण्याचा प्रयत्न कराल तर त्याचा फार वाईट परिणाम होईल त्याने तर आमचे सामानच हिसकावून घेतले वस्तुत: मूळचा टॅक्सीवाला इतर उतारूना घेऊन निघूनही गेला होता पण तो अडाणी दादा आम्हाला सोडायला तयार होईना म्हणून आम्ही एअर इंडियाच्या गाडीतून जाण्यासाठी फलाटाच्या दुसऱ्या टोकाला आपले सामान स्वतःच घेऊन गेलो सगळीकडे सामसूम झाल्याची खात्री पटताच ते भारतीय गृहस्थ आपली गाडी घेऊन तेथे आले, आणि एअर इंडियाची गाडी जाण्यास थोडा अवकाश असल्याने आम्ही चोरासारखी गुपचुप त्या गाडीतून स्वतःची सुटका करून घेतली आग्र्याहून शिवाजी महाराजाची सुटका झाली तेव्हा त्याना काय वाटले असेल, त्याची किंचित कल्पना मला आली या दांडगाव्याविरुद्ध पोलिसही काही करू शकत नाहीत, कारण ते नेहमीच स्थानिक लोकाची बाजू घेतात, असे समजले सर्वच आखात देशात ही स्थिती आहे तुमच्या गाडीवर एखाद्या स्थानिक इसमाची गाडी येऊन आदळली तरी त्या गुन्ह्याबद्दल तुम्हालाच जबाबदार धरून जबर शिक्षा ठोठावण्यात येते, असे म्हणतात. या साऱ्या गडबडीत साडे नऊ वाजून गेले विमानतळापासून मत्रा भागात असलेले हॉटेल सुमारे ३० किलोमीटर दूर होते तेथून खुद्द मस्कत शहर १० किलोमीटर. या ४० कि मी चे टॅक्सीचे भाडे ४ रियाल म्हणजे १०० रुपये आहे. चार उतारू असले तर प्रत्येकी १ रियाल पडतो हे अंतर सुमारे अर्ध्या तासात कापले जाते कारण एका वेळी चार मोटारी जाऊ शकतील असा प्रशस्त, दुहेरी, गुळगुळीत डांबरी रस्ता आहे सर्वच आखात देशातील रस्ते असे सुंदर आहेत उजव्या बाजूने वाहतूक चालते त्यामुळे प्रथम आपल्याला थोडे चमत्कारिक वाटते परंतु फार लौकर त्याला आपले डोळे सरावतात जाण्यासाठी व येण्यासाठी असे दोन स्वतंत्र रस्ते असल्याने गाडीचा वेग किमान ८० कि मी ठेवणे परवडते, किंबहुना अपरिहार्य

असते बहुतेक रस्ते सपाटीवरून, वाळवटातून जाणारे असल्याने खूप दूरवरचा मार्ग स्पष्ट दिसतो

## वैभवाचे प्रदर्शन

सामान्यत आखात देशातील सर्वच खासगी गाड्या आणि टॅक्सी वातानुकूलित असतात तेथील हवामान लक्षात घेता ते आवश्यकच असते तेथील घरेही वातानुकूलित असतात त्यामुळे घरातून बाहेर पडून मोटारीत बसेपर्यंतच काय तो उन्हाचा त्रास होतो पुन कचेरीत किंवा दुकानात, कारखान्यात प्रवेश केला की वातानुकूलन सुरू होते

परतु या वेळी हवा फार छान होती अगदी मुबईच्या चौपाटीसारखी गार वारा वाहात होता यामुळे गाडीच्या खिडक्या उघडून आम्ही चाललो होतो काही दिवसापूर्वी या भागात जोराचा पाऊस पडून गेला होता त्यामुळे तेथील हवा अपवादात्मकरीत्या थड होती कित्येक वर्षांत एप्रिल-मेमध्ये इतकी उत्तम हवा नव्हती, असे लोकानी सागितले

चौकाच्या जागी मोठेमोठे गोल तयार केलेले होते अशा काही गोलामध्ये पाण्याची रगीबेरगी कारजी दिसली त्याच्यामुळे त्या वाळवटाला एक आगळी शोभा आली होती एके ठिकाणी लग्नासारखी झगझगीत रोषणाई दिसली चौकशी केली असता समजले की, काही दिवसापूर्वी कुवैतचा राष्ट्रीय दिन साजरा झाला होता त्या वेळी दूतावासावर केलेली ती रोषणाई होती ती काढून घेण्याची जणू कोणालाच घाई नव्हती वैभवाच्या बटबटीत प्रदर्शनाचे ते एक मासुली उदाहरण म्हणता येईल

काही दिवसापूर्वी ओमानच्या सुलतानाचे लग्न झाले होते त्या वेळच्या रोषणाईची व इतर खर्चाची जी हकीगत ऐकली ती ऐकून मला फारसे आश्चर्य वाटले नाही सबध शहराला तीन दिवस चमचमीत जेवण देण्यात आले त्यासाठी भारतातून खास विमानानी हजारो मण मास व शेळ्यामेंढ्या नेण्यात आल्या होत्या त्याचे वर्णन करणाऱ्याच्या तोंडाला अजूनही पाणी सुटत होते

मी मोठ्या उत्साहाने नाना प्रश्न विचारीत होतो पण श्री सेठ हॉ, हूं करून उत्तरे देत होते त्याना जणू त्यात कसलाच रस नव्हता गाडीवाल्या मित्राकडूनच मला थोडीफार प्राथमिक माहिती मिळवावी लागली श्री सेठ याना माझ्या प्रवासाचे काहीच महत्त्व वाटत नव्हते अशा मुखस्तभाचा दूतावासाना काय उपयोग होत असेल कोण जाणे ! सुदैवाने इतर ठिकाणी मला बरेच बोलके लोक भेटले

## कॉर्निश हॉटेल

सर्वच आखात देशात राहण्याच्या जागेची टचाई हा सर्वांत मोठा प्रश्न आहे जी

संस्था किंवा कपनी तुम्हाला नोकरीसाठी बोलावते तिने तुमच्या निवासाची सोय केली नाही तर तुम्हाला आपल्या प्राप्तीचा अर्धा वाटा घरभाड्यापोटी द्यावा लागतो. त्यामुळे बहुतेक शहाणे लोक आधी निवासाची सोय असल्याची खात्री करून घेतात, आणि मगच या देशाना प्रयाण करतात अर्थातच येथे हॉटेलमध्ये जागा मिळविणे हाही एक पराक्रमच समजला जातो हॉटेलवाले इतके मग्रूर की दूतावासाच्या अधिकाऱ्यानाही त्याच्याशी लीनतेने वागावे लागते

मत्रा हा बृहन् मस्कतचा एक भाग नव्या बदराच्या काठाकाठाने वसलेला त्याचे इग्रजी स्पेलिंग Mutrah किंवा Muttrah असे करतात यावरून मला आपल्या मथुरेची आठवण झाली तेथील कॉर्निश या बऱ्यापैकी हॉटेलात माझी उतरण्याची सोय करण्यात आली होती आखात देशामध्ये परदेशी लोकाना जमीनजुमला किंवा घरे–दुकाने विकत घेण्याची परवानगी फारच क्वचित मिळते त्यामुळे सगळी हॉटेले स्थानिक अरबाच्या मालकीची आहेत मात्र ती चालविणारे बहुतेक परकीय आहेत. कॉर्निश हॉटेल चालविणारे गृहस्थ गोव्याचे ख्रिस्ती होते आणि इतर कामगारही गोवा किंवा मगळूरचे मुख्यतः ख्रिस्ती होते Corniche या फ्रेच शब्दाचा अर्थ डोगराकडे किंवा कड्याकडे तोड करून असलेला रस्ता मत्रा भागात डोगराची दाटी आहे त्या संदर्भात हे नाव देण्यात आले असावे त्याचे स्पेलिंग चुकीने Cornish असेही केले जाते परतु त्या शब्दाचा इग्लडमधील कॉर्नवाल जिल्ह्याशी संबध असल्याने तो शब्द येथे लागू पडत नाही येथील डोगर बाहेरून काळ्या फत्तराचे असल्याचा भास होतो परतु ते इतक्या भुसभुशीत मुरमाचे आहेत की साध्या बुलडोझरनेही ते भुईसपाट करता येतात तसे ते भुईसपाट करून रस्ते बनविण्याचे काम तेथे चालूच होते. समुद्राकाठीच ते डोंगर असल्याने त्याचा मुरूम समुद्रात लोटून रस्ता रुद करणे सहज शक्य होत आहे या डोगरामध्ये जुन्या सुल्तानानी बाधलेले किल्लेवजा राजवाडे दुरून छान दिसतात जुन्या काळी संरक्षणासाठी त्याचा चागला उपयोग होत असावा हे ते पाहताक्षणी लक्षात येते

अशा या पार्श्वभूमीवरील कॉर्निश हॉटेल तसे भर बाजारातच आहे समोर नवे बदर असून लहानमोठ्या आगबोटी तेथे नागरून पडलेल्या दिसतात.

ते तीन मजली हॉटेल तसे नवेच होते, परतु त्याच्यावर नवेपणाची झळाळी नव्हती प्रथम मला तिसऱ्या मजल्यावरची तीन खाटा असलेली खोली देण्यात आली होती. पण तिला जोडून स्नानगृह–शौचालय नव्हते त्यासाठी बाहेर जावे लागणार होते म्हणजे दर खेपेला खोलीला कुलूप घालावे लागणार; आणि इतर कोणी राहावयास आल्यावर आणखीच कटकट होणार काय करावे या विवचनेत मी होतो इतक्यात शेजारच्या खोलीतील श्री मोरारजी रतनसी टाटारिया नावाचे गुजराती गृहस्थ मदतीला

धावून आले. त्यांनी माझी अडचण ओळखली, आणि हॉटेलच्या व्यवस्थापकाला फोन करून मला दुसऱ्या मजल्यावरची २०३ नंबरची खोली देवविली श्री टाटारिया मुंबईचे बहरैनच्या एका व्यापारी कंपनीत व्यवस्थापनाचे काम करतात पगार दरमहा १० हजार रुपये शिवाय बंगला मोफत (तो भाड्याने घेतला तर ५ हजार रुपये पडतील !) ही प्राप्ती भारतातही आयकरापासून मुक्त असल्याने (आखात देशात तर आयकर नाहीच !) भरपूर शिल्लक पडते, असे त्यांनी सांगितले दोन-तीन दिवसात त्यांच्याशी इतकी गट्टी जमली की त्यांनी बहरैनला येण्याचे व स्वतःच्या घरी राहण्याचे आमंत्रण मला दिले, आणि तशी शक्यता नाही, हे दिसत असूनही मी ते आनंदाने स्वीकारले.

या हॉटेलचे दर त्या मानाने थोडे जास्त वाटले एका खाटेला रोज दर माणशी ८ ओमानी रियाल दोन खाटांच्या खोलीत एकच इसम राहिल्यास त्याबद्दल रोजी १४ रियाल बहुतेक सर्वच खोल्या दोन खाटांच्या असल्याने व माझ्यासाठी संपूर्ण खोली रिझर्व्ह केली असल्याने रोजी १४ रियाल म्हणजे ३५० रुपये दूतावासाला द्यावे लागणार होते त्यात फक्त सकाळची न्याहारी मिळणार होती इतर जेवणा-खाण्यासाठी मला पैसे द्यावयाचे होते पण दूतावासाकडून मला रोजचे सुमारे ६ रियाल मिळणार असल्याने तेवढ्यात कसे-बसे भागले असते शाकाहारी जेवण असे नव्हतेच मी जेव्हा स्नानगृहाबद्दल तक्रार केली तेव्हा हॉटेलचा भारतीय व्यवस्थापक मिस्किलपणे म्हणाला "अहो, संडासबाथरूम जितकी दूर असेल तितके आरोग्याच्या दृष्टीने चांगलेच नाही काय ?"

शाकाहारी न्याहारी इतकी भरपूर होई की दुपारच्या जेवणाची फारशी गरजच उरत नसे थोडेफार खाल्ले तरी भागत असे

# ३

# असा हा ओमान

दक्षिणेला अरबी समुद्र, पश्चिमेला तांबडा समुद्र व पूर्वेला इराणचे आखात अशा प्रकारे तीन बाजूंनी समुद्राने वेढलेला जो भाग भारताच्या पश्चिमेस आहे त्याला अरबस्तान किंवा अरबी द्वीपकल्प असे म्हणतात तांबडा समुद्र व इराणचे आखात हा वस्तुतः अरबी समुद्राचाच भाग आहे आता या इराणच्या आखाताचे नावही बदलले आहे त्याला अरब लोक अरबस्तानचे आखात म्हणतात कारण अरब देश व इराण याच्या मधोमध ते आहे या अरबी द्वीपकल्पामध्ये सऊदी अरबस्तान, ओमान, यमन ( दक्षिण व उत्तर ), संयुक्त अरब अमीरात, कुवैत, वगैरे देश आहेत त्यामुळे या सर्व देशाना मिळून आखात देश असे म्हणतात यापैकी सर्वात मोठा देश म्हणजे सऊदी अरबस्तान त्यानतर ओमानचा क्रमाक लागतो

अरबी द्वीपकल्पाच्या दक्षिण-पूर्व भागात सुमारे ३ लाख चौरस कि मी क्षेत्रफळाच्या ओमान देश आहे त्याच्या पूर्वेस अरबी समुद्र, पश्चिमेस सऊदी अरबस्तान, दक्षिणेस यमन व उत्तरेस सयुक्त अरब अमीरात हे देश आहेत या देशाचा मुसंदम नावाचा एक लहानसा प्रात अगदी उत्तरेला होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या काठावर आहे हा प्रात मूळ देशापासून वेगळा पडलेला आहे, कारण मुसंदम व ओमानची मुख्य भूमी यामध्ये संयुक्त अरब अमीरातीपैकी फुजरा हे राज्य आणि दुबई, रासल खैमा वगैरे राज्याचे काही भाग आलेले आहेत त्यामुळे ओमानला आपल्या या उत्तरेकडील प्राताशी समुद्रमार्गेच संबध ठेवावा लागतो अरबी आखात व ओमानचे आखात याच्या संगमावर हा प्रात असल्याने तो अत्यंत मोक्याचा भाग समजला जातो या देशाला सुमारे १७०० कि मी चा समुद्रकिनारा लाभला आहे अरबी द्वीपकल्पातील इतर देशापेक्षा ओमानचे एक वेगळेपण आहे. इतर देशाप्रमाणे येथेही फार मोठा भाग

वाळवटाने व्यापलेला असला तरी येथे पुष्कळच मोठमोठे डोंगर आहेत, आणि त्या उघड्या-बोडक्या डोंगरावर पडणारे पावसाचे पाणी अनेक झऱ्यांच्या रूपाने मुख्यतः उत्तर व दक्षिण भागात–जेथे हे डोंगर आहेत तेथे–वाहात असते या पाण्याला पाट बाधून ते शक्य तेवढ्या भागात खेळविले आहे, आणि त्यावर उत्तम शेती केली जाते. या पाटाना तेथे ' फलाज ' असे म्हणतात या फलाजाचे पाणी कधीच आटत नाही, एवढेच नव्हे तर कितीही कडक उन्हाळा पडला तरी त्या पाण्याची पातळी खाली जात नाही, हा एक निसर्गाचा चमत्कारच म्हटला पाहिजे अरबस्तान म्हणजे निव्वळ वाळवट, हा आपला समज अत्यत चुकीचा असल्याचे ओमानमध्ये फिरल्यानतर आपल्या लक्षात येते हे फलाज किती हजार वर्षांपूर्वी बाधले गेले आहेत, त्याची माहिती इतिहास सागत नाही ते फार प्राचीन असावेत, एवढेच आपण म्हणू शकतो वाळवटे व डोंगर वगळल्यास इतर जमीन चागली सुपीक आहे वाळवटात तेल सापडले आहे परतु ते फार काळ पुरेल इतके नाही सुमारे वीस वर्षातच ओमानचा तेलसाठा सपुष्टात येईल असे म्हणतात तोपर्यंत हाती येणाऱ्या सपत्तीचा उपयोग करून भूगर्भातील जास्तीत जास्त पाणी नलिकाकूपाच्या साह्याने वर आणावे आणि भूमीला सुजला सुफला बनवून अन्नवस्त्राच्या बाबतीत स्वावलबी व्हावे, अशी महत्त्वाकाक्षा आधुनिक ओमानने मनाशी बाळगली आहे

वर जी जमीन सुपीक आहे असे म्हटले आहे ती मुख्यतः मस्कतच्या उत्तरेस समुद्र व डोंगर याच्यामधील खलाटीची जी पट्टी ३५० किलोमीटरपर्यंत गेलेली आहे त्या भागात आहे या भागाला बातिना असे म्हणतात बातिना म्हणजे लपलेली. डोंगरानी झाकून टाकलेली भूमी या अर्थाने ते नाव त्या पट्टीला दिले गेले असेल किंवा बातिन म्हणजे हृदय या शब्दावरून, ते देशाचे हृदय आहे, असेही त्यातून सूचित करण्यात आले असेल अशीच एक अरुद पट्टी दक्षिणेस धोफार ( झुफार ) भागातही आहे या ठिकाणी लिंबवर्गीय फळे ( मुख्यतः मुसंबी ), कादे, लसूण, गहू, केळी, आबे, नारळ, घोडेघास ( लुसर्न ग्रवत ) याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते देशाच्या अतर्गत रूक्ष भागात जेथे मरुद्याने ( ओॲसिस ) आहेत तेथे आणि इतरही सर्वत्र खजुरीची झाडे होतात त्यांचा खजूर हेच या देशाचे प्रमुख पीक म्हटले पाहिजे

क्षेत्रफळाच्या बाबतीत जवळजवळ आपल्या महाराष्ट्राएवढा असणारा ( महाराष्ट्राचे क्षेत्रफळ ३,०७,७६२ चौ कि मी आहे ) हा देश, परतु लोकसंख्या मात्र सरकारी अदाजाप्रमाणे सुमारे १५ लाख आहे (बिगर सरकारी अंदाज १० लाखाच्या आस-पासच आहे ! ) म्हणजे महाराष्ट्रातील लोकसख्येची घनता दर चौ कि मी ला १६४ आहे, तर ओमानची फक्त ५ आहे परतु ही लोकसख्या मुख्यतः या सुपीक पट्टीतच एकवटलेली असल्याने तेथे आपल्याकडल्यासारखी लोकवस्तीची दाटी प्रत्ययास येते.

शहरात रोजगाराची संधी भरपूर आणि नव्या समृद्ध जीवनाचे आकर्षण यामुळे ग्रामीण भागातून शहराकडे लोकांचा ओघ चालू झाला आहे परंतु शहरातील आजच्या रोजगार संधी कायम टिकणार नाहीत, आणि शहरी जीवनाची चटक लागलेले अरब सुखासुखी खेड्यात परत जाणार नाहीत, हे ओळखून शेतीचे आधुनिकीकरण आणि उद्योगाचे विकेंद्रीकरण यावर सारे लक्ष आतापासूनच केंद्रित करण्याचे ओमान सरकारने ठरवले आहे, असे तेथील समाजकल्याणमंत्र्यांनी मला सांगितले आधुनिकतेतील दोष योग्य वेळी ओळखून त्यांच्या निराकरणाची तयारी आधीपासूनच करण्याइतका दूरदर्शीपणा ओमानच्या नेत्यात आहे, याची जाणीव त्यांच्याशी बोलताना आपल्याला हटकून होते

## उज्ज्वल भूतकाळ · आशादायक भविष्यकाळ

ओमान हा देश एकेकाळी अरबी समुद्रावर प्रभुत्व गाजविणारा एक बलाढ्य देश होता, याची माहिती आपल्यापैकी फारच थोड्यांना असेल

या देशातील अरबांच्या आगमनापूर्वी सांस्कृतिकदृष्ट्या याचा संबंध इराण–अफगाणिस्तानशी होता, असे विद्वानांचे मत आहे परंतु या कालखंडातील प्राग्ऐतिहासिक पुरावे अजून पुरेशा प्रमाणात उपलब्ध झालेले नाहीत मात्र इ स पूर्वी दुसऱ्या शतकात दक्षिणेकडून यमनी अरब आणि उत्तरेकडून निझारी अरब या देशात प्रविष्ट झाले आणि त्यांच्यात चकमकी उडू लागल्या तेव्हापासूनचा इतिहास बराचसा उपलब्ध आहे या बाहेरून आलेल्या अरबांनी ओमानला अरबी भाषा दिली, आणि त्यानंतर इस्लामची दीक्षाही त्याला मिळाली हजरत मुहम्मद पैगंबरांच्या हयातीत ज्या देशांनी इस्लामचा स्वीकार केला त्या सुरुवातीच्या देशामध्ये ओमान हा प्रमुख देश होता ( अरबीमध्ये याचा उच्चार ' उमान असा आहे )

इस्लामच्या स्वीकारानंतर चारशे वर्षेपर्यंत बातिना प्रदेशातील सुहार (Sohar) हे शहर ओमानचे प्रमुख नगर व आंतरराष्ट्रीय महत्त्वाचे बंदर होते ओमानचे नावाडी पूर्व आफ्रिका, भारत व चीनपर्यंत जात होते सोळाव्या शतकात युरोपीय सत्तांनी हिंदी महासागरावर प्रभुत्व स्थापन करीपर्यंत ओमानी व्यापारी या भागात मुक्तपणे व्यापार करीत होते भारताशी इस्लामच्या पूर्वीपासून ज्या अरब व्यापाऱ्यांचा संबंध होता ते प्रामुख्याने ओमानीच होते सोळाव्या शतकाच्या सुमारास पूर्व व पश्चिम यांना जोडणारे प्रमुख व्यापारी केंद्र म्हणून मस्कतचा उदय झाला होता त्यामुळे पोर्तुगीजांनी त्यावर कबजा मिळवला तेथे त्यांनी बांधलेले जलाली व मिरानी हे किल्ले आजही त्यांच्या राजवटीची साक्ष देत दिमाखाने उभे आहेत मस्कतखेरीज इतरही काही समुद्रकिनाऱ्यावरची शहरे पोर्तुगीजांनी जिंकून घेतली



ओमानच्या खेड्यातील बाजारात भाजी विकणारा दुकानदार ( पृष्ठ ४० )



कुवैत विश्वविद्यालयात
(पृष्ठ १५९)
[छाया श्रीपाद जोशी]



रुस्ताक जवळील दुवेरा गावचा सलीम सुलेमान अल हमामी आपली पत्नी व नातवंडे यांच्यासह
(पृष्ठ ५१)
[छाया श्रीपाद जोशी]



सामुदायिक मेजवानी, अबू धाबी (पृष्ठ ८१)



रस्ताक जवळील दुत्रेरा गावच्या सालिम सुलेमान अल हमामीच्या घरात जमलेल्या स्त्रिया व मुले (पृष्ठ ५१) [छाया श्रीपाद जोशी]



वाली आपल्या प्रजाजनाशी बातचीत करीत असताना (पृष्ठ ४४) [छाया श्रीपाद जोशी]



ओमानी पोषाख. (पृष्ठ २८)



शेख बदर बिन सालिम अल अब्री याच्याबरोबर लेखक (पृष्ठ ३४)



ओमानी मुले त्याच्या राष्ट्रीय पोषाखात ( पृष्ठ   २८ )

स

आपल्या या पराभवाचे उट्टे काढण्यासाठी ओमानी अरब एकत्र झाले, आणि त्यानी पोर्तुगीजाना मस्कतमधूनच नव्हे तर सपूर्ण ओमानी किनाऱ्यावरून हुसकून लावले ( इ स १६५० ). या वेळी पोर्तुगीजाचा असा दणदणीत पराभव झाला की ओमानी लोकानी त्याचा पाठलाग करून पूर्व आफ्रिकेच्या व बलुचिस्तानच्या किनाऱ्यावरील त्याच्या ताब्यातील अनेक ठिकाणे जिंकून घेतली. बलुचिस्तानच्या मकरान किनाऱ्यावरील ग्वादार हे बदर ओमानच्या सुलतानाने पाकिस्तानला ३० लाख डॉलरना १९५८ साली विकले तोपर्यंत तो प्रदेश ओमानी राज्याचाच भाग होता पोर्तुगीजावरील त्याच्या विजयाचे ते प्रतीकच होते, असे म्हणता येईल. अर्थात त्यामुळे आज ओमानमध्ये सर्वात अधिक परकीय बलुचीच आहेत अरबाचा केरळशी पूर्वापार सबध असल्याने केरळीय मोपला मुसलमानाची ओमानमधील मोठी संख्याही त्यामुळेच स्वाभाविक वाटते केरळमधील वाढती लोकसंख्या व रोजगाराची चणचण यामुळे सर्वच केरळीयामध्ये आपला प्रात सोडून परप्रातात व परदेशात जाण्याची प्रवृत्ती नेहमीच राहात आली आहे परतु अरबाच्या संपर्कामुळे केरळीय मुसलमान आखात देशामध्ये मोठ्या प्रमाणावर जाऊ शकले, हेही तितकेच खरे आहे

पोर्तुगीजावरील या विजयानंतर ओमानी गलबते अरबी समुद्र व हिंदी महासागर यावर मोठ्या प्रमाणात हालचाली करू लागली ओमानी साम्राज्य पूर्व आफ्रिकेच्या किनाऱ्याने झांजिबारपर्यंत पसरले परतु ब्रिटिश सत्तेचा भारतात उदय झाल्यानतर या ओमानी साम्राज्याला ग्रहण लागले १७९८ साली ओमानचा सुलतान सैयद सुलतान बिन अहमद याने ईस्ट इडिया कपनीशी पहिला तह केला, आणि त्याच्याकडून आपल्या व्यापाऱ्याना सरक्षण मिळविले. त्यानंतर ओमानला ब्रिटिशाशी असे अनेक तह करावे लागले, आणि आपले व्यापारी प्रभुत्व गमावावे लागले युरोपीय व्यापाऱ्यापुढे ओमानी व्यापारी निष्प्रभ ठरले.

पुढे १८५६ साली सुलतानच्या मुलामध्ये झांजिबारच्या मालकीवरून यादवी सुरू झाली तिचा परिणाम म्हणजे ओमानी साम्राज्यातून झांजिबार वेगळे झाले साम्राज्याची शकले पडली एक काळ असा आला की ओमानचे नावच मस्कत व ओमान असे पडले मस्कतच्या सुलतानाची सत्ता त्या शहराच्या परिसरापुरतीच मर्यादित राहिली व वेगवेगळे शेख ओमानमध्ये राज्य करू लागले. ओमान पुन. एकदा अधकार-युगात प्रविष्ट झाले ब्रिटिशाचे वर्चस्व संपूर्ण आखात प्रदेशाप्रमाणे ओमानवरही प्रस्थापित झाले. १९६४ साली ओमानमध्ये खनिज तेलाचा शोध लागेपर्यंत त्या देशाचे नावही लोकाच्या स्मरणातून पुसून गेले होते परतु इतर आखात देशाना तेलाच्या शोधाने जशी झटपट श्रीमती प्राप्त झाली तशी ती ओमानला प्राप्त झाली नाही याचे मुख्य कारण असे की, ओमानमधील तेल-साठा पुष्कळच मर्यादित आहे दुसरे कारण असे

की ओमानमधील तेल बंदरापासून खूपच दूर म्हणजे २७६ कि मी. अंतरावर आहे त्यामुळे स्वयंचलित नळप्रणाली बसविण्यासाठी प्रारंभिक खर्च खूपच आला आज त्या तेलविहिरींतून दररोज सुमारे ३,७५,००० बॅरल तेल निघते परंतु राज्याचा विकास-खर्च इतका प्रचंड आहे की हे उत्पन्नही कमी पडते यामुळे ओमानला सऊदी अरब-स्तान व कुवैत यासारख्या संपन्न राष्ट्राच्या मदतीवर बरीचशी भिस्त ठेवावी लागते. शिवाय दक्षिण यमनमधील कम्युनिस्ट राजवटीच्या गनिमी हल्ल्याना तोंड देण्यासाठी ओमानला संरक्षणावरही प्रचंड रक्कम खर्च करावी लागते

## रक्तहीन सत्तापरिवर्तन

सध्याच्या सुलतानाचा बाप सुलतान सईद बिन तैमूर सुधारणाचा कट्टर विरोधक होता त्याच्या काळात लोकाना घराबाहेर धूम्रपान करता येत नसे, रात्री दिवा घेतल्या-शिवाय बाहेर पडता येत नसे, अथवा घराच्या चार भिंतींतही संगीत ऐकता येत नसे स्त्रियाना बुरख्याने संपूर्ण शरीर झाकल्याशिवाय बाहेर पडता येत नसे शिक्षणामुळे नव्या कल्पनाचा प्रसार होतो म्हणून त्याला शिक्षणाचीच भीती वाटत असे त्याच्या काळात सबंध ओमानमध्ये फक्त तीन सरकारी प्राथमिक शाळा होत्या यावरून शिक्षणाची कशी पद्धतशीर गळचेपी सुलतानाने केली होती याची कल्पना येईल आपल्या मुलाचा म्हणजे सध्याच्या सुलतानाचा सुधारणेकडे असलेला ओढा लक्षात घेऊन पित्याने त्याला सलाला या दक्षिणेकडील शहरात जवळजवळ नजरकैदेत ठेवले होते, असे म्हणतात १९६४ साली झांजिबारमध्ये क्रांती झाली, आणि इतर आशियाई लोकाप्रमाणे ओमानी लोकानाही तो देश सोडून परागंदा व्हावे लागले हे सुशिक्षित लोक ओमानमध्ये गोंधळ माजवितील या भीतीने सुलतानाने त्याना देशात येऊ दिले नाही परंतु त्याच्यापैकी बहुतेक जण या ना त्या मार्गाने देशात प्रविष्ट झाले आज त्याच्यापैकी अनेकजण मोठ्या हुद्द्यावर आहेत ईजिप्तचे अध्यक्ष नासर व इतर साम्य-वादी राष्ट्रे याच्या पाठिंब्याने ओमानचा दक्षिणेकडील काही डोंगराळ भाग मातृभूमी-पासून १९५५ च्या सुमारास विभक्त झाला होता तेथील अनेक तरुण पूर्व युरोपीय देशात शिक्षण घेण्यासाठी गेले होते ते आता परत आले असून देशाच्या विकासाला हातभार लावीत आहेत या सगळ्या घडामोडी चालू असता सँढर्स्टला लष्करी शिक्षण घेतलेले सुलतान काबूस बिन सईद बिन तैमूर यानी ब्रिटिशाच्या साह्याने आपल्या पित्याला जुलै १९७० मध्ये पदच्युत करून स्वतःच्या हाती राज्याची सूत्रे घेतली त्या वेळी त्याचे वय ३० वर्षांचे होते

या रक्तहीन राज्यक्रांतीनतर ओमानचा जणू चेहरामोहराच पार बदलून गेला. ( राजवाड्यातील झटापटीमध्ये सुलतान तैमूर जबर जखमी होऊन लंडनच्या इस्पितळात

मरण पावला असे काही लोक म्हणतात, तर तो आधीच मेला होता, फक्त त्याचे निधन नंतर जाहीर करण्यात आले, असे काही लोकांचे म्हणणे आहे सईद बिन तैमूरचा बाप भारतात ( मुंबईत ? ) निधन पावला होता आपणही भारतातच मरावे अशी सईदची इच्छा होती परंतु त्यामुळे ब्रिटिशांची कारवाई उघडी पडली असती. म्हणून त्यांनी त्याला बळजबरीने इंग्लंडला नेले, अशी वदंता आहे या घटनेच्या बाबतीत सध्या तरी कोणी मोकळेपणाने बोलत नाही ! )

गेल्या पाच वर्षांत सुल्तान काबूस याच्या नेतृत्वाने या देशाने किती झपाट्याने प्रगती केली आहे, ते पाहिले की मन आश्चर्याने थक्क होते चार वर्षांपूर्वी या देशात फक्त तीन शाळा होत्या व त्यात ९०० विद्यार्थी शिकत होते. आता शाळांची संख्या १८० झाली असून विद्यार्थ्यांची संख्या पन्नास हजारावर गेली आहे राष्ट्रीय उत्पादन दुप्पट झाले व्यापार वाढला दवाखाने, इस्पितळे वगैरेंचे जाळे देशभर पसरले. काळ्याभोर डांबरी सडका व सीमेंटची लहानमोठी पक्की घरे यांची उभारणी खूप झपाट्याने होऊ लागली या नवनिर्मितीला हातभार लावण्यास इतर आशियाई देशा-प्रमाणे भारतही पुढे सरसावला डॉक्टर, इंजीनियर, आर्किटेक्ट, कारकून, मजूर, व्यापारी वगैरे सर्वच क्षेत्रामध्ये भारतीय अग्रेसर आहेत १९७० साली ओमानमधील भारतीयांची संख्या केवळ ८ हजार होती, ती आता ३२ हजार झाली आहे अर्थात येत्या ५–१० वर्षांत ओमानी लोक मुबलक प्रमाणात शिकून तयार होतील आणि या परस्थांना आपापल्या देशांना परत जावे लागेल, ही गोष्ट सर्वच मंडळी ओळखून आहेत

ओमानमध्ये सुन्नी व वहाबी पंथाचे मुसलमान बरेच असले तरी या देशाचा प्रमुख पंथ इबादी हा असून मुख्य इस्लामपासून सर्वांत प्रथम आपले वेगळेपण प्रस्थापित करणाऱ्या खारिजी पंथाची ती एक शाखा आहे निखळ धर्मनिष्ठा व शुद्ध चारित्र्य यांचा उग्र पुरस्कार करणारा आणि ज्या सत्ताधाऱ्यांमध्ये चारित्र्याचा अभाव दिसेल त्यांच्या सत्तेविरुद्ध बंड पुकारणारा आक्रमक खारिजी पंथ कालांतराने जवळजवळ नामशेष झाला त्यांचे जिहादचे तत्त्वज्ञान अधून मधून इतर पंथांचे लोकही स्वीकारतात, परंतु त्यांची तात्त्विक कट्टरता फारशी टिकली नाही इबादी त्या मानाने खूपच सौम्य प्रकृतीचा पंथ राहिला त्याने कधीही आक्रमक पवित्रा घेतला नाही यामुळेच ओमान-मध्ये इस्लामचे इतर पंथच नव्हे तर हिंदूसारखे इतर धर्मही गुण्यागोविंदाने नांदू शकले या देशाच्या इतिहासात हिंदूंवर जुलूम झाल्याचे आढळत नाही एवढेच नव्हे तर मस्कतसारख्या शहरात हिंदूंची देवळेही सुस्थितीत असल्याचे दिसून येते

असा आहे हा ओमान देश !

# ४

## राजदूतांशी भेट

दुसऱ्या दिवशी सकाळी भारतीय दूतावासात गेलो पूर्वी मस्कतला मुंबई सरकारची एक छान इमारत होती ती स्वतंत्र भारत सरकारने ब्रिटिश सरकारला विकली नसती तर आपला दूतावास त्या टुमदार इमारतीत दिसला असता पण सध्या आपला दूतावास जुन्या मस्कत शहरात, एका जुनाट वाड्यात आहे सारी घरे दाटीवाटीने एकमेकाना खेटून बसलेली आहेत. तेथे जाण्यासाठी सुलतानाच्या नव्या राजवाड्यावरून जावे लागते आधुनिक वास्तुशिल्पाचा आकर्षक नमुना म्हणून त्या राजवाड्याकडे बोट दाखविले जाते मुंबईच्या शापूरजी पालनजी या स्थापत्य संस्थेने तो बाधला आहे, हे समजले की तो बाहेरूनच पाहताना आपल्या अगावर मूठभर मास चढल्यासारखे वाटते रुवी भागातील ' धार्मिक अध्ययनकेंद्र ' ही नवी कोरी वास्तूही अशीच आकर्षक असून ती डोडसाल प्रा लि या भारतीय कपनीने उभारली आहे भारतीयाच्या स्थापत्यकौशल्याला ओमानमध्ये भरपूर वाव मिळतो, असे दिसते दूतावासात जाऊन भारतीय राजदूत श्री निर्मल जीत सिंग याच्याशी ओमानची परिस्थिती व माझा दौरा यासंबधी चर्चा केली श्री सिंग शीख असले तरी शिखाप्रमाणे त्यानी दाढी राखलेली नाही अथवा ते शिखाचा पारपरिक पोषाखही वापरीत नाहीत त्याच्याशी बोलत असताना त्याच्या सखोल अध्ययनाची व व्यापक वाचनाची छाप आपल्यावर पडल्याशिवाय राहात नाही बोलता बोलता त्यानी आपल्या कपाटातून ओमानसबधी तीन-चार जुने-नवे ग्रंथ काढून माझ्या हातात दिले आणि ते म्हणाले, " मधल्या वेळात तुम्ही हे चाळून पाहा पाश्चात्त्य लेखकानी या प्रदेशावर किती परिश्रमपूर्वक लिखाण केल आहे त्याची ओझरती कल्पना तुम्हाला या पुस्तकावरून येईल " त्यापैकी ' दि कट्रीज अड ट्राइब्स ऑफ दि पर्शियन गल्फ '—ले एस् बी. माइल्स या पुस्तकाची पहिली आवृत्ती

१९११ साली निघाली होती त्याला नवीन विस्तृत प्रस्तावना लिहून श्री जे वी केली यानी १९६६ साली त्याची दुसरी आवृत्ती प्रकाशित केली आहे दुसरे पुस्तक १९६७ साली प्रसिद्ध झालेले ' ओमान सिन्स १८५६ ' हे असून त्याचे लेखक रॉबर्ट जेरान लँडेन हे आहेत मी ही पुस्तके वाचण्यासाठी बरोबर घेतली

माझ्या प्रवासाचा उद्देश ऐकल्यावर श्री सिंग म्हणाले, " येथील लोकाच्या सास्कृतिक जीवनाचा अभ्यास करण्यासाठी या देशात आलेले तुम्ही पहिलेच भारतीय लेखक आहात सामान्यतः पत्रकारच इकडे येतात आणि थातुरमातुर, वरवरची माहिती घेऊन निघून जातात त्याना मुख्यतः राजकारण–अर्थकारणात रस असतो जनतेच्या जीवनाची ओळख करून घेण्यात त्याना स्वारस्य नसते अर्थात ते त्याचे क्षेत्रही नव्हे लेखकानीच करायच ते काम आहे तुमच्यासारखे लेखक अधिकाधिक प्रमाणात इकडे येतील तर दोन्ही देशातील लोकामध्ये आत्मीयता निर्माण होण्यास त्याची चागली मदत होईल इकडील लोकानाही भारतात नेल पाहिजे परतु अजून इथ लेखक–पत्र-कार तयार व्हायचे आहेत आता कुठ शिक्षणाला सुरुवात झालीय युरोपात शिकून आलेल्याचा ओढा पाश्चात्त्य सस्कृतीकडे आहे, आणि भारतीयानीच पाश्चात्त्याच अधानुकरण चालविल असल्यामुळ त्याच्याबद्दल या पिढीला मुळीच आकर्षण वाटत नाही. स्थानिक जुन्या लोकाच्या मनात भारताबद्दल आदर आणि प्रेमही आहे. कदाचित त्याच्यातील जी तरुण मुल इथ शिक्षण घेऊन मोठी बनतील त्याना भारता-बद्दल आपलेपणा वाटू लागेल. सध्या मधली स्थिती चालू आहे पण देशाच नेतृत्व ज्या बुद्धिमताच्या हाती आहे, त्याना भारताच वैचारिक मोठेपण कळलेल आहे इथल्या मत्र्याना तुम्ही भेटाल तेव्हा त्याच्या बुद्धीची चमक आणि भारताबद्दल त्याना वाटणारा जिव्हाळा याची तुम्हाला कल्पना येईल ओमानसमोर आर्थिक समस्या नाही. त्याना जादा माणसे हवीत–कामगार बनण्यासाठी त्यमुळे कुटुबनियोजनाचा विचार त्याना भेडसावत नाही भिकाऱ्याचा प्रश्न त्यानी चुटकीसरशी सोडवला सगळे भिकारी गोळा केले; त्याना वातानुकूलित घर दिली, आणि प्रत्येक कुटुबाला दरमहा ३५ रियाल ( सुमारे हजार रुपये ) भत्ता सुरू केला; आणि भिकाऱ्याची समस्या सुटली " आता क्वचित एखाद्या मशिदीच्या दाराशी भिकारी दिसतो पण तो नुसता गप्प बसलेला असतो, कारण उघडपणे भीक मागणे येथे गुन्हा आहे तो भारतीय उपखडातील एखाद्या देशाचा रहिवासी असतो

## सुलतानांचे भारतीय मित्र

खिमजी रामदास या नावाची एक भारतीय पेढी शभर वर्षांपासून ओमानमध्ये व्यापार करीत आहे या पेढीच्या मुबईत व गुजरातेतही शाखा आहेत. तिचे वयोवृद्ध

मालक श्री गोकुळदास खिमजी त्या वेळी तेथे होते त्यांची मुख्य कचेरी भारतीय दूतावासाजवळच आहे त्यांना भेटून जुन्या-नव्या ओमानसंबंधी मी माहिती मिळवावी म्हणून श्री सिंग यांनी मला त्यांच्याकडे पाठविले मोठे उमदे व कर्तबगार गृहस्थ वाटले ते म्हणाले, “ माझ्या वडिलांनी ही पेढी सुरू केली माझा जन्म इथलाच. १९०१ सालचा माझं शिक्षण फारसं झालेलं नाही पण १९१५ पासून मी ही पेढी सांभाळली १९७१ साली मी निवृत्त झालो. आता फक्त विचारतील तेव्हा सल्ला देतो माझा एक मुलगा अजितपाल हा ओमानचा नागरिक बनला आहे अलीकडे ओमानचं नागरिकत्व मिळणं फार अवघड झालं आहे, पण सुलतानाशी आमचे संबंध नेहमीच मैत्रीचे राहिल्यामुळं आम्हाला नागरिकत्व मिळवण्यास अडचण पडली नाही. इथल्या प्रत्येक दुकानात किंवा कारखान्यात एक तरी स्थानिक ओमानी भागीदार असलाच पाहिजे, असा कायदा आहे आता माझा मुलगाच ओमानी बनल्यामुळं आम्हाला अरब ओमानी भागीदार घ्यावा लागणार नाही त्याचा दुसरा भाऊ भारतीय आहे तो त्याचा भागीदार जुन्या धंद्यांना स्थानिक लोकांचा हिस्सा ३५ टक्के आणि परस्थांचा ( भारतीयांचा ) हिस्सा ६५ टक्के अशी सवलत आहे नवीन धंदा सुरू करणाऱ्यासाठी स्थानिक लोकांचा वाटा ५१ टक्के आणि परस्थांचा ४९ टक्के ठेवावा लागतो आमच्या या पेढीत ६०० भारतीय आणि सुमारे २०० स्थानिक लोक काम करतात. संबंध देशभर आमच्या पेढीच्या शाखा आहेत आम्ही मुख्यतः आयात-निर्यातीचं काम करीत असलो तरी बांधकामाचाही बराच मोठा भाग त्यात आहे बरीचशी सरकारी बांधकामं आम्ही केली आहेत आजचे लोक पूर्वीच्या सुलतानाला नावं ठेवतात. त्यानं ओमानला जगापासून दूर, अंधारात ठेवलं हे खरं आहे पण त्याचं प्रजेशी वर्तन फार चांगलं होतं देशानं एकदम पाश्चात्यांचं अनुकरण न करता हळूहळू प्रगती करावी असं त्याचं म्हणणं होतं आमच्याशी त्याचे संबंध फारच सलोख्याचे होते नवा सुलतानही फार चांगला माणूस आहे रस्ते, दळणवळण, शिक्षण याबाबतीत त्यानं खूप झपाट्यानं प्रगती घडवून आणली आहे त्याच्यामुळं ओमानचा जगाशी संबंध जोडला गेला पण तोही वृत्तीनं धार्मिकच आहे. रुवीला त्यानं जी नवीन मशीद बांधायला काढलीय ती पुरी झाल्यावर तिच्या जवळचं सिनेमाचं थिएटर तो जमीनदोस्त करणार आहे, आणि त्याबद्दल पुरेपूर नुकसानभरपाईही देणार आहे, कारण सिनेमाच्या गोंगाटामुळं नमाजात व्यत्यय येतो गेल्या शंभर वर्षांत आमच्या पेढीनं पाहिलेला हा पाचवा सुलतान इथले स्थानिक लोक आमच्याशी फार चांगले वागतात. आमच्यावर त्यांचा खूप विश्वास आहे आता झांजिबार वगैरे ठिकाणाहून नवीन ओमानी लोक आले आहेत त्यांना भारतीय लोक आपले स्पर्धक वाटतात. त्यामुळे वातावरण थोडं बदललंय परंतु जोपर्यंत सुलतानाचा आमच्यावर विश्वास आहे

तोपर्यंत आम्हाला काही त्रास होणार नाही पाकिस्तान आमचे संबंध बिघडविण्याचा प्रयत्न सतत करीत असते परंतु इथल्या लोकांचा भारताशी–विशेषतः मुंबईशी–फार प्राचीन संबंध असल्यामुळे पाकिस्तानला फारसं यश येत नाही तरीपण आता भारत–पाकिस्तानचे संबंध सुधारू लागले आहेत, त्याचा इथल्या वातावरणावर फार अनुकूल परिणाम होईल इथल्या भारतीय शाळेला आम्ही पुष्कळ मदत केली आहे कच्छ-मध्येही आम्ही शिक्षणप्रसाराला बराच हातभार लावला आहे ''

भारतातील आणीबाणीविषयी बोलताना श्री गोकुलदास खिमजी म्हणाले, "इथल्या लोकांची पहिली प्रतिक्रिया आणीबाणीला अत्यंत प्रतिकूल होती परंतु आता ती अनुकूल होत आहे आणीबाणीने देशात पुष्कळ सुधारणा घडवून आणलीय, यात शंका नाही मात्र ही आणीबाणी कायम टिकता कामा नये कारण त्यातून हुकूमशाही निर्माण होण्याची शक्यता असते आणि जगात हुकूमशाही कधीच यशस्वी होत नसते ''

अर्थात मला राजकीय चर्चा टाळावयाची असल्याने मी तो विषय तेथेच थांबविला खिमजी रामदास ही फर्म ओमानमध्ये खूप प्रतिष्ठित समजली जाते तिच्या कर्मचाऱ्यामध्ये मराठी मंडळीही असल्याचे समजले कच्छी मालकामुळे कच्छी–गुजराती लोकांची संख्या अधिक असणे स्वाभाविकच आहे पण त्यांच्या बरोबरीने राजस्थानी, पंजाबी, मंगळूरी, केरळीय वगैरे लोकही तिच्यात काम करीत असल्याचे पाहून बरे वाटले.

## उष्माघाताचा धोका नाही

.थोडा वेळ उन्हातून हिंडलो समुद्रकाठचा गार वारा वाहात असल्याने मुंबईच्या चौपाटीवरून फिरत असल्यासारखे वाटले. या प्रदेशात १२० अंशापर्यंत तापमान चढते, परंतु उष्माघाताने ( सनस्ट्रोकने ) एकही मृत्यू होत नाही, असे समजले याचे कारण मुख्य वस्ती समुद्राच्या काठाकाठाने असल्याने हवेत दमटपणा असतो, आणि वाराही वाहात असतो कदाचित अरबांच्या पोशाखात डोके झाकण्याची सोय असल्यानेही उन्हापासून संरक्षण होत असावे दूतावासाच्या गाडीतून माहिती मंत्रालयात जाऊन मी काही अधिकाऱ्यांना भेटलो व त्यांच्याकडून प्रकाशित माहिती–साहित्य घेऊन परत आलो माहिती मंत्रालयाची नवी कोरी पण टुमदार दुमजली इमारत एका लहानशा टेकडीवर असून तो भाग कुरुम या नावाने ओळखला जातो याच भागात सर्व देशांचे दूतावास आपापले इमले उभारू लागले आहेत त्यामुळे लौकरच हा वैराण दिसणारा भाग गजबजून जाईल यात शंका नाही

## एका जेवणाचे ८५ रुपये

दुपारी हॉटेलात शाकाहारी जेवण घेतले पुलाव, वरण व अनेक भाज्या किंवा

उसळी ( सर्व डबाबंद पदार्थांच्या ) असा बेत होता परंतु जेवणाचे समाधान लाभले नाही त्यात पुनः तेवढ्याचे ४५ रुपये बिल झाल्याचे पाहिल्यावर उरले-सुरले समाधानही नाहीसे झाले मी येथे सहा रात्री राहणार, असा हिशेब करून दूतावासाने मला जेवणा-खाणाच्या खर्चासाठी ३८ रियाल ( ७२० रुपये ) दिले तेवढ्यात सारा खर्च भागवावयाचा आहे रुवी या भागात राहणारे पुण्याचे श्री गोखले यांच्याकडे सायंकाळी जेवण केले ते व श्री दामले ( प्रभातच्या फत्तेलाल-दामल्यांचे चिरंजीव ) हातानीच स्वयंपाक करतात येथे बाजारात तंदुरीसारखी नान नावाची परातीएवढी चपाती ( रुपयाला एक ) विकत मिळते ती चांगली भाजलेली असल्याने रुचकर लागते. नान, भात व मटार उसळ असा मराठी बेत असल्याने पोटभर जेवल्यासारखे वाटले

ओमानमध्ये भारतीयांना असुरक्षित वाटते, दूतावासाचे लोक भारतीयांच्या हिताकडे लक्ष देत नाहीत, वगैरे नेहमीच्या तक्रारी येथे ऐकावयास मिळतात त्यात थोडेफार तथ्य असण्याची शक्यता आहे परंतु भारतीय मंडळी अनेक बेकायदा गोष्टी करतात व त्यातून दूतावासाने आपल्याला सोडवावे, अशी अपेक्षा बाळगतात, असे दूतावासाकडून समजले एक उदाहरण मी स्वतःच पाहिले मुंबईचा एक कारागीर गलबतातून मस्कतला आला होता ज्याने त्याला बोलावले त्याचा पत्ता त्याला मिळेना त्याचे आगमनच बेकायदेशीर होते तो दूतावासात आला आणि गयावया करू लागला अखेर त्याला परत पाठविण्याची सोय दूतावासाला करावी लागली

## पुरस्कर्त्यांचे महत्त्व

या संदर्भात एक महत्त्वाची गोष्ट नमूद केली पाहिजे आखात देशामध्ये कोणीही आपल्या मर्जीने नोकरीधंद्यासाठी जाऊ शकत नाही त्याला तिकडे बोलावणारा कोणी तरी हवा असतो अशा इसमाला स्पॉन्सर ' असे म्हणतात आपण त्याला हमीदार किंवा पुरस्कर्ता म्हणू हा हमीदार स्थानिक अरबच असला पाहिजे त्याचे प्रतिनिधी भारतात असतात ते मजूर व कारागीर गोळा करून ते आखात देशांना निर्यात करतात शेळ्या-मेंढ्यांच्या निर्यातीसारखीच ही निर्यात समजता येईल, आणि त्यामध्ये मजूर, इंजीनियर, डॉक्टर यात फारसा भेदभाव केला जात नाही मजुराला मिळणाऱ्या प्राप्तीत हमीदाराचा वाटा असतो मजुराला रोज ४ रियाल मिळाले तर त्यांपैकी १ रियाल हमीदाराला द्यावा लागतो अशा प्रकारे एखाद्या हमीदाराने शंभर मजूर किंवा कारागीर आणले तर त्याला घरबसल्या रोज अडीच हजार रुपये मिळत राहतात या देशातील संपत्ती समाजाच्या खालच्या थरापर्यंत कशी झिरपत जाते, याचे हे एक उदाहरण होय अर्थात हे अडीच हजार रुपये सर्वच्या सर्व त्याच्या हातात पडतात असे

नाही कारण या कामासाठी त्याला आपली माणसे नेमावी लागतात, त्याच्यावर खर्च करावा लागतो मजुरांना प्रवासखर्च द्यावा लागतो सुरुवातीला त्याची व्यवस्था पाहावी लागते त्याच्याकडून ठरलेला हप्ता वसूल करण्यासाठी माणसे नेमावी लागतात, वगैरे. या हमीदाराला कायद्याने फार व्यापक अधिकार दिलेले आहेत त्याने आपली हमी काढून घेतली तर मजुराला परत जावे लागते याच्या उलट मजुराला परत जावयाचे असेल किंवा एक काम सोडून दुसरे काम धरावयाचे असेल तर त्यासाठी हमीदाराची परवानगी घ्यावी लागते कराराची मुदत संपण्यापूर्वी त्याला देश किंवा काम सोडता येत नाही कित्येकदा तर कराराची मुदत संपल्यावरही त्याला सहजासहजी मुक्त होता येत नाही जुन्या काळी मुदतबंदीचे जे भारतीय मजूर मॉरिशस वगैरे देशात नेले जात असत त्याच्याशी तुलना करिता या मजुराची स्थिती पुष्कळच चागली आहे परंतु गुलामगिरीत फारसा फरक पडलेला नाही. एका मराठी डॉक्टराची मस्कतच्या एका हमीदाराने कशी नाकेबंदी व ससेहोलपट केली होती, त्याचे वर्णन मी त्याच्याच ताेंडून ऐकले होते त्या वेळी माझ्या अंगावर काटा उभा राहिला होता ही जर चागल्या, सुशिक्षित, मुबईकर डॉक्टराची कथा तर सामान्य मजुराची काय अवस्था असेल त्याची कल्पनाच करावी ! आणि इतके असूनही तिकडे जाण्यासाठी लाखो लोक राग लावून भारतात उभे आहेत !

## पोस्टमन नाही

आखात देशामध्ये आपल्याला टपाल वाटणारा पोस्टमन कुठेही दिसत नाही; कारण तेथे टपालाचा वटवडा घरोघर जाऊन करण्याची पद्धत नाही प्रत्येकाला एक पोस्ट-बॉक्स नंबर दिला जातो. ज्याने त्याने पोस्टात जाऊन आपल्या जवळच्या किल्लीने आपला कप्पा उघडायचा आणि आपले टपाल घेऊन जावयाचे काही वर्षांपूर्वी तर हीही सोय नव्हती आठवड्यातून एकदा किंवा दोनदा भारताची बोट येई. त्या वेळी ज्याचे पत्र येणार असेल त्याने टपाल कचेरीत जाऊन हजर व्हावयाचे. पोस्ट मास्टर लिलाव बोलल्याप्रमाणे पत्रावरील नाव वाचून दाखवी आणि ज्याचे ते पत्र असेल तो ते घेऊन जाई देशातल्या लोकामध्ये पत्रव्यवहाराची आवड व जरूर अजूनही फारशी निर्माण झाली नसावी, असे वाटते या पद्धतीमुळे सर्वात मोठी अडचण अशी निर्माण झालेली आहे की इतरत्र पोस्टाच्या पत्त्यावरून आपण जसा त्या व्यक्तीचा ठावठिकाणा शोधून काढू शकतो तसे तेथे करता येत नाही हल्ली शहरे नव्याने वसविली जात असल्याने घराचा ठावठिकाणा निश्चित करणे अवघड जात असेल हे खरे, परंतु पूर्वी जेव्हा शहराच्या वस्त्या निश्चित होत्या तेव्हाही पत्राचा वटवडा का केला जात नसावा ? कदाचित पत्रव्यवहारच फार मर्यादित असावा वाढता

पत्रव्यवहार ही आधुनिकतेची एक खूणच समजता येईल

पोस्टात जाऊन चौकशी केली तेव्हा समजले की फक्त तिकिटे शिल्लक आहेत कार्डे, पाकिटे, एरोग्राम वगैरे सगळे संपले होते टपाल कचेरीत इतका शुकशुकाट मी पूर्वी कुठे पाहिला नव्हता इमारत मात्र अगदी अद्ययावत, रुबाबदार होती येथून भारतात पत्रे जायला दोन-दोन महिने लागतात, आणि कधी-कधी तर ती मुक्कामाला पोचतच नाहीत, असे कळल्यावरून मी सुखरूप पोचल्याचे घरी कळविण्याची निराळी व्यवस्था मला करावी लागली

सकाळी ४ ला कोंबड्याची बांग ऐकली व पाठोपाठ मुअज्जिनची बांग कानावर आली (नमाजासाठी मशिदीत येण्याची हाक देणाऱ्याला मुअज्जिन म्हणजे अजॉ (बांग) देणारा असे म्हणतात ) दिवसभर लाउडस्पीकरवरून बांग ऐकू येत असते परंतु फक्त म्हातारी मंडळीच मशिदीत पाच वेळा नमाज पढायला जातात, तरुण मंडळी बहुधा आठवड्यातून एकदाच, शुक्रवारी नमाज पढतात असे समजले

## आदर्श वाहतूक व्यवस्था

ता २७ रोजी काहीच काम झाले नाही म्हणून माहिती खात्याकडून मिळालेली पुस्तके वाचण्यात आणि बंदरावर भटकण्यात वेळ घालविला

येथील मोटार चालविण्याची पद्धत आदर्श समजता येईल मोटारीचा ॲक्सिडेंट हा येथे भयंकर गुन्हा समजला जातो आणि तो करणाऱ्याला तावडतोब तुरुंगात डांबले जाते त्यामुळे प्रत्येकजण सावधगिरीने मोटार चालवितो रस्ता दुहेरी असला तरच पुढच्या गाडीला मागे टाकून तुम्हाला पुढे जाता येते ( ओव्हरटेक करता येते ). कारण एका दिशेने दोन-तीन मोटारी एका वेळी जाऊ शकतील एवढा तो रस्ता रुंद असतो परंतु काही ठिकाणी, विशेषत डोंगराच्या कडेने अजून आपल्याकडल्या-सारखा एकेरीच रस्ता आहे तेथे कोणत्याही परिस्थितीत तुम्ही पुढच्या मोटारीला मागे टाकू शकत नाही तुम्हाला रांगेनेच जावे लागते रांगेतील एखादी गाडी नादुरुस्त होऊन अडली तर मागच्या सगळ्या मोटारी थांबून राहतात पोलिस येऊन क्रेनच्या साह्याने ती गाडी बाजूला काढतील तेव्हाच रांगेतील गाड्यांना पुढे सरकता येते भर रस्त्यात गाडी उभी करण्याची सक्त मनाई आहे- ज्याला वाटेत थांबावयाचे असेल तो रस्त्याच्या बाहेर जाऊन गाडी उभी करतो वळणावर आधी दिसणाऱ्या गाडीला पुढे जाऊ द्यावे लागते यामुळे ताशी ८०–९० कि मी वेगाने जाऊनही सामान्यत: अपघात घडत नाहीत (इतके असूनही अरब ड्रायव्हराच्या रॅश ड्रायव्हिंगमुळे अपघात होतात, असेही ऐकण्यात आले, परंतु माझ्या पाहण्यात मात्र एकही अपघात आला नाही !)

दूतावासाचा भारतीय मुसलमान ड्रायव्हर मोठा तरबेज आहे कट्टर धार्मिक वृत्तीचा नमाजाच्या वेळा कटाक्षाने पाळणारा पण ओमानी मुसलमानाबद्दल त्याचे मत फारच प्रतिकूल दिसले ते अत्यत आळशी व अविश्वसनीय असून धर्मपालनाच्या बाबतीत फार बेफिकीर आहेत, त्याच्या तुलनेने भारतीय मुसलमान कितीतरी अधिक चागले व धर्मनिष्ठ आहेत, असे तो म्हणाला असेच मत पुण्याचा एक तरुण सैयद नजीर यानेही मजजवळ व्यक्त केले तो धार्मिक प्रवृत्तीचा असून तबलीग ( धर्मप्रचार ) आदोलनाशी सहानुभूती बाळगणारा आहे तो मला म्हणाला, " खरा इस्लाम भारतातच आहे भारतीयामध्ये जी माणुसकी आहे तिचा लवलेशही मला ओमानमध्ये आढळला नाही पाकिस्तान्याच्या बाबतीत तर माझा पूर्ण भ्रमनिरास झाला आणि ही गोष्ट तुम्ही भारतात जाऊन तिथल्या लोकाना अवश्य सागा की पाकिस्तानी हे अत्यत नीच वृत्तीचे असून आम्हा भारतीयाना ते तुच्छ लेखतात स्वतःच्या स्वार्था-खातर ते कुणाचाही गळा कापायला मागेपुढे पाहायचे नाहीत तुम्ही जेवत असलात तर तुमच्या तोंडचा घासही ते काढून घेतील अर्थात हे सार पजाबी पाकिस्तान्याना लागू आहे. त्याच्या या स्वार्थीपणामुळेच बगाली फुटून निघाले. आणि आता सिंधी, बलुची, पठाण वेगळे होऊ पाहत आहेत इथे भेटणारे बिगर पजाबी पाकिस्तानी सागतात की भुट्टो असेपर्यंतच पाकिस्तान टिकेल त्याच्यानतर उर्वरित पाकिस्तानचीही छकले पडतील. " मी त्याला म्हणालो, " सगळे पजाबी सारखेच—मग ते हिंदू असोत, शीख असोत की मुसलमान असोत. म्हणून तर पाकिस्तानी पजाब्याना इतर पाकि-स्तान्यापेक्षा भारतीय पजाबी जास्त जवळचे वाटतात "

## एकलेपणाची जाणीव

तसे परदेशात सर्वांनाच एकलेपणा सतावत असतो पण या अरब देशात राहणाऱ्या भारतीयाना तो जास्त जाणवतो कारण अरब लोक इतराशीच नव्हे तर आपल्या लोकाशीही फटकूनच वागतात एका अरबाच्या घरात दुसरा अरबही बैठकीच्या खोलीपलीकडे जाऊ शकत नाही त्यामुळे स्नेहाचे वातावरण तयार होण्यास अडकाठी येते. सैयद नजीर म्हणाला, " इथ मन लागत नाही पण पैसा मिळवायचा तर इथ राहिलच पाहिजे इथ मी 'बँक मिल्ली ईरान' मध्ये काम करतो. मला दरमहा १३० रियाल पगार मिळतो त्यातले १० रियाल घरभाड्यात जातात. आम्ही १८ जणानी मिळून चार खोल्याचा एक ब्लॉक भाड्याने घेतलाय त्याचे भाडे आहे १८० रियाल ( ४५०० रुपये ) इतर खर्च ६०–७० रियाल होतो. म्हणजे दरमहा ५०–६० रियाल शिल्लक पडतात. वर्षाकाठी २० हजार रुपये शिल्लक पडतील पगार वाढला की ही शिल्लक वाढेल, आणि ४–५ वर्षांत सहज एक लाख रुपये शिल्लक पडतील तेवढी

रक्कम जमली की भारताला परत जायच आणि त्या पैशावर काहीतरी उद्योगधदा करायचा अस मी ठरवलय " असे सागणारे बरेच लोक मला या प्रवासात भेटले. मात्र त्यात आनदापेक्षा गरजेचीच भावना अधिक दिसली गल्फ हॉटेलमध्ये रिसेप्शा-निस्ट म्हणून काम करणारा एक बागलादेशी मुसलमान तरुण उदास स्वरात म्हणाला, " पैसा इथ भरपूर मिळतो पण कधी–कधी मनात विचार येतो, At what cost ? त्या पैशापायी आम्ही किती किमत मोजतो, याचा विचार मनात आला की मन उदास होत तारुण्याच्या उमेदीचे दिवस असे मातृभूमीच्या विरहात काढल्यानतर जीवनात जगण्यासारख काही उरलेल तरी असेल काय ?" बगाली माणसाची भावनाप्रधानता यातून उणी केली तरी सर्वसामान्य लोकाना हा विदेशवास फारसा सुखकर होत नसावा असाच माझा ग्रह झाला विशेषत. विवाहित पुरुषाना पत्नी व मुलेबाळे यापासून दूर राहण्यात खूपच मानसिक कष्ट होत असले पाहिजेत इग्लड–अमेरिकेत राहणाऱ्या लोकाना हा एकलेपणा फारसा सतावत नाही, असे म्हणतात खरेखोटे देव जाणे ! विवाहित लोकाची अडचण मोठी विचित्र असते बिऱ्हाड केले तर पैसा शिल्लक पडत नाही, मुलाच्या शिक्षणाची आबाळ होते, बायकाना एकलकोंडेपणा सहन करावा लागतो, आणि एकटे राहिले तर आपलेच मन लागत नाही

इथल्या बाजारपेठेतून जाताना एक मजेदार दृश्य दिसले शुक्रवारी दुपारनतर सगळे भारतीय-पाकिस्तानी-बागला देशीय एका विशिष्ट ठिकाणी गोळा होतात एक-मेकाना भेटतात आणि दोन सुखदु.खाच्या गोष्टी करून एकमेकाचा निरोप घेतात त्या वेळी सरकारी कचेऱ्या व दुकाने वगैरे सर्वच बंद असल्यामुळे ती वेळ सर्वांना सोयीची असते

## अरबांचा स्वाभिमान भाषा व पोषाख

आखात देशात फिरताना आपल्याला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे अरबाचा स्वाभिमान आपली अस्मिता किंवा अनन्यता ( आयडेंटिटी ) टिकवून ठेवण्याचा त्याचा प्रयत्न आपल्या डोळ्यात भरतो मत्र्यापासून सत्र्यापर्यंत आणि रावापासून रकापर्यंत सर्वांनी आपला राष्ट्रीय पोषाख कटाक्षाने कायम ठेवला आहे खाली लुगी, वर गाऊनसारखा पाढरा डगला आणि डोकीला रुमालाप्रमाणे गुडाळलेला टॉवेल किंवा चादरीसारखा कपडा यापैकी डगल्याला ' दिशदाशा ' व डोकीवरील फडक्याला ' मसार्र ' किंवा ' चिताया ' असे म्हणतात त्यात पुनः प्रत्येक देशाचे वेगवेगळे वैशिष्ट्य असतेच ओमानचे लोक कमरेला कातडी पट्टा आवळतात त्यात नक्षीकाम केलेला व चादीच्या म्यानात बद केलेला खजीर असतो स्त्रियाचा पोषाख म्हणजे सुरवार, कुडता व ओढणी हा असतो बहुतेक सर्वच देशात बुरख्याची प्रथा

असल्यामुळे स्त्रियांचे चेहरे क्वचितच पाहायला मिळतात संयुक्त अरब अमीरातीमधील पुरुष डोकीवर एक मोठे फडके ठेवून त्यावर काळ्या दोरीने दोन वेढे देतात या दोरीला ' अकाल ' किंवा ' ॲकाल ' असे म्हणतात ' अक्ल ' ( अक्कल ) या शब्दा-पासून हा शब्द बनला आहे मुलगा वयात आल्यावरच ही दोरी गुंडाळू लागतो म्हणजे त्याला अक्कल आल्याची ती खूण असते असाच पोषाख सऊदी अरबस्तानचे पुरुष करतात मात्र तेथे रंगीत फडकेही वापरण्याचा रिवाज आहे कुवेताचा राष्ट्रीय पोषाखही जवळजवळ असाच आहे कोणत्याही देशात डोके उघडे ठेवण्याची प्रथा नाही या देशात सूट-पॅट, किंवा मॅनिला घातलेला अरब तुम्हाला दिसला की तो ईजिप्त, जॉर्डन, लेबॅनॉन वगैरे देशातला आहे, हे हमखास ओळखावे आपल्या या विशिष्ट पोषाखामुळे अरब लोक आंतरराष्ट्रीय संमेलनामध्ये कसे उठून दिसतात ते आपण वृत्तपत्रातील चित्रात पाहतोच

भाषेच्या बाबतीत अरबांचा स्वाभिमान तर अगदी वाखाणण्यासारखा आहे त्यांचा सारा राज्यकारभार अरबीत चालतो अर्थातच शिक्षणाचे माध्यम अरबीच आहे. अरबीतून विज्ञानाचे शिक्षण घेतल्याने आपले काही अडेल, अशी भीतीही त्यांना वाटत नाही त्यांचे अनेक उच्च पदस्थ अधिकारी फक्त अरबी जाणणारेच असतात इंग्रजी सत्तेच्या सावलीखाली राहूनही या लोकांनी इतक्या लौकर इंग्रजीच्या गुलामगिरीतून आपली सुटका करून घेतली, हे पाहून आपल्याला त्यांचे कौतुक वाटते ( अर्थात भारताप्रमाणे त्यांच्यावर प्रत्यक्ष इंग्रजी सत्ता नव्हती आणि भारताप्रमाणे तेथे अनेक भाषांची अडचणही नाही, ही गोष्ट मान्य केलीच पाहिजे ) भाषेच्या बाबतीत जपानी लोकांशी अरबांचे बरेच साम्य आहे जपानी लोकही आपल्या भाषेला असेच चिकटून राहिले आहेत मात्र त्यांनी पाश्चात्त्य पोषाख–निदान घराबाहेर तरी–पूर्णपणे स्वीकारला आहे

## प्राथमिक शाळेतील चुणचुणीत मुले

मस्कतमधील एक प्राथमिक अरबी शाळा पाहायला मी गेलो. अरबी भाषेचा तास चालू असलेल्या एका वर्गात मी गेलो शिक्षक व मुले उत्साही व चुणचुणीत वाटली. शाळेच्या आवारात खूपच स्वच्छता व टापटीप दिसली सगळ्याच आखात देशात शिक्षणावर खूप खर्च केला जात आहे कारण या विद्यार्थ्यांमधूनच भावी प्रशासक निर्माण होणार आहेत, याची जाणीव राज्यकर्त्यांना आहे वर्गात गेल्याबरोबर मुले उभी राहून सुलतान काबूस यांचा जयजयकार खड्या सुरात करतात या मार्गाने त्यांच्यावर राजनिष्ठा बिंबविण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला जात असावा

या शाळेत एक विशेष गोष्ट पाहावयास मिळायची मुख्याध्यापक एक काळा हबशी

गृहस्थ होता आणि त्याच्या हाताखाली गोरेपान अरब काम करीत होते अरबामध्ये वर्णभेदाचे प्रस्थ विशेष नसल्याचे समजले अर्थात गोरा रंग त्यानाही प्रिय आहे, परंतु काळ्या रंगाला दूर लोटण्याची त्याची वृत्ती नाही यमन, सूदान, अल्जीरिया वगैरे देशातील काळे अरब या आखात देशामध्ये मोटमोठ्या हुद्द्यावर असल्याचे आढळून आले

प्राथमिक शाळेत वापरली जाणारी अरबी भाषेची पाठ्यपुस्तके मला हवी होती, म्हणून चौकशी केली असता समजले की या देशात कतारहून पाठ्यपुस्तके येतात मुलाना सरकारतर्फेच पुस्तके, वह्या वगैरे पुरविण्यात येतात ती बाजारात विकत मिळत नाहीत वर्षअखेर असल्याने शाळानी आपल्याजवळची पुस्तके सरकारात परत केली होती सारांश, मला पुस्तके मिळाली नाहीत

## पुरातत्त्वशास्त्रीय संग्रहालय

ओमानचे पुराणवस्तुसंग्रहालय माहिती व संस्कृती मंत्रालयाच्या आवारातच असल्याने ते सहजासहजी पाहून घेता आले आखात देशाची सरकारे पुरातत्त्व संशोधनाकडे किती जिव्हाळ्याने लक्ष देत आहेत ते पाहिले की गमत वाटते जणू त्याना जगाला हे दाखवून द्यावयाचे आहे की आम्ही कोणी तेलामुळे श्रीमंत झालेले उठवळ नवश्रीमंत नसून खरे, खानदानी श्रीमंत आहोत, आम्हालाही वैभवशाली इतिहास आहे त्यामुळे अगदी इस्लामपूर्व काळात जाऊन ते पोचतात या संदर्भात मला पाकिस्तानी विद्वानाचे स्मरण झाले श्री भुट्टो अधिकारावर येण्यापूर्वी रेडिओ पाकिस्तानवर मी एक चर्चा ऐकली होती त्या चर्चेत काही विद्वान अट्टाहासाने असे प्रतिपादन करीत होते की, "पाकिस्तानचा इतिहास १९४७ नंतरच सुरू होतो, त्यापूर्वीच्या इतिहासाशी आमचा काही संबंध नाही म्हणून मोहनजोदडोची मातब्बरी आम्हाला वाटता कामा नये " सुदैवाने श्री भुट्टो यानी ही भूमिका मान्य केली नाही, आणि आता मोहनजोदडो हे पाकिस्तानचे एक गौरवास्पद स्थान समजले जाते याच्या उलट आखात देशानी आपला इतिहास कधीच नाकारला नाही त्यातील पराभवही दडविले नाहीत. त्यामुळे सोळाव्या शतकात पोर्तुगीजानी बांधलेले डोंगरी किल्लेही ओमानी लोक अभिमानाने दाखवितात ओमानमध्ये इ स पूर्वी ३० हजार वर्षापासून मानवी वस्ती असल्याच्या खाणाखुणा सापडल्या आहेत. त्या काळातली दगडी हत्यारे या संग्रहालयात पाहावयास मिळतात त्यानंतर इ स पूर्वी ८ हजार वर्षापासून या देशात इराणी लोकानी पाण्याचे पाट बांधून काढले तेही अभिमानाने दाखविले जातात पुरातन काळातील कबरी, जुन्या नौका, प्राचीन लिपीतील शिलालेख वगैरे जे काही मिळाले ते सारे त्यानी जपून ठेवले आहे जुनी नाणी, हत्यारे, हस्तलिखिते, कलाकुसरीच्या

वस्तू वगैरेही मोठ्या प्रमाणावर तेथे पाहावयास मिळाल्या शिंग, डफ, तुणतुणे यासारखी भारतीय वाद्याशी मिळतीजुळती वाद्ये, घरगुती वस्तू जुनी घरे, त्यात वारा खेळण्यासाठी केलेल्या खास सोयी ( विंड टॉवर्स ), किल्ले व त्यातील सोयी, भिंती व छते यावरील कलाकुसर यासारख्या गोष्टी छायाचित्रे व लघुप्रतिकृती याच्या साह्याने त्यानी जपून ठेवल्या आहेत नुकतेच उभारलेले हे संग्रहालय बाह्यतः अगदी कोरे करकरीत आहे पण त्यातील वस्तू मात्र शेकडो वर्षांपूर्वीच्या आहेत त्या पाहून मन प्रसन्न होते.

## श्री अँथनी ॲश्वर्थ यांची मुलाखत

ता २८ रोजी माहिती व संस्कृती मन्त्र्याचे वैयक्तिक सल्लागार श्री अथनी ॲश्वर्थ याच्याशी बरीच खेळीमेळीची चर्चा झाली मी त्याना पहिलाच प्रश्न असा विचारला की, " माझ्यासारख्या लेखकाकडून या देशाच्या काय अपेक्षा आहेत ? " यावर ते म्हणाले, " या देशासंबधी खरी माहिती तुमच्याकडून तुमच्या लोकाना कळावी, एवढीच आमची माफक अपेक्षा आहे पाच वर्षांपूर्वीपर्यंत या देशाचा बाहेरच्या जगाशी माहितीच्या दृष्टीन जवळ जवळ काहीच संबध नव्हता खर म्हणजे इतर देशाना ज्याबद्दल माहिती मिळविण्याची इच्छा व्हावी, अस इथं काही घडतच नव्हत आता हा देश बाह्य जगाला मोकळा झाल्यापोसून जे काही अद्‌भुत घडतय ते तुम्ही तुमच्या वाचकासमोर माडा ज्याच्याजवळ परपरेच प्रचड सामर्थ्य असत तेच लोक एवढा मोठा अकस्मात परिवर्तनाचा आघात सहन करू शकतात. त्या सामर्थ्यामुळच इथले लोक आपल्या मूलभूत गोष्टी न सोडता नवीन सुधारणा पचवू शकले आहेत. इथ तुम्हाला दारुडे आढळणार नाहीत नव्या सुधारणाबरोबर येणार हे प्रतिष्ठित व्यसन त्यानी कटाक्षान दूर ठेवलय या लोकाच्या मनात स्त्रियाविषयी असीम आदर आहे, कुटुबाविषयी जिव्हाळा आहे यामुळ जुनी एकत्र कुटुबपद्धती इथ टिकून राहिली आहे तस पाहिल तर ओमानी संस्कृती ही अरब सस्कृतीचाच एक भाग आहे तरीपण तिचही थोडफार वेगळेपण आहेच ते लोकाच्या मनावर ठसविण्यासाठी नुकतच आठ दिवसापूर्वी सास्कृतिक वारसा टिकवून टेवण्याकरिता राष्ट्रीय वारसा ( heritage ) मत्रालय ' स्थापन करण्यात आलय. "

मी दुसरा प्रश्न असा विचारला की, " ओमान आणि भारत याच्यातील स्नेहभाव अधिक दृढ करण्यासाठी भारताला काय करिता येईल ? " यावर ॲश्वर्थसाहेब म्हणाले, " या बाबतीत भारताला खूपच अनुकूल स्थिती आहे भारताविषयी इथल्या लोकाना पूर्वीपासूनच जिव्हाळा वाटत आलेला आहे इथल्या जनतेला मदत करण्याच्या भावनेन सदाचारी, जबाबदार लोक इकडे येतील तर त्याचा फार चागला प्रभाव पडेल.

भारतीय पत्रकाराना इकडे पाठवून इकडील सत्यस्थितीचं दर्शन भारतीय जनतेला घडवावं आणि इथल्या पत्रकाराना तिकडे पाठवून भारताच्या प्रगतीची माहिती इथल्या लोकाना करून द्यावी इथं अजून स्थानिक साहित्यिक, कलावंत फारसे निर्माण झालेले नाहीत जसजसा शिक्षणाचा प्रसार होत जाईल तसतसे ते तयार होत जातील त्याच्या साहित्याचे अनुवाद भारतीय भाषात प्रसिद्ध झाले पाहिजेत भारतीय लेखक-कलावंताशी त्याच्या गाठीभेटी होऊ शकतील अशा सोयी दोन्ही देशानी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत सध्या झूफर ( धोफार ) ला काही कवी आहेत पण अजून ते विकासाच्या अवस्थेतच आहेत त्याना व्यापक मान्यता मिळालेली नाही ”

मी विचारले, “ इथल्या लोकाच्या धर्मभावनेवर नव्या सुधारणाचा कितपत परिणाम झाला आहे ? त्याच्या आधुनिकीकरणाची प्रक्रिया कोणत्या अवस्थेत आहे ?” यावर ते म्हणाले, “ इथल्या लोकावर नव्या सुधारणाचा फारसा परिणाम झालेला नाही तरुण, वृद्ध सर्वांमध्येच धर्माविषयी जिव्हाळा आहे, कळकळ आहे त्याची नैतिक भावना खूपच उच्च दर्जाची आहे याच एक कारण अस की इथले सुलतान तरुण असूनही धर्माच्या बाबतीत अत्यत कडक आहेत ते स्वत' दारू पीत नाहीत किंवा धूम्रपानही करीत नाहीत त्यानी स्वतःच्या खाजगी खर्चानं इस्लामी तत्त्वाच शिक्षण देणारी एक मोठी सस्था चालविली आहे या सर्वांचा परिणाम जनतेच्या वागणुकीवरही झाला आहे ”

मी एक जरा अडचणीचा प्रश्न विचारला “ एकदम पैसा मिळाल्यामुळं इथले लोक आळशी बनले आहेत, असं मी ऐकलय त्यात कितपत तथ्य आहे ? याला उदाहरण म्हणून मला असं सागण्यात आल की पूर्वी एक इसम दिवसभरात खजुरीच्या दहा झाडावर पराग-सेचनाच* काम ( pollination ) करीत असे आता पूर्वीच्या चौपट मजुरी मिळत असूनही तो दिवसातून फक्त दोन तीन झाडावरच पराग-सेचन करतो हे खर आहे काय ? ”

या प्रश्नाचे सरळ उत्तर न देता श्री ॲश्वर्थ यानी सामान्य विवेचनच केले. ते म्हणाले, “ इथल्या लोकाना वेळेचं भान अस पूर्वी कधी नव्हतच अजूनही या देशात ६०–७० टक्के लोक भटक जीवनच जगतात भटक्याना वेळेच बधन असत नाही त्यामुळ त्याना अजून नव्या जमान्याशी जुळवून घेता आलेल नाही त्यानी यत्रे अशी पाहिलीच नव्हती तेव्हा तत्रज्ञान कुठून असणार ? यामुळ बदरावर काम करायला पाकिस्तानी मजूर आणावे लागले आता परिस्थिती हळूहळू बदलत आहे ”

*खजुरीच्या झाडावर फुलातील पुकेसर व स्त्रीकेसर याचा मिलाप घडवून आणण्याचे काम माणसाला करावे लागते, ही माहिती मला ओमानमध्येच मिळाली.

मी त्याना विचारले, " समाजसुधारणेविषयी इथले लोक काही विचार करतात काय ? स्त्रीमुक्तीचा एवढा डंका नुकताच जगभर पिटला गेला, त्याचे काही पडसाद इथं उमटले काय ? द्विभार्याप्रतिबंधासारखी जी पुरोगामी पावलं ईजिप्तसारख्या पुढार-लेल्या अरब राष्ट्रानी उचलली आहेत तसं काही करण्याची इच्छा इथल्या लोकामध्ये आहे काय ? "

यावर श्री ॲश्वर्थ यानी दिलेले उत्तर नकारात्मकच होते ते म्हणाले, " सध्या तरी त्या दिशेनं काही घडून येईल असं वाटत नाही पण स्त्रियामध्ये शिक्षणाचा प्रसार खूप झपाट्यानं होतो आहे. शिक्षणाच्या द्वारेच स्त्रीमुक्ती होण्याची शक्यता मला दिसते आता इथल्या तरुण मुलींना लग्नापेक्षा करिअर महत्त्वाची वाटू लागलीय पोलिस,* नर्स, डॉक्टर वगैरे पेशात त्या प्रवेश करीत आहेत. हळूहळू त्या एकपत्नीत्वाच्या कायद्याची मागणी करू लागतील शिवाय पुढारलेल्या अरब देशातून ज्या स्त्रिया इथं कामा-साठी आल्या आहेत त्यांच्या मुक्त जीवनाचाही परिणाम इथल्या स्त्रीपुरुषावर पडल्या-शिवाय राहणार नाही, हे उघड आहे "

भारत–पाकिस्तानची तुलना हा या देशात एक नाजूक विषय असतो सहसा त्याबाबतीत कोणी मोकळेपणाने बोलायला तयार नसतो पण मला त्या विषयात रस असल्याने मी अनेकाना तो प्रश्न विचारला तसा तो ॲश्वर्थसाहेबानाही विचारला मी म्हटले, " ओमानी लोक मुसलमान असल्यामुळ त्याचा भारतापेक्षा पाकिस्तानकडे अधिक ओढा आहे, असं म्हणता येईल काय ?"

यावर ते म्हणाले, " ते खरं नाही भारतीय आणि इंग्रज याच्याशी ओमानी लोक फार आपलेपणानं वागतात माझा स्वतःचाच तसा अनुभव आहे खरी गोष्ट अशी आहे की ओमानी लोक चाणाक्ष, व्यवहारवादी आहेत ते रोजच्या व्यवहारात धर्माचा काही संबंध येऊ देत नाहीत त्यामुळे पाकिस्तानकडे त्याचा ओढा असण्याचं कारणच नाही "

एक शेवटचा प्रश्न : " ओमानपुढील मुख्य समस्या कोणत्या ? " श्री ॲश्वर्थ म्हणाले, " राजकीय बाबतीत साम्यवादी आक्रमणाची टांगती तलवार ही ओमानची सर्वांत महत्त्वाची समस्या आहे क्यूबा, रशिया, पूर्व जर्मनी याच्या पाठिंब्यानं दक्षिण यमननं आतापर्यंत ओमानच्या प्रदेशावर हल्ले केलेच होते आता इराण-ब्रिटनच्या मदतीनं ते आक्रमण थोपवून धरण्यात आलं आहे तरी कम्यूनिझमचा छुपा प्रचार चालूच

* स्त्री-पोलिस असलेला ओमान हा आखात प्रदेशातील एकमेव देश ओमानी स्त्री पोलिस नेमबाजीत व शस्त्रास्त्राशिवाय आत्मसरक्षण करण्याच्या कलेत प्रवीण समजल्या जातात

आहे ~ या परिस्थितीमुळ अर्थव्यवस्थेवर फार ताण पडतो देशाच्या अदाजपत्रकातल्या खर्चापैकी ४४ टक्के रक्कम सरक्षणावर खर्च होते यावरून या समस्येची कल्पना तुम्हाला येईल. या खर्चामुळ विकासासाठी पुरेसा पैसा उपलब्ध होऊ शकत नाही सामाजिक दृष्ट्या सर्वात मोठा प्रश्न म्हणजे शिक्षणाचा अभाव या देशात पूर्वी जवळ-जवळ ९० टक्के निरक्षरता होती ती आता झपाट्यान कमी होत आहे. साक्षरतेच प्रमाण आता ३० टक्क्यापर्यंत आल आहे जसजसे भटके लोक स्थायिक होत जातील तसतसा शिक्षणाचा प्रसार झपाट्यान होऊ लागेल आणि मग देशाच्या साऱ्या गरजा स्थानिक सुशिक्षित लोक भागवू शकतील. त्यासाठी परदेशातून शिक्षित लोक आणावे लागणार नाहीत "

## शेख बद्र बिन सालिम अल अब्री यांची मुलाखत

या मुलाखतीनतर लागलीच जनसंपर्क विभागाचे संचालक ( Director of Public Relations ) शेख बदर बिन सालिम अल अब्री याची मुलाखत झाली. ॲस्वर्थ व शेख बदर ही जणू दोन टोके होती एक पाश्चात्त्य-विद्या-विभूषित गोरा साहेब तर दुसरा इग्रजीचा गंध नसलेला, निझवा येथील इस्लामी शिक्षणकेंद्रात केवळ अरबीतून इतिहास व अरबी भाषा याचे परंपरागत पद्धतीचे शिक्षण घेतलेला सावळा अरब नेहमी परदेशी लोकाशी ज्या खात्याचा संबंध यावयाचा ते खाते कोणतीही परदेशी भाषा न येणाऱ्या व्यक्तीने साभाळावयाचे, ही कल्पनाच माझ्या इग्रजी भाषेच्या गुलामगिरीत वाढलेल्या मनाला मोठी चमत्कारिक वाटली. म्हणून मी त्याना पहिलाच प्रश्न हा केला की, " इग्रजीच ज्ञान नसताना एवढी मोठी जबाबदारी आपण कशी काय पेलू शकता ? आपल्याला काही अडचण वाटत नाही त्यात ? " यावर ते किंचित हसून म्हणाले, " त्यात कसली अडचण ? स्वत ची भाषा, पोषाख आणि जीवन शुद्ध अरबी ठेवण्याचा आग्रह असला की सारं काही जमत आता आपण दोघे दुभाष्याच्या मदतीने विचारविनिमय करणार आहोतच की ! तसंच इतर वेळी घडत मला तर कसलीच अडचण वाटत नाही " आता भाषा, पोषाख व जीवन शुद्ध अरबी ठेवल्यामुळे हे सारे कसे घडू शकते, याचा मला काही नीट बोध झाला नाही. पण त्याचा अर्थ मी एवढाच घेतला की माणूस कर्तबगार असला, कामाची आवड आणि शिस्त असली की भाषेची अडचण फारशी त्रासदायक होत नाही नाहीतरी जगात बहुतेक सर्वच देश आपापल्या भाषात राज्यकारभार व लोकव्यवहार चालवीत

* ओमानच्या सैन्यात ब्रिटिश व पाकिस्तानी अधिकारी मोठ्या प्रमाणावर असल्याचे मी ऐकले होते !—लेखक

नाहीत काय? इग्रजी वटवृक्षाच्या सावलीत वाढल्यामुळे आम्हा भारतीयाना इग्रजी-शिवाय आपले कसे होईल, या कल्पनेने कापरे भरते हे खरे, पण जग पाहून आल्या-वर ही भीती कशी हास्यास्पद आहे, तेही आपल्याला कळते.

मी दुसरा प्रश्न विचारला, " ओमानच्या इस्लामवर आधुनिकतेचा काय परिणाम होईल असं आपल्याला वाटत ? "

यावर ते म्हणाले, " वस्तुत तसा काही परिणाम होण्याची गरज नाही, आणि तसा तो होऊ नये, अशीच आमची खटपट राहील आधुनिकतेच्या प्रवाहात वाहून जाण्याची आमची इच्छा नाही "

भारतीय मुसलमानाना अखिल भारतीय लोकप्रवाहात कसे आणावयाचे, आपण कुणी वेगळे आहोत, ही त्याची भावना नाहीशी होऊन आपण भारतीयच आहोत, ही जाणीव त्याच्यात कशी निर्माण करावयाची हा देशभक्त भारतीयाना सतत भेडसाव-णारा एक प्रश्न आहे त्याची थोडीशी कल्पना शेख बदर याना देऊन मी म्हणाले, " भारतीय मुसलमान इस्लामशी एकनिष्ठ राहूनही भारतीय जीवनाशी कसे समरस होऊ शकतील ? " यावर ते म्हणाले, " भारतीय मुसलमानाची मला माहिती नाही. परतु खरा इस्लाम मानवमात्रावर प्रेम करायला शिकवतो म्हणून भारतीय मुसल-मानाची इस्लामनिष्ठा खरी असेल तर त्यानी अन्य भारतीयावर प्रेम करायला शिकलं पाहिजे तसं झाल तर वेगळेपणाची भावना नाहीशी होऊन ते भारतीय जीवनाशी समरस होतील "

यातूनच ज्या प्रश्नाचे उत्तर मिळते तो प्रश्न केवळ नेहमीच्या सवयीनुसार मी त्याना विचारला, " भारतीय आणि पाकिस्तानी याच्यात तुम्ही काही भेद करता काय ? " ते लागलीच उत्तरले, " मुळीच नाही आमचा धर्म आमच्यापुरता आहे इतरानी कोणता धर्म मानावा किंवा पाळावा, हा त्याचा प्रश्न आहे "

" भारताच्या बाबतीत आपल्या काय अपेक्षा आहेत ? " मी विचारले.

" भारत एवढा मोठा देश आहे की, त्याला दुसऱ्यावर अवलबून राहण्याची गरज नाही त्यान स्वावलबी बनाव, एवढीच माझी इच्छा आहे भारतीय लोक ओमानी लोकाना जुन्या काळापासून ओळखतात त्याच्या आतिथ्यशीलतेचाही आम्हाला अनुभव आहे ते ही मैत्री अधिक दृढ बनवितील, असा मला विश्वास वाटतो " ते म्हणाले.

शेख बदर मोठे शात, प्रेमळ, हसतमुख व सौम्य वृत्तीचे वाटले त्याच्या गभीर आवाजातून चिंतनशीलतेचा प्रत्यय येत होता अशा या सात्त्विक पुरुषाने 'भारतान स्वावलबी बनाव ' अशी इच्छा व्यक्त केली तेव्हा तिच्यात काही खोच असेल, रशिया-वरील त्याच्या अवलबित्वाकडे तो इशारा असावा, असे मला वाटले नाही.

## श्री मादद अल कावी यांची मुलाखत

शेख बदर याचे वैयक्तिक सहायक व जनसपर्क सचालनालयाचे चिटणीस श्री मादद अल कावी याच्याशी परिचय झाल्यानतर जीवनाविषयी गभीरपणे विचार करणारा हा एक अनुभवी मध्यमवगाय आहे, अशी छाप माझ्यावर पडली, आणि त्याच्याशी दोन-तीनदा बोलल्यावर ती छाप बरोबर असल्याचे माझ्या प्रत्ययास आले श्री अल कावी हे विश्वविद्यालयीन शिक्षणासाठी इंग्लंडला गेले होते तेथून ते सुट्टीत घरी आले असता जुन्या सुलतानाने त्याना इंग्लडला परत जाऊ दिले नाही त्यामुळे त्याना पदवी मिळविता आली नाही परतु पदवी न मिळाल्याने त्याच्यात काही उणीव राहिली आहे असे वाटत नाही त्याची कार्यकुशलता तर वाखाणण्यासारखी आहे प्रत्येक काम ठरल्यावेळी व झटपट झाले पाहिजे, अशी या पस्तिशीच्या तरुणाची धडपड असते

आपल्या चुलत्याच्या औषधोपचारासाठी ते काही दिवसापूर्वी मिरजेला आले होते, आणि तेथून बेंगळूरपर्यंत फिरून आले होते म्हणून मी त्याना विचारले, " भारतीय लोक तुम्हाला कसे काय वाटले ? " ते म्हणाले, " भारतीय माणूस सरळ, निष्कपट स्वभावाचा आहे त्याचा धर्म कोणताही असला तरी त्याच्यात माणुसकी जास्त असल्याच मला आढळून आल सागली, मिरज, कोल्हापूर, बेंगळूर, जिथजिथ मी गेलो, तिथतिथ मला भारतीयाच प्रेमच मिळाल मी परदेशी नि परधर्मीय म्हणून कुणीही माझा तिटकारा केला नाही याच्या उलट कराचीच्या विमानतळावर मी एक रात्रच राहिलो पण तिथला अनुभव अगदी खेदजनक आहे आमच्या विमानात जे गोरे, युरोपियन प्रवासी होते त्याची हाजी-हाजी करण्यातच तिथले पाकिस्तानी अधिकारी मग्न होते आम्हाला त्यानी फार तुच्छतेन वागवल आमची मैत्री ते लोक गृहीतच धरून चालतात त्याना वाटत, त्याचा-आमचा धर्म एक असल्यामुळ आम्ही त्याच वाटेल तसल वागण सहन करू पण आम्हाला धर्मापेक्षा माणुसकी जास्त प्यारी आहे, हे त्याना कळत नाही "

मी म्हणालो, " हे ठीक आहे. पण भारतीयाकडून तुमच्या काय अपेक्षा आहेत ?"

ते म्हणाले, " आम्ही विकासाच्या क्षेत्रात नुकताच प्रवेश केला असल्यामुळ आम्हाला सर्वच बाबतीत सहकार्य हवं आहे भारत स्वतः कष्ट करून खडतर जीवन जगतो आहे म्हणून त्याला आमच्याबद्दल सहानुभूती वाटली पाहिजे आम्हालाही ग्रामीण जनतेची गरिबी हटवायची आहे, दैन्य नाहीस करायच आहे त्यासाठी प्रत्यक्ष काय करायला हवं त्याबाबतीत भारत आम्हाला मार्गदर्शन करू शकेल पैशाशिवाय जगायला भारतीय शिकले आहेत तेलाचा साठा सपल्यावर आम्हालाही पैशाशिवाय जगाव लागणार आहे ते कस जगायच ते त्यानी आम्हाला शिकवाव."

श्री मादद अल काबी याचा हा मुद्दा मला मोठा गमतीदार व त्याचबरोबर विचारणीय वाटला मग मी त्याना ओमानी लोकाबद्दलच एक नाजूक प्रश्न विचारला मी म्हणालो, " स्थानिक ओमानी लोक सरळ, सज्जन आहेत, पण झांजिबार वगैरे ठिकाणाहून आलेले ओमानी लबाड, स्वार्थी आहेत ते भारतीयाचा द्वेष करतात, असं मी ऐकलय. याबाबतीत तुमच काय मत आहे ? "

ते म्हणाले, " हे बाहेरून आलेले ओमानी फारच थोडे आहेत त्याची फिकीर भारतीयानी करू नये बहुसंख्य ओमानी लोक भारतीयावर प्रेमच करतात हे मला ठाऊक आहे "

" आणखी एक नाजुक प्रश्न ! ओमानी माणूस आळशी आहे शेती असूनही तो ती कसत नाही अस म्हणतात अशा माणसाला तुम्ही कार्यप्रवण कसे करणार ? " मी विचारले.

श्री मादद अल काबी म्हणाले, " ओमानी माणूस आळशी आहे, हे मला मान्य नाही प्रत्येकाजवळ जमीनजुमला आहे तो वाढविण्याचा प्रयत्न प्रत्येकजण करीत असतो त्यासाठी बाहेरचे लोक कामाला लावावे लागतात, त्यामुळ तो आळशी आहे असा समज पसरतो अनेक लोक सैन्यात आहेत अगदी कोवळी, तरुण मुलं तुम्हाला सैनिकी वेशात जागजागी पाहायला मिळतील काही लोक मोलमजुरीसाठी आणि लष्करी नोकरीसाठी सयुक्त अरब अमीरातीत गेले होते त्यामुळे शेतीकडे दुर्लक्ष झाल, हे खर. पण आता ते परत येताहेत त्यामुळ यापुढ शेतीकडे पुरेस लक्ष दिल जाईल, यात शंका नाही "

ओमानमध्ये सर्व महत्त्वाच्या जागावर आणि सैन्यातही ब्रिटिश लोकाचे वर्चस्व आहे त्या सबधात मी विचारले, " ब्रिटिश लोक ओमानला लुटत आहेत, असं म्हटल जात यावर तुम्ही काय उपाय सुचविता ? "

श्री मादद अल काबी मिस्किलपणे हसून म्हणाले, " ही गोष्ट बहुतेकाच्या ध्यानात आली आहे पण हे शोषण फार काळ चालणार नाही दोन-तीन वर्षांत हे थाबेल तोपर्यंत आम्ही स्वावलबी झाल पाहिजे तस झाल तर त्याच्या तावडीतून आम्ही नक्की सुटू "

# ५

## झोपडीतून राजवाड्यात

ता २८ एप्रिल रोजी दुपारी राजदूत श्री सिंग यानी मला फोनवरून सागितले, "ओमानच्या माहिती व सस्कृती मत्रालयान तुम्हाला आपला पाहुणा बनविण्याच ठरवलय दोन मत्री तुमच्याशी बोलू इच्छितात त्यासाठी तुम्ही तुमचा मुक्काम आणखी दोन-तीन दिवसानी तरी वाढवावा, अशी त्याची इच्छा आहे तुम्ही आता त्याचे पाहुणे झाल्यामुळ ते तुम्हाला गल्फ हॉटेलात घेऊन जातील. आजपर्यंत तुमच्यावर झालेला सारा खर्चही ओमान सरकारच देणार आहे " मी त्याना म्हणालो, "मी इथला मुक्काम वाढविला तर पुढच्या कार्यक्रमात गोधळ होईल निदान दुबईला तरी हा बदल कळवायला हवा " ते म्हणाले, "त्याची काळजी तुम्ही करू नका. दूतावासातर्फे आम्ही सगळी व्यवस्था करतो इथला खर्च भारत सरकारवर पडणार नसल्यान तुम्ही तुमच्या दौऱ्याचे तितके दिवस वाढवले तरीसुद्धा चालेल अस मला वाटत." पण तो धोका पत्करायला मी तयार नव्हतो म्हणून ओमानमध्ये दोन दिवस जास्त राहून दुबईचा मुक्काम दोन दिवसानी कमी करावा, असे मी ठरविले कारणे दुबईला फार काही काम असणार नाही, अशी माझी कल्पना होती, आणि ती खरीही ठरली

ठरल्याप्रमाणे मत्रालयाचे श्री मादद अल काबी गाडी घेऊन आले; आणि कॉर्निश हॉटेलचे आजपर्यंतचे सारे बिल मत्रालयाकडून दिले जाईल, असे सागून मला गल्फ हॉटेल या आखात देशातील सर्वात श्रीमत व महाग हॉटेलात घेऊन गेले समुद्राची सुदर पार्श्वभूमी असलेल्या एका टेकडीवर हे हॉटेल आहे सुमारे ३० लाख अमेरिकन डॉलर खर्चून बाधलेले हे हॉटेल नुकतेच पूर्ण झाले आहे ते सर्व आधुनिक सुखसोयींनी युक्त असल्याने देशातील व परदेशातील नवश्रीमत मंडळी या हॉटेलात जागा मिळविण्यासाठी धडपडत असल्यास नवल नाही कॉर्निश हॉटेलात रोज माणशी २०० रुपये राहण्याचा खर्च

येत होता त्यात सकाळची न्याहारी फुकट असे गल्फ हॉटेलात केवळ राहण्याचा दर-माणशी रोजचा खर्च ६०० रुपये आहे सकाळची न्याहारी, दोन वेळचे जेवळ आणि कपडे धुण्याचा खर्च ह्या सगळ्याचे मिळून सुमारे ४०० रुपये पडतात. म्हणजे तेथे राहण्यासाठी माणशी किमान हजार रुपये खर्च येतो मी शाकाहारी व मद्यपानापासून अलिप्त असल्याने कदाचित माझा खर्च थोडा कमीही झाला असण्याची शक्यता आहे.

हॉटेलचा एकूण भपका पाहून हिंदी सिनेमातल्याप्रमाणे एखाद्या भिकारणीवर खुष होऊन राजपुत्राने तिला आपल्या राजवाड्यात नेऊन ठेवल्यावर तिला कसे वाटत असेल याची कल्पना मला आली जपानमधील हॉटेलापेक्षाही ते मला जास्त शानदार वाटले. खोलीत जेवण मागविण्याची सोय होती अर्थात त्यासाठी जादा आकार पडतोच पण सरकारच सारा खर्च करणार असल्याने मला त्याची चिंता नव्हती एका दृष्टीने ते जरूरही होते कारण साहेब लोकात सामान्य लोकानी घुसू नये अशी सोय त्या हॉटेलात होती तेथे स्पष्ट सूचनाच होती की, Gentlemen are requested to wear ties after 7 p. m in the lounge, bar and restaurant माझ्या जवळ तर टायच काय पण सूटही नव्हता खुद्द अरब मडळी काय करीत असतील कोण जाणे ! तेथील खाद्यपदार्थांचे भावही हॉटेलला साजेसेच आहेत आंब्याचा रस १० रु , टोमॅटो सूप १२ रु , टोस्ट व बटर २५ रुपये, चीज १५ रुपये, चहा–कॉफी ७ रुपये, आइस्क्रीम ८ रुपये वगैरे मला जेवायचे नव्हते म्हणून आंब्याचा रस, पाव–लोणी, चीज व आइस्क्रीम मागवले त्याचे सुमारे ५० रुपये बिल झाले तो सारा खर्च मला वायफळ व निरर्थक वाटला, पण काही इलाज नव्हता.

घरून निघताना गडबडीत पँट्स घेतल्या पण त्यावर घालायचे मॅनिले घरीच राहिले. त्यामुळे झब्बे व सुरवारी याच्यावरच भागवावे लागले एका परीने ते बरेच झाले खास भारतीय पोषाखात वावरता आले गल्फ हॉटेलातील कपडे धुलाईचा खर्च तर डोळे फाडणारा होता रोजची चड्डी व बनियन प्रत्येकी ४ रु , पायजमा १२ रु व सदरा ७ रु , रुमाल २ रु असे दर होते. म्हणजे एक-दोन धुण्यात कपड्याची मूळ किंमत निघून जाई अर्थात इतर ठिकाणी देखील धुलाईचे दर जवळजवळ असेच असल्याने मला स्वतःचे कपडे स्वत. धुऊन टाकणे सोयीचे वाटले पण गल्फ हॉटेलात राहणाऱ्यानी आपले लहान-सहान कपडेही धोब्यालाच दिले पाहिजेत असा अलिखित नियम असल्यामुळे, किंवा तसे न करणे तेथे राहणाऱ्याच्या प्रतिष्ठेला साजेसे नसल्या-मुळे तेथे कपडे धोब्याला देणे एक प्रकारे अपरिहार्यच होते तेथे उतरणारे बहुतेक लोक कपन्याचे किंवा सरकाराचे प्रतिनिधी असल्याने त्याच्या बाबतीत हा खर्चाचा प्रश्न उद्‌भवतच नसावा

वातानुकूलनामुळे खोलीतील हवा इतकी गार होई की रग पाघरावा लागे मला ते

आवडत नसे म्हणून मी वातानुकूलन बंद करून झोपत असे पण बाहेरची शुद्ध हवा आत येण्याची सोय नसल्याने पहाटे उकडू लागे म्हणून वातानुकूलन पुन सुरू करावे लागे. वस्तुत हे हॉटेल समुद्रकिनाऱ्यावर असल्याने बाहेरचे दृश्य फार छान दिसे पण त्या बाजूच्या खिडक्या-दारे उघडी टाकण्याची काही सोय नसल्याने नाइलाजाने वातानुकूलनाचा आसरा घेणे भाग पडे

या हॉटेलात मुंबईचा पै नावाचा एक तरुण रिसेप्शनिस्ट म्हणून काम करीत होता स्वयपाकघरातही एक महाराष्ट्रीय गृहस्थ होते पण त्याची माझी गाठ पडली नाही. अर्थात ते माझ्यासाठी शाकाहरी भोजन देऊ शकले असते किंवा काय याविषयी मला शंकाच वाटते पाव-लोणी, चीज, कॉफी, सुकी फळे ( बदाम, पिस्ते, काजू वगैरे ), फळाचा रस वगैरे मागवून मी माझे क्षुधाशमन करून घेई पण जेवणाचा आनद काही न्याराच !

टपालखर्चही सरकारच देणार या कल्पनेने मी सर्व मित्राना पत्रे लिहून टाकली पण हॉटेल सोडताना जेव्हा त्याचे बिल मला द्यावे लागले तेव्हा चागलीच फजिती झाली ७५ बैझे तिकीट असताना त्यावरही सर्व्हिस चार्ज लावून १०० बैझे ( २५ रुपये ) प्रत्येक पत्रासाठी मला द्यावे लागले

साऱ्या खर्चाची जबाबदारी ओमान सरकारने घेतल्याने माझ्या वरखर्चासाठी दूतावासातून मिळालेले २८ रियाल मला परत करावे लागले मात्र सरकारने सगळा खर्च केला तरी किरकोळ खर्चासाठी थोडीबहुत रक्कम पाहुण्याला देण्याची सोय कायद्यात आहे त्यामुळे मला ८ रात्रीचे १६.५ रियाल ( सुमारे ३१५ रुपये ) मिळाले मी स्वत खर्च केला असता तर २०–२२ रियाल लागलेच असते म्हणजे या नव्या व्यवस्थेने माझे प्रत्यक्ष नुकसान असे काही झाले नाही

ओमान सरकारच्या विनतीवरून मी माझा मुक्काम दोन दिवस वाढविला, पण तसे हॉटेलवाल्याला सागायचे राहून गेले त्यामुळे १ मेलाच हॉटेल खाली करण्याची पाळी मजवर आली होती. परतु सरकारी पाहुणा असल्याने ती नामुष्की टळली

## अरबी मंडईतून फेरफटका

ता २९ एप्रिल रोजी माहिती मत्रालयाने आपली गाडी व दुभाष्या देऊन मला ओमानच्या ग्रामीण भागात हिंडवून आणले अमर सैफ अब्दुल्ला हा एकाक्ष तरुण बऱ्यापैकी इग्रजी जाणणारा दुभाष्या होता गाडीचा ड्रायव्हर उमर नसीर हाही मोठा उमदा व उत्साही वाटला वस्तुतः मी एकटाच त्या दौऱ्यावर जाणार होतो तरीपण नेहमीची लहान गाडी घेण्याऐवजी त्यानी जपानी टोयोटा लॅडक्रूझर ही दहा उतारू बसतील एवढी मोठी वॅगन घेतली होती त्याचे कारण विचारता अब्दुल्लाने सागितले

की, "शेवटपर्यंत डांबरी रस्ता नाही मुख्य सडकेपासून आपल्याला पुष्कळ आत जायचं आहे तिथं अजून डांबरीच काय पण पक्का रस्ताही झालेला नाही. म्हणून जीपसारखी चालणारी ही गाडी घेतलीय "

सकाळी ९–३० ला आम्ही निघालो, आणि मस्कतच्या उत्तर पश्चिम दिशेला समुद्रकिनाऱ्याशी समांतर असलेल्या राष्ट्रीय मार्गाने आमची गाडी भरधाव निघाली मस्कत, मत्रा, रुवी व सीब ही राजधानी मस्कतची उपनगरे ओलांडून आम्ही अर्ध्या तासाने बातिनाच्या चौपाटीवर पोचलो संयुक्त अरब अमीरातीतील फुजैरा या राज्याच्या सीमेपर्यंत डावीकडे डोंगराची रांग व उजवीकडे समुद्र याच्यामध्ये जी चिंचोळी सुपीक पट्टी आहे तिलाच बातिना म्हणतात राजधानीची सरहद्द संपते तेथे सीब मार्केट आहे आसपासच्या ग्रामीण भागाच्या गरजा भागवणारी ती बाजारपेठ पाहण्यासाठी आम्ही थोडा वेळ थांबलो येथील समुद्रकिनारा मोकळा व प्रशस्त असून सकाळचा गार वारा शरीराला सुखवीत होता

आखात प्रदेशातील जुन्या बाजारपेठा अत्यंत दाटीवाटीने वसलेल्या आहेत बोळ इतके अरुंद की एका वेळी चार माणसेही चालू शकत नाहीत खुद्द मस्कत शहरातही अशी बाजारपेठ आहे पण आता नव्या पद्धतीचे ऐसपैस बाजार निर्माण होत आहेत सीब मार्केटमध्ये दोन्ही प्रकार पाहायला मिळाले भाजी मंडई, मासळी-मांस बाजार वगैरे नव्या पद्धतीच्या, प्रशस्त सीमेंट कॉंक्रीटच्या इमारतीत भरतो इतर वस्तूंची बाजारपेठ जुन्या पद्धतीचीच आहे ओमानचा हा भाग सुपीक शेतीचा समजला जातो म्हणून मला भाजी मंडई पाहण्याचे विशेष कुतूहल होते भेंडी ( बमिया ), वांगी ( बदिजन ), भोपळा ( बोबार ), मिरची ( फिलफिल ), कांदा, लसूण ( स्सोम ), दुध्या ( कदू, उबा, कर्रा ), केळी ( मोझ ), कलिंगड ( जो ), रताळी ( जझर ) वगैरे भाज्या आणि फळे तेथे विक्रीसाठी होती आसपासच्या प्रदेशात पिकणाऱ्याच त्या जिनसा होत्या २–३ रुपये किलो भावाने भाज्या मिळत होत्या मला त्या खूपच स्वस्त वाटल्या भारतातून गेलेला छोटा हापूसचा आंबा ७ रुपयांना एक व स्थानिक आंबा २ रुपयांना एक मिळत होता तोही भाव एकूण महागाईचा विचार करिता फार जास्त म्हणता येणार नाही त्या भाजीमंडईत चेहऱ्यावर झिरझिरीत बुरखा घेतलेल्या भाजी विकणाऱ्या बाया पाहिल्यावर मला आमच्या गावच्या आठवड्याच्या बाजारातील बागवानजींची आठवण झाली मुसलमान बायकांनी भाजी विकण्याच्या कलेत विशेष प्रावीण्य कसे काय संपादन केले असेल ? एका हलवायाच्या दुकानात चळचळीत तूप वाहात असलेला ताजा गरम शिरा चाखायला मिळाला त्याला तेथे हलवाच म्हणतात आणि तो आपल्याकडील माहीम हलव्यासारखा होता त्यात अंडी घालतात, असे समजल्यानंतर तो खाण्याची इच्छा नाहीशी झाली

## माळरानावरील हिरवळ

सुमारे शभर किलोमीटर अतर कापल्यानतर आम्ही डाव्या बाजूला वळलो आणि देशाच्या खऱ्या ग्रामीण भागाचे दर्शन घडू लागले मुख्य मार्गावर लहान-मोठी खेडी दिसली पण त्यावर शहरी सस्कृतीची छाप पडू लागल्याचे दिसून आले सामान्यतः ओमानी घराच्या भोवती घर झाकून टाकणाऱ्या तटासारख्या मातीच्या भिंती किंवा खजुरीच्या झावळयाचे कूड असतात, असे या रस्त्यात दिसलेल्या खेड्यावरून वाटले पडदा पद्धतीच्या सरक्षणाचा तो उपाय असावा मध्येच एखादे सीमेंट काक्रीटचे कोरे घर दिसते सुलतानाचा बगीचाही जाता जाता पाहून घेतला सभोवताली वाळवंट आणि मध्येच हिरवागार बगीचा, हे दृश्य नयनमनोहर होते पधरा दिवसापूर्वी झालेल्या पावसाने वाळवंटात हिरवळ उगवली होती शेळया, मेढ्या, उट, गाढवे चरताना दिसली सारे माळरान काटेरी झुडुपे व पाढऱ्या ( देव ) बाभळीसारखी झाडे सर्वत्र पसरलेली होती क्षितिजावर त्याची जणू रागच असल्याचा भास होत होता अधून-मधून खजुरीच्या बागा आणि त्याच्या भोवती घरे अशी दृश्ये दिसली मरूद्याने ( ओॲसिस ) म्हणतात ती हीच वाटेत जागजागी पाण्याचे ओहोळ ओलाडावे लागले अरबस्तानात असे ओढे पाहायला मिळतील अशी मुळीच अपेक्षा नव्हती या देशात नद्या नाहीत पण पाऊस पडला की असे ओहोळ काही काळ वाहात राहतात त्याच्या दोहोबाजूच्या प्रदेशाला वादी म्हणजे खोरे असे म्हणतात अशा वाद्या सर्वच आखात देशात आहेत हे समुद्राकडे वाहून जाणारे पाणी जागजागी अडविण्याच्या योजना सध्या तयार होत आहेत

### कस्कात रुस्ताक

दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास मस्कतहून सुमारे १५० कि मी अतरावरील रुस्ताक या गावी आम्ही जाऊन पोचलो गावाजवळून मोठा ओढा वाहात होता घरे बहुतेक सारी मातीची व एकमेकाना चिकटलेली रस्ते इतके अरुद की आमची मोटार घराच्या भिंतींना घासली कशी नाही, याचेच मला आश्चर्य वाटले घराना खिडक्या जवळजवळ नव्हत्याच सगळी घरे धाब्याची कचऱ्याचे ढीग जागजागी साचलेले परतु वृक्षराजीमुळे गाव दुरून छान दिसते

रुस्ताक ( Rostaq ) हे तालुक्याचे ठिकाण असल्यासारखे दिसते पण ते आहे जिल्ह्याचे मुख्य ठाणे आपल्याकडील मामलेदार कचेरीसारखी एक कचेरी तेथील जुन्या भुईकोट किल्ल्यात आहे तिला वालीची म्हणजे जिल्हाधीशाची ( गव्हर्नराची ) कचेरी म्हणतात या कचेरीवरून गाव पार करून आमची मोटार गावाबाहेर गेली.

## माळरानावरील हिरवळ

सुमारे शभर किलोमीटर अतर कापल्यानतर आम्ही डाव्या बाजूला वळलो आणि देशाच्या खऱ्या ग्रामीण भागाचे दर्शन घडू लागले मुख्य मार्गावर लहान-मोठी खेडी दिसली पण त्यावर शहरी सस्कृतीची छाप पडू लागल्याचे दिसून आले सामान्यत. ओमानी घराच्या भोवती घर झाकून टाकणाऱ्या तटासारख्या मातीच्या भिंती किंवा खजुरीच्या झावळ्याचे कूड असतात, असे या रस्त्यात दिसलेल्या खेड्यावरून वाटले पडदा पद्धतीच्या संरक्षणाचा तो उपाय असावा मध्येच एखादे सीमेंट कॉंक्रीटचे कोरे घर दिसते. सुलतानाचा बगीचाही जाता जाता पाहून घेतला सभोवताली वाळवट आणि मध्येच हिरवागार बगीचा, हे दृश्य नयनमनोहर होते पधरा दिवसापूर्वी झालेल्या पावसाने वाळवंटात हिरवळ उगवली होती शेळ्या, मेंढ्या, उट, गाढवे चरताना दिसली सारे माळरान काटेरी झुडुपे व पाढऱ्या ( देव ) बाभळीसारखी झाडे सर्वत्र पसरलेली होती क्षितिजावर त्याची जणू रागच असल्याचा भास होत होता अधून-मधून खजुरीच्या बागा आणि त्याच्या भोवती घरे अशी दृश्ये दिसली मरूद्याने ( ओॲसिस ) म्हणतात ती हीच वाटेत जागजागी पाण्याचे ओहोळ ओलाडावे लागले अरबस्तानात असे ओढे पाहायला मिळतील अशी मुळीच अपेक्षा नव्हती या देशात नद्या नाहीत पण पाऊस पडला की असे ओहोळ काही काळ वाहात राहतात त्यांच्या दोहोबाजूच्या प्रदेशाला वादी म्हणजे खोरे असे म्हणतात अशा वाद्या सर्वच आखात देशात आहेत हे समुद्राकडे वाहून जाणारे पाणी जागजागी अडविण्याच्या योजना सध्या तयार होत आहेत

## कस्फात रुस्ताक

दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास मस्कतहून सुमारे १५० कि मी अतरावरील रुस्ताक या गावी आम्ही जाऊन पोचलो गावाजवळून मोटा ओढा वाहात होता. घरे बहुतेक सारी मातीची व एकमेकाना चिकटलेली रस्ते इतके अरुद की आमची मोटार घराच्या भितींना घासली कशी नाही, याचेच मला आश्चर्य वाटले घराना खिडक्या जवळजवळ नव्हत्याच सगळी घरे धाब्याची कचऱ्याचे ढीग जागजागी साचलेले परतु वृक्षराजीमुळे गाव दुरून छान दिसते

रुस्ताक ( Rostaq ) हे तालुक्याचे ठिकाण असल्यासारखे दिसते पण ते आहे जिल्ह्याचे मुख्य ठाणे आपल्याकडील मामलेदार कचेरीसारखी एक कचेरी तेथील जुन्या भुईकोट किल्ल्यात आहे तिला वालीची म्हणजे जिल्हाधीशाची ( गव्हर्नराची ) कचेरी म्हणतात या कचेरीवरून गाव पार करून आमची मोटार गावाबाहेर गेली.

गाव काहीसे उंचवट्यावर बसलेले पाहून गमत वाटली गावच्या ओढ्याला कधीकाळी पूर येईल आणि मातीची घरे वाहून जातील, या भीतीने बहुधा ही सोय केली असावी

गावाबाहेर गरम पाण्याचा झरा आहे त्याला ' कस्फात ' असे म्हणतात कस्फ-रियत म्हणजे गंधक या अरबी शब्दापासून तो बनला आहे परंतु आपल्याकडे ज्या-प्रमाणे गरम पाण्याच्या झऱ्यातील पाण्याला गंधकाचा उग्र वास येतो तसा येथील झऱ्याच्या पाण्याला येत नाही. कदाचित गंधकाचे प्रमाण फारच कमी असेल

झरा म्हटल्यानंतर आपल्या मनश्चक्षूसमोर जे चित्र उभे राहते त्याहून येथील झरा वेगळा आहे त्याचा आकार एखाद्या लहानशा विहिरीसारखा किंवा सिंहगडावरील देव-टाक्यासारखा आहे त्यातून वाहणारे पाणी पाटातून बाहेर काढले आहे पाणी स्फटिका-सारखे निर्मळ आहे पण टाक्याचा तळ दिसत नाही यावरून ते खूपच खोल असावे असे दिसते. त्याच्या शेजारी जुने टाके आहे पण त्यातील झरा आता बंद झाल्याने त्यातील पाणी शेवाळले आहे व त्याचा पाट कोरडा पडला आहे भूकंपामुळे एक टाके बंद होऊन दुसरे खुले झाले असावे असे दिसते या पाण्याने संधिवात व त्वचारोग बरे होतात, असे म्हणतात या टाक्यात उतरण्याची बंदी आहे त्यामुळे पाणी स्वच्छ राहिले आहे पाण्याचा जो पाट काढला आहे त्याला ' फलाज असे म्हणतात या फलाजवर सुमारे छातीइतक्या उंचीची स्नानगृहे ओळीने बांधली आहेत त्यावर छपरेही नाहीत अथवा दारेही नाहीत ( सर्वोदय सम्मेलनामध्ये चराचे संडास उभारतात त्याची मला आठवण झाली ' ) भिंती अर्थात मातीच्या आहेत पाण्यात पाय सोडले तर चटका बसला पाण्याचा पाट शेतापर्यंत नेऊन पोचविला आहे हे पाणी लागताच रोपे प्रथम कोमेजतात पण थोड्याच वेळात तरारून उठतात आपल्याकडे बहुधा गरम झऱ्याच्या पाण्याचा उपयोग शेतीसाठी केला जात नसावा या पाण्यावर मुख्यतः भाजीपाला पिकविला जातो. डोंगरात उगम पावणाऱ्या झऱ्याचे असे बरेच फलाज या भागात आहेत. एक फलाज वालीची कचेरी असलेल्या किल्ल्यातही पाहायला मिळाल' या भागात पिण्याच्या पाण्याची मुळीच टंचाई नसल्याचे आढळून आले शिवाय मुबलक फलाज असल्याने लोकांमध्ये दररोज स्नान करण्याची प्रथाही प्रचलित आहे.

## टाइपरायटरचा खेड्यात प्रवेश

ओमानमध्ये प्रवेश केल्यापासून एखाद्या अरबाचे घर पाहण्याची इच्छा मी भेटेल त्याच्याजवळ व्यक्त करीत होतो पण कोणाकडूनच तिला प्रतिसाद मिळत नव्हता कोणालाच ती शक्य कोटीतील गोष्ट वाटत नव्हती कारण अरब लोक नातेवाइका-खेरीज इतर अरबानाही बैठकीच्या खोलीव्यतिरिक्त घरात इतरत्र प्रवेश करू देत

नाहीत रुस्ताकला पोचल्यापासून मी अब्दुल्लाच्या मागे टुमणे लावले होते की, "मला एखाद्या अरबाच्या घरी घेऊन चल" पण तो मला सांगत होता, "इथं माझ्या ओळखीचं कुणी नाही अनोळखी माणसाच्या घरात आपल्याला कसं जाता येईल?" मी निराश होऊन गावातल्या घरांची बाहेरूनच छायाचित्रे घेतली

परत जाताना वोटत अल हज्म नावाचा एक जुना किल्ला लागत होता तो पाहण्यासाठी वालीचा लेखी परवाना लागतो म्हणून आम्ही पडक्या किल्ल्यातील वालीच्या कचेरीत गेलो वालीची कचेरी माडीवर होती अर्थात देवडीवर सशस्त्र पहारेकरी होतेच दिवाणखान्यात प्रवेश करण्यापूर्वी पादत्राणे बाहेर काढून ठेवावी लागतात पूर्वीच्या काळी सरकारी कचेऱ्यात भारतीय बैठक असे खुद्द वालीसुद्धा जमिनीवरच (गादीवर) बसे त्या वेळी पादत्राणे बाहेर काढून ठेवणे योग्य होते पण आता टेबल-खुर्च्यांचा वापर सुरु झाला आहे अशा वेळी जुन्या प्रथेचे काही औचित्य उरलेले नाही असा विचार माझ्या मनात येऊन गेला कचेरीत इतर कर्मचाऱ्यांपेक्षा सशस्त्र पहारेकऱ्यांची संख्याच जास्त दिसली वाली काळासावळाच पण रुबाबदार वाटला त्याच्या खुर्चीला खुर्ची लावून बसलेला त्याचा सहायक अत्यंत देखणा होता. गोरापान रंग, धारदार नाक, पाणीदार काळेभोर डोळे व रेखीव चेहरा असे पुरुषी सौंदर्य मी भारतात व इतरत्र त्यापूर्वी पाहिले नव्हते त्याच्या आवाजात गोडवा, बोलण्यात मार्दव व वागण्यात सौजन्य होते वालीला इंग्रजी येत नव्हते पण त्या तरुणाने सऊदी अरबस्तानात शिक्षण घेतल्याने त्याला कामचलाऊ इंग्रजी येत होते अल हज्मचा किल्ला पाहण्याचा परवाना मिळावा अशी आम्ही वालीला विनंती केली ती त्याने तत्काळ मान्य केली, आणि परवाना तयार करण्याचा हुकूम दिला पाच-सात मिनिटांत सदर परवाना टाइप होऊन सहीसाठी वालीकडे आला मी तर ते पाहून आश्चर्याने थक्क झालो एक तर, सरकारी काम इतक्या झटपट झाले होते आणि दुसरे म्हणजे ज्या देशात परवा-परवापर्यंत सारी लिखापढी हस्ताक्षरातच होत होती तेथे आता टाइपरायटर जाऊन पोचला होता आमच्या देशात प्रादेशिक भाषामध्ये राज्यकारभार सुरू न करण्याची जी कारणे देण्यात येतात त्यामध्ये टाइपरायटरचा अभाव किंवा तुटवडा हे एक असते, आणि येथे तर टाइपरायटर खेडोपाडी जाऊन पोचला होता अर्थात लोकसंख्या कमी व साधनसंपत्तीचा मुबलकपणा यामुळे त्यांना हे शक्य झाले होते याची मला कल्पना होती पण त्यांना पाच वर्षांत जे जमले ते आम्हाला तीस वर्षांतही जमले नाही, याचे कारण आम्हाला इंग्रजीचा मोह सोडवत नाही, हेही खरेच

वालीच्या सहायकाशी भारतीय व ओमानी आदरातिथ्यासंबंधी माझे बोलणे सुरू झाले दोन्ही देशांतील शिष्टाचारामध्ये खूपच साम्य असल्याचे पाहून आम्हाला गमत वाटली एवढ्यात आमच्या पाहुणचारासाठी म्हणून एका बशीतून साली काढलेल्या

आंब्याच्या फोडी आल्या त्या अर्थातच डब्यातील ( कॅन्ड ) होत्या, आणि तो भारतातला तोतापुरी आंबा होता सर्वजण आपापल्या हाताने त्या एका बशीतील फोडी घेऊन खाऊ लागले मला तोतापुरी विशेष आवडत नसल्याने मी एक-दोन फोडी खाऊन हात आखडता घेतला इतरांनी हां हां म्हणता बशी रिकामी केली हात धुण्यासाठी एका पातेलीत गरम पाणी आणण्यात आले त्यातच सर्वांनी आळीपाळीने हात धुतले या प्रदेशात उष्ट्याचा विधिनिषेध नसल्याने त्यात कोणाला काही वाटले नाही पण मला मात्र दुसऱ्याने उष्टावलेल्या पाण्यात हात बुडविताना थोडे सकोचल्या-सारखे झाले त्यानतर कहवा ( कॉफी ) पानाचा कार्यक्रम झाला पाहुण्यांचे स्वागत चहाने किंवा कॉफीने करावयाचे, आणि दिवसभर चहापान करीत राहावयाचे हा अरबांचा खास शोक आहे सरकारी किंवा बिनसरकारी कचेरीत तुम्ही गेलात की प्रथम तुमच्यासमोर चहा–कॉफी आलीच पाहिजे चहात दूध नसते पण साखर असते त्यामुळे जपानी चहासारखा तो कडूजार नसतो अर्थात मी कधीच चहा घेतला नसल्यामुळे मला तो गोड चहाही आवडत नसे अगदीच नाइलाज झाला तर कसा-बसा एखादा छोटा पेला घशाखाली ढकलावा लागे अर्थात तो पेला फार लहान असे. आपल्याकडील सर्वसामान्य कपात जेवढा चहा असतो त्याच्या एकचतुर्थांशच चहा त्या पेल्यात मावतो त्यामुळे एरंडेल प्याल्याप्रमाणे मी तो एका घोटात सपवून टाकी. कॉफीतही दूध नसते पण तिच्यात वेलदोडा व साखर असते त्यामुळे ती स्वादिष्ट लागते तरीपण एकदोन पेल्यापेक्षा जास्त कॉफी पिववत नसे कॉफीचा पेला चहाच्या पेल्यापेक्षाही लहान नैवेद्याच्या वाटीएवढा असतो त्यात जेमतेम दोन चमचे कहवा किंवा कॉफीचा अर्क असतो मात्र सुदर, नक्षीदार चांदीच्या किंवा पितळेच्या सुरई-सारख्या किटलीतून कहवा पाजणारा ' साकी ' तुम्ही पेला रिकामा केलारे केला की तो परत भरण्यासाठी उभा असतो हे कहवापान बराच वेळ चालत राहते तुम्हाला जास्त कहवा नको असल्यास हातातील पेला डमरूसारखा उलट–सुलट फिरवायचा आणि बस बस म्हणावयाचे मग तो पेला तो परत घेतो गल्फ हॉटेलच्या स्वागत-कक्षात येणाऱ्या-जाणाऱ्या पाहुण्यांना कहवा देण्यासाठी एक अरब सतत उभा असे तो मला कहवा पिण्याचा फार आग्रह करी परंतु तो एकाच पाण्याच्या बादलीत सगळे उष्टे पेले बुचकळत असे ते पाहून त्याच्या आग्रहाला मान देणे माझ्या जिवावर येई

या खाण्यापिण्याच्या कार्यक्रमात कचेरीतील सर्व लहानथोर कर्मचारी सामील झाले. त्यात उच्चनीचता दिसली नाही अरबांमधील, किंबहुना मुसलमानांमधील सामाजिक समता आपल्या नजरेत चटकन भरते तुम्ही कचेरीत गेलात की मंत्र्यापासून संत्र्या-पर्यंत सर्वांशी तुम्ही हस्तांदोलन केले पाहिजे साधा चपराशीही खोलीत येताच सर्वांशी हस्तांदोलन करतो व ते करण्यासाठी मंत्री किंवा अधिकारीही उठून उभा राहतो

आणि ' अहलन् व सहलन् ' ( हॅलो ) किंवा ' सबाह इलखैर ' ( गुड मॉर्निंग ) म्हणतो ते दृश्य प्रथम प्रथम आपल्या डोळ्याना थोडे चमत्कारिक वाटते खरे, परतु लौकरच आपल्याला त्याचाही सराव होतो

## अल हमामीच्या घरी

हा सारा कार्यक्रम चालू असताना माझ्या डोक्यात अरबी घर पाहण्यासबधीचे विचार घोळतच होते अमर सैफ अब्दुल्लाची याबाबतीत काही मदत होणार नाही, हे मी ओळखले होते म्हणून आपणच थोडा पुढाकार घ्यावा, मग त्यायोगे औचित्याचा थोडा भग झाला तरी हरकत नाही, असे मी मनाशी ठरविले खरे म्हणजे औचित्य व शिष्टाचार यासंबधीच्या आपल्या परपरागत किंवा साहेबाकडून उसन्या घेतलेल्या नव्या कल्पनाशी माझी तार कधीच जुळली नाही त्या कल्पनाच्या काटेरी कुपणातून बाहेर पडण्याचीच धडपड माझे मन सतत करीत आले आहे आणि त्या प्रयत्नात मला बहुधा कधी पस्तावावे लागलेले नाही भारताच्या विविध प्रातात असो, जपान-मध्ये असो की आखात देशात असो, शिष्टाचाराच्या रूढ चाकोरीतून बाहेर पडण्याचा मला फायदाच झाला आहे लोकाच्या रोपाला पात्र होण्याऐवजी त्याचा स्नेह व जवळीकच मला मिळाली आहे म्हणून तोच प्रयोग वालीच्या बाबतीत करावयाचे मी ठरविले

मी वालीला म्हणालो, " माझी एक विनती आहे तुमच्या या गावातल एखाद जुन्या पद्धतीच घर मला पाहायच आहे आमच्या लोकाना तुमची ओळख करून द्यायची तर तुमच घरही मला पाहायला मिळाल पाहिजे नाहीतर ती ओळख अपूर्णच राहील "

यावर सगळेजण आश्चर्याने एकमेकाच्या तोडाकडेच पाहात राहिले खेडवळ अरबाचे घर पाहण्याची इच्छा प्रदर्शित करणारा बहुधा मी पहिलाच परदेशी—किंवा निदान भारतीय असावा परक्याला घरी नेण्यात त्याची खरीखुरी मानसिक अडचण होती, हे मला दिसत होते ' त्यात काय पाहण्यासारख आहे ? ' अशा प्रकारची सर्वत्र आढळणारी भावनाही त्यात होतीच पण माझ्या आग्रहाची तीव्रता वालीच्या लक्षात आली आणि त्याने तेथे उपस्थित असलेल्या लोकासमोर माझी इच्छा ठेवून त्याच्या सहयोगाची अपेक्षा व्यक्त केली

वालीच्या विनतीला मान देणे म्हणजे आपली परंपरा मोडणे, आणि त्या विनतीचा अव्हेर करणे म्हणजे आपल्या वरिष्ठाची नाराजगी ओढवून घेणे होते या शृगापत्तीत सर्वजण सापडले असता तेथील पहारेकऱ्यावरील अधिकारी सालिम सुलेमान अल हमामी यानी आम्हाला त्याच्या घरी नेण्याची तयारी दाखविली सर्वांनाच बहुधा

हायसे वाटले असावे मला अर्थातच सर्वांत अधिक आनद झाला साऱ्या आखात देशात साऱ्या कचेऱ्या दुपारी १ वाजताच बद होतात ती वेळ होत आली होती. म्हणून आम्ही वालीचे आभार मानून बाहेर पडलो अल हमामीचे घर रुस्ताकपासून जवळच असलेल्या दुवेरा या खेड्यात होते हे खेडेही रुस्ताकप्रमाणे लहानशा टेकडी-वरच असून त्यात सुमारे ३५ घरे आहेत गावातील रस्ता इतका अरुद आहे की त्यातून मोटार जाऊच शकत नाही म्हणून टेकडीच्या खालील बागेत आमची गाडी उभी करून आम्ही वर गेलो सहज वर नजर गेली तेथे एक आब्याचे झाड होते, आणि त्याला कैऱ्याही लागलेल्या होत्या आपण भारतातच आहोत असा क्षणभर भास झाला मातीची व धाब्याची घरे पाहून आपण पजाब-राजस्थान किंवा सोलापूर-पढरपूर भागात आहोत असे वाटले.

अल हमामी आमच्या पुढे चालले होते त्यानी हातातील छडीने खटखट असा आवाज करून बहुधा घरातील बायामाणसाना आत जायला सागितले असावे आम्ही थोडा वेळ दाराबाहेरच उभे राहिलो आणि अल हमामींनी आत येण्यास सागितल्या-वर आत गेलो ती ओसरीवरची बैठकीची खोली होती तिला सब्ला असे म्हणतात सामान्यत. अरब घरी जाणाऱ्या बाहेरच्या लोकाना या सब्लापर्यंतच जाता येते अल हमामींच्या घरी गच्चीवर एक विशेष बैठकीची खोली आहे वर जाण्याचा मातीचा जिना ओसरीवरच्या खोलीतच आहे बहुतेक सर्वच आखात देशात परपरागत घरे मातीची आहेत कारण तेथे दगड दुर्मिळ आहे. दारे, खिडक्या, चौकटी यासाठी लागणारे लाकूड भारतातून किंवा आफ्रिकेतून आणले जाते नव्या पद्धतीच्या अनेक मजली घरासाठी किंवा इमारतींसाठी लागणारे सीमेंट, लोखड वगैरे साहित्य सध्यातरी परदेशातूनच येते; आणि त्यासाठी लागणारे तत्रज्ञान व मजूर याचीही या देशाना आयात करावी लागते या आयातीत भारताचा वाटा—सऊदी अरबस्तान वगळता सर्वच देशामध्ये खूप मोठा आहे ओमानमध्ये धाब्यासाठी लागणारे लाकूड खजुरीच्या झाडाचे असते ते किडत-कुजत नाही दाराना-खिडक्याना लागणारे लाकूड आबा किंवा अल अलान नावाच्या स्थानिक वृक्षापासून मिळते त्यामुळे घराच्या बाबतीत ओमानचा ग्रामीण भाग स्वावलबी आहे, असे म्हणण्यास हरकत नाही अर्थात ग्रामीण घराची रचना अपेक्षेप्रमाणे पुष्कळच ओबडधोबड असते आम्ही जिना चढून गच्चीवर गेलो तेथील बैठकीची प्रशस्त खोली पाहून मन प्रसन्न झाले जमिनी-वर चटया आणि सतरज्या अथरलेल्या होत्या टेकून बसण्यासाठी भितीच्या कडेला उशा ठेवलेल्या होत्या आणि वारा घेण्यासाठी खजुरीच्या पानाचे पखे ठेवलेले होते ती ऐसपैस भारतीय बैठक मला आवडली कोनाडे ( रफूफ ), झरोका ( सुरख ), फडताळे, खुट्या ( उटाद ) वगैरे गोष्टी अगदी भारतातल्या ग्रामीण घरातल्यासारख्याच तेथेही

असलेल्या पाहून आपोआपच एक प्रकारची जवळीक निर्माण झाली प्रत्येक बैठकीच्या खोलीत सुलतान काबूसची तसबीर हमखास असतेच

## पाहुणचार अरबी पद्धत

आपल्याकडे घरी आलेल्या पाहुण्याला गूळपाणी देण्याची प्रथा अजूनही ग्रामीण भागात आढळते तशीच प्रथा अरबामध्येही आहे मात्र तेथे गुळाऐवजी खजूर देतात आणि पाण्याऐवजी कहवा थोडा वेळ विश्रांती घेतल्यावर एका मोठ्या परातीतून बिया काढलेल्या खजुराचा पुरणासारखा गोळा आमच्यासमोर आला त्या एकाच गोळ्यातून प्रत्येकाने आपापल्या हाताने हवा तेवढा खजूर घेऊन खावयाचा त्याच्या सोबत एका वाडग्यात पिवळे धमक गाईचे तूप होते त्यात तो खजूर बुडवून घ्यावयाचा हे तर माझे अत्यंत आवडते खाद्य ओमानमध्ये आल्यापासून खरेखुरे तूप प्रथमच पाहायला मिळाले होते त्यामुळे उष्म्याखरकट्याचा कसलाही विकल्प मनात न आणता मी पोटभर खजूर खाऊन घेतला खजूर खाऊन झाल्यावर हात धुण्यासाठी एका पातेल्यातून गरम पाणी आले तुपाचा ओशटपणा जायला गरम पाणी चांगले नंतर कहवापान झाले वस्तुतः यानंतर जेवणाचा कार्यक्रम असतो पण एकतर आम्हाला लौकर परत जावयाचे होते, आणि दुसरे म्हणजे आम्ही आधी न कळविता इतके लोक गेल्यामुळे स्वयंपाक करायला वेळ लागला असता म्हणून आम्ही अल हमामींची क्षमा मागून खाली उतरलो (अर्थात तो दिवस प्रवासात गेल्यामुळे जेवण असे झालेच नाही !)

जुन्या पद्धतीच्या मोठ्या घरामध्ये घरात हवा तर खेळावी, पण उन्हाचा त्रास तर होऊ नये, यासाठी विशिष्ट प्रकारची दुमजली तिमजली खोलीसारखी बांधणी करीत असत तिला 'विंडटॉवर' (हवा बुर्ज) म्हणतात लहान घरात अशा बांधणीची सोय नसते म्हणून धाब्यालाच लहान-मोठी भोके पाडून प्रकाश व वारा खेळत राहील अशी व्यवस्था केलेली असते वावटळीबरोबर वाळवंटातील वाळू घरात येऊ नये म्हणून घराना खिडक्या ठेवल्या जात नाहीत त्यामुळे ही व्यवस्था आवश्यकच ठरते आता घरोघरी वीज खेळू लागल्यामुळे या झरोक्याचे महत्त्व प्रकाशापुरते तरी कमी झाले आहे मी हमामींना विचारले, "पाऊस पडला म्हणजे या झरोक्यातून पाणी घरात येत नाही काय ?" त्यावर ते हसून म्हणाले, "एवढा मोठा पाऊस इथ क्वचितच पडतो जेव्हा पडतो तेव्हा आम्ही हे झरोके आच्छादून टाकतो"

## घराची साधी रचना

ग्रामीण अरबी घर अगदी साधे असते ओसरीवरच्या बैठकीच्या खोलीसमोरच

अडगळीची खोली होती तिच्यात धान्य व खजूर, शेतीची किरकोळ अवजारे आणि इतर सटरफटर गोष्टी होत्या धान्याचा साठाही फार मोठा दिसला नाही बहुधा वर्षाची बेगमी करण्याची गरज आता उरली नसावी ओसरीवरून आत शिरल्यावर डाव्या उजव्या हाताना समोरासमोर एकेक खोली होती त्या दोन्ही झोपण्याच्या खोल्या त्यात पलग किंवा खाटा नव्हत्या. जमिनीवरच चटया, सतरज्या किंवा गाद्या अथरून हे लोक झोपतात ग्रामीण भागात सापाचा सुळसुळाट आहे आणि विंचूही काळेभोर व खूप मोठे असतात असे मी ऐकले होते. त्यावरून लोक जमिनीवर झोपत नसावेत अशी माझी समजूत झाली होती, ती खोटी ठरली उन्हाळ्यात बहुधा सगळेजण गच्चीवरच झोपतात कोल्ह्यासारखा एक जगली प्राणी या भागात आहे. त्याखेरीज इतर वन्यपशू मुळीच नाहीत त्यामुळे माणसाना व गुराना निर्धास्त वाटते

परसदारच्या पडवीत एका कोपऱ्यात तीन दगड माडून त्यावर स्वयपाक करतात. खजुरीची वाळलेली पाने जळण म्हणून वापरतात तव्यावर पेपरडोसासारख्या पातळ चपात्या करतात, आणि भात व माशाचे किंवा मासाचे कालवण करतात. सर्वच आखात देशाना भरपूर समुद्रकिनारा असल्याने मच्छीमारीचा व्यवसाय पुरातन काळापासून मोठ्या प्रमाणावर चालत आला आहे. आता तर यंत्रनौकान्चाही वापर त्यासाठी केला जात आहे त्यामुळे मासळीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते आणि स्वाभाविकपणेच अरबाच्या आहारात मासळीचे प्रमाण अधिक असते. अरब देशात तादुळाचे उत्पादन मुळीच होत नाही. तरी पण अरबाचा मुख्य आहार गहू नसून तादूळ आहे, याचे आश्चर्य वाटते. त्याची आबोळीसारखी चपाती मी चाखून पाहिली आणि ती मला चागलीच चवदार लागली

स्वयपाकघरात भाडी-कुडी, डबे, कपबश्या वगैरे काहीच दिसले नाही, म्हणून मी चौकशी केली तेव्हा समजले की या साऱ्या फापटपसाऱ्याची त्याना जरूरच नसते. एका परातीत सर्वांनी जेवायचे असल्यामुळे ताट-वाट्याचा प्रश्न निर्माणच होत नाही. नाना प्रकारचे मसाले, डाळी वगैरेंचा वापर नसल्याने डब्याचा सोस नाही आहारातील पदार्थ अगदी मोजके त्यामुळे इतर भाडीकुडीही नकोत. एकूणच त्या घरातील वस्तूची अल्पसंख्या पाहून मनात विचार आला, खरे अपरिग्रही लोक आहेत हे. महात्माजींनी याची घरे पाहिली असती तर अपरिग्रहासाठी बहुधा याचाच आदर्श समोर ठेवायला त्यानी लोकाना सागितले असते

## जुम्मे के जुम्मे ? छेः दररोज !

आपल्याकडे एखाद्या व्यक्तीला रोजच्या रोज आघोळ करण्याचा कटाळा असला तर आपण तिला जुम्मे के जुम्मे म्हणून संबोधतो त्याच्या मुळाशी अशी कल्पना



४

असते की मुसलमान लोक फक्त शुक्रवारी आघोळ करतात अरबस्तानात पाण्याचे दुर्भिक्ष असल्याने तेथील लोक रोज आघोळ करीत नसावेत, या अदाजातून ही कल्पना आलेली असते पण ओमानमधल्या अरबाच्या बाबतीत तरी ती साफ चुकीची असल्याचे मला आढळून आले किंबहुना त्यानतरही ज्या-ज्या देशात मी गेलो तेथे आघोळीच्या बाबतीत अरब बाधव भारतीयाच्या पेक्षा कमी उत्साही असल्याचा अनुभव काही मला आला नाही उलट शारीरिक व कपड्याची स्वच्छता आपल्या-पेक्षा त्याच्यामध्येच अधिक असल्याचे मला दिसून आले मळके, फाटके कपडे तर मला कुठेच दिसले नाहीत खेड्यातून कचऱ्याचे ढीग दिसले तरी शहरातील स्वच्छता आपल्यापेक्षा खूपच अधिक दिसली अर्थात शहराची नवीन रचना आणि स्वच्छता राखण्यासाठी लागणाऱ्या द्रव्याची तरतूद सहज होण्याची शक्यता यामुळे त्याना या गोष्टी साध्य झाल्या आहेत, हे स्पष्ट आहे पण रस्त्यावर थुकणे, नाक शिंकरणे, मोकळ्या जागेवर प्रातर्विधी करणे यासारख्या गोष्टी मला कोठेही दिसल्या नाहीत. भारतीय उपखडातील जे बाधव तेथे गेले आहेत तेच जी काय घाण करत असतील तेवढीच तेथे दिसते अर्थात ती काढून टाकण्याचे कामही आपलेच लोक करतात. भगी, झाडूवाले वगैरेंची कामे करण्यात भारतीयच-विशेषतः केरळीय प्रमुख असतात, असे समजले समृद्धी आली की आरोग्य व स्वच्छता या गोष्टीही येतात, असे अरब देशात हिंडल्यानतर आपल्याला वाटू लागते अरब स्त्रीपुरुषाच्या अगावरील झुळ-झुळीत व सदभिरुचिसंपन्न, नीटनेटके कपडे, आणि त्याच्या चेहऱ्यावरील रसरशीत प्रसन्नता हे त्याच्यातील आरोग्य व स्वच्छता याचे पुरावेच म्हणता येतील

तर असे हे रोजच्या रोज न चुकता स्नानानंद उपभोगणारे अरब लोक त्यामुळे अल हमार्मीच्या मागील पडवीत छोटीशी विहीर पाहून मला आश्चर्य वाटले नाही आश्चर्य वेगळ्याच गोष्टीचे वाटले पाणी अगदी सहज हाताने काढता येईल इतक्या वर होते त्याचे पाच-सहा फुटावर पाणी दिसत होते चौकशी केल्यावर समजले की, या भागात पाणी फारच जवळ लागते आणि ते गोडे असते त्याहून जास्त खोल गेल्यास खारे पाणी लागते विहीर मात्र फारच चिचोळी होती. तिचा व्यास दोन फुटापेक्षाही कमी असावा स्वतंत्र स्नानगृहाची आवश्यकता या लोकाना वाटत नसावी झाडाच्या आडोशाला, उघड्यावरच आघोळ करतात ज्याच्या परसात विहीर नसते ते फलाजवर जाऊन स्नान करतात

## बुरखा न घेणाऱ्या स्त्रिया

सारे घर पाहून आम्ही पुन ओसरीवर आलो तो तेथे बऱ्याच स्त्रिया जमलेल्या दिसल्या मला वाटले, आम्हा परक्या पुरुषाना पाहून त्या धूम ठोकणार आणि

खोल्यात जाऊन दडणार ! पण तसे काहीच घडले नाही त्या थोड्याशा लाजल्या व त्रसल्या जागी तोंड लपवू लागल्या पण तेही फार थोडा वेळ दुसऱ्या क्षणी त्या मोकळेपणाने हसू-खिदळू लागल्या त्याचा फोटो काढण्यास काही हरकत नाही ना, असे मी भीतभीत विचारले तेव्हा त्याला कसलीही हरकत नसल्याचे मला सागण्यात आले मी भरभर दोन फोटो काढले नतर खुद्द अल हमामी, त्याची पत्नी व त्याचे नातवड याचेही एक छायाचित्र घेतले शहरात रस्त्यावर बुरखा न घेतलेली अरब स्त्री पाहायला मिळत नाही पण दुबेरा गावातून मोकळ्या चेहऱ्यानेच सर्व स्त्रिया हिंडत असलेल्या मला दिसल्या आपल्याकडे ग्रामीण भागातील कामकरी मुसलमान स्त्रिया बुरखा घेत नाहीत फक्त शहरातील मुस्लिम स्त्रियातच प्रामुख्याने बुरखा आढळतो तशीच स्थिती येथे असावी, असे मला वाटले तरीपण शकानिवृत्ती करून घेण्यासाठी मी अल हमामींना विचारले, " तुमच्या बायका बुरखा घेत नाहीत ? " यावर ते म्हणाले, " फक्त बेदू स्त्रिया बुरखा घेतात " बेदू किंवा बदू म्हणजे भटके, आदिवासी लोक आता ते खेड्यात स्थायिक झाले असले तरी त्याच्यावरील भटकेपणाचा शिक्का कायम राहिला आहे मात्र ज्यानी मुक्त जीवन जगायचे तेच बुरख्याच्या कैदेत सापडलेले पाहून चमत्कारिक वाटले.

## बहुपत्नीत्वाचा आर्थिक आधार

अल हमामींना मी विचारले, " तुमच्या गावात एकाहून अधिक बायका असलेले लोक किती असतील ? " ते म्हणाले, " पुष्कळच लोक आहेत. " अरब देशात बायकोला हुडा द्यावा लागतो त्याला मेहर म्हणतात हा मेहर बायकोला घटस्फोट देण्याच्या वेळी तिला परत करावा लागतो परंतु काही ठिकाणी तो वधूच्या बापालाही देण्याची पद्धत आहे चांगल्या घरची मुलगी मिळवायची तर खूपच मोठी रक्कम द्यावी लागते म्हणून मी विचारले, " हे जादा बायका करणारे लोक श्रीमंत आहेत काय ? " यावर अल हमामी म्हणाले, " छेः छेः ! ते अगदीच सामान्य लोक आहेत. पण त्या बायकांचा त्याना शेतीला उपयोग होतो काही लोकानी आपल्या बायकाना शिवणकामाची यंत्रे घेऊन दिली आहेत त्यावर त्या आपल्या पोटापुरती कमाई करतात आता माझ्या बाबतीत म्हणाल तर मी कधीही एक बायको हयात असताना दुसरी बायको केली नाही पहिल्या दोन बायका आणि त्याची मुलही मरून गेली तेव्हा मी तिसरी बायको केली तिला एकच मुलगी झाली ती गावातच दिलीय. तिचाच हा मुलगा "

मी अब्दुल्लाला विचारले, " शहरात काय स्थिती आहे ? " तो म्हणाला, " सुशिक्षिता-मध्ये एका वेळी एकच बायको करण्याची प्रथा आहे कारण ते मागसलेपणाच लक्षण

समजल जात शिवाय मध्यम वर्गायाना जादा बायका परवडतही नाहीत ज्या लोका-जवळ भरपूर पैसा आहे ते वाटेल तेवढी लग्न करतात मात्र एकावेळी चारापेक्षा जास्त बायका करीत नाहीत काही शेख किंवा अमीर युरोपियन बायकाशीही लग्न करतात आणि चार-सहा महिने मजा मारून त्याना तलाक देतात त्यासाठी लाख दोन लाख रुपये खर्च करायला ते मागेपुढे पाहात नाहीत त्याच्याशी लग्न करणाऱ्या गोऱ्या बायकाही काही कमी नाहीत. पैसा मिळवायचा तो एक मार्ग, याच दृष्टीन त्या अशा लग्नाकडे पाहतात कुवैतला एका अमीराने अशी ७०–८० लग्ने केल्याचे मला समजले रतिसुखाला अरबाच्या जीवनात विशेष महत्त्व असावे असे दिसते. त्यामुळे त्याना बायका पुरवण्याचा धदाच काही भारतीयानी चालविला असल्याचे मी ऐकले. त्यात मुसलमानाचा भरणा विशेष आहे कारण भारतातून वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रिया आपल्या बायका म्हणून ते तिकडे नेतात, आणि त्या अरबाना विकतात. त्यामुळे खऱ्याखुऱ्या भारतीयाना आपल्या धर्मपत्नींना तिकडे नेणे अलीकडे त्रासाचे झाले आहे, असे काही भारतीयानी मला सागितले केरळमधील नर्सेसचा व्यापार आखात देशात चालल्याच्या ज्या बातम्या मध्यतरी वृत्तपत्रातून आल्या होत्या त्याचाही या संदर्भात अर्थ लागतो

भारतीय स्त्रियाचे अरबाना विशेष आकर्षण वाटते एका चगीभगी अरबाने सागितले, “ युरोपातल्या गोऱ्या बायका मी खूप भोगल्या पण भारतीय बायका जसं रतिसुख देतात तस गोऱ्या बायका देऊ शकत नाहीत म्हणूनच वर्षातून तीन-चारदा मी मुंबईला फेरी मारून येतो मुंबईच्या पोरी घेऊन पुणे–पाचगणी–महाबळेश्वरला चक्कर मारून आलो की मन तृप्त होतं ” शभर रियाल असले की मुंबईचे परतीचे विमानाचे तिकीट मिळते त्यामुळे मुंबईची सफर ही सर्वात स्वस्त सफर समजली जाते. अनेक ओमानी लोकाच्या मुंबईत इस्टेटीही आहेत शिवाय इतर देशापेक्षा भारतात खूपच स्वस्ताई आहे यामुळेच बहुधा गतवर्षी ( १९७५ साली ) भारतात आलेल्या परदेशी प्रवाशामध्ये अरबाची सख्या बरीच मोठी होती.

आखात देशात वेश्याव्यवसायाला कायद्याने बदी आहे यामुळे उघडपणे तो चालत नाही पण छुप्या मार्गाने तो चालूच असतो. परतु अरब स्त्रिया तो व्यवसाय करीत नाहीत- आता तर त्याना आर्थिकदृष्ट्याही तो करण्याची जरूर राहिलेली नाही तथापि व्यभिचार चालूच असतो, आणि नवरा परगावी असताना गरोदर राहिलेल्या स्त्रिया गर्भपात करून घेतात, असे एका डॉक्टरानी सागितले

एकेकाळी आखात देशातील, विशेषत' दुबई, अबूधाबी, कुवैत वगैरे बदरातील अरब जकातचोरीच्या ( स्मगलिंगच्या ) धद्यात आघाडीवर होते. पण आता त्याना त्यात रस उरलेला नाही यामुळे जकातचोरीचा धदा ही हिंदी-पाकिस्तानी लोकाची मक्ते-

दारी बनली आहे दुबईतील काही भारतीयांचे पासपोर्ट भारताने अलीकडे जकात-चोरीच्या आरोपावरून रद्द केले त्यासंबंधी बोलताना एक भारतीय जाणकार म्हणाले, " सरकारने ही मोठी चूक केली ते लोक भारतात गेल्यावर त्यांची पारपत्रे जप्त केली असती तर ते बरोबर झाले असते वस्तुत' ते अत्यंत हुशार लोक असून त्यांच्या हुशारीचा भारताला उपयोग झाला असता अजूनही भारतातून येणाऱ्या पुढाऱ्यांची सरबराई हेच १०–१२ श्रीमंत लोक करतात त्याना दुखवून सरकारने काय मिळवले?" हेच गृहस्थ अरबांविषयी म्हणाले, " अरब लोक भारतीयांपेक्षा कमी बुद्धिमान आहेत, हा गैरसमज आपण डोक्यातून काढून टाकला पाहिजे ते आपल्याइतकेच हुशार आहेत, आणि ओमानी लोक तर इतर अरबांहून अधिक चतुर व व्यवहारकुशल आहेत "

## अल हज्मचा भुईकोट किल्ला

ओमानमध्ये ऐतिहासिक किल्ले तसे हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच आहेत परंतु ते चांगले भक्कम असले पाहिजेत, असे मी जो एकच भुईकोट किल्ला पाहिला त्यावरून माझे मत झाले तसे पाहिल्यास रुस्ताकची जिल्हाधीशाची कचेरीही जुन्या किल्ल्यातच आहे पण आता त्याचे स्वरूप किल्ल्याऐवजी एखाद्या गढीसारखे किंवा प्रचंड वाड्या-सारखे झाले आहे किल्ल्याची वैशिष्ट्ये त्यात दिसत नाहीत रुस्ताकहून मस्कतला परत जाताना रुस्ताकहून सुमारे तीस कि मी अंतरावर मुख्य रस्त्यापासून जवळच अल हज्मचा भुईकोट किल्ला आहे तो पाहण्यासाठी वालीकडून आम्ही लेखी परवानगी आधीच काढून ठेवली होती किल्ल्यापर्यंत पोचण्यासाठी एका खेड्यातून जावे लागते; आणि तेथील रस्ताही अत्यंत अरुंद असल्याने गाडी अगदी काळजीपूर्वक चालवावी लागते हे खेडेही रुस्ताक व दुबेरा यांच्यासारखेच होते

किल्ल्याच्या तटाकडे पाहिले की तो मातीचा असावा असा समज होतो पण तटाचा जो भाग ढासळला आहे त्यावरून तो तट आतल्या बाजूने भक्कम दगडांनी बांधून काढला असल्याचे लक्षात येते किल्ल्याच्या मुख्य दरवाजासमोर सुमारे सात फूट जाडीची एक भक्कम मातीची भिंत उभारण्यात आली आहे तिच्यात तोफेचा गोळा रुतून बसे, पण आरपार जात नसे अथवा दगडी भिंतीप्रमाणे इतर भागाला त्या गोळ्याचा आघात पोचत नसे

किल्ल्याच्या आवारात प्रवेश करण्यापूर्वी फाटकातच देवडीसारखा एक भाग आहे तेथे सशस्त्र सैनिक पहारा देत होते १७–१८ वर्षांची ती कोवळी मुले पाहिल्यानंतर ओमानला संरक्षणासाठी ब्रिटन व इराण यांच्यावर का अवलंबून राहावे लागत असावे याची कल्पना येते. जुन्या सुलतानाने आपल्या जनतेतून जवान तयार करण्याचा

प्रयत्नच केला नाही त्यामुळे लष्करी जीवनाची आवड असलेले बेकार तरुण इतर आखात देशाच्या लष्करात जाऊन सामील होत. आता सुल्तान काबूस यानी लष्करी शिक्षणावर लक्ष केंद्रित केल्याने पुस्तकी शिक्षणाची गोडी नसलेले अनेक शेतकरी तरुण सैन्यात भरती होत आहेत या प्रक्रियेची सुरुवात नुकतीच झाली असल्यामुळे इतके कोवळे सैनिक ओमानमध्ये जागजागी दिसतात सरकारी कचेऱ्यातही अगदी १५–१६ वर्षांची कोवळी मुले चपरासी म्हणून काम करताना आढळतात कारण तेथे पगार भरपूर मिळत असल्याने शिक्षणाची आवड नसलेली मुले ती नोकरी आनदाने पत्करतात.

आम्ही आमचा परवाना दाखविल्यावर त्या जवानापैकी एकाने आपल्या अधिकाऱ्याला बोलावून आणले तोही अगदीच फाटका व फडतूस वाटला त्याच्या अंगात एक साधा बनियन व कमरेला लुगी होती दोन-अडीचचा सुमार होता त्यामुळे तो बहुधा वामकुक्षी करीत पडला असावा तरीपण त्याने एक बदूकधारी सैनिक बरोबर घेऊन सारा किल्ला आम्हाला मोठ्या आस्थेने फिरून दाखविला

किल्ल्याचा मुख्य दरवाजा सुमारे दीड फूट जाड व वीस फूट उच आहे तो लाकडी असून ते लाकूड भारतीय असल्याचे समजले हा किल्ला सुमारे दोनशे वर्षांपूर्वी म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला सुल्तान बिन सैफ अल यारूबी याने बाधला होता. भारतात त्या वेळी कपनी सरकारचे राज्य सुरू झाले होते, आणि अरबी समुद्रावरही इग्रजाचे प्रभुत्व प्रस्थापित झाले होते आपल्याकडे किल्ल्याच्या मुख्य दरवाजाला वीत दीड वीत लाबीचे अणकुचीदार खिळे असतात तसेच खिळे या दरवाजावरही आहेत मात्र ते अणकुचीदार नसून साधे गोल माथ्याचे आहेत कदाचित आपल्याकडे ज्याप्रमाणे दरवाजा फोडण्यासाठी हत्तीचा वापर करीत तसा वापर करण्याची प्रथा इकडे नसावी. कारण अरबाच्या सैन्यात उट व घोडेच असत त्याचा भर तोफेच्या भडिमारावरच असला पाहिजे

दारातून मात्र प्रवेश करताच सुमारे वीस फूट रुंदीचा एक प्रचड खदक होता एरवी त्यावर फळ्या झाकलेल्या असत. शत्रूचे सैनिक आत शिरताच या फळ्या काढून घेत त्यामुळे ते बुडून मरत आपल्याकडे संपूर्ण किल्ल्याभोवती खदक असे दिल्ली व आग्र्याच्या लाल किल्ल्याभोवतीचे असे खदक आजही पाहायला मिळतात या भागात पाण्याचा तुटवडा असल्याने संपूर्ण किल्ल्याभोवती पाण्याचा खंदक निर्माण करणे अरबाना परवडण्यासारखे नव्हते, हे उघड आहे खदकातून पोहून पलीकडे जाणाऱ्या शत्रुसैनिकाशी मग किल्ल्यातील सैनिकाची हातघाईची लढाई होई एखाद्या सैनिकाला शत्रूशी लढताना छातीत गोळी लागली किंवा सगीन घुसली तर तो हाताचा पजा छातीवर दाबून धरी आणि तोच पजा समोरच्या भितीवर मारी. असे रक्ताच्या पजाचे

२–४ ठसे अजूनही दिसतात ते वीरत्वाचे प्रतीक मानले जातात.

किल्ल्यात पाण्याचा एक पाट ( फलाज ) आजही खळखळताना दिसतो शत्रूने तो पाट बाहेरच्या बाजूलाच बंद करून पाणी तोडल्यास आतील लोकांवर तहानेने मरण्याची पाळी येऊ नये म्हणून पाण्याचे प्रचंड साठे करण्याची सोयही किल्ल्यात जागजागी केलेली आहे शिवाय काही विहिरीही खोदलेल्या आहेत किल्ला आतून चांगला प्रशस्त असून त्याला तीन मजले आहेत. उंची सुमारे ६० फूट असावी आत मोठमोठे दिवाणखाने, स्वयंपाकघरे, राहण्याच्या खोल्या, तुरुंग, शाळा, स्नान-गृहे, घोड्याच्या पागा. कोठारे वगैरे आहेत एक गमतीची गोष्ट म्हणजे घोड्यांच्या पागा वरच्या मजल्यावर आहेत घोड्यांना वर जाण्यासाठी पुण्याच्या पर्वतीला आहेत तसल्या रुंद पायऱ्या बांधलेल्या आहेत वर्षाचा खजूर खजुरीच्या पानापासून बनविलेल्या बोऱ्यामध्ये भरून ठेवीत सुमारे सहा इंचाचे चर बांधून काढलेले असून त्यावर ते बोरे ठेवीत त्यातून पाझरणारा रस किंवा मध एका खड्ड्यात जमा होईल अशी सोय केलेली आहे. तुरुंगाच्या अंधारकोठड्या भुयारासारख्या जागात असून तेथे हवा व प्रकाश याची सोय नसल्यामुळे आजही तेथे गुदमरल्यासारखे होते किल्ल्याला एकच बुरूज असून तो मधोमध आहे. त्याच्यावरील नक्षीकाम फारच सुरेख आहे. किल्ल्यात जागजागी लहानमोठ्या तोफा पडलेल्या दिसतात. त्या पूर्वी बुरुजावर असल्या पाहिजेत, किंवा काही झरोक्यातूनही त्या रोखलेल्या असतील.

किल्ल्याच्या गच्चीवरून सभोवतालचे दृश्य छान दिसते सगळीकडे वाळवंट पसरले असल्याने खूप दूरवरचा प्रदेश नजरेच्या टप्प्यात येतो अधूनमधून मरूद्याने, खजुरीची बने व लहान-लहान गावे दिसतात. गच्चीवरील खोल्यात आता सैनिकांच्या राहण्याची सोय केली आहे ३०–४० खाटा ओळीने मांडलेल्या आहेत गार वारे वाहत असल्याने दुपारची वेळ असूनही मोठे प्रसन्न वाटत होते

किल्ला पाहून खाली आल्यावर आपण एक अद्‌भुत वास्तू पाहिली, असे वाटले. दगड, लाकूड, लोखंड यापैकी कसलेच साहित्य देशात उपलब्ध नसताना जुन्या काळची मंडळी असे किल्ले कसे बांधत असतील, असा विचार मनात येऊन गेला. त्यासाठी लागणारा पैसा या देशाजवळ कोठून येत असेल ?

परत आल्यावर बँक ऑफ बरोडाच्या परराष्ट्र विभागाचे जनरल मॅनेजर श्री बाना ( बी एल ) परांजपे यांची ओळख झाली ते गल्फ हॉटेलातच उतरले होते मस्कतला बँकेची शाखा उघडण्याची तयारी करण्यासाठी ते आले होते. दुबई व अबूधाबीला त्याच्या बँकेच्या शाखा आहेत आवश्यकता पडल्यास मी त्या मंडळींचे साह्य नि'संकोच-पणे घ्यावे असे त्यांनी मला सांगितले व त्यांचे पत्ते दिले. ते पत्ते मला पुढे फार उपयोगी पडले

## महाराष्ट्र-दिनानिमित्त स्नेहसंमेलन

१ मे हा महाराष्ट्र-दिन पण त्या दिवशी शनिवार होता म्हणून मस्कतमधील मराठी मडळींनी ३० एप्रिल रोजीच महाराष्ट्र दिन साजरा करण्याचे ठरविले, कारण त्या दिवशी शुक्रवार असल्याने सर्वांना सुटी होती तसे त्याचे स्वरूप अगदी साधे होते सर्वांनी एकत्र जमावयाचे, गप्पागोष्टी करावयाच्या आणि चहापाणी घ्यावयाचे पुण्याचे श्री एम् पी. गोखले याना त्याच्या कपनीकडून रुवी भागात मिळालेल्या घराला ऐस-पैस अगण आहे म्हणून तेथेच सुमारे ३०–४० मडळी जमली मस्कतमध्ये सहकुटुंब राहणारे लोक थोडेच असल्याने स्त्रिया व मुले याची संख्या थोडीच होती तसे मस्कत-मध्ये मराठी बोलणारे लोक हजाराहून अधिक असतील परंतु त्या दिवशी जमलेल्यामध्ये प्रामुख्याने पाढरपेशाचाच भरणा होता इजिनियर, डॉक्टर, व्यवस्थापक, कारकून वगैरे अधिकाश अर्थातच ब्राह्मण होते पण अब्राह्मण व अहिंदूही हाताच्या बोटावर मोजता येतील एवढे होतेच. मला त्यानी मुख्य अतिथी म्हणून बोलावले होते सर्वांनी आपापली ओळख करून दिली त्यातच अर्धापाऊण तास गेला खरा कार्यक्रम तोच नतर काही स्त्रीपुरुषानी हिंदी-मराठी गाणी गाऊन दाखविली मी माझ्या दौऱ्याचे प्रयोजन थोडक्यात समजावून सागितले व माझ्या काही कविताही म्हणून दाखविल्या बहुतेक मडळी पुण्यामुबईची असूनही माझे नाव माहीत असलेले अथवा माझे लिखाण वाचलेले त्यात बहुधा कोणीच नव्हते ते पाहून स्वतःसंबधीचा माझा भ्रमनिरास पूर्ण झाला. त्याच दिवशी मराठी मडळाची स्थापना करण्यात आली दरमहा १ रियाल ( २५ रुपये ) वर्गणी ठरली आणि बसल्या बैठकीत १५०० रुपये जमा झाले महिन्याच्या शेवटच्या शुक्रवारी एकत्र जमणे एवढाच कार्यक्रम तात्पुरता म्हणून ठरविण्यात आला

ओमानी लोकाविषयीचे मराठी मडळींचे अनुभव जाणून घेण्याच्या दृष्टीने मला या प्रसंगाचा फायदा घेता आला बेगळूरचे सिव्हिल इजिनियर श्री मिरजी म्हणाले, "सामान्यत ओमानी लोक भारताविषयी प्रेमादर बाळगतात तेलाचा पैसा संपला तर पुन' उटावर नि गाढवावर बसायची त्याची तयारी आहे अल्लाह करीम (देवाची इच्छा देव दयाळू आहे ) हे त्याच ब्रीदवाक्य आहे " श्री सदलगेकर यानी सागितले, "ग्रामीण भागातले लोक शाकाहारी भोजनसुद्धा मोठ्या प्रेमाने खाऊ घालतात त्याना आपली कदर आहे पण शहरी शिक्षित ओमानी चढेल मग्रूर आहेत "

सुलतानाच्या शाही बगिचाचे प्रमुख व्यवस्थापक श्री देसाई या नावाचे महाराष्ट्रीय तरुण आहेत त्यानी सागितले की त्या बगिचात लावण्यासाठी भारतातून दोन बोईंग विमाने भरून रोपे नेण्यात आली होती ते मला तो बगीचा दाखविण्यासाठी घेऊन जाणार होते परतु त्याची गाडी ऐनवेळी नादुरुस्त झाल्यामुळे ते जमले नाही

ओमानी लोकानी आळस झटकून टाकला तर हा देश अन्नाच्या बाबतीत नक्की स्वावलंबी होईल, असे सर्वांचे मत दिसले

## खलफान बिन नासिर अल वहीबी

आखात देशामध्ये भेटलेल्या अरब बुद्धिमंतांपैकी ज्यानी मला सर्वांत अधिक प्रभावित केले, किंबहुना ज्यांचे वाचन व चिंतन यानी मी भारून गेलो अशा लोकांमध्ये ओमानचे समाजकल्याण मत्री श्री खलफान बिन नासिर अल वहीबी हे प्रमुख होते त्यांच्याशी माझी बौद्धिक चकमकच घडली, असे म्हणण्यास हरकत नाही आणि त्याना ती चकमक फार आवडली असावी, असे त्यानी पुन मला भेटण्याची जी इच्छा आमच्या राजदूताजवळ व्यक्त केली तिच्यावरून मला वाटले परदेशात शिक्षण घेऊन तयार झालेली ही तरुण मडळी वैचारिक दृष्ट्या किती तरबेज आहेत, हे पाहिले की बरे वाटते आणि त्यांच्या मार्गदर्शनाने त्यांचा देश नक्कीच प्रगती करील असा विश्वास वाटतो महाराष्ट्रदिनाच्या दिवशी श्री खलफान यांची मुलाखत झाली हा योगायोग मला मोठा अर्थपूर्ण वाटला

श्री नासिर याना मी पहिलाच प्रश्न हा केला “ तुमच्या देशाच जे आधुनिकीकरण चाललं आहे त्याचा किंबहुना एकूण आधुनिकतेचा तुमच्या देशातल्या इस्लामवर काय परिणाम झाला आहे ? ”

ते म्हणाले, “ आधुनिकीकरण म्हणजे पाश्चात्त्यीकरण नव्हे, हे आधी समजून घेतल पाहिजे तुमच्या देशात हात चरखा चालत होता आता त्यासाठी तुम्ही यत्रशक्ती वापरता हे त्याच आधुनिकीकरण झाल आधुनिकीकरण हे अधिक चागल जीवन जगता येण्याच एक साधन किंवा अवजार आहे पाश्चात्त्य प्रभाव नकारात्मक आहे त्यापासून दूर राहिल पाहिजे आधुनिक सस्कृतीतील ज्या गोष्टी आपल्या जीवनप्रणालीशी जुळत असतील तेवढ्याच आपण घ्याव्यात भारतीय स्त्रिया आधुनिक बनल्या तरी त्यानी आपली साडी सोडली नाही हे आधुनिकतेच चागल उदाहरण आहे याच्या उलट पाश्चात्त्यानी दारूला लोकप्रिय आणि प्रतिष्ठित बनवल वस्तुतः दारू ही काही नवी गोष्ट नव्हे पुरातन काळापासून ती चालत आलीय, आणि गावढळ आदिवासींपासून राजापर्यंत सगळेच दारू पीत होते अशी ही दारू आता आधुनिकीकरणाच प्रतीक बनू पाहात आहे पण दारू पिण म्हणजे आधुनिक बनण नव्हे, हे आपण ओळखल पाहिजे जे काही पाश्चात्त्य असेल ते सारच नव आणि चागल, असा जो समज मागास देशात पसरला आहे तो चुकीचा आहे तो आपण आपल्या आचरणानच दूर केला पाहिजे.”

“ आता इस्लामसबधी बोलायच तर तो एक पूर्ण धर्म आहे, अस मी मानतो

आधुनिक काळाशी जमवून घेण्याचं सामर्थ्य त्याच्यात आहे पण मुसलमानांची अधोगती झाली आहे ते खऱ्या धर्माप्रमाणं आचरण करीत नाहीत, म्हणूनच त्यांची अशी दुर्दशा झाली आहे याचा अर्थ असा की, इस्लाम वाईट नसून मुसलमानच वाईट बनले आहेत. दोष धर्माचा नसून त्याच्या अनुयायांचा आहे पाश्चात्त्य प्रभावानं अनेक अविकसित देशांत वाईट गोष्टी शिरल्या आहेत. त्याच्या प्रभावापासून इस्लाम अलिप्त राहिला तरच मुसलमानांचं कल्याण होईल तसा तो दूर राहावा, या दृष्टीनं आमचे प्रयत्न चालू आहेत अजून तरी आम्हाला त्या बाबतीत यश येत राहिलं आहे. आमचा पोषाख, आमची भाषा, आमची कुटुंबसंस्था, आमचे शिष्टाचार, आमचा आहार-विहार या सर्व बाबतींत आम्ही आमची अस्मिता टिकवून ठेवली आहे यावरून इथल्या इस्लामवर आधुनिकतेचा फारसा प्रभाव पडलेला नाही, हे तुमच्या लक्षात येईल.

" आधुनिकीकरणाचा एक परिणाम म्हणजे खेड्यातून शहराकडे माणसांचा व साधन-संपत्तीचा सुरू झालेला ओघ हा होय तसं पाहिलं तर ही प्रक्रिया जागतिकच आहे पण आम्हाला तिचा आमच्या दृष्टीनं विचार केला पाहिजे सध्या शहरी भागात झपाट्यानं विकास चालू आहे. रस्ते, घरं, कारखाने उभारण्याची कामं चालू आहेत त्यामुळं सर्वांना काम मिळतं म्हणून खेड्यातून शहराकडे लोकांची रीघ लागली आहे पण हा विकासाचा वेग काही असाच कायम राहणार नाही तो मंदावल्यावर ग्रामीण लोकांना खेड्यात परत जावं लागेल पण तोपर्यंत त्यांना इथल्या शहरी जीवनाची चटक लागलेली असेल आणि ते खेड्यात परत जायला तयार होणार नाहीत. म्हणून आतापासूनच शहराच्या सुखसोयी, रोजगार साधनं वगैरे ग्रामीण भागात न्यायला सुरुवात करावी लागेल सत्तेच्या आणि उद्योगाच्या विकेंद्रीकरणानंच हा प्रश्न सुटू शकेल त्यायोगे आधुनिकीकरणाचा वाईट परिणामही पुष्कळच आटोक्यात राहील. "

त्याचे हे उत्तर तसे सर्वच विकसनशील देशांना लागू पडण्यासारखे आहे, परंतु आधुनिकतेच्या प्रभावापासून इस्लामला वाचविण्याची जी धडपड आखाती देशांनी चालविली आहे तिच्या स्वरूपाची कल्पना मला त्याच्या या उत्तरावरून आली. परंतु आधुनिकीकरणाचा एवढा मर्यादित अर्थ मला अभिप्रेत नव्हता. विचारस्वातंत्र्यावर आधारलेली मुक्त लोकशाही ही आधुनिकतेची जगाला मिळालेली एक अमूल्य देणगी आहे, असे मी समजतो इस्लामी देशांत या लोकशाहीचे रोपटे का रुजत नाही त्याचाही मी थोडाबहुत विचार केला आहे म्हणून माझे म्हणणे मी जरा मोकळेपणाने त्याच्यापुढे मांडले मी म्हणालो, " इस्लाम आणि लोकशाही यांचं नातं काय याचा विचार मी करीत असतो मला असं वाटतं की, इस्लाममध्ये लोकशाहीला काही स्थानच असू शकत नाही कारण एक देव, एक प्रेषित आणि एक धर्मग्रंथ यांच्या चौकटीतच

मुसलमानाना वसाव लागत त्याच्या आज्ञेबाहेर ते जाऊ शकत नाहीत. खऱ्या लोकशाहीत विचारभिन्नतेला, मतभेदाला पूर्ण वाव असतो. असा वाव इस्लाम आपल्या अनुयायाना देत नाही म्हणूनच मुस्लिम देशात राजा, सुलतान, शेख किंवा अध्यक्ष याची हुकूमशाही तरी असते किंवा साम्यवादी राजवट तरी असते अर्थात साम्यवाद म्हणजे पक्षाची हुकूमशाहीच असं का घडत ? ”

श्री खलफान बिन नासिर गंभीरपणे म्हणाले, “ मी मघाच सांगितलं की हा दोष इस्लामचा नसून मुसलमानाचा आहे कुराणात लोकशाहीला अनुकूल असे अनेक आदेश आहेत अम्र हुमशूरा—सर्वांनी एकविचाराने काम करावं, देव, पैगंबर आणि नेता याची आज्ञा पाळावी, पण नेत्याचं वर्तन कुराणाविरुद्ध, देवाविरुद्ध असेल तर त्याची आज्ञा पाळू नये असं कुराणातच सांगितलय सामूहिक जीवनाची खूपच महती कुराणान गायिली आहे पण कुराणात सांगितलेलं सामूहिक जीवन जगण्याच्या बाबतीत मुसलमान अयशस्वी ठरले आहेत

“ याचा अर्थ पाश्चात्त्य पद्धतीची लोकशाही इथ यशस्वी होईल, असा नव्हे. किंबहुना आशिया, आफ्रिका, लॅटिन अमेरिका वगैरे खंडातल्या गरीब देशाना ही आधुनिक लोकशाही परवडणारी नाही, असंच इतिहासान सिद्ध केलं आहे जपानसारख्या समृद्ध देशालाच ती परवडेल. भुट्टोंची लोकशाही आणि इंदिरा गांधींची लोकशाही यात तुम्ही काय फरक करता ? भुट्टोनी आपली सत्ता प्रस्थापित करण्यासाठी ज्या-ज्या मार्गांचा अवलंब केला—विरोधी पक्षाना बदनाम करून त्याच्या पुढाऱ्याना तुरुंगात टाकणं, वृत्तपत्रावर नियंत्रण घालून ती आपल्या प्रचारासाठी राबवणं, आपल्याला अडचणीचे वाटतील अशा पक्षावर बंदी घालणं, न्यायसंस्थाही आपल्या हुकूमशाहीच्या दावणीला बांधणं—या साऱ्या गोष्टी इंदिराजींनी केल्या नाहीत काय ? उलट एका बाबतीत भुट्टोंची लोकशाही इंदिराजींच्या लोकशाहीपेक्षा अधिक चांगली म्हणावी लागेल कारण त्यानी विरोधी पक्षावर आरोप ठेवून त्याला न्यायालयात खेचलं, आणि त्याच्यावर बंदी घालण्याच्या आदेशावर न्यायालयाकडून शिक्कामोर्तब करवून घेतलं तेवढाही मुखवटा तुमच्या देशात कायम ठेवण्यात आलेला नाही एका व्यक्तीला वाटलं आणि तिन पक्षावर बंदी घालून ते बेकायदा ठरवले यात कोण चूक कोण बरोबर, हे मला सांगायचं नाही इस्लामी आणि बिगरइस्लामी देशात सारखीच परिस्थिती आहे, एवढंच मला सांगायचं आहे चीन, ब्रह्मदेश, नेपाळ, फिलिपाइन्स वगैरे देश काही इस्लामी नव्हेत मग तिथ लोकशाही का नाही ? खरं म्हणजे हा गरिबीचा प्रश्न आहे, अज्ञानाचा प्रश्न आहे त्यामुळेच लष्करी कट होतात आणि लोकशाही राजवटी उखडल्या जातात, किंवा देशाच्या राज्यघटनेचाच वापर करून लोकशाही निकालात काढली जाते हे सारे मागासलेपणाचे परिणाम आहेत इंग्लंड,

अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, पश्चिम युरोपातील इतर देश वगैरे ठिकाणीच खरी आधुनिक लोकशाही आपल्याला पाहायला मिळते कारण तिथ अनेक वर्षांपासून लोकशाहीची जोपासना होत आलीय परंतु त्यावरून ख्रिस्ती धर्म लोकशाहीला अधिक अनुकूल किंवा पोषक आहे असा निष्कर्ष तुम्ही काढाल काय ? तस असत तर लॅटिन अमेरिकेतली आणि अफ्रिकेतलीच नव्हे तर स्पेन–पोर्तुगालसारखी युरोपीय राष्ट्रेदेखील हुकूमशाहीच्या टाचेखाली का चिरडली गेली असती ? ”

श्री खलफान बिन नासिर यानी माझा मुद्दा इतक्या जोरदारपणे खोडून काढला की मी थक्कच झालो. भारतावरील हुकूमशाहीचे सावट तात्कालिक आहे हिंदू धर्मात विचारस्वातंत्र्याला खूप वाव आहे इंदिराजींनी जे काही केले ते नैतिक दृष्ट्या कितीही अयोग्य असले तरी त्यानी राज्यघटनेच्या चौकटीत राहूनच ते केले आहे, वगैरे मुद्दे भारताच्या संदर्भात मांडण्याचा मी प्रयत्न केला, परंतु त्याच्या युक्तिवादापुढे त टिकले नाहीत, हे मला मान्य केलेच पाहिजे

मी मग एक जरा वेगळ्या धर्तीचा प्रश्न विचारला " हिंदूशी सहकार्य करण इस्लामला कितपत आवडेल ? कितपत मानवेल ? भारत आणि ओमान याच्यातल सहकार्य कसं वाढेल ? ”

यावर ते म्हणाले, " ओमानी लोक मनान मोकळे उघडे आहेत त्यानी आपल्या मनाची कवाड बंद करून घेतलेली नाहीत भारताशी त्याचा इस्लामपूर्व काळापासून व्यापारसंबंध आहे आणि किमान दोनशे वर्षांपासून हिंदू लोक या देशात मोठ्या संख्येने राहात आले आहेत या अवधीत इथ कधीही जातीय दंगल झाली नाही इथ हिंदूची देवळही आहेत जुन्या काळापासून बिगरमुसलमानाची उपासनास्थान असलेला ओमान हा बहुधा एकमेव अरब देश असेल * भारत-पाक युद्धाच्या वेळी इथ काही गैरसमज पसरल्यामुळे ओमानी लोकाची सहानुभूती पाकिस्तानकडे राहिली खरं म्हणजे भारत आणि पाकिस्तान एकत्र आहेत, पण राजकारणी मंडळींनी वैयक्तिक किंवा पक्षीय स्वार्थापायी अविश्वासाचं वातावरण पसरविल आणि इंग्रजानी त्याचा फायदा घेऊन देशाची फाळणी केली, अस ओमानी लोक मानतात त्यामुळ फाळणीबद्दल आम्हाला दुःखच झाल."

मी मध्येच त्याना थांबवून विचारले, " पुन. भारत पाक युद्ध झाल तर ओमानी लोकाची सहानुभूती कोणाकडे असेल ? ”

यावर ते म्हणाले, " त्या वेळी चूक कुणाची आहे आणि न्यायाचा पक्ष कोणता

---

* दुबई, कुवेत वगैरे ठिकाणीही देवालये, गिरजाघरे व गुरुद्वारे असल्याचे नतर मला आढळले.—लेखक

आहे ते पाहूनच आम्ही आमचा निर्णय घेऊ पण एक गोष्ट लक्षात ठेवा पाकिस्तान भारताच्या तुलनेन लहान आणि दुबळा असल्यान त्याच्या बाजूला आमच्या सहानुभूतीच पारड नेहमीच झुकलेल राहील. अर्थात विचारवंताच्या दृष्टीन हिंदु-मुसलमान असा मुद्दा नसून कोण चूक, कोण बरोबर, न्यायाचा पक्ष कोणता, हेच मुद्दे महत्त्वाचे असतात मला व्यक्तिश लेबॅनॉनमधील मुसलमानाच्या अनेक गोष्टी चूक वाटतात पण त्याच्यावर अन्याय झालेला असल्यान त्याच्याबद्दल सहानुभूतीही वाटते बागला देशाच्या वेळी भारतान पाकिस्तानवर आक्रमण केल असच आम्ही मानतो त्या वेळी पाकिस्तानकडून काही चुकीच्या, मूर्खपणाच्या गोष्टी घडल्या हे खर, पण त्यामुळ भारताच आक्रमण न्याय्य ठरत नाही भारतान गोव्याच्या बाबतीत हिंसेचा वापर करून आपली प्रतिमा डागळवून घेतली, अस अजूनही मला वाटत. भारत आणि पाकिस्तान हे मित्र, शेजारी, किंबहुना भाऊभाऊ आहेत, आणि त्यानी तसच वागल पाहिजे, असं मी मानतो ”

चर्चची गाडी भलत्याच रुळावर गेल्याचे माझ्या लक्षात आले म्हणून मी जरा दुसराच नाजूक प्रश्न विचारला, “ ब्रिटिश लोक ओमानच शोषण करीत आहेत, फसवीत आहेत अस मी ऐकलय ब्रिटिश संस्थेत काम करणाऱ्या एका जबाबदार गृहस्थानी मला अस सांगितल की, पाच हजार रियालच काम झाल असताना ते पन्नास हजाराच बिल लावतात आणि मोटारी पुसायसाठी लागणाऱ्या चिंध्याही इग्लडहून मागवतात याबाबतीत तुमच काय म्हणण आहे ? ”

यावर श्री खलफान बिन नासिर यानी दिलेले उत्तर मोठे चतुरपणाचे व मासलेवाईक होते ते म्हणाले, “ ही गोष्ट मी मान्यही करीत नाही अथवा नाकारीतही नाही. आम्हाला आमचा विकास घडवून आणायचा आहे पाच वर्षांपूर्वीच त्याची सुरुवात झालीय खूपसं काम करायचं आहे आणि ते झटपट उरकायच आहे त्यासाठी सर्वांची मदत घेण भाग आहे आमच्या या परिस्थितीचा गैरफायदा सर्वच लोक घेतात त्यात ब्रिटिश, जर्मन, भारतीय, ओमानी सर्वच आहेत त्यापैकी ब्रिटिशाकडून केल्या जाणाऱ्या शोषणाच्या बाबतीत पुष्कळशी अतिशयोक्ती केली जात असण्याची शक्यता आहे आम्हाला एक शाळा तीन महिन्यात बाधून हवी असते एक रस्ता सहा महिन्यात तयार करून हवा असतो त्यासाठी काम करणारा जेवढी रक्कम मागेल तेवढी द्यावीच लागते. त्यात फसवणूक होणार, हे आम्ही गृहीतच धरलेल असत. ब्रिटिशामध्येही बरे, वाईट, सर्व प्रकारचे लोक आहेत. आता आमची आधार चौकट ( इन्फ्रास्ट्क्चर ) तयार झाली आहे. यापुढ वाटेल ती किंमत देऊन काम करवून घेण्याची गरज उरणार नाही ”

मी शेवटचा प्रश्न विचारला, “ भारत आणि ओमान याच्यातले चागले सबध कसे

दृढ करता येतील ? त्यासाठी प्रत्येकान काय केल पाहिजे, असं तुम्हाला वाटत ? ”

यावर ते म्हणाले, “ आपण एकमेकाचे शेजारी आहोत तेव्हा शेजारधर्माप्रमाण आपण एकमेकाना अधिक ओळखायला शिकूया तुम्ही त्यासाठीच आला आहात, ही एक शुभ गोष्ट आहे, अस मी समजतो तुम्ही वस्तुनिष्ठ दृष्टिकोणातून आमच्या देशासबंधी लिहा तुमच्या लोकाना आमची खरीखुरी माहिती करू द्या कुणावरही अन्याय होणार नाही, अशी काळजी तुम्ही घ्यावी चागली, विचारवंत मडळी एक-मेकाच्या देशात आली-गेली पाहिजेत आम्ही मुसलमान असलो तरी भारताबद्दल आम्हाला परकेपणा वाटत नाही आम्ही मुख्यतः माणुसकीच्याच भूमिकेतून विचार करतो, आणि तुम्हीही तसाच विचार करावा, अशी आमची अपेक्षा आहे तुकड्या-तुकड्यात विचार न करिता संपूर्ण माणसाचा विचार केला तर आपल्या दोन देशा-मध्ये चागले संबध आपोआपच निर्माण होतील, असा मला विश्वास वाटतो ”

अशा प्रकारे अत्यत खेळीमेळीच्या वातावरणात ही मुलाखत संपली तिने माझ्या विचाराना चागलीच चालना दिली अरब देशातील बुद्धिवत भारतासंबधी कसा विचार करतात, याची मला पुष्कळच स्पष्ट कल्पना त्यावरून आली इस्लामसंबधी मी राज्याच्या मुफ्तींशी ( असे मुफ्ती म्हणजे धर्माचार्य प्रत्येक आखात देशात असून त्याचा दर्जा मत्र्याचा असतो व त्याच्याकडे सामान्यत. वक्फ ( धार्मिक सस्था ) हे खाते असते. ) चर्चा करावी असे त्यानी मला सागितले व तशी व्यवस्थाही केली परंतु वेळेच्या अभावी मला मुफ्तींना भेटता आले नाही

## इजिप्तमधील परिस्थिती

माहिती व संस्कृती मत्र्याचे चिटणीस श्री शौकी हे मोठे उमदे गृहस्थ वाटले ते इजिप्शियन आहेत गोरापान रग, धिप्पाड शरीर, हसतमुख चेहरा व बोलके निळे डोळे प्रथम ते रशियन किंवा युरोपियन असावेत असे वाटते पण काळेभोर, डोकी-बरोबर कापलेले किंचित कुरळे केस पाहिले की ते आफ्रिकी अरब असल्याचे जाणकार नजरेला समजते मत्रिमहोदयाच्या भेटीसाठी मी त्याच्या खोलीत तिष्ठत बसलो असता मला कटाळा आला, आणि मग शिष्टाचाराची फारशी पर्वा न करिता मी त्याच्याशी गप्पा मारायला सुरुवात केली श्री शौकीही लौकरच गप्पात रगून गेले मला वाटते, लोकाना बोलके व बोलते करण्याची जादू माझ्या वाणीत असावी समोरच्या माणसाच्या अंत:करणापर्यंत जाऊन पोचण्याची किमयाही मला अनेक वर्षांच्या सरावाने साध्य झाली असावी परप्रातात व परदेशात याचा मला नेहमी अनुभव येतो. आपण स्वत:-संबधीच न बोलता दुसऱ्या माणसाला त्याच्यासंबधी बोलू दिले की तो खुलतो, असा माझा अनुभव आहे त्याची किंवा त्याच्या समाजाची, देशाची आपण नेहमीच स्तुती

करावी लागते, असे नाही पुष्कळदा निर्मळ मनाने केलेली टीकाही लोकाना आवडते परंतु सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या व्यक्तीशी आपण बोलतो तिच्यात, तिच्या कुटुंबात, समाजात, देशात आपल्याला रस आहे, त्या सर्वांविषयी जाणून घेण्याची आपल्याला उत्सुकता आहे, हे आपण तिच्या नजरेस आणून दिले की तिच्या मनाची व हृदयाची कवाडे आपोआप खुलतात शौकींच्या बाबतीतही असेच झाले बोलता-बोलता ते खुलत गेले आखात देशातील अरब आणि इजिप्तचे लोक याच्यातील साम्य-भेद जाणून घेण्यास मी उत्सुक होतो त्यामुळे ते मोकळेपणाने बोलू लागले ते म्हणाले,-" मिस्री ( इजिप्शियन ) समाज भारतीय समाजासारखाच मोकळा-ढाकळा आहे नव्या गोष्टी स्वीकारायला त्याची नेहमीच तयारी असते पण ओमानी समाज अजून बंद किंवा बंदिस्त आहे नव्या गोष्टी स्वीकारायला त्याच मन तयार होत नाही म्हणूनच तर अजून आपला भोगळ पोषाख सोडून आमच्यासारखा सुटसुटीत पाश्चात्त्य पोषाख त्यान घेतलेला नाही आमच्या बायकाही स्कर्ट घालू लागल्या आहेत याच्या बायका अजून बुरख्यातच आहेत अर्थात जसजसा शिक्षणाचा प्रसार वाढत जाईल तसतसा या लोकाचा बंदपणा कमी होऊन ते तुमच्या-आमच्यासारखे मुक्त बनत जातील "

"आमच्या देशातल्या मुसलमानामध्ये बहुपत्नीत्वाचा आग्रह आणि कुटुंब-नियोजनाला विरोध फार मोठ्या प्रमाणावर आढळतो त्यामुळं आमच्या सामाजिक-आर्थिक विकासामध्ये बराच अडथळा निर्माण झाला आहे तुम्ही मिस्री लोकानी हा प्रश्न कसा सोडवला आहे ?" मी विचारले

श्री शौकी म्हणाले, " मिस्र आणि भारत याच्या समस्या जवळजवळ सारख्याच आहेत सर्वांत मोठी समस्या अर्थातच लोकसंख्या वाढीची आहे. त्यासाठी कुटुंब-नियोजनाचे आधुनिक मार्ग स्वीकारण अपरिहार्य झाल आहे पण जुनाट विचाराचे मुल्ला-मौलवी धर्माच्या नावावर कुटुंबनियोजनाला विरोध करतात. ते निसर्गाविरुद्ध आहे, परमेश्वरी इच्छेच्या विरुद्ध आहे, अस ते म्हणतात बायकानाही वाटत की आपल्याला कमी मुल झाली तर आपला नवरा दुसऱ्या बायाकडे जाईल; म्हणून त्याना सारखी मुल होत राहायला हवीत मुल होण हे पौरुषत्वाच लक्षण समजल जात, म्हणून पुरुषही जास्तीत जास्त मुल–आणि तेही मुलगेच होण्यासाठी धडपडत असतो. या सगळ्या भोळसट समजुतीमुळं आमच्या देशात कुटुंबनियोजनाचा गाडा फारसा पुढ सरकतच नाही त्यात पुनः बहुपत्नीत्वाची समस्या आहेच तरीपण आमच्या सरकारन हळूहळू कायद्यान त्यावर बंधन घालायचा प्रयत्न चिकाटीन चालवलाय आता कुणालाही पहिली बायको हयात असताना दुसर लग्न करायच असल्यास न्यायालयात जाऊन न्यायाधीशाला ते पटवून द्याव लागत तरच पहिल्या बायकोपासून

तलाक मिळतो शिवाय पहिल्या बायकोजवळ चरितार्थाचे साधन नसेल तर तिला भरपूर पोटगीही द्यावी लागते या बंधनामुळे तोंडी तलाक देण्याची प्रथा जवळजवळ नामशेष झाली आहे, आणि मनात येईल तेव्हा दुसरी, तिसरी किंवा चौथी बायको घरात आणण्याच्या खुशालचेंडूपणाला आळा बसला आहे मुख्य म्हणजे, सुशिक्षितामध्ये बहुपत्नित्व जवळजवळ संपुष्टात आले आहे एकतर ते आता परवडतही नाही, आणि ते आधुनिक सभ्यपणाच्या कल्पनेत बसू शकत नाही याचा अर्थच असा की या सामाजिक दुर्गुणातून मुक्त होण्याचा एकमेव मार्ग म्हणजे शिक्षण हाच होय. लोकसंख्यावाढीची झळ खुद्द आपल्यालाही पर्यायाने लागल्याशिवाय राहात नाही, हे शिक्षणाने लोकाना पटेल तेव्हाच ते कुटुंबनियोजनाकडे वळतील, हे ओळखून मिस्री सरकारने लोकशिक्षणाचा मोठा कार्यक्रम हाती घेतला आहे ”

## माहिती मंत्र्यांची भेट

ज्या माहिती व संस्कृती मन्त्रालयाने मला सरकारी पाहुणा बनविले होते त्याच्या मन्त्याना भेटून त्याचे आभार मानणे हे माझे कर्तव्य होते म्हणून त्याच्या भेटीसाठी खटपट सुरू केली त्याप्रमाणे ता १ मे रोजी सकाळी १०–३० वाजता त्याची मुलाखत ठरली तेथे गेल्यावर समजले की मोरोक्कोचे पतप्रधान त्याच्या मन्त्रालयाला व पदार्थसंग्रहालयाला त्याच वेळी भेट देणार असल्यामुळे मला ते भेटू शकणार नाहीत दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजता त्याना भेटावयाचे ठरले. पण त्या वेळी ईजिप्तचे राजदूत त्याना भेटावयास आले आणि ते लौकर हलेनात मला निष्कारण १२ वाजेपर्यंत तिष्ठत बसावे लागले या मुदतीत ओमानच्या मुफ्तींची भेट ठरली होती ते माझी वाट पाहून घरी निघून गेले; आणि एक चांगली मुलाखत हुकली

माहिती व संस्कृती मन्त्री श्री सैयिद फहद अल सईद बिन महमूद मोठे सुस्वभावी व मनमोकळे वाटले मी त्याच्या आतिथ्याबद्दल त्याचे आभार मानले आणि श्री मो ज्ञा शहाणे यानी केलेले ‘ मी पाहिलेले गांधीजी ’ या माझ्या पुस्तकाचे महात्मा माय बापू ’ हे इंग्रजी भाषांतर त्याना भेट म्हणून दिले. त्यानी त्याबद्दल आभार मानून आपण ते पुस्तक वाचून पाहू व शक्य झाल्यास त्याचे अरबी भाषांतर प्रसिद्ध करू असे मला सांगितले ते मला म्हणाले, “ तुमची ही भेट फार त्रोटक झाली तुम्ही पुन. सवडीने सपत्नीक या म्हणजे सबंध ओमान पाहून तुम्हाला सविस्तर लिहिता येईल तुमचा सगळा खर्च आमचे सरकार करील ” एकमेकाना समजून घेण्यासाठी सांस्कृतिक सामंजस्याची भूमिका व वृत्ती असलेल्या मंडळींची देवाणघेवाण झाली पाहिजे, ही माझी सूचना त्याना एकदम पटली मी त्याच्या निमन्त्रणाचा सहर्ष स्वीकार केला

धर्माच्या बाबतीत ते म्हणाले, “ धर्मामध्ये सक्तीला मुळीच स्थान असता कामा

नये सऊदी अरबस्तानात दुपारची नमाज प्रत्येकाने पढलीच पाहिजे, त्यासाठी हातातले काम टाकून मशिदीत गेले पाहिजे, अशी सक्ती आहे तिने काय धर्मभावना जागृत होते ? मला असली सक्ती मुळीच मान्य नाही माणूस दिवसभर काय करतो, कसं जीवन जगतो हे खरं महत्त्वाचं धर्माची प्रेरणा अंतःकरणातून आली पाहिजे. त्यासाठी प्रत्येकाला धार्मिक स्वातंत्र्य असलं पाहिजे सक्तीनं धर्मांतर होता कामा नये माझी पत्नी फ्रेंच आहे ती खिस्तीच राहिली आहे तिच्यावर धर्म बदलण्याची सक्ती करण्याचा विचार चुकूनही कधी माझ्या मनात येत नाही पण ही काही माझी एकट्याची गोष्ट नाही. माझ्याप्रमाणेच इतर अनेक मंत्र्यांच्या आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बायका युरोपियन आहेत. त्यांच्यावर कुणीही धर्मपरिवर्तनाची सक्ती केलेली नाही आम्हा ओमानी लोकांमधली ही धार्मिक सहिष्णुता फार जुन्या काळा-पासून चालत आलेली आहे ".

## बारा लाखांचे घर

मला ओमानमध्ये एक आठवडा राहण्याची परवानगी ( व्हिसा ) मिळालेली होती मी एक दिवस जास्त राहिलो होतो त्यामुळे बाहेर जाताना काही त्रास होऊ नये म्हणून मी व्हिसा वाढवून आणण्यासाठी माझे पारपत्र श्री मादद अल काबी यांच्या-कडे दिले त्यांनी ते विदेश मंत्रालयात पाठवून दिले. तेथून ते मजकडे परत आले तेव्हा त्यावर कसलीच नोंद केलेली नव्हती आता आली का पंचाईत ? कचेऱ्या बंद झाल्यावर ते पारपत्र माझ्या हाती आल्यामुळे मला पुढे काहीच चौकशी करता येणे शक्य नव्हते मी अगदी अस्वस्थ झालो पण राजदूतांनी मला सांगितले की, " एक-दोन दिवसांचाच प्रश्न असल्यामुळे त्यांना ती नोंद करणं आवश्यक वाटलं नसावं, तरी पण काही अडचण उपस्थित झाली तर मला फोन करा काही काळजी करू नका." श्री नाना पराजपे त्याच विमानाने दुबईला जाणार असल्याचे समजले तेव्हा बरेच हायसे वाटले तरीपण थोडी धाकधूक राहिलीच.

सायंकाळी खिमजी रामदासचे एक भागीदार श्री मथुरादास खिमजी यांच्या नव्या घराच्या वास्तुशांतीला गेलो मस्कतमधील सुलतानाच्या राजवाड्याभोवतालची जुनी वस्ती हलविण्याचे काम सुरू झाले आहे तेथे राहणाऱ्यांना नव्या भागात जागा दिल्या गेल्या आहेत अशा एका जागेवर हे घर बांधण्यात आले आहे येथे धार्मिक कृत्ये करणारे ब्राह्मण नसल्याने श्री पंड्या नावाच्या एका उच्च विद्याविभूषित सहव्यव-स्थापकाने धार्मिक कृत्य केले होते आपण लहानपणी शिकलेल्या भिक्षुकीच्या मंत्रांचा असा उपयोग होतो, असे श्री पंड्या अभिमानाने म्हणाले तळमजल्यावर २५०० चौरस फूट व पहिल्या मजल्यावर तेवढेच बांधकाम केले आहे त्याला सुमारे १२ लाख

रुपये खर्च आल्याचे समजले म्हणजे दर चौरसफुटास २५० रुपये खर्च आला आतील सामान तर जुन्या काळच्या बादशहाच्या राजवाड्याना लाजवील असे आहे मुख्यतः इटालियन वस्तू वापरण्यात आल्या आहेत हा माल दुबईला स्वस्त मिळत असल्या-मुळे तो तेथून आणला असल्याचे त्यानी गर्वाने सांगितले त्याच्या त्या दिमाखाचे कौतुक करण्याची इच्छा मला झाली नाही. मनात विचार आला, यानी या वस्तू भारतातून का मागविल्या नाहीत? पण भारतातील नवश्रीमंत 'इम्पोर्टेड मालाच्या मोहात गुरफटले असताना भारताबाहेरील भारतीय श्रीमंताकडून तशी अपेक्षा करणे कितपत व्यवहार्य होते ?

भारतीय पद्धतीचा फराळ मिळाल्याने रात्रीच्या जेवणाचा प्रश्न सुटला होता एवढाच माझ्या दृष्टीने फायदा !

## अलविदा या उमान !

अखेर ओमानचा निरोप घेण्याचा दिवस उजाडला ३ मे रोजी सकाळी ७ वाजता गल्फ एअरचे विमान मला गाठावयाचे होते नेहमीच्या नियमाप्रमाणे दोन तास आधी विमानतळावर हजर राहावयास हवे होते परंतु या विमानाला गर्दी नसल्याने तासभर आधी गेले तरी चालेल असे श्री नाना परांजपे यानी सांगितल्यामुळे मी स्नान, न्याहारी वगैरे करून साडेपाचला तयार झालो सरकारी गाडी आलेलीच होती तिच्या अरब ड्रायव्हरला दुभाष्याच्यामार्फत मी सांगितले की, "मी आत जाईपर्यंत तू माझ्याबरोबर राहा काही अडचण आल्यास मी सरकारी पाहुणा असल्याचं तू तिथल्या अधिकाऱ्याना सांग" त्यानेही ते कबूल केले, आणि त्याप्रमाणे तो शेवटपर्यंत मजबरोबर राहिला

मी माझ्या नेहमीच्या सवयीप्रमाणे त्याचा निरोप घेताना 'खुदा हाफिज (ईश्वर तुझे रक्षण करो) असे म्हणालो तो मात्र अरबीत म्हणाला, 'फी अमानिल्ला' (ईश्वर तुला शांतता देवो) आणि मग माझ्या लक्षात आले की भारतात अरबीऐवजी फारसी वाक्प्रचार रूढ असून त्यानाच आपण मुसलमानी वाक्प्रचार समजतो

सुदैवाने व्हिसाच्या बाबतीत काहीच अडचण आली नाही शिवाय श्री गणपतराव साळवी याचीही सगळ्या सोपस्कारातून चटकन मोकळे होण्यास मदत झाली श्री गणपतराव हे पुण्याच्या कॅपिटाल बॉब केसमधील श्री प्रभाकर माळवी ( हे सध्या पुण्याच्या 'पूनम' हॉटेलचे व्यवस्थापक आहेत ) याचे चुलते होत पूर्वी ते एअर इंडियात काम करीत होते आता ते एका खाजगी प्रवासविषयक संस्थेत काम करीत आहेत श्री परांजपे याचे ते स्नेही त्याच्या सांगण्यावरूनच त्यानी मला मदत केली.

विमानतळावरील धादलीत एक गमत झाली विमानतळाचे भाडे म्हणून मला १ रियाल द्यावयाचा होता पण मजजवळ पाच रियालाची नोट होती काउंटरवरील इसमा-

जवळही मोड नव्हती म्हणून तो म्हणाला, " थोड्या वेळाने ४ रियाल परत घेऊन जा "
माझ्या डोक्यात व्हिसाची चिंता होती त्यामुळे इतर गोष्टी सुलभपणे पार पडताच मी खुषीतच आत गेलो थोड्या वेळाने मला त्या उरलेल्या चार रियालाची आठवण झाली चार रियाल म्हणजे शंभर रुपये ते असे सहजासहजी जाऊ देण्यास मन तयार होईना म्हणून मी पुन. बाहेर जाण्यास निघालो पण दारावरचा शिपाई बाहेर जाऊ देईना अखेर बाबापुता केल्यावर त्याने माझा पासपोर्ट स्वतःकडे घेतला; आणि मला बाहेर जाण्याची परवानगी दिली काउटरवरच्या माणसाने लगेच चार रियाल परत दिल्याने वस्तुत मी २–३ मिनिटातच परत आलो होतो तरीपण पासपोर्टमधील छायाचित्राशी माझा चेहरामोहरा ताडून पाहिल्यावरच त्या शिपायाने मला आत सोडले यावरून मस्कतच्या विमानतळावर किती कडक बंदोबस्त असतो त्याची कल्पना आली त्यानतर प्रत्यक्ष विमानात बसावयास जाण्यापूर्वी फारच कडक तपासणी करण्यात आली हातातील सामान व अगावरील कपड्यांचीही स्वतत्र खोलीत नेऊन तपासणी करण्यात आली याचे कारण उघड आहे ओमानचे दक्षिण यमनशी चाललेले युद्ध सध्या थांबले असले तरी साम्यवादाचा धोका टागत्या तलवारीप्रमाणे त्या देशासमोर सदैव उभा आहे म्हणूनच देशात येणाऱ्या-जाणाऱ्याची विशेष कडक तपासणी केली जाते

विमानावर सोनेरी बहिरी ससाण्याचे ( Golden Falcon ) चित्र होते, व विमानाचे नावही तेच होते विमानापर्यंत चालत जावे लागले विमान ७ ऐवजी ७–२० वाजता सुटले, तेव्हा ओमानच्या भूमीचा निरोप घेताना आपण आपल्या जिवलग मित्राला ( किंवा खरे म्हणजे मैत्रिणीला ) सोडून दूर चाललो असल्याची भावना माझ्या मनात निर्माण झाली मनात विचार आला, " ही प्रेमळ आतिथ्यशील भूमी पुन· आपल्याला पाहायला मिळेल काय ? "

सात-आठ दिवसाच्या मुक्कामात ओमानचा फारच थोडा भाग मला पाहायला मिळाला मुख्यतः राजधानीच्या परिसरातच मी फिरलो उत्तरेकडील सोहार, निझवा, मुसंदम किवा दक्षिणेकडील सलाला, धोफार वगैरे शहरे व प्रदेश पाहण्याचे राहूनच गेले सुलतानाच्या बागेचे मराठी माळी श्री देसाई मला बाग दाखवायला घेऊन जाणार होते एवढी मोठी बाग एका मराठी माणसाच्या देखरेखीखाली फुलत आहे, याचा अभिमान मनातच राहून गेला सिंधी गायींचा गोपालनासाठी केला जाणारा उपयोग मला पाहायचा होता नारळीच्या व गुलाबाच्या बागाही पाहता आल्या नाहीत धुपाचे झाड धोफरमध्ये उगवते ते पाहण्याची तर मला विशेष उत्कंठा होती पुष्कळच पाहायचे राहून गेले

ओमानशी आपला व्यापार खूप मोठ्या प्रमाणावर चालतो एकेकाळी ओमानला

माल पुरवठा करणाऱ्या देशात भारताचा तिसरा क्रमांक होता आता इंग्लंड, अमेरिका, जपान, पश्चिम जर्मनी यासारखे पुढारलेले देश त्या चढाओढीत उतरल्यामुळे भारत सातव्या क्रमांकावर गेला आहे. तरीपण एकूण निर्यातीत वाढच झाली आहे (१९७४ साली भारताची ओमानला एकूण निर्यात १ कोटी ७० लाख डॉलरची होती, ती १९७५ च्या पहिल्या सहामाहीतच २ कोटी डॉलर झाली ) परंतु माझी दृष्टी केवळ आयात निर्यातीवर अथवा ओमानमधील भारतीय दरमहा जे १ कोटी रुपये परकीय चलनाच्या रूपाने भारतात पाठवतात त्यावर नव्हती मला ओमानी लोकांच्या स्नेहाची कदर अधिक होती हा स्नेह वाढविण्याच्या कामी आपल्या या भेटीचा काही उपयोग होईल काय, याचाच विचार माझ्या मनात राहून राहून येत होता

६

# संयुक्त अरब अमीरात

(३, ४ व ५ मे)

मस्कत ते दुबई हा विमानप्रवास केवळ चाळीस मिनिटाचा (आता तर मोटार-नेही हा प्रवास करता येतो माझ्याजवळ विमानाचे तिकीट नसते, तर मी चार-पाच तासाचा हा मोटार-प्रवासच पसंत केला असता !)७-२० ला निघालेले विमान ८ वाजता दुबईच्या आतरराष्ट्रीय विमानतळावर उतरले १९७१ साली तयार झालेला हा विमानतळ मोठा रुबाबदार वाटला—जणू वाळवटात फुललेले सुदर फूलच ! रडार व इतर आधुनिकतम उपकरणे यामुळे हा विमानतळ जगातील सर्वोत्कृष्ट विमानतळापैकी एक समजला जातो

अर्थात आमच्यासारख्या सामान्य उतारूच्या दृष्टीने या विमानतळाचे वैशिष्ट्य म्हणजे तो मुक्त विमानतळ असल्याने येणाऱ्या-जाणाऱ्याची तेथे कडक तपासणी केली जात नाही तुम्ही काहीही आणू शकता अथवा नेऊ शकता त्यामुळे मनावर कसलेही दडपण येत नाही

सयुक्त अरब अमीरातीची राजधानी अबूधाबी असल्याने आपला दूतावास तेथे आहे दुबईला कौंसलावास (कौंसुलेट) आहे कौंसलावासातर्फे मला घेण्यासाठी श्री गोयल नावाचे एक गृहस्थ आले होते श्री पराजपे याच्या स्वागतासाठी दुबईच्या बँक ऑफ बरोडा बँकेच्या शाखेचे व्यवस्थापक श्री लोबो व सौ. लोबो, शारजा शाखेचे व्यवस्थापक श्री श्रीकृष्ण विश्वनाथ जोशी, दुबई शाखेचे श्री सुरेश जगन्नाथ दातार वगैरे मडळी आली होती त्याच्याशी श्री पराजपे यानी माझी ओळख करून दिली, आणि मला काही जरूर लागल्यास मदत करण्यास त्याना सागितले या औपचारिक परिचयाचा मला पुष्कळ फायदा झाला

## राजवाड्यातून झोपडपट्टीत

श्री गोयल यानी विमानतळावरून सुमारे १५ कि. मी दूर असलेल्या दुबई शहरातील एका तीन मजली इमारतीत मला नेले श्री किशन भाटिया याचे ते अतिथिगृह होते बराच वेळपर्यंत मला कोठल्या खोलीत राहावयाचे आहे, याचा पत्ताच लागेना दोन तीनदा वर-खाली केल्यावर एकदाची खोली निश्चित झाली तो तीन खोल्याचा एक फ्लॅट होता त्यातील एका खोलीत एक थाई जोडपे राहात होते बाहेरची खोली वीसपचवीस थाई कामगाराची समाईक खोली होती. तिच्यातून आतल्या खोलीत जावे लागत होते माझ्यासाठी असलेल्या खोलीत चद्रशेखर नावाचा एक केरळीय कामगार किंवा कारकून आधीपासूनच राहात होता तिच्यात बाध-कामासाठी लागणारे बरेचसे सामान होते. बहुधा अडगळीची खोली म्हणून ती वापरली जात असावी, आणि तिच्यातच चद्रशेखर राहात होता खोलीत एकच खाट होती तेथे दोन माणसानी कसे राहावयाचे असा मला प्रश्न पडला पण चद्रशेखरने तो चुटकीसरशी सोडवला. तो म्हणाला, " मी जमिनीवरच झोपतो. मला कॉटवर झोपायची नाहीतरी सवय नाहीच तुम्ही खुशाल झोपा कॉटवर " परंतु 'गडस्योपरिपिटिका' न्यायाने आणखी एक अडचण निर्माण झाली त्या फ्लॅट-मधील सडास बाथरूम नादुरुस्त असल्याने त्या कामासाठी वरचेवर तळमजला गाठावा लागणार होता मी नुकताच गल्फ हॉटेलमधून आलो होतो ते सारे दृश्य पाहून राजवाड्यातून झोपडपट्टीत जाऊन पडलेल्या इसमासारखी माझी स्थिती झाली तरी पण आलीया भोगासी असावे सादर ' या भावनेने मी तेथे सामान ठेवले आणि कौंसलवासात गेलो

## 'स्थानिक आतिथ्य' म्हणजे काय ?

कॉन्सल जनरल श्री सुरद्र भाटिया याना मी सारी परिस्थिती सागितली यावर ते म्हणाले, " तुमच्यासाठी एक पैसाही खर्च करावयाचा नाही, असं भारतीय सास्कृ-तिक संबध परिषदेन आम्हाला स्पष्ट कळवलय " दुबईमध्ये मला स्थानिक आतिथ्य-( लोकल हॉस्पिटॅलिटी ) दिले जाईल असे भा सा सं परिषदेने मलाही आधीच कळविले होते पण 'स्थानिक आतिथ्य' म्हणजे काय याचा खुलासा कोणीच केला नसल्यामुळे भाटियासाहेबही माझ्यासारखेच चक्रावून गेले होते ते माझ्या समोरच दुबई-तील वेगवेगळ्या प्रतिष्ठित भारतीय लोकाना फोन करून, 'आमच्याकडे एक भारतीय पाहुणे आले आहेत, त्याना तुमच्याकडे नेऊन त्याच्या राहण्या-जेवण्याची व्यवस्था करता काय ? असे गयावया करून विचारू लागले ते लोक अर्थातच गुजराती-

मारवाडी होते कोणीच त्याना दाद देईना ते हताश होऊन माझ्याकडे पाहू लागले माझ्या मनात विचार आला, ' हे गृहस्थ इतराना विचारण्याऐवजी स्वतःच्या अली-शान फ्लॅटमध्येच मला का घेऊन जात नाहीत ? पण मला त्या साऱ्या प्रकाराचा इतका उद्वेग आला होता की, त्याचे वैयक्तिक उपकार आपण घ्यावेत ही कल्पनाच मला कशीशी वाटली मी जरा त्राग्यानेच त्याना म्हणालो, ," तुमच्या मडळींकडून काही मदत होईल अस दिसत नाही. आता बॅक ऑफ बरोडाचे श्री जोशी याना काही उपाय सुचतो काय ते विचारा " श्री भाटिया याना माझी सूचना एकदम पटली. त्यानी श्री जोशी याना फोन केला त्यानी चटकन उत्तर दिले, " त्यात काय अवघड आहे ? जोशींची व्यवस्था आम्ही सहज करू तुम्ही मुळीच काळजी करू नका " मग मीही त्याच्याशी फोनवर बोलून सारी परिस्थिती त्याना समजावून सागितली ते म्हणाले, " यानानी ( पराजप्यानी ) मला आधीच सागून ठेवलय. . तेव्हा तुम्ही नि सकोचपणे आमच आतिथ्य स्वीकारा आम्हाला त्यात आनदच वाटेल "

श्री भाटिया याच्या डोकीवरील एक मोठे ओझे उतरले मला मात्र उगीचच अपराध्यासारखे वाटू लागले माझे ओझे बॅकेच्या शिरावर कशासाठी ? मी जेव्हा स्वतःच्या खर्चाने प्रवास करीत असतो तेव्हा मित्राच्या, परिचिताच्या अथवा अपरि-चिताच्या घरी नि'सकोचपणे राहतो पण सरकारतर्फे प्रवासाला गेल्यानतर खासगी व्यक्तींवर किंवा सस्थावर भार टाकणे मला प्रशस्त वाटत नाही तशी माझी सोय इतरत्रही होऊ शकली असती. पुण्याच्या बी. जी शिर्के कपनीने दुबईत अनेक कोटींची बाधकामे घेतली आहेत त्या कपनीत माझा मुलगा इजिनियर म्हणून काम करतो त्याचे अनेक मित्र व सहकारी दुबईत आहेत त्यानी मोठ्या आनदाने माझी सोय केली असती पण त्याचे उपकार घेणे मला योग्य वाटले नाही

दुबईच्या कौंसलावासाजवळ स्वतःची मोटारही नाही व म्हणून ड्रायव्हरही नाही. तेव्हा श्री भाटिया यानी स्वतःच आपल्या मोटारीतून मला थोडा वेळ गावातून फिर-विले; आणि म्युनिसिपालिटीच्या समाजकल्याण खात्याचे सचालक श्री उमर दीसी याच्याकडे व संयुक्त अरब अमीरातीच्या माहिती खात्याचे सचालक श्री सईद मुहम्मद बूजसैम याच्याकडे नेऊन त्याच्याशी माझी ओळख करून दिली श्री उमर दीसी हे गोरेपान व गुटगुटीत पॅलेस्टीनियन गृहस्थ आहेत त्यानी आपल्या सचालनालया-तर्फे प्रकाशित साहित्य दिले, आणि दुसऱ्या दिवशी गावातून हिडवून आणण्याचेही आश्वासन दिले मी त्याना म्हणालो, " तुमच माहिती साहित्य तुम्ही भारतीय भाषात का प्रसिद्ध करीत नाही ? " यावर ते म्हणाले, " इग्रजी साहित्य आधी भरपूर प्रमाणात निघू द्या, मग भारतीय भाषाचा विचार करू. "

## भारतीयांवर विश्वास

श्री सईद मुहम्मद बूजसैम म्हणाले, "भारतीयांविषयी आमच्या मनात पूर्वापासूनच आपलेपणा आहे मी स्वतः सोमाली किंवा इतर लोकांपेक्षा भारतीयांवरच जास्त विश्वास ठेवीन कुराण अरबीत असल्याने ज्यांची मातृभाषा अरबी नाही त्यांना त्यातले बारकावे कळत नाहीत. अरबांनाच ते जास्त चांगले कळतात उदाहरणार्थ, जिहाद हा शब्द जेव्हा वापरला जातो तेव्हा इतर लोक काफिरांविरुद्ध मुसलमानांनी केलेले धर्म-युद्ध असाच त्याचा अर्थ करतात परंतु खरा जिहाद हा अनेक वाईट गोष्टींविरुद्ध करावयाचा संघर्ष असतो फसवाफसवी करणारे, दारू पिणारे, इतरांचा द्वेष करणारे मुसलमान दिवसभर नमाज पढत असले तरी ते खरे मुसलमान नव्हेत शुद्ध आचरण असणाराच खरा मुसलमान होय."

अमीरातीची राजधानी अबूधाबीला असल्याने तेथेच अधिक माहिती मिळेल व मंत्र्यांना भेटता येईल, असे श्री बूजसैम यांनी सांगितले पण अबूधाबीला जावयाचे कसे? माझ्यासाठी खर्च करण्याची परवानगी कौंसलावासाला नव्हती, आणि मला नेण्यासाठी त्यांच्याजवळ वाहन नव्हते श्री भाटिया यांनी आपली ही अडचण श्री बूजसैम यांना सांगितल्यावर ते म्हणाले, "रोज सकाळी अबूधाबीहून आमच्या मंत्रालयाची गाडी टपाल आणि वृत्तपत्र घेऊन इथे येते, आणि इथले टपाल घेऊन लगेच परत जाते त्या गाडीतून श्री जोशी जाऊ शकतील" मंत्रालयाच्या गाडीवर विसंबून राहिल्यामुळे आपला किती वेळ वाया जाईल याची काहीच कल्पना मला नसल्यामुळे मला त्यांची सूचना पसंत पडली श्री भाटिया तर परस्पर एक ब्याद टळली याच खुषीत त्या सूचनेला मान्यता देऊन मोकळे झाले

एवढा कार्यक्रम उरकल्यावर श्री भाटिया यांनी मला बँक ऑफ बरोडाच्या कचेरीत नेऊन श्री जोशी यांच्या स्वाधीन केले आणि सुटकेचा नि श्वास टाकून माझा निरोप घेतला

एव्हाना तीन वाजायला आले होते मला सडकून भूक लागली होती त्या दिवशी पोटभर जेवण मिळाले नसते तर मी चांगलाच चडफडलो असतो पण सुदैवाने जवळच असलेल्या मनोरंजन रेस्टॉरंट या गुजराथी खानावळीत आम्हाला थंडगार दा होईना, पण पोटभर जेवण मिळाले

त्यानंतर श्री जोशी यांच्या मोटारीतून जाऊन मी माझे सामान आणले व ते श्री दातार यांच्या हॉटेलात ठेवले

इतर आखात देशांप्रमाणे दुबईतही जागेची टंचाई खूपच आहे. हॉटेलातही सहजा-सहजी जागा मिळत नाही म्हणून श्री दातार यांनी आपल्याच खोलीत एक जादा

खाट टाकून माझी सोय केली हॉटेलचे नाव ' एअर लाइन्स हॉटेल ' तसे लहानसेच परंतु स्वच्छ होते चहा, न्याहारी व दोन्ही वेळचे जेवण यासह हॉटेलचे भाडे १७० दिरहम म्हणजे सुमारे ३५० रुपये होते जेवण बाहेर घेतले तरी एवढे भाडे द्यावेच लागते श्री दातार यांच्या पत्नी पारशी असून त्याही मुंबईस त्यांच्याच बँकेत काम करतात त्यांनी दुबईला लौकर यावे अशी श्री परांजपे यांची इच्छा आहे असे समजले बँकेने त्यांच्यासाठी जो फ्लॅट भाड्याने घेतला आहे तो पूर्ण तयार होईपर्यंत त्यांना थांबावे लागेल असे दिसते आपल्या छोट्या मुलावर त्यांचा फार जीव आहे त्याचा फोटो त्यांनी फ्रेम करून उशाजवळ ठेवला होता मोठे प्रेमळ तरुण वाटले चांगल्या गुणवत्तेची माणसे दुबईत मिळत नाहीत, आणि मराठी तरुण इकडे यायला तयार होत नाहीत, अशी त्यांनी तक्रार केली.

सायंकाळी चार वाजता माहिती मंत्रालयाच्या लोकसंपर्क विभागाचे प्रमुख श्री मुहम्मद अल बोवर्दी आपली गाडी घेऊन आले आणि त्यांनी मला गावातून फिरवून आणले खाडीच्या खालून नुकताच एक बोगदा काढला असून बोगद्यातील वाहतुकी-वर टेलिव्हिजनच्या साह्याने कसे लक्ष ठेवले जाते, ते त्यांनी दाखविले. कुणी जास्त वेगाने किंवा चुकीच्या मार्गाने जात असल्यास या टेलिव्हिजनवरून ते दिसते मग दुसऱ्या टोकाला उभ्या असलेल्या पोलिसाला त्याची सूचना दिली जाते तो पोलिस ती गाडी अडवितो व योग्य ती कारवाई करतो देरा व शिंदगाह या दोन भागांना जोडणारा हा बोगदा खरोखरीच पाहण्यासारखा आहे दोन कोटी डॉलर खर्चून बांधलेल्या या बोगद्यात जाणाऱ्या व येणाऱ्या मोटारींसाठी स्वतंत्र रस्ते असून पायी चालणाऱ्यांसाठी एक तिसरा रस्ता आहे दुबई शहर खाडीच्या दोन्ही किनाऱ्यावर वसलेले आहे त्यामुळे बोगद्याप्रमाणेच दोन प्रचंड पूलही खाडीवर बांधण्यात आले आहेत परंतु पुलामुळे खाडीतील बोटींच्या वाहतुकीला अडथळा येऊ नये म्हणून खाडीवरील पुलाचा भाग यंत्रांच्या साह्याने वर उचलण्याची सोय त्यात केली आहे अशा प्रकारे आधुनिक यंत्रे व उपकरणे यांचे फार मोठ्या प्रमाणावर साह्य घेण्यात दुबईने आघाडी मारली आहे

समुद्रकिनाऱ्यावरील अनेक मजली इमारतींमुळे दुबईचे रूप मुंबईच्या मरीन ड्राइव्हसारखे मोहक व आकर्षक बनले आहे शहराचे सौंदर्य वाढविण्यासाठी कारंजी, हिरवळी, फळा-फुलांची लहान मोठी झाडे यांचाही मुक्त हस्ताने वापर करण्यात आला आहे इतका की आपण वाळवंटात आहोत याचाही आपल्याला क्षणभर विसर-पडतो आधुनिक शिल्पकलेचेही दर्शन काही शिल्पातून घडते, आणि आपण फ्रान्स, इटलीसारख्या कलानगरात तर नाही ना असा क्षणभर संभ्रम होतो उदाहरणार्थ देरा भागाच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेला घड्याळ मनोरा आणि दुबईमध्ये तेल सापड-

त्याच्या घटनेच्या स्मरणार्थ उभारलेले स्मारक घड्याळ मनोरा म्हटले की आपल्या डोळ्यासमोर मुंबईचा राजाबाई टॉवर किंवा दिल्लीच्या चांदणी चौकातील ( आता नामशेष झालेला ) घंटाघर यासारखी शिल्पे उभी राहतात. पण दुबईतील अत्याधुनिक घड्याळ मनोरा 'मॉडर्न आर्ट'च्या धर्तीवर उभारलेला चार त्रिकोणाचा मजेदार संगम आहे पेट्रोल स्मारकाच्या शिल्पात दोन-तीन चतुर्थांश वर्तुळाचा खुबीने वापर करण्यात आला आहे. अत्याधुनिक कलेशी जनतेची ओळख करून देण्याचा हा प्रयत्न मला स्वागतार्ह वाटला खोर दुबई नावाची जी खाडी सुमारे १२ किलोमीटर आतपर्यंत गेली आहे ती पाहिल्यानंतर प्रथमतः ती नदी असल्याचाच भास होतो तिच्या डाव्या किनाऱ्यावर खुद्द दुबई शहर असून उजव्या किनाऱ्यावरील भागाला देरा म्हणतात या देरा भागातच प्रमुख बाजारपेठ आहे.

दुबई हे मुख्यतः आयात, निर्यात व पुनर्निर्यात करणारे बंदर असल्याने येथे मालवाहक जहाजांची सदैव गर्दी असते त्यासाठी साडे सहा कोटी पौंड खर्चून २२ गोद्या असलेले रशीद बंदर उभारण्यात आले आहे, आणि साडे अठरा कोटी डॉलर खर्चून जगातील एक प्रचंड कोरडी गोदी उभारण्याचे काम चालू आहे बंदरात दोन पाकिस्तानी बोटी दिसल्या, पण भारतीय बोटमात्र त्या वेळी तेथे नव्हती पोर्ट रशीद हे मध्यपूर्वेतील सर्वात मोठे मानवनिर्मित बंदर आहे परंतु वाढत्या जलवाहतुकीच्या दृष्टीने तेही अपुरे पडू लागले असून त्याच्या दक्षिणेस वीस किलोमीटर अंतरावर आणखी एक नवे बंदर उभारण्याचा विचार दुबईचे राजे व संयुक्त अरब अमीरातीचे उपाध्यक्ष श्री शेख रशीद बिन सईद अल मक्तूम हे करीत आहेत

बंदरातून फेरफटका मारल्यावर आम्ही दुबईचे पदार्थसंग्रहालय पाहावयास गेलो पुण्याच्या शनिवारवाड्यासारखे भव्य बुरूज असलेल्या एका प्रशस्त गढीवजा वाड्यात हे छोटेसे पदार्थसंग्रहालय आहे या गढीचे नाव अल फिहाइदी किल्ला असे असून तो इ स १८०० च्या सुमारास बांधलेला आहे या प्रदेशातील हा सर्वात जुना भुईकोट किल्ला समजला जातो या शतकाच्या प्रारंभी हा किल्ला शस्त्रास्त्रे व दारूगोळा ठेवण्याचे भांडार म्हणून वापरला जात असे, तसेच त्याचा काही भाग तुरुंग म्हणूनही उपयोगात आणला जाई

आता त्या ठिकाणी दुबईचे जुने स्थापत्य, जुनी हत्यारे, परंपरागत पोषाख, दागदागिने, घरातील भांडीकुंडी, मच्छीमारी व मोती काढण्याची उपकरणे, बहिरी ससाण्याच्या शोकासंबंधीची वस्तुगत माहिती वगैरे गोष्टी पाहावयास मिळतात वाळवंटात तंबू उभारून राहणाऱ्या भटक्या लोकांच्या जीवनाची कल्पना यावी यासाठी तसाच तंबू उभारण्यात आला असून छुटपुटीची विहीरही तयार करण्यात आली आहे. हे संग्रहालय पाहिल्यानंतर आधुनिक संस्कृतीचा प्रवेश होण्यापूर्वी या प्रदेशातील लोक

कसे राहात असत याची चागली कल्पना येते येथील अनेक गोष्टींवर—उदाहरणार्थ विहिरीवरील रहाट, वाद्ये, भाडीकुडी, दागिने, चुली, वगैरेवर—भारतीय वस्तूंची बरीच छाप पडलेली दिसून येते

जुन्या अरब संस्कृतीचे दर्शन घडविणारे हे पदार्थसंग्रहालय पाहून आम्ही अगदी अत्याधुनिक संस्कृतीची झलक दाखविणारे 'मुश्रिफ राष्ट्रीय उद्यान' ( मसावह हदीका मुश्रिफ ) पाहावयास गेलो अजून ते तयार झालेले नाही लावलेली झाडे अजून झुडपाच्या अवस्थेतच आहेत तरीपण तेथील पोहण्याचा तलाव अगदी पाश्चात्त्य पद्धतीचा आहे त्याच्या आवारात प्रवेश करण्यासाठी दोन दिरहम ( चार रुपये ) शुल्क द्यावे लागले आतील बाजूस चागली झाडी असून तलावाची स्वच्छताही वाखाणण्यासारखी दिसली. आत उपाहारगृहाची सोय असल्याने सुखवस्तू मडळींची बरीच गर्दी तेथे होते लहान मुलासाठी पोहण्याचा वेगळा सगमरवरी तलाव आहे त्यात मुले मजेने डुबत होती

परत येताना एक राजवाडा पाहण्यासाठी आम्ही आत शिरलो पण संध्याकाळ झाल्यामुळे प्रत्यक्ष वाड्यात प्रवेश करता आला नाही तो बाहेरूनच पाहिला

या शहरात हिंडताना एक गोष्ट लक्षात येते तेथे स्वच्छता व टापटीप कटाक्षाने पाळली जाते शहराप्रमाणेच माणसाची वैयक्तिक स्वच्छताही सहज नजरेत भरते गलिच्छ कपडे लोकाच्या अगावर दिसत नाहीत पानतबाखूसारख्या सवयी लोकामध्ये नसल्याने रस्ते किंवा भिंती चितारलेल्या दिसत नाहीत. एवढेच नव्हे तर उघड्यावर नैसर्गिक विधी उरकण्याची दृश्येही अभावानेच आढळतात

# ७

# असे हे अमीरात !

आज ज्या प्रदेशाला संयुक्त अरब अमीरात असे म्हटले जाते त्याला पूर्वी ब्रिटिशानी ' ट्रूशियल ओमान ' किंवा ' ट्रूशियल स्टेट्स ' ( विरामसंधी झालेला ओमान किंवा तह झालेली संस्थाने ) असे नाव दिले होते. यावरून हा ओमानचाच भाग असावा असे वाटते आपल्याकडील जुन्या काळची संस्थाने किंवा जहागिऱ्या ज्याप्रमाणे ब्रिटिशाशी तह करून आपापला वेगळेपणा वाळगून होत्या, तशीच काहीशी याची स्थिती होती अरब द्वीपकल्पाचा उत्तरेकडे गेलेला जो निमुळता भाग आहे त्यात ही सस्थाने आहेत पश्चिमेला अरबस्तानचे ( किवा इराणचे ) आखात, पूर्वेला ओमान, दक्षिणेला सऊदी अरबस्तान आणि उत्तरेला मुसदम हे ओमानच्या राज्यातील भूशिर अशा याच्या चतुःसीमा आहेत यापैकी दक्षिणेकडून उत्तरेकडे क्रमाने अबूधावी, दुबई, शारजा, अजमान, उम्मल कैवेन व रासअल खैमा ही सहा राज्ये असून उत्तर-पूर्व दिशेला ओमानच्या आखातावर फुजेरा हे सातवे राज्य आहे.

एकेकाळी या भागातील अरब ओमानच्या लोकाप्रमाणेच पट्टीचे दर्यावर्दी समजले जात. युरोपीय लोकाचे भारताशी दळणवळण वाढल्यानतर त्याचे या अरबाशी संघर्ष झडू लागले; आणि त्यानी या अरबाना चाचे ठरवून अरबी समुद्राच्या या किनाऱ्याला पायरेट कोस्ट किंवा ' चाच्याचा किनारा ' असे नाव दिले इ स १८०० च्या सुमारास शारजा व रास अल खैमा या दोन सस्थानाजवळच ६३ मोठी जहाजे व ८०० लहान गलबते होती, आणि त्यावर १९,००० लोक काम करीत होते यावरून त्याच्या सामर्थ्याची कल्पना यावी पुढे ब्रिटिशानी त्याचा पाडाव करून १८२० साली त्याच्याशी शाततेचा तह केला मे १८५३ पर्यंत इतर अनेक शेखाशी (संस्थानिकाशी) ब्रिटिशानी तह केले त्यामुळे या भागाला ' ट्रूशियल कोस्ट अमे नाव मिळाले या

राज्याना अंतर्गत स्वातंत्र्य होते, परंतु संरक्षण व परराष्ट्रीय संबंध या गोष्टी ब्रिटिशानी आपल्याकडे ठेवल्या होत्या एक प्रकारे तो भारताचाच एक भाग बनला होता पुढे १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर ब्रिटिशानी त्याच्याशी नव्याने तह केले अशा प्रकारचे एक संयुक्त राज्य स्थापन करण्याचे प्रयत्न १९५२ पासूनच सुरू झाले होते, परंतु त्याना फारसे यश आले नव्हते अखेर १९६८ मध्ये जेव्हा ब्रिटिशानी आपण १९७१ च्या अखेरीस हा प्रदेश सोडून जाणार असल्याचे व सर्व तह रद्द-बातल होणार असल्याचे जाहीर केले तेव्हा या प्रश्नाला विशेष निकडीचे स्वरूप प्राप्त झाले, आणि जुलै १९७१ मध्ये हे संयुक्त राज्य स्थापन झाले त्याच्या संस्थानिकानी एक राज्यघटनाही तयार केली ही राज्यघटना २ डिसेंबर १९७१ रोजी प्रवर्तित कर-ण्यात आली, आणि त्या दिवसापासून ' युनायटेड अरब एमिरेट्स ' हे एक स्वतंत्र, सार्वभौम्य राज्य अस्तित्वात आले

या राज्याचे अरबी नाव ' अल् इमारात अल् अरबीया अल् मुत्तहदा ' असे आहे दौलतुल इमारात अल् अरबीयतुल मुत्तहदा ' किंवा ' इत्तिहाद अल् इमारात अल् अरबीया ' अशी ही नावे वापरलेली आढळतात बहरैन व कतार ही दोन राज्ये या संघराज्यात सामील होतील अशी अपेक्षा होती पण त्यानी स्वतंत्र राहणेच पसंत केले रास अल् खैमा हे संस्थान नंतर सामील झाले.

या संस्थानाची क्षेत्रफळे व लोकसंख्या यावरून ती किती लहान आहेत याची कल्पना येईल

| | चौरस कि मी | १९७५ ची अंदाजी लोकसंख्या |
|---|---|---|
| अबूधाबी | ६७,३७० | १,३०,००० |
| दुबई | ३,९०० | १,१०,००० |
| शारजा | २,६०० | ५०,००० |
| अजमान | २५० | ४,४०० |
| उम्म अल् कैवैन | ८०० | ५,७०० |
| रास अल् खैमा | १७०० | ३०,००० |
| फुजैरा | १२०० | १२,००० |

एकूण संयुक्त अरब अमीरातीचे क्षेत्रफळ सुमारे ८३,६५० चौरस कि. मी असून लोकसंख्या अंदाजे ३,४२,००० आहे भारतातील अरुणाचल प्रदेशाएवढा हा देश असून लोकसंख्या मिझोरामएवढी आहे (पश्चिम बंगालचे क्षेत्रफळही जवळजवळ एवढेच असून लोकसंख्या मात्र साडेचार कोटी आहे !) या देशाच्या एकूण जमिनी-पैकी फक्त १२२ चौ कि मी म्हणजे ·१६ टक्के एवढीच जमीन लागवडीखाली आहे यावरून खाद्यपदार्थांच्या बाबतीत हा देश सर्वस्वी परदेशावर अवलंबून आहे, हे

लक्षात येते खनिज तेलाचे उत्पादनमात्र भरपूर आहे अबूधाबीच्या प्रदेशात दररोज सुमारे १४ लाख बॅरल, दुबईला २ लाख बॅरल व शारजाला ४० हजार बॅरल तेल निघते याच्या आधारावरच हा संपूर्ण प्रदेश सपन्न बनला आहे अजमान वगैरे ज्या राज्यात तेल मिळालेले नाही तेथे ते शोधण्याचा प्रयत्न चालू आहे परंतु ती राज्ये एकूण देशाचाच भाग असल्यामुळे त्यानाही या सपत्तीत वाटा मिळतो १९७५ च्या अंदाजपत्रकाप्रमाणे अमीरातीची महसुली जमा २ अब्ज ६० कोटी दिरहम ( म्हणजे सुमारे ५ अब्ज रुपये ) आणि खर्च २ अब्ज ७० कोटी दिरहम ( सव्वापाच अब्ज रुपये ) होता हा प्रदेश मुख्यत व्यापारी लोकाचा भाग आहे प्राक्ऐतिहासिक काळा-पासून आशिया व युरोप याच्या व्यापारमार्गावर हा वसलेला असल्याने या भागाची अर्थव्यवस्था तेल मिळण्यापूर्वी व्यापारावरच प्रामुख्याने अवलबून होती युरोप व आशियातून येथे माल येतो आणि तो पुढे रवाना होतो यामुळे या देशाच्या व्यापारात पुनर्निर्यातीला फार महत्त्व आहे अबूधाबी व दुबई या दोन बदरातूनच गेल्या काही वर्षात केवढ्या प्रचड प्रमाणात आयात-निर्यात झाली ते पुढील आकड्यावरून लक्षात येईल

| वर्ष | आयात | निर्यात | पुनर्निर्यात |
|---|---|---|---|
| १९६९ | १४,६१,३११,००० | ६,०४५,००० | ६९,७८९,००० |
| १९७० | १२,७२,४१०,००० | २,९७०,००० | ९३,५५०,००० |
| १९७१ | १४,६९,३१८,००० | ५,५१५,००० | १,५५,८३५,००० |
| १९७२ | २१,१३,१००,००० | ४,०२७,००० | १,९९,७८०,००० |
| १९७३ | ३२,७८,९१२,००० | ६,६५१,००० | २,३८,३१०,००० |
| १९७४ | २७,१२,३६२,००० | ९,८१०,००० | १,४३,२७२,००० |
| ( पहिली सहामाही ) | | | |

[ हे आकडे दिरहमचे असून एका दिरहमची किंमत सुमारे दोन रुपये आहे ]

येथे रुपयाला दोन लिटर पेट्रोल मिळते बहुधा हीच येथील सर्वात स्वस्त वस्तू असावी इतर राज्याचा व्यापार तितकासा महत्त्वाचा नाही अबूधाबी व दुबई ही दोन राज्येच आर्थिक दृष्ट्या अत्यत महत्त्वाची आहेत

तेलातून प्राप्त झालेल्या संपत्तीचा उपयोग प्रामुख्याने दळणवळणाची साधने अद्ययावत करण्यासाठी केला गेला आहे दुबई व अबूधाबी ही बदरे सर्व आधुनिक सोयींनी व उपकरणानी सज्ज करण्यात आली असून सर्व राज्याची शहरे ऐसपैस डाबरी सडकानी एकमेकाना जोडण्यात आली आहेत त्यामुळे मस्कतहून दुबईला येताना विमानातून मुख्यत. हजर पर्वताची उघडीबोडकी शिखरे आणि काळ्या नागिणी सारखे सळसळणारे डाबरी रस्ते व अधूनमधून तेलाच्या विहिरींनी काळवडलेले भाग

किंवा अग्निहोत्राप्रमाणे सतत जळणारा गॅस एवढेच दिसते बंदरातून शेकडो बोटी उभ्या असलेल्या दिसतात सहा-सहा महिने त्यांची पाळी लागत नाही म्हणून आता खुष्कीच्या गोदी ( डाय डॉक्स ) बांधण्याचे काम फार मोठ्या प्रमाणावर सुरू झाले आहे अल् ऐन व लिवा यासारखी काही मरूद्याने ( ओॲसिस ) या देशात असून तेथे मुख्यत खजूर व इतर फळे पिकविली जातात आता कृत्रिम पाण्याचा उपयोग करून अधिकाधिक जमीन शेतीयोग्य बनवायची आणि अन्नाच्या बाबतीत स्वावलंबी बनावयाचे असा चग सरकारने बांधला आहे, आणि त्याच्याजवळील साधनसंपत्ती पाहता त्यात ते यशस्वी होतील अशी लक्षणे दिसत आहेत

शेळ्या-मेंढ्या व गाई याचे पालन मोठ्या प्रमाणावर करण्याचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत मच्छीमारी हा तसा येथील पारंपरागत व्यवसाय आता त्यात यांत्रिक बोटींची भर पडल्याने दहा वर्षांत पकडलेल्या मासळीचे प्रमाण पाच पट झाले आहे. ( १९७४ साली ५० हजार टन मासळी पकडली गेली )

रासायनिक खते, सीमेंट वगैरेचे कारखाने, भारतातून नेलेल्या कच्च्या लोखंडापासून पोलाद बनविण्याचा कारखाना, खनिज तेलापासून मिळणाऱ्या उपउत्पादनाचे कारखाने वगैरे अनेक योजना हाती घेण्यात आल्या असून त्यापैकी काही पुऱ्याही झाल्या आहेत या सर्व कामात भारतीयाचा वाटा फार मोठा आहे या देशात परकीय भांडवल गुंतवणुकीवर कसलीच बंधने नाहीत शिवाय मामुली जकातकर वगळल्यास इतर करही नाहीत यामुळे तेथे फार मोठ्या प्रमाणावर परकीय भांडवलाची गुंतवणूक झालेली आहे तसा हा प्रदेश भारतीयाना काही परका नाही शंभर-सव्वाशे वर्षांपासून या भागात येऊन स्थायिक झालेले गुजराती-मारवाडी व्यापारी येथे आहेत परंतु भारताचे या प्रदेशाशी अगदी प्राचीन काळीही संबंध असले पाहिजेत असे येथील उत्खननात सापडलेल्या मातीच्या भांड्यावरील नदींच्या चित्रावरून दिसून येते येथे सापडलेली मातीची भांडी सिंधू नदीच्या खोऱ्यात सापडलेल्या भांड्यासारखीच आहेत त्यामुळे कधीकाळी या प्रदेशाचा भारताशी फार निकटचा संबंध असावा असे वाटते

या देशात आधुनिक पद्धतीची लोकशाही असेल, अशी अपेक्षाही बाळगता येणार नाही सातही राज्याचे शेख ( संस्थानिक ) ज्याचे सभासद आहेत अशा एका वरिष्ठ परिषदेतर्फे या देशाचा कारभार चालविला जातो परंतु मंत्रालये, मंत्री, सचिव, संचालनालये वगैरे लोकशाही पद्धतीतील सगळ्या गोष्टी येथे आहेत शेखाची मुलेच प्रामुख्याने मंत्रिपदे भूषवीत आहेत त्यामुळे ज्या शेखसाहेबाना जास्त मुले असतील त्यांच्या कुटुंबाकडे जादा मंत्रिपदे येणे स्वाभाविकच ठरते

परंतु अशा प्रकारची सरंजामशाही असूनही या देशात शिक्षणावर फार लक्ष दिले जात आहे १९६८-६९ साली पुस्तकी, तांत्रिक, व्यापारी, इस्लामी, कृषिविषयक-

वगैरे सर्व प्रकारचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारे १८ हजार होती, ती १९७४-७५ साली सुमारे ५४ हजार म्हणजे तिप्पट झाली यावरून शिक्षणप्रसाराच्या वेगाची कल्पना येईल साक्षरता २५ टक्क्यापर्यंत गेली आहे, स्त्रीशिक्षणही १० टक्क्यावर आले आहे १९७१ साली ४१२ शिक्षक होते त्यापैकी २६९ कुवैतचे, ८६ ईजिप्तचे, ४२ कतारचे, ९ बहरैनचे व फक्त ६ स्थानिक होते यावरून सुशिक्षिताचा तुटवडा या देशात किती मोठ्या प्रमाणावर असेल याची कल्पना येते

असे आहे हे अमीरात !

# ८

# अबूधाबी येथील फेरफटका

दुबईतील दिवस तसा वायाच गेला होता कारण विशेष गाठीभेटी होऊ शकल्या नव्हत्या त्यामुळे अबूधाबीचा दिवस कसा जाणार याविषयी मनात धाकधूक होती धन्याने सांगितले कुत्र्याला आणि कुत्र्याने सांगितले शेपटीला, अशातला सारा मामला होता ज्याचा मी पाहुणा त्या कौंसलावासाच्या मंडळींनाच माझ्या दौऱ्याचे महत्त्व समजले नव्हते यामुळे ते माहिती खात्याच्या लोकांवर मला सोपवून मोकळे झाले. त्या खात्यालाही विशेष पर्वा किंवा आस्था असावी असे दिसले नाही त्यामुळे आबूधाबीचा दिवसही असाच वाया गेला त्या दिवसाची ही कर्मकहाणी

४ मे रोजी सकाळी सहा वाजण्यापूर्वीच उठून, स्नान करून, कपडे धुऊन, मामुली न्याहारी करून सव्वासातला मी खाली उतरलो मुहम्मद अल बोवर्दी आपली गाडी घेऊन आलाच होता त्याच्या गाडीतून माहिती मंत्रालयाच्या कचेरीत मी ७-३० ला पोचलो वस्तुतः अबूधाबीहून येणारी टपालाची मोटार ८-३० ला येणार होती त्या वेळी मी गेलो असतो तरी चालले असते परंतु नंतर मला पोचवायला कोणी नव्हते व बोवर्दीने कचेरीत जाताना मला घेऊन जाण्याची इच्छा आधल्या दिवशी व्यक्त केल्यामुळे नाइलाजाने तासभर आधीच त्याच्या खोलीत जाऊन बसावे लागले आपल्या कार्यक्रमाच्या बाबतीत आपण परस्वाधीन असलो की कसा कालनाश व पर्यायाने कार्यनाश होतो, त्याचा चांगलाच अनुभव त्या दिवशी आला पण मला काहीच करिता येणे शक्य नसल्याने नुसताच चडफडलो

माहिती मंत्रालयाची गाडी अर्धा तास उशिरा म्हणजे ९ वाजता आली गाडीच्या ड्रायव्हरला रेडिओ-टेलिव्हिजनमध्ये काही काम होते म्हणून तो तिकडे गेला तो अकरा वाजता परत आला म्हणजे पुरे साडेतीन तास मला एका जागी बसून काढावे

लागले. प्रथम थोडा वेळ बोवर्दी व त्याचे सहकारी त्याच्या खुर्च्यांवर होते. नंतर एकेक जण तेथून सटकला आणि दोन-अडीच तास त्या खोलीत मी एकटाच भुतासारखा बसून राहिलो. कोठे ओमानमधील मंडळींची आस्था आणि कोठे दुबईवाल्याची अनास्था ! त्या परिस्थितीतही मला त्या विचित्र योगायोगाचे हसू आले. 'सब दिन जात न एक समान' हेच खरे. बसल्या-बसल्या दैनंदिनी लिहून काढली, आणि अबूधाबीहून आलेले इंग्रजी दैनिक अथपासून इतिपर्यंत (जाहिरातींसह) वाचून काढले. तरीही वेळ जाता जाईना.

## सरकारी वृत्तपत्रे

संयुक्त अरब अमीरातीमध्ये वृत्तपत्रव्यवसाय अजून फारच बाल्यावस्थेत आहे. नाव घेण्यासारखी दोनच दैनिके आहेत व तीही माहिती खात्यातर्फे प्रकाशित होणारी. दुबई-हून दुबई नगरपालिकेतर्फे 'अखबार दुबई' हे अरबी साप्ताहिक १९६६ सालापासून प्रकाशित होणारे पहिलेच नियतकालिक. काही साप्ताहिके, पाक्षिके व मासिके त्यानंतर निघाली व बंद पडली. वृत्तपत्रे वाचणे व पत्रव्यवहार करणे या आधुनिक संस्कृतीच्या विशिष्ट परंपरेने अजून या प्रदेशात मूळ धरलेले दिसत नाही. माहिती खात्यातर्फे 'एमिरेट्स न्यूज' हे इंग्रजी व 'अल् इत्तेहाद' हे अरबी दैनिक अलीकडेच प्रकाशित होऊ लागले आहे. त्यात प्रामुख्याने शेख, मंत्री यांचीच वक्तव्ये व सरकारशी संबंधित बातम्या असतात. आणीबाणीनंतर भारतातील वृत्तपत्रांची जी दशा झाली आहे, तिचे स्मरण मला 'एमिरेट्स न्यूज' वाचताना झाले, आणि मनात विचार आला, भारतात ही वेगवेगळी वृत्तपत्रे काढण्याची मुभा देण्यापेक्षा सरकारने आपलीच एकदोन वृत्तपत्रे काढली तर अधिक बरे होईल. निदान कागद व शाई यांचा अपव्यय तरी टळेल ! 'रूटर्स' (Reuters) नावाचे एक दैनिक वार्तापत्र शारजा (ऊर्फ शारका) या शहरातून निघते. त्यात मुख्यत: व्यापारविषयक बातम्या असतात. परंतु त्यांचे प्रमाण फारच अल्प असते. एकदशांश भाग बातम्यांनी व नऊदशांश भाग जाहिरातींनी व्यापलेला असतो. किंबहुना आधी जाहिराती छापून घेतात, आणि उरलेल्या जागेत टाइप केलेल्या बातम्या छापतात. मासिकाच्या आकाराच्या या तीसपानी दैनिकाची ८५ फिल्स (सुमारे पावणेदोन रुपये) ही किंमत मला जरा जबरच वाटली. कैरो, बैरूत वगैरे ठिकाणाहून येणारी वृत्तपत्रेच त्या मानाने प्रतिष्ठित म्हणता येतील अशी आहेत.

जेथे वृत्तपत्रांची ही स्थिती तेथे साहित्याची काय अवस्था असणार हे उघडच आहे. आखात देशामध्ये सार्वत्रिक शिक्षणाचा प्रसार हीच मुळी अगदी अलीकडील गोष्ट आहे. त्यामुळे साहित्यनिर्मितीचा विकास होण्याला अजून बराच काळ लोटावा लागेल.

क्वचितच कोठे एखादा कवी किंवा लेखक असेलही परंतु येथील लोकांची साहित्य-विषयक भूक-तहान भागविण्याचे काम मुख्यतः मध्यपूर्वेतील अरबी लेखकच करीत असतात त्यामुळे आखात देशातील जनतेच्या आशाआकांक्षा व भावभावना व्यक्त करणारे साहित्य अद्यापि निर्माणच झालेले नाही, असे म्हटले तरी चालेल जे थोडे बुद्धिवंत या देशात तयार झाले आहेत, ते राज्यकारभारातच गुंतून पडले आहेत

बोवर्दाच्या खोलीत बसल्या बसल्या माझे विचारचक्र असे चालले होते अखेर गाडी घेऊन ड्रायव्हर आला आणि माझा औट घटकेचा तो एकान्तवास किंवा तुरुंग-वास संपला

## पवनवेगाने धावणारी गाडी

दुबई ते अबूधाबी हे अंतर १६० कि मी आहे ( इंग्रजी स्पेलिंग प्रमाणे आपण ज्याला अबूधाबी म्हणतो ते खरोखरी अबू जबी किंवा अबू झबी आहे !) भारता-तील वेगाचा हिशेब करिता एवढे अंतर कापण्यास तीन-चार तास सहज लागले असते, परंतु आमची गाडी ११ वाजता निघून १२-३० ला म्हणजे फक्त दीड तासात पोचली वेगदर्शक काटा १२० व १४० कि मी याच्या दरम्यान फिरत होता गाडी वाता-नुकूलित होती त्यामुळे खिडक्या बंद होत्या परिणामतः वाऱ्याच्या झोतामुळे होणारी वेगाची जाणीवही होत नव्हती ड्रायव्हरला इंग्रजी फारसे येत नव्हते त्यामुळे संभाषण बंदच होते तो एकामागून एक अरबी गाण्याचे टेप लावीत होता व मीही त्या लोक-संगीतासारख्या वाटणाऱ्या गाण्याचा रसास्वाद पेंगत-पेंगत घेत होतो

दुबईपासून दक्षिणेस ५२ किलो मीटरवर दुबईची सरहद्द संपते आणि अबूधाबीची सुरू होते वस्तुत' दुबईपासून अबूधाबीपर्यंत नुसतेच वाळवंट पसरलेले आहे त्या वाळवंटात फक्त जेमतेम वीतभर उंचीची काटेरी झुडपे अधूनमधून उगवलेली आहेत अशा स्थितीत संयुक्त राज्य बनण्यापूर्वी या राज्याच्या सरहद्दी कशा ठरल्या असतील आणि त्यांचे संरक्षण कसे केले जात असेल याची काहीच कल्पना येत नाही सध्या दुबई-अबूधाबी राजमार्गावर ५२ किलोमीटरवर काही इमारती दिसतात ती जुनी चेकपोस्टे होत पूर्वी तेथे तपासणी होत असे पण आता संयुक्त राज्य बनल्यामुळे प्रवाशांना तेथे थांबावे लागत नाही या १६० कि मी च्या प्रवासात रस्त्यापासून थोड्या अंतरावर फक्त दोन खेडी भेटली त्यापैकी एक तर अलीकडेच वसविलेले आहे दुबई-अबूधाबीमध्ये खेडी अशी जवळ जवळ नाहीतच अबूधाबीमध्ये पूर्वेस ओमा-नच्या सरहद्दीजवळ अल ऐन व दक्षिणेस लिवा अशी दोन मरूद्याने ( ओॲसिस ) आहेत तेथे शेती व फळबागा आहेत. रस्ता दुहेरी, वाटेत वळणे किंवा टेकड्या याचा अभाव यामुळे गाडी इतक्या वेगाने चालविणे शक्य होते अर्थात तरीही एखाद्या

वळी अपघात होतातच हे अपघात मुख्यत उंटामुळे होतात. वाळवंटात चरणारे उंट पलीकडे जाण्यासाठी रस्त्यावर येतात ते इतके बलथड असतात की, मोटारीच्या हॉर्नचा त्याच्यावर काहीही परिणाम होत नाही ते मख्खपणे रस्ता अडवून उभे राहतात आणि भरधाव जाणारी मोटार त्याच्यावर आदळते उंट किंवा शेळ्यामेंढ्या याचे राखणदारही जवळपास दिसत नाहीत अशा या भटक्या जनावरापासून वाहनाचे रक्षण करण्यासाठी काही ठिकाणी रस्त्याच्या कडेने काटेरी ताराचे कुपण लावलेले आहे परंतु अजून सपूर्ण मार्ग अशा प्रकारे सुरक्षित करण्यात आलेला नाही सरकार-जवळ पैशाचा तुटवडा नसल्याने दुबईपासून अबूधाबीपर्यंतचा संपूर्ण रस्ता कुपणाने परिवेष्टित व्हायला फारसा काळ लागणार नाही असे वाटते

दुबई–अबूधाबी राजमार्गावरून जाताना वाटेत एके ठिकाणी भूउपग्रहकेंद्राची प्रचड शुभ्र धातूची छत्री चकाकताना दिसते, आणि संपूर्ण संयुक्त अरब अमीरातीत साध्या व रगीत चित्रवाणीचे जे सुदर कार्यक्रम दाखविले जातात त्याचे आपल्याला स्मरण होते या भूउपग्रहकेंद्रामुळे आता तर जगातील अनेक देशाचे रगीत दूरदर्शन कार्यक्रम इथल्या लोकाना पाहावयास मिळू लागले आहेत

## निष्फळ प्रतीक्षा

आधी असे ठरले होते की अबूधाबीला प्रथम भारतीय दूतावासात जावयाचे आणि तेथून मुलाखतीची वेळ ठरवून माहिती मत्रालयात जावयाचे परतु मत्रालय १ वाज-ताच बद होते म्हणून दूतावासात नेण्याऐवजी ड्रायव्हरने मला मंत्रालयातच नेऊन सोडले मंत्री महाशयापर्यंत माझ्या नावाची चिठ्ठी लागलीच पोचली असती तर कदा-चित त्याची भेट झालीही असती पण कचेरीतील मडळी कामापेक्षा घरी जाण्याच्या गडबडीतच अधिक दिसली त्यामुळे माझ्याकडे कुणीच लक्ष दिले नाही मत्र्याचे चिटणीस माझे नावगाव विचारून जे एकदा गेले ते पुनः परत आलेच नाहीत अखेर जेव्हा दारे, खिडक्या लावून घेणे सुरू झाले तेव्हा मी स्वतःच खात्याच्या उपसंचालका-कडे गेलो आणि प्रकाशित साहित्याची मागणी केली कचेरी बद झाल्यामुळे त्याने एक मामुली चोपडे देऊन माझी बोळवण केली माझ्या आधी आलेल्या एका गोऱ्या वृत्त-पत्रकाराची कशी बडदास्त ठेवली जात होती ते मी स्वतःच्या डोळ्यानी पाहिल्यावर आमच्या देशात गोऱ्या पत्रकाराना विशेष सन्मानाने वागविले जाते म्हणून तक्रार करणाऱ्या अरब मित्राच्या देशातही तीच परिस्थिती असल्याचे मला पटले मत्र्या-बद्दल विचारले असता ते केव्हाच घरी गेले असल्याचे मला सागण्यात आले, परतु मी खाली जाऊन प्रतीक्षा करीत असता बऱ्याच वेळाने ते मोटारीत बसल्याचे मी पाहिले

## दूतावासाची टोलवाटोलवी

एक वाजता सरकारी कचेऱ्या बंद झाल्या की दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजेपर्यंत कोणतेही सरकारी कामकाज होण्याची आशा नसते. म्हणजे अबूधावीची माझी भेट तशी वायाच गेली होती शिवाय माझ्याबरोबर कोणी स्थानिक माणूस नसल्याने मला स्वतःला काहीच हालचाल करिता येणे शक्य नव्हते कौसलावासाने मला दैनिक भत्ता दिला नसल्याने मजजवळ त्या देशाचे चलनही नव्हते त्यामुळे भाड्याची टॅक्सी करणेही मला शक्य नव्हते एक प्रकारे मी तेथे अडकूनच पडलो होतो कोणीतरी येऊन माझा उद्धार करणे भाग होते मी भारतीय दूतावासात फोन केला तेव्हा तेथील एक अधिकारी श्री भटनागर यानी सांगितले, "दूतावासाकडे डायव्हर नाही त्यामुळ गाडी पाठवता येत नाही तरीपण बॅंक ऑफ बरोडाचे श्री दुडानी याना फोन करून तुम्हाला दूतवासात घेऊन यायची मी विनती करतो " बराच वेळ झाला गाडी येण्याचे काही चिन्ह दिसेना. म्हणून मीच श्री दुडानी याना फोन केला ते म्हणाले, "आमच्या-कडेही ड्रायव्हर नाही माझ काम आटोपल की मी स्वत.च गाडी घेऊन येतो "

आखात देशामध्ये भारतीय दूतावासाकडे डायव्हर नसल्याचे रडगाणे मला मस्कतखेरीज सगळीकडेच ऐकावे लागले याचे कारण असे की, या देशामध्ये मोटारींची संख्या माणसापेक्षाही जास्त असल्याने (लौकिकार्थाने !) गाडीहाक्याना फार मागणी आहे त्यामुळे अनेक अरब टॅक्सीवाले किंवा सरकारी अथवा कपन्याचे ड्रायव्हर बनतात, आणि खोऱ्याने पैसा ओढतात सरकारी डायव्हर दुपारी एक वाजल्यानतर खासगी टॅक्सी चालवितात अशा स्थितीत भारतीय दूतावास किंवा बॅंक ऑफ बरोडासारख्या भारतीय बॅंका याच्याजवळ डायव्हर कसे टिकणार ? भारतीय दूतावासाच्या ड्रायव्हरला जास्तीत जास्त दरमहा हजार रुपये पगार मिळू शकतो पण त्यालाच अमेरिकन दूतावासात तीन हजार रुपये मिळतात. त्यामुळे भारतातून नेलेले ड्रायव्हरही काहीतरी लटपटपची करून चारसहा महिन्यातच दुसरीकडे नोकरी करू लागतात अर्थात ही काही एकट्या ड्रायव्हराचीच गोष्ट नाही दूतावासातील इतर नोकराचीही तीच स्थिती आहे तेथील महागाईमुळे लठ्ठ भासणारे पगारही पुरत नाहीत, अशी तक्रार सर्वत्र ऐकू आली पण ही पांढरपेशी मडळी अधिक बाधलेली असल्यामुळे ड्रायव्हर किंवा चतुर्थ श्रेणीच्या इतर नोकराप्रमाणे सहजासहजी नोकरी सोडून जाऊ शकत नाहीत एवढेच

## एका मराठी अरबाचे मनोगत

स्वागत कक्षामधून ही फोना-फोनी चालली असताना एक काळासावळा अरब

तेथे आला तो तेथला रखवालदार होता त्याने उर्दूतून मी कोण, कुठला याची चौकशी सुरू केली मी पुण्याचा असल्याचे समजताच त्याने एकदम माझ्याशी मराठीत बोलायला सुरुवात केली मी थक्क होऊन त्याच्याकडे पाहातच राहिलो. दुबई-अबूधाबीला बऱ्याच अरबाना मोडकेतोडके उर्दू येते, हे मला माहीत होते पण एखाद्या अरबाला मराठीही येत असेल याची मात्र मला स्वप्नातही कल्पना आली नसती माझे आश्चर्य पाहून त्याने खुलासा केला "मी औरंगाबादचा राहणारा माझे आई-वडील अजून तिथच आहेत त्याना मुलीजवळ राहायला बरं वाटत, म्हणून ते इकडे यायला तयार नाहीत माझी बायको आणि मुल दुबईला आहेत मी शेखकडे जमीन मागितली आहे ती मिळाली की इथच घर बाधून राहणार आहे "

"पण तुम्ही इकडे आलात कसे ?" मी विचारले

"आम्ही मूळचे अरबच निजामाच्या सैन्यात भरती होण्यासाठी फार जुन्या काळी हैदराबादला गेलो होतो कैक पिढ्या आमच्या निजामाची चाकरी करण्यातच गेल्या हैदराबाद भारतात विलीन झाल्यावर मी बाहेर पडलो आणि एडन, इडोनेशिया वगैरे ठिकाणी नोकऱ्या करीत करीत इथ येऊन पोचलो " तो सागू लागला मराठवाड्यातील शेतकऱ्याची ओबडधोबड पण कानाना मधुर लागणारी मराठी तो बोलत होता

"तुम्हाला इथ कस काय वाटत ?" मी विचारले

"काय सागू साहेब ? इथ मन लागत नाही मी अगदी याच्यासारखीच अरबी बोलतो पण इथल्या अरबाबद्दल मला आपलेपणा वाटत नाही. औरंगाबादला आमच्या आसपास सगळे ब्राह्मणच होते–देशमुख, देशपाडे, जोशी वगैरे सगळे धर्मान चालणारे, आमच्यावर प्रेम करणारे कधी दुजाभाव वाटला नाही ते प्रेम इथ मिळत नाही खरे मुसलमान भारतातच आहेत इथल्या अरबाना पैशाची मस्ती चढलीय दारू पितात वाटेल ते खातात, रडीबाजी करतात. खरा इस्लाम त्याना कळलेलाच नाही भारतात मात्र हिंदू, मुसलमान सगळेच आपापल्या धर्माप्रमाण चालतात त्यामुळे तिथ प्रेमाच, आपलेपणाच वातावरण आहे मी इथ चौकीदारी करतो आणि इथच कुठ तरी झोपतो "

त्याने आपली एक सामाजिक व्यथा सागितली तिच्यात कितपत तथ्य आहे ते अर्थातच मला माहीत नाही

तो म्हणाला, "हैदराबादेत अनेक अरब अडकून पडले आहेत त्याना इकडे यायचं आहे पण भाड्याचे पैसे नसल्यामुळ त्याना येता येत नाही भारत सरकारन त्याना इकडे पाठवायची सोय केली पाहिजे ते इकडे आले की चटकन अरबी शिकतील, आणि इथल्या जीवनात समरस होतील "

"आता तुम्हीच म्हणताहात की तुमच मन इथ लागत नाही, आणि तिथल्या

अरबाना इकडे आणून काय होणार? तरीपण मला वाटत, या बाबतीत इथल्या सरकारनच पुढाकार घेतला पाहिजे आर्थिक दृष्ट्या त्याला ते शक्यही आहे इतके भारतीय मजूर इकडे येताहेत, त्यातूनच ते येऊ शकतील पण इकडे येऊन ते काय करणार?" मी विचारले

यावर तो म्हणाला, "दुसर काय करणार? हमाली किंवा मजुरी! ते अशिक्षित असल्यामुळ त्याना मोठ्या पगाराच्या नव्या नोकऱ्या इथल सरकार तरी कशा देणार?"

त्याच्याविषयी मनःपूर्वक सहानुभूती व्यक्त करून मी त्याचा निरोप घेतला दुसरे काय करणार?

## राजदूतांशी भेट

अखेर १-४५ ला भारतीय दूतावासाची गाडी श्री दुडानींच्या आधी आली आणि मी २ वाजण्याच्या सुमारास दूतावासात पोचलो. कचेरी बंद झाल्यामुळे इतर कर्मचारी निघून गेले होते पण राजदूत श्री सैयद एहसान हैदर रिज्वी व प्रथम सचिव श्री भटनागर माझी वाट पाहात थांबले होते श्री रिज्वी फक्त तीन वर्षांसाठीच आर्थिक सहकार्य मिळविण्यासाठी आले होते, आणि पुढील महिन्यात परत जाणार होते ते मला म्हणाले, "भारतातूनच इथ भरपूर माल आयात करण शक्य आहे मात्र त्यासाठी डोळ्यात तेल घालून जागरूकतेन प्रयत्न केला पाहिजे स्थानिक लोकाचे भारतीयाशी चागले सबध आहेत पाकिस्तानन भारताविरुद्ध जहरी प्रचार करून पाहिला पण स्थानिक जनतेवर त्याचा फारसा परिणाम झाला नाही सरकारवर थोडा-फार झाला त्यामुळ सरकारी पातळीवर आपले सबध विशेष मैत्रीपूर्ण नव्हते पण सुलतानाच्या भारत भेटीनतर ते खूपच स्नेहपूर्ण बनले आहेत. त्याच्या भारतभेटी-तही पाकिस्तानन खो घालण्याचा खूप प्रयत्न केला. पण अखेर मला यश आल आणि त्याची भारतयात्रा यशस्वी झाली तिथ त्याच भव्य स्वागत झाल त्याचा चागला परिणाम दिसून आला भारतात कोट्यवधी मुसलमान सुखासमाधानान राहात असल्याच इथल्या लोकाना सतत पटवून देत राहाव लागत त्यासाठी चित्रपट, लेख, पुस्तकं याचा वापर आम्ही करतो इथल्या इस्लामवर आधुनिकतेचा परिणाम फारसा झालेला नाही तो तुम्हाला कुवैतमध्ये बराच पाहायला मिळेल सर्वात कमी प्रभाव सऊदी अरबस्तानाच्या इस्लामवर पडलेला दिसून येईल त्यानी आपला जुना धर्म जसाच्या तसा टिकवून ठेवण्याची आटोकाट धडपड चालविली आहे, आणि राजेशाही व आर्थिक सुबत्ता यामुळे त्याची ती धडपड यशस्वीही झाली आहे."

## एक मजेदार घटना

राजदूताशी माझे बोलणे चालू असतानाच बँक ऑफ बरोडाच्या अबूधाबी शाखेचे व्यवस्थापक श्री लाल रैंदोमल दुडानी व रोखपाल ( कॅशियर ) श्री विपीन परशुराम कर्णिक हे तेथे आले त्यांच्या गाडीतून आम्ही श्री दुडानी यांच्या बिऱ्हाडी गेलो बँकेने त्यांना दिलेला फ्लॅट एका उच्च इमारतीच्या पाचव्या मजल्यावर होता लिफ्ट चालू नसल्यामुळे पाच ( किंबहुना दहा ) जिने चढून वर गेल्यावर जणू एखादा डोंगर चढून गेल्यासारखे वाटले जागा मात्र छान होती तेथे उत्तम सिंधी जेवण मिळाले मी वामकुक्षी करीत आरामात पडलो होतो घरी सौ दुडानी व त्यांची दोन मुलेच होती श्री दुडानी व कर्णिक आपापल्या कामाला गेले होते इतक्यात दारावरची बेल वाजू लागली दुसऱ्याच्या घरात आपण फोन घ्यायचा नसतो अथवा बेल वाजली तरी दार उघडायला जायचे नसते, अशी माझी समजूत शिवाय मी अगदी आतल्या खोलीत झोपलो होतो सौ दुडानी बाहेर असतील म्हणून मी काही हालचाल केली नाही बराच वेळ बेल वाजत राहिली आणि नंतर बंद झाली थोड्या वेळाने सौ दुडानी व मुले माझ्या खोलीत येऊन माझे काही बरेवाईट तर झालेले नाही ना, अशा नजरेने माझ्याकडे पाहू लागली मी म्हणालो, “ असे काय पाहता ? ” यावर खोखो करून हसत त्या म्हणाल्या, “ अहो, जम्मतच झाली मी मुलांना घेऊन खाली गेले होते जाताना दार बंद केलं, आणि दाराची किल्ली आतच राहिली म्हणून तुम्हाला उठ-वायसाठी बेल वाजवीत होते अखेर एका शेजाऱ्यांनी सज्जातून आत येऊन दार उघडलं नाहीतर दुडानीसाहेबांना फोन करून त्यांच्याकडली किल्ली आणावी लागली असती ” मग मीही त्यांच्या हास्यात सामील झालो

सायंकाळी श्री दुडानी यांनी आपल्या गाडीतून फिरवून आणले समुद्रकिनाऱ्या-वरची घरबांधणी मुंबईच्या मरीन ड्राइव्हसारखीच आहे अधून-मधून हिरवळी व बागाही तयार केल्या आहेत रम्य परिसर आहे श्री दुडानी यांना मी म्हणालो‘ “ ही मंडळी तुमच्या नावाचा उच्चार दुधाने असा करतात त्यामुळे तुम्ही मराठीच असाल असं वाटलं होतं ” ते नुसते हसले

## भारतीय मित्रांच्या तक्रारी व सूचना

श्री दुडानी आपल्या कामाला निघून गेले, आणि श्री कर्णिक यांच्याबरोबर मी बाजारपेठेतून पायी हिंडू लागलो दुबई व अबूधाबी येथे भारतीयांची संख्या एवढी मोठी आहे की, अरबीप्रमाणेच उर्दू किंवा हिंदुस्तानी ही देखील या देशाची भाषाच असावी, असा अनेकदा भास होतो हीच गोष्ट कुवैतच्या बाबतीत खरी असल्याचे

नतर आढळून आले त्यामुळे येथील जुन्या व्यापारी मडळींना भेटण्याने आपल्या माहितीत चागली भर पडेल असे मला वाटत होते परतु प्रत्यक्षात अनुभवमात्र फारसा उत्साहवर्धक आला नाही या मडळींना पैसा व धदा याशिवाय इतर कोणत्याच गोष्टींत रस नसल्याने त्याच्या बोलण्यातून काहीच पदरी पडत नसे

अबूधाबीला श्री भोजराज नावाच्या एका कोट्यधीश सिंधी किराणा दुकानदाराची मुलाखत घडवून आणण्यासाठी श्री कर्णिक मला त्याच्या दुकानी घेऊन गेले पण ते गृहस्थ आपल्या विक्रीच्या कामात इतके गढून गेले होते की, आमच्याकडे लक्ष देण्याला त्याना सवडच झाली नाही माझ्या कामाचे स्वरूपच त्याना आकलन झाले नाही; आणि माझ्या प्रश्नात त्यानी कसलीच रुची दाखविली नाही “ पूर्वी इथ कसल्याच सुखसोयी नव्हत्या, त्या आता झाल्या आहेत शेख फार चागला माणूस असून त्यान मला जागा दिली आहे, आणि मी तिथ बगला बाधणार आहे ” एवढीच माहिती त्याच्या मुखारविंदातून मला काढता आली

परतु याची भरपाई ‘ इडिया सोशल सेंटर ’ या सस्थेत गेल्यावर झाली तसे पाहिले तर हा एक सर्वसामान्य क्लब आहे सायकाळी घटकाभर एकत्र जमावे, टेनिस–बॅड-मिंटनसारखे खेळ खेळावेत, मनसोक्त मद्यपान करावे, हिंदी, मल्याळी, इग्रजी चित्र-पट पाहावेत एवढ्या माफक अपेक्षेनेच येथे लोक जमतात परतु त्याच्यामध्ये देश व समाज याचा गभीरपणे विचार करणारे लोकही असतात, असा मला अनुभव आला

सेंटरची इमारत चागली प्रशस्त व सुबक आहे क्लबाचे १०८० सभासद असून त्यात अरब, पाकिस्तानी, बागलादेशी यानाही अल्प प्रमाणात सहयोगी सभासद म्हणून प्रवेश देण्यात आला बागला देशाचे खुद्द राजदूतच सभासद आहेत, असे मला सागण्यात आले गतवर्षी ( १९७५ ) २४ ऑक्टोबरला या इमारतीत ‘ इडियन स्कूल नावाची शाळा उघडण्यात आली असून तिच्या पहिल्या इयत्तेत शभर विद्यार्थी शिकत आहेत क्लबातर्फे स्त्रियासाठी अरबीचा एक वर्गही चालविण्यात येतो

असे आणखी तीन क्लब अबूधाबीत असल्याचे समजले केरळीयाची सख्या तेथे सर्वात अधिक असल्याने त्याचा असा एक वेगळाच क्लब आहे केरळीय, सिंधी मारवाडी, गुजराथी, याच्या मनाने मराठी लोकाची वस्ती अगदीच नगण्य आहे नाहीतरी मराठी माणसे घरकोंबडेपणाबद्दल प्रख्यात आहेतच

इडिया सोशल सेंटरमध्ये अनेक मडळींशी मनमोकळ्या गप्पा झाल्या त्यापैकी अबूधाबी पेट्रोलियम कपनीत काम करणारे श्री जॉन माथन व श्री पद्मनाभन नबियार याच्याकडून काही महत्त्वाच्या सूचना ऐकावयास मिळाल्या हे दोघेही केरळीय आहेत श्री नबियार सेंटरचे अध्यक्ष असून अनेक वर्षं त्या कपनीत काम करीत आहेत श्री माथन हे गोरेपान व धिप्पाड असून प्रथमदर्शनी ते पजाबी असल्याचा

भास होतो  सरक्षण खात्यात  त्यानी  अनेक  वर्षे नोकरी  केली  आहे  त्या वेळी  ते पुण्याच्या खडकीच्या फॅक्टरीतही काही काळ असल्याने त्याना पुण्याची बरीच माहिती आहे  त्याच्या प्रमुख सूचना अशा :

( १ ) आमचे दूतावास दैनदिन स्वरूपाचे ( रूटीन ) काम  नोकरशाही  पद्धतीने उरकण्यात गढून गेलेले असतात  त्याना भारतीय  लोकाकडे  लक्ष  देण्यास  सवडच नसते  म्हणून प्रत्येक  दूतावासात  समाजसेवेची  आवड  असलेला  एकेक  कार्यकर्ता नेमावा व त्याच्याकडे भारतीयाच्या अडचणी सोडविण्याचेच कार्य सोपवावे- आमच्या काही अडचणी सरकारी पातळीवरूनच सोडविता येण्यासारख्या आहेत  उदाहरणार्थ, ब्रिटिश कपन्यानी स्थानिक लोकाना नोकऱ्या दिल्या पाहिजेत, असे  त्यांच्यावर  बधन आहे  पण ते पाळण्यात त्या चुकारपणा करतात  १०  ब्रिटिशाना नोकऱ्या दिल्या की एका अरबाला नोकरी देतात  पण  भारतीयाना मात्र त्याच्या हक्काची  बढतीही  देत नाहीत  आमच्यावर होणारा हा अन्याय दूर करावा म्हणून आम्ही भारतीय दूतावासात गेलो तर आमच्याकडे कोणी लक्षच देत नाहीत  ही परिस्थिती बदलली पाहिजे

( २ ) आमच्या सेंटरला भारतातून येणाऱ्या  पुढाऱ्यानी  भेटी  दिल्या  पाहिजेत त्याच्या—आमच्या भेटीगाठी होत राहिल्या तर आम्ही आमच्या अडचणी त्याच्यापुढे माडू शकू  मध्यतरी श्री  झकेरिया व श्री के  डी  मालवीय  येथे  येऊन  गेले  पण आम्हाला मात्र ते  येऊन गेल्यावर  वृत्तपत्रातून  समजले  स्वातत्र्यदिन, गणतत्रदिन यासारख्या समारभामध्ये आम्ही सहभागी व्हावे,  अशी  दूतावासाची अपेक्षा  असते मग आमच्याशी त्यानी इतर वेळी अधिक निकटचे  सबध का  ठेवू  नयेत ?  त्यायोगे आमच्यात एक सुरक्षिततेची भावना निर्माण होईल

( ३ ) पतप्रधान श्रीमती इदिरा गाधीनी या भागात एक  दौरा  लौकरात लौकर काढला पाहिजे. त्यामुळे भारतीयाचे महत्त्वही वाढेल आणि अरबानाही आपला गौरव झाल्यासारखे वाटेल  पाकिस्तानतर्फे असा प्रचार चालू असतो की इदिराजींना आखात देशाचे महत्त्व वाटत नाही, म्हणून त्या जगभर हिंडत असल्या तरी या देशात येणार येणार म्हणत असूनही येत नाहीत  त्याचा हा प्रचार खोटा पाडला पाहिजे.

आणीबाणीमुळे देशाचा कारभार फार छान चालला  आहे,  म्हणून  ती  अशीच किमान १० वर्षे चालू राहावी असेही सागणारे काही महाभाग मला भेटले. मी त्याचे म्हणणे शातपणे ऐकून घेतले  नाहीतरी भारतात लोकशाही  चालणार  नाही,  हुकूम-शाहीच आली पाहिजे असे म्हणणारे लोक भारतात पूर्वीही होतेच व आताही आहेतच !

## गरिबांची ससेहोलपट

राहण्याच्या जागेची  टचाई  ही  या  आखात देशातील  सर्वात  मोठी  समस्या

असल्याचा उल्लेख यापूर्वी आलाच आहे गरीब व मध्यमवर्गीय भारतीयाना ही समस्या कशी तापदायक ठरते याचे दर्शन अबूधाबीला घडले या देशात भाडेनियत्रण कायदा नसल्यामुळे घरमालक अरब आपल्या भाडेकरूना केव्हाही हुसकून लावू शकतो पाच-पन्नास रुपये जादा देणारा माणूस भेटला की पहिल्या भाडेकरूला त्याच्या जागे-तून सक्तीने बाहेर काढले जाते अशा वेळी दुसरीकडे जागा मिळणेही शक्य नसते मग तो भाडेकरू कुटुबवत्सल असला तर त्याने काय करावे ? असा एक हिंदी भाषी इसम अबूधाबीची रात्र मी ज्याच्या घरी काढली ते श्री कर्णिक याच्या घरी आश्रयाला आला होता मालकाने घरातून बाहेर काढल्यावर त्याने आपली बायको व मुले याना भारतात पाठवून दिले पण घरातल्या मौल्यवान सामानाचे काय करावयाचे ? अनेकदा असे सामान कवडीमोलाने विकून टाकावे लागते, आणि एखाद्या मित्राच्या घरी किंवा हॉटेलात आसरा घ्यावा लागतो हॉटेलात राहणे इतके महाग असते की, सगळा पगार त्यासाठी खर्च घातला तरी तो अपुराच पडतो पैशाच्या लोभाने स्वदेश सोडून येणाऱ्याची स्थिती अशा वेळी घी देखा लेकिन बडगा नहीं देखा ' अशी होते. सरकारने कमी प्राप्तीच्या लोकासाठी घरे बाधली आहेत, परंतु तीही मुख्यत. अरबानाच मिळतात, आणि मग त्या जागाचा काळाबाजार सुरू होतो ' लकेत सोन्याच्या विटा या म्हणीप्रमाणे अनेकावर नुसताच हजाराचा जमाखर्च करण्याचा प्रसग ओढवतो

## पाकिस्तानी मुहम्मद अस्लमची धर्मनिरपेक्षता

दुसऱ्या दिवशी श्री गाधी नावाच्या एका सिंधी व्यापाऱ्याच्या वहिणीची मुलगी आपल्या मुलासह दुबईला जाणार होती त्या गाडीतून मला परत पोचविण्याची जबाबदारी श्री दुडानी यानी घेतली त्याप्रमाणे मी त्याच्या कचेरीत गेलो तेथून श्री गाधी यानी मला आपल्या घरी नेले चहापाणी दिले आणि आपल्या भाचीबरोबर माझी रवानगी केली ही सिंधी मडळी मजेत दिसली जणू भारतात असल्यासारखीच वागत होती म्हातारी आईही खुषीत दिसली आम्हा मराठी माणसांप्रमाणे ' इथ मन लागत नाही, ही त्याची तक्रार नव्हती जेथे जायचे तेच आपला देश, अशी वृत्ती असल्यामुळेच सिंधी लोक जगाच्या पाठीवर सर्वत्र जाऊन पोचले आहेत

गाडी होती मुहम्मद अस्लम या पाकिस्तानी व्यापाऱ्याची टोयोटा सव्वा नऊला निघून सव्वा अकराला पोचलो मुहम्मद अस्लम मोठा बोलका व ' जिंदा दिल माणूस वाटला गाधी परिवाराशी आपले कसे घनिष्ठ संबंध आहेत त्याचे त्याने केलेले रसभरित वर्णन ऐकून मन प्रसन्न झाले आणि तरण्याताठ्या मुलीला एकटीला त्याच्या गाडीतून पाठविण्यास गाधी कुटुबीय कसे तयार झाले असतील या माझ्या प्रश्नाचे उत्तरही मिळाले. हिंदूशी–विशेषत' गाधी कुटुबाशी–स्नेहाचे व जवळिकीचे संबध

निर्माण झाल्यामुळे आपल्या जीवनावर फार चागला परिणाम झाला, आपण सौम्य बनलो, मुलावर प्रेम करायला शिकलो, त्याना आपण आता शिवीगाळ करीत नाही, असे त्याने सागितले आपल्या जीवनातील एक अद्‌भुत घटना त्याने मला सागितली तो म्हणाला, " दुर्गेश गाधी हा माझा जीवश्च कठश्च मित्र त्याची बायको ही माझी राखी-बधी बहीण दरसाल न चुकता ती मला राखी बाधते एकदा धद्यातल्या काही गोष्टींवरून दुर्गेशशी माझ भाडण झाल मी त्याच्याशी बोलण बद केल त्याच घरही वर्ज्य केल जवळ-जवळ आठ दहा महिने असे गेले एके दिवशी मला फारच अस्वस्थ वाटू लागल कारण काही कळेना बाहेर जाऊन लोकाना विचारल, आज कोणता दिवस आहे? तेव्हा ती राखी पौर्णिमा असल्याच समजल. माझ्या अस्वस्थतेच कारण माझ्या लक्षात आल, आणि तावडतोब मिठाईची पेटी घेऊन मी दुर्गेशच्या घरी गेलो मी बाहेरून कानोसा घेतला त्या नवराबायकोंत वाद चालला होता दुर्गेश म्हणत होता 'अस्लम मुळीच येणार नाही'; आणि त्याची बायको म्हणत होती, 'तो माझा खरा भाऊ असेल तर नक्कीच येईल' तिचा तो आत्मविश्वास पाहून माझे डोळे भरून आले मी झटकन आत गेलो मला पाहताच त्यानाही आनदाश्चर्याचा धक्का बसला दुर्गेशन मला कडकडून मिठी मारली, आणि आमचा कायमचा सलोखा झाला "

मी म्हणालो, "अगदी हिंदी सिनेमात शोभावी अशीच घटना आहे की! कुणाचा सहजासहजी विश्वासही बसणार नाही!"

"खरं आहे साहेब! पण आयुष्यात अशा घटना घडत असतात म्हणूनच तर ते जगण्यात गमत असते "

मुहम्मद अस्लम तसा सामान्य माणूस दिसला स्पेअर पार्ट्सचा धदा भरपूर कमाई स्वतःच्या चार-पाच मोटारी आहेत चागला सुखवस्तू म्हणता येईल असा पण त्याचे वाचन व चितन हे एखाद्या उच्च विद्याविभूषित बुद्धिमतासारखे वाटले. भारत, पाकिस्तान, काश्मीर वगैरे विषयावरील त्याची माहिती अद्ययावत होती तो बहुधा दरवर्षी पाकिस्तानला—पजाबातील आपल्या गावी जाऊन येतो काश्मीरसबधी तो म्हणाला, "ज्या शेख अब्दुलाच्या जिवावर काश्मीरच्या बाबतीत पाकिस्तान उड्या मारीत होत तोच आता भारताला सामील झाल्यामुळ काश्मीर मिळण्याची आशा शहाण्या पाकिस्तान्यानी सोडून दिलीय अनेक लोकाना अस वाटतय की, भुट्टो आणि इदिराजी यानी आपसात एखादा गुप्त करार करून एकमेकाना गादीवर टिकवून ठेवण्यासाठी सारी मदत करण्याच ठरवल आहे हा करार योग्य वेळी बाहेर येईल भारत आणि पाकिस्तान हे दोस्त बनले तर साऱ्या जगाला भारी होतील "

"इथल्या मुसलमानासबधी तुमच काय मत आहे?" मी विचारले

यावर मुहम्मद अस्लम म्हणाला, "इथल्या अरबापेक्षा पाक भारतीय मुसलमान

जास्त धार्मिक आणि सच्चे आहेत अरबाना कुराणाचा फक्त शब्दार्थ कळतो पण आपल्या मुसलमानाना कुराणाबरोबर हदीसचा सदर्भही कळतो कुराण आणि हदीस याबर आपल्याकडे इतकी भाष्य झाली आहेत की, तेवढी साऱ्या अरब जगतातही झाली नसतील "

मुहम्मद अस्लमने मला बँक ऑफ बरोडाच्या कचेरीत सोडले बँकेत ही गर्दी उसळली होती चौकशी केल्यावर समजले की, ही सारी भारतीय मडळी आपले पैसे बँकेमार्फत भारतात पाठविण्यासाठी गोळा झाली आहेत दररोज अक्षरशः हजारो रुपयाचे परकीय चलन या बँकेमार्फत भारतात जाते पूर्वी हे पैसे चोरट्या मार्गाने पाठविले जात त्यामुळे सरकारचे फार नुकसान होई आता त्याबाबतीत भारत सरकारने कडक धोरण स्वीकारल्यामुळे सारा पैसा बँकाच्या मार्फतच भारतात जातो सरकारला परकीय चलन मिळते आणि लोकाना बिनधोकपणे आपला पैसा आपल्या कुटुंबियापर्यंत पोचल्याचे व देशाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावल्याचे समाधान मिळते आता अरब लोकही बँक ऑफ बरोडामध्ये आपले पैसे ठेवू लागले आहेत असे समजले. भारतीय बँका अरबाच्या मनात एवढा विश्वास निर्माण करू शकल्या आहेत, हे पाहून बरे वाटले

बँकेतूनच श्री सईद मुहम्मद बूजसैम याना फोन करून मी आल्याचे कळविले. त्यानी सरकारी प्रेस रिपोर्टर श्री नाजिक याना तासाभराने मजकडे पाठविले मला काही दाखविण्यापेक्षा झकास खाना देण्याची त्याची इच्छा होती पण मी शाकाहारी व मद्यपान न करणारा आहे, हे समजताच त्याचा उत्साह थडावला आणि त्यानी मुहम्मद अल बोबर्दीच्या ताब्यात मला देऊन अग झटकले ओमानमध्ये सरकारी व बिनसरकारी लोकात मला जो जिव्हाळा आढळला त्याचा अशही संयुक्त अरब अमीरातीत अनुभवास आला नाही कोणाच्या तरी मानगुटीला बसून काम करवून घ्यावे लागले बहुधा माझे काय करावे, हेच कोणाला कळले नसावे बोबदाला मी म्हणालो, " आपण मुफ्तीकडे जाऊ " त्याप्रमाणे तो मुफ्तींकडे मला घेऊन गेला. पण मध्यतरीच्या गडबडीत एक वाजून गेला होता, आणि एक वाजल्यानतर कोणीही अधिकारी किंवा सामान्य कर्मचारी तुम्हाला कचेरीत दिसायचा नाही एखाद्याला घरी बोलावून त्याच्याशी गप्पागोष्टी करण्याची प्रथाच या देशात नाही त्यामुळे एकदा एक वाजून गेला की सगळे व्यवहार बद दुसरे दिवशी सकाळी ८–९ वाजेपर्यंत हरी हरी करीत स्वस्थ बसले पाहिजे

## शहरी अरबाचे आधुनिक घर

दिवस वाया चाललेला पाहून मी अस्वस्थ झालो बोबदाचा एक स्नेही मोटारीत

होता त्याला म्हणालो, " तुमच्या घरीच आपण थोडा वेळ गप्पागोष्टी करू त्या निमित्तान मला तुमच घर पाहता येईल " पण त्याने मला सफाईने झटकले आपल्या घराच्या दरवाजात मोटारीतून उतरता-उतरता तो म्हणाला, " आत्ता मी जरा गडबडीत आहे तुम्ही चार वाजता या ना ! " मी काय समजायचे ते समजलो बोवदी मला माझ्या हॉटेलवर सोडण्याचा विचार करीत होता पण मी त्याला म्हणालो, " आजचा माझा दिवस वायाच गेलाय आता निदान तुझ घर पाहण्याचा कार्यक्रम तरी होऊ दे. " तो म्हणाला, " पण तुमची जेवायची वेळ झाली असेल ." मी म्हटले, " जेवणाची मला काळजी नाही जेवण तर रोजच पाठीशी लागलय प्रवासात ते थोड इकडे-तिकडे झाल तरी मला चालत "

" पण आम्हाला जेवायच आहे ना ! " तो म्हणाला

" मीही जेवेन तुमच्याबरोबर नाहीतरी मला तुमच जेवण बघायच आहेच " मी निगरगट्टपणाचा कळस केला

अखेर नाइलाजाने तो मला आपल्या बगल्यावर घेऊन गेला इराणी इस्पितळाजवळच्या एका अत्याधुनिक वस्तीत त्याचा बगला आहे कोरा-करकरीत सर्व आधुनिक सुखसोयींनी व यात्रिक उपकरणानी सुसज्जित किमान पाच लाख रुपये तरी खर्च आला असावा आणि आतील सजावट पाहून तर माझे डोळे दिपले उची गालिचे, सोफासेट, सुदर चित्रे, दुर्मिळ पुरातन वस्तू, विद्युद्दीपाचे नाना प्रकार...आपल्याकडील नव श्रीमताच्या घरातही इतक्या मौल्यवान वस्तू क्वचितच पाहायला मिळतात

बोवदी हा तसा जेमतेम हेडक्लार्कच्या श्रेणीचा कर्मचारी त्याला हे वैभव कोठून प्राप्त झाले ? परंतु लौकरच त्याचा उलगडा झाला. त्याचे वडील शेखच्या नोकरीत होते, आणि अजूनही ते रोज शेखला भेटायला जातात तेव्हा ही सारी शेखचीच कृपा असली पाहिजे बोवदाची उमर असेल पस्तिशीच्या आसपास अजून त्याला मूलबाळ नाही पण दुसऱ्या लग्नाचा विचार तो करीत नाही आईवडील व बोवदा पतिपत्नी असे चौघेच त्या राजेशाही बगल्यात राहतात बोवदी उच, किडकिडीत पण गोरापान आहे त्याचे वडील मात्र काळेसावळे व बुटके आहेत जुन्या पद्धतीप्रमाणे कमरेला लुगी, अंगावर उपरणे आणि डोकीला पाढरी जाळीची टोपी असा त्याचा घरातील पोशाक होता.

घरात बायका मडळी असल्याने घर तसे फिरून पाहता आले नाही पण इकडून तिकडे जाताना जेवढा भाग दिसला त्यावरून इतर खोल्याची सजावटही चागलीच भपकेबाज असली पाहिजे हे लक्षात आले त्याच वेळी एक पचविशीची तरुणी ओझरती दिसली गोरा रग, शिडशिडीत अगकाठी, मोहक व रेखीव चेहरा तीच बहुधा बोवदींची बायको असावी

बोवर्दीने आपल्या वडिलाचा ४० वर्षांपूर्वी मुंबईत काढलेला एक फोटो दाखविला पायघोळ डगला, डोकीला पगडी, हातात छत्री मोठे रुबाबदार वाटत होते गृहस्थ

## बहिरी ससाण्याची बडदास्त

बहिरी ससाणा हा संयुक्त अरब अमीरातीचा राष्ट्रीय पक्षी आहे सरकारी पुस्तकावर, विमानावर, महत्त्वाच्या इमारतीवर त्याचे चित्र पाहायला मिळते हा पक्षी पाळणे हा येथील श्रीमंताचा व गरिबांचाही सर्वांत आवडता छंद आहे थंडीच्या दिवसात या पक्ष्याला घेऊन ते शिकारीला जातात. याच्या नख्या अत्यंत तीक्ष्ण असतात दुसऱ्या पक्ष्यावर व लहान प्राण्यावर झडप घालून तो त्याना पकडतो व मालकाकडे आणून देतो भारतातही लखनौच्या नवाबाना बहिरी ससाणे पाळण्याचा षोक असे. त्याला उर्दूत बाज असे म्हणतात या ससाण्याची झुंज लावणे हा त्याचा आवडता छंद होता हा पक्षी अत्यंत क्रूर समजला जातो पण पाळीव ससाण्याच्या चोचीत बोट घातल्यास तो ते पोपटाप्रमाणे कसे कुरवाळतो, हे मला बोवर्दींच्या वडिलानी दाखविले

बोवर्दाच्या बंगल्याच्या आवारात मोटारीच्या गॅरेजच्या आकाराची ॲस्बेस्टॉसच्या पत्र्याची एक सुरेख खोली बांधलेली असून तिच्यात त्यानी घारीच्या आकाराचा एक बहिरी ससाणा ठेवलेला आहे एखाद्या अमूल्य ठेव्याप्रमाणे तो कडीकुलपात व कडेकोट बंदोबस्तात असतो वीतभर उंचीच्या एका लाकडी खुंटाला त्याला बांधलेले असते तो त्या खुंटावरच बसून असतो. त्याच्या पायाच्या एका नखीला दोरी बांधली आहे. तिला फार पीळ बसला तर ती तुटून जाईल म्हणून दोरीला एक पितळेचे लहानसे गोल कडे लावलेले आहे ते कडे फिरत राहते त्यामुळे पीळ बसत नाही

या ससाण्याला रोज भरपूर अंडी व मांस खाऊ घालावे लागते तो माणसाकडे इतक्या धारदार नजरेने पाहतो की समोरच्या माणसाच्या मनात भीतीने धडकीच भरावी

त्याच्या खोलीजवळच खजुरीची व जर्दाळूसारख्या जाड पानाची झाडे असल्याने त्याला उन्हाचा त्रास होत नाही त्याची जी बडदास्त ठेवली आहे ती पाहून कोणालाही त्या हिंस्र प्राण्याचा हेवाच वाटेल

## अरबी जेवणाचा थाट

मी जेव्हा त्याच्याबरोबर जेवण्याची इच्छा व्यक्त केली तेव्हा बोवर्दींचे वडील म्हणाले, " तुम्ही जेवायला येणार हे आधी कळल असत तर तुमच्यासाठी साधा भात, भाजी वगैरे केली असती आज आमच्याकडे नुसताच पुलाव आहे त्यात मटण-मासळी दोन्ही आहेत तुम्हाला तर ते चालत नाही ! " मी म्हणालो, " त्याची काळजी करू

नका; मला नुसता खजूर आणि फळेही चालतील मला तुमचं जेवण पाहायचं आहे. ते जास्त महत्त्वाचं ”

त्याप्रमाणे त्यांनी स्वयपाकघराजवळच्या खोलीत चटई पसरून तेथे सर्वांच्या जेवण्याची व्यवस्था केली आउट हाउससारख्या एका छपरीत त्यांचे स्वयपाकघर होते त्यांचा स्वयपाकी एक केरळीय मुसलमान होता त्याला थोडेफार उर्दू येत होते त्यामुळे मला काय चालेल ते त्याला सांगता आले वस्तुत. बोवर्दांच्या बंगल्यात उत्कृष्ट जेवण-घर आहे; आणि तेथे उंची टेबलखुर्च्याही आहेत परंतु परक्या इसमाला इतक्या आतल्या बाजूस जाऊ देणे त्यांना गैरसोयीचे वाटले असावे, किंवा मला त्यांचे पार-परिक जेवण पाहायला मिळावे असाही त्यांचा हेतू असावा म्हणून त्यांनी मुख्य बंगल्यापासून अलग असलेल्या खोलीत जेवणाची सोय केली असावी ती खोली रिकामीच होती फक्त कोपऱ्यात एक खजुराचा पोऱ्या पडला होता आपल्याकडे ज्या पोऱ्यातून खजूर येतो, तसाच तो होता

बोवर्दा, त्यांचे वडील व त्यांच्या वहिणीची सात-आठ वर्षांची लहान मुलगी असे एका मोठ्या ॲल्यूमिनियमच्या परातीत जेवायला बसले पुलाव आणि सलाद (मुळ्याचा हिरवा पाला) एवढे दोनच पदार्थ होते परात खूप मोठी असल्यामुळे तिच्यातच एका बाजूला त्यांनी माझ्यासाठी खजूर, केळी, द्राक्षे, सफरचंद वगैरे खाद्य-पदार्थ ठेवले होते त्यांच्या पुलावाचा माझ्या फळांना स्पर्श झाल्याचा संशय आला की मी ते हाताने पुसून स्वच्छ करी (संस्काराचा परिणाम!) भूक चांगलीच लागली असल्याने मी निःसंकोचपणे भरपूर फलाहार केला बोवर्दाला मी एक उदबत्तीचा पुडा आणि ‘महात्मा माय बापू’ ची प्रत भेट म्हणून दिली त्यांच्या दिवाणखान्यात पुस्तिकांसाठी असलेले कपाट जवळ जवळ रिकामेच होते फक्त माहिती खात्याच्या पुस्तिकाच त्यात दिसल्या त्यांच्या संगतीत माझ्या ‘महात्मा ला किती एकाकी वाटेल, या कल्पनेने मी क्षणभर अस्वस्थ झालो तरी पण जेवणाबद्दल मनःपूर्वक आभार मानून मी त्यांच्याच गाडीतून हॉटेलवर परतलो

## मशिदीसमोर देऊळ

सायंकाळी श्री भाटिया यांचे मित्र ॲडव्होकेट श्री एन आर उपाध्याय हे हिंदी गृहस्थ भेटायला हॉटेलवर आले ते या देशातील सर्वांत जुने भारतीय वकील पूर्वी त्यांची प्रॅक्टिस खूप जोरात चालत होती. पण आता परकीयांना येथे वकिली करता येत नाही, म्हणून ते अरब वकिलांना सल्ला देण्याचे काम करतात मुंबईच्या शीव भागात त्यांनी बरीच इस्टेट केली आहे त्यावरून त्यांच्या येथील प्राप्तीची कल्पना येते मी त्यांना विचारले, “ इथ मुख्यतः कसले खटले तुम्ही चालवीत होता ? ” ते

म्हणाले, "मुख्यतः घटस्फोटित बायकांना त्यांच्या नवऱ्याकडून पोटगी किंवा लग्नाच्या वेळी ठरलेली हुंड्याची ( मेहरची ) रक्कम मिळवून देण्याचे खटले माझ्याकडे येत चार दिवस मौज करायची आणि बायकोला तलाक देऊन वाऱ्यावर सोडायचं असला बेजबाबदारपणा करणारे पुरुष इथं फार आहेत जवळ पैसा असूनही ते सुखासुखी आपल्या तलाकशुदा बायकांना पोटगी किंवा त्यांची मेहरची रक्कम देत नाहीत म्हणून कोर्टात जाऊन ती मिळवावी लागते

थोडा वेळ त्यांच्याशी गप्पागोष्टी झाल्यावर मी व श्री दातार त्यांच्याबरोबर गावात भटकून आलो श्री उपाध्याय अनेक वर्षे येथे असल्याने अनेक लोकांशी त्यांच्या ओळखी आहेत

प्रथम आम्ही एक कृष्णमंदिर पाहिले गावच्या मुख्य मशिदीच्या मागील दारा-समोरच हे देऊळ आहे मशिदीच्या इतक्या जवळ देऊळ पाहून मला थोडे आश्चर्य वाटले परंतु या शहरात नुसते देऊळच नाही तर गुरुद्वारा व गिरजाघरही आहे, हे समजल्यानंतर स्थानिक लोकांच्या धार्मिक सहिष्णुतेची कल्पना आली

मात्र त्या मंदिराला देवळाचे रूप नव्हते त्यामुळे तेथे देऊळ असेल असे बाहेरून लक्षात येत नाही ती एक साधी दुमजली इमारत असून तळमजल्यावर गोदाम आहे, आणि वरच्या मजल्यावर मंदिर व पुजाऱ्यांच्या राहण्याच्या खोल्या आहेत त्याला देऊळ म्हणण्यापेक्षा मोठे देवघर म्हणणेच जास्त उचित होईल मंदिरात मूर्ती नसून कृष्णाच्या तसबिरी आहेत ध्वनिमुद्रित भजने वाजत होती परंतु त्यांचा आवाज बाहेर न जाईल अशी खबरदारी घेण्यात आली होती काही स्त्रिया देवासाठी फुलांचे हार गुंफत होत्या मोगरा, चमेली, सोनचाफा वगैरे फुले दिसली ही फुले इराणमधून विमानाने येतात असे समजले मंदिराचे मालक एक कच्छी भाटिया असून त्यांचीही भेट झाली त्यांना मी विचारले, "इथं मूर्ती का नाही?" ते म्हणाले, "आमच्या पूर्वजांनी शंभर सव्वाशे वर्षांपूर्वी या तसबिरी इथं आणल्या. आगबोटीच्या प्रवासात मूर्तीपेक्षा तसबिरी आणणं अधिक सोयीचं होतं तेव्हापासून तसबिरीच राहिल्या आहेत "

## माझा मुलगा तुमच्यासारखा हुषार निपजो

श्री उपाध्याय यांच्या ओळखीच्या काही व्यापाऱ्यांना व दुकानदारांना भेटलो. परंतु त्यांच्याकडून काही विशेष माहिती मिळाली नाही तुमच्याजवळ शोध घेण्याची विशिष्ट दृष्टी नसेल तर वर्षानुवर्षे तुम्ही एखाद्या ठिकाणी राहिलात तरी तुमच्या ज्ञानाची कक्षा मर्यादित व संकुचितच राहते त्या गुजराती, सिंधी, मारवाडी मंडळींना भेटल्या-नंतर माझ्या या विधानाला पुष्टीच मिळाली या आखात देशात हजारो भारतीय

कित्येक वर्षांपासून राहात असूनही त्या देशाची व तेथील लोकांची सामान्य माहितीही आपल्या देशातील लोकांना का नाही, याचेही उत्तर त्यातून मिळाले, आणि माझ्यासारख्या केवळ माहिती मिळविण्यासाठी परदेशप्रवास करणाऱ्याची आजही किती गरज आहे, याची कल्पना मला आली

येथील इंडियन असोसिएशनतर्फे एक शाळा चालविली जाते तिच्यात १२०० विद्यार्थी व ५० शिक्षक आहेत सरकारने जागा दिली असून लोकांच्या देणग्यातून शाळेची इमारत बांधलेली आहे सगळ्या शाळा गावाबाहेर मोकळ्या जागेत असल्याने तेथील वातावरण फार सुंदर वाटले या असोसिएशनचे मानद चिटणीस श्री चाचा भाटिया याना भेटायला आम्ही गेलो त्याच्यासंबंधी माहिती विचारता ते म्हणाले, "या भागातले हे आखात देश म्हणजे एकेकाळी मोत्याचं आगर होत मोत्याच्या व्यापारावरच या प्रदेशाच जीवन अवलंबून होत त्या काळची सारी भरभराट मोत्यामुळ होती आम्ही चाळीस वर्षांपूर्वी इकडून भारताला मोती पाठवीत होतो, आणि भारतातून कापड आणीत होतो परंतु पुढे जपानच्या कल्चर्ड मोत्यानी सारी जागतिक बाजारपेठ व्यापून टाकली त्याच्याशी स्वस्ताईच्या बाबतीत चढाओढ करण अशक्य झाल्यामुळ इथल मोत्याच उत्पादन (अर्थात समुद्रातून बाहेर काढण) बंद झाल मग आम्ही फक्त भारतातून कापड आयात करण्याचाच व्यवसाय चालू ठेवला"

आमचे बोलणे चालू होते त्या वेळी तेथे एक अरब जोडपे त्याच्या पाच-सहा वर्षांच्या गुटगुटीत व देखण्या मुलासह बसले होते त्यापैकी मुलाची आई उर्दूत बोलत होती व बाप अरबीत आई भारतीय होती. काळी-सावळी, असुंदरात जमा होणारी, परंतु तरतरीत व बोलकी आपल्या मुलाला भारतीय शाळेत प्रवेश मिळविण्यासाठी ते आले होते आई म्हणत होती, "मी भारतीय आहे माझ्या मुलान भारतीय वातावरणातच शिकाव अशी माझी इच्छा आहे तुमच्या शाळेवर माझाही भारतीय या नात्यान हक्क आहे" बाप सुतार होता तो म्हणत होता, "माझा मुलगा तुमच्या शाळेत शिकला तर तुमच्यासारखा शहाणा होईल अरब पोराबरोबर शिकला तर उडाणटप्पू बनेल मला ते नको आहे त्यासाठी वाटेल तेवढा खर्च करायची माझी तयारी आहे माझ्या मुलाला तुम्ही प्रवेश दिला तर मी तुमच्या शाळेच फर्निचर फुकट करून देईन"

त्याना सहानुभूतीने विचार करण्याचे आश्वासन देऊन श्री भाटिया मला म्हणाले, "खर म्हणजे आमची इमारतच आम्हाला अपुरी पडत आहे प्रतीक्षा यादीवर ३०० नाव आहेत दिल्लीच्या सेंट्रल स्कूलशी आमची शाळा संलग्न असल्यामुळ पुढील शिक्षणासाठी भारतात जाऊ इच्छिणाऱ्या भारतीय मुलाना ती सोयीची पडते शिवाय आमच्या शिक्षणाबद्दल इथल्या लोकाच्या मनात आदर आहे त्यामुळ अरब व

पाकिस्तानी लोकही आपली मुलं आमच्या शाळेत पाठवू इच्छितात परंतु भारतीय मुलांना डावलून इतरांना प्रवेश कसा द्यायचा ? तरीपण काही खास बाबतीत अपवाद करून आम्ही बिगरभारतीयानाही प्रवेश देतो खरं म्हणजे इथलं सरकार शिक्षणावर खूप खर्च करतं पुस्तकं, वह्या, गणवेश, मधल्या वेळचं खाणं, हे सारं सरकारकडून सरकारी शाळेतल्या विद्यार्थ्यांना मोफत मिळतं एवढंच नव्हे तर शाळेत जाणाऱ्या प्रत्येक मुलामागं सरकार त्याच्या आईबापाना १०० दिरहम ( २०० रुपये ) भत्ता देतं ती शिष्यवृत्तीच म्हणायची इतकं सारं सोडून लोक आमच्या शाळेत येऊ इच्छितात " भारतीय शाळेत प्रवेश मिळविण्याची बिगरभारतीय लोक खटपट करीत असल्याचे इतरत्रही मला आढळून आले

## एक संस्मरणीय खरेदी !

बाजारातून फेरफटका मारताना मी म्हणालो, " इथं रंगीत चष्मे ( सन गॉगल्स ) चांगले मिळतात असं मोहनराव शहाणे म्हणत होते उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून मी एक रंगीत चष्मा अवश्य घेतला पाहिजे, असं आमच्या सौभाग्यवतीनं वारवार बजावून सांगितलं होतं पण इथं तर कुणीच रंगीत चष्मा वापरताना दिसत नाही शिवाय हवाही अजून तशी थंडच आहे त्यामुळं चष्मा घेण्याच्या बाबतीत माझा निश्चय होत नाही तरीपण चष्मा हा घेतलाच पाहिजे नाहीतर मी माझ्या नेहमीच्या स्वभावाप्रमाणे चिक्कूपणापायी स्वत:च्या प्रकृतीची हेळसांड केली, असा आरोप माझ्यावर केल्याशिवाय सौभाग्यवती राहणार नाही " यावर श्री दातार म्हणाले, " इथं वस्तू फारच महाग आहेत त्या मानानं कुवैतला थोडी स्वस्ताई आहे तिथं तुम्ही जाणारच आहात तेव्हा तिथंच का घेत नाही चष्मा ? " खरेदीच्या बाबतीत नेहमीच कच्चरणाऱ्या माझ्या मनाला एक सबब मिळाली, आणि मी चष्म्याची खरेदी आनंदाने लांबणीवर टाकली

पण माझी विड्याची पाने संपत आली होती अजून दहा दिवस मला काढावयाचे होते म्हणून मी विड्याची पाने विकत घेण्याची इच्छा प्रदर्शित केली श्री उपाध्याय मला घेऊन एका दुकानात गेले. ते विड्याच्या पानानीच भरलेले होते मी पंचवीस बंगला पाने घेतली ही पाने पळसाच्या पानाएवढी मोठी असतात त्यामुळे एक पानाचे दोन किंवा चार भागही करता येतात. मजजवळ स्थानिक चलन नसल्यामुळ श्री दातार पानाचे पैसे देऊ लागले श्री उपाध्याय याना ते पसंत पडले नाही ते म्हणाले, " जोशीजींनी आमचा काहीच पाहुणचार घेतला नाही निदान त्यांच्या पानाचे पैसे तरी मला देऊ द्या " त्यांचे ते गोड भांडण पाहून हसणारा दुकानदार म्हणाला, " तुम्ही दोघेही पैसे देऊ नका या भारतीय पाहुण्याना माझी ही अल्पशी

भेटच समजा " त्याच्या त्या अनपेक्षित सद्‌भावनेचे मला कौतुक वाटले, आणि मी त्याचे आभार मानले

कृष्णमंदिराजवळच गुरुद्वाराही होता तो पाहावा म्हणून आम्ही गेलो तर तो बंद होता. तोही असाच एका राहत्या घराच्या दुसऱ्या मजल्यावर होता गिरजाघरे जशी स्वतंत्र इमारतींतून आहेत तशी मंदिराला व गुरुद्वाऱ्याला स्वतंत्र इमारत नाही कदाचित यापुढे त्यांच्या स्वतंत्र इमारती तयार होतील

## विमानतळ की साताराचा एस टी स्टँड

हॉटेलवर परत जाऊन भारतीय कौंसल श्री सुरेंद्र भाटिया यांचा निरोप घेण्यासाठी त्यांना फोन केला ते म्हणाले, " जाण्यापूर्वी आमच्या घरी येऊन कपभर चहा तरी घेऊन जा " खरे म्हणजे मी दिवसभराच्या दगदगीने खूप दमून गेलो होतो शिवाय रात्रीचे जेवण श्री जोशी यांच्या घरी घ्यावयाचे ठरले होते यामुळे श्री भाटिया यांच्या घरी जाण्यास मी उत्सुक नव्हतो परंतु त्यांनी श्री दातार यांना फोनवरून आग्रह करून मला घेऊन येण्याची गळ घातली या बँकवाल्याचा कौंसलावासाशी रोजचा संबंध असल्यामुळे त्यांना त्यांचा शब्द मोडवेना ते मला घेऊन त्यांच्या घरी गेले चांगले प्रशस्त व सजविलेले घर होते भजी, पकौडे, वगैरे फराळही चमचमीत होता मी मनात म्हटले, " शेवटच्या घडीला एवढं आतिथ्य करण्याऐवजी एक रात्रभर या आलिशान महालात मला मुक्काम करू दिला असता तर तुमचे मी मनःपूर्वक आभार मानले असते "

रात्रीचे जेवण श्री जोशी यांच्या घरी झाले सौ वासंती जोशी यांच्या सुगरणपणा-मुळे त्या मराठी जेवणाला जास्तच चव आली कुमार अमितच्या बाललीलांमुळे वातावरणाच्या आनंदात भर पडली होती श्री जोशी यांच्या आतिथ्यशील स्वभावा-मुळे मला थोडी शंका आली हे गृहस्थ पुण्या-मुंबईचे नसावेत ! आणि चौकशी केल्या-वर समजले की ते ग्वाल्हेरचे आहेत ! अर्थात या शंकेमुळे मी श्री दातार यांच्यावर अन्याय करीत होतो, याची कल्पना मला आली नाही वस्तुत. त्यांनी तर मोठ्या भावासारखी माझी बडदास्त ठेवली होती

जेवण झाल्यावर श्री जोशी यांच्या गाडीतून विमानतळावर गेलो जोशी कुटुंब व श्री दातार निरोप देण्यासाठी आले होते यथा काष्ठं च काष्ठं च या न्यायाने भेट-लेली ही मराठी माणसं स्नेहातिरेकामुळे माझ्या अंतःकरणात घर करून बसली होती !

दुबईला विमानतळभाडे द्यावे लागत नाही त्यामुळे दिरहम किंवा फिल्स यांना स्पर्श न करताच माझा संयुक्त अरब अमीरातींचा दौरा समाप्त झाला इतर तपास-ण्याही झटपट झाल्या पण विमानतळावरील ती प्रचंड गर्दी पाहून मी घाबरलो

मुख्यत. मल्याळी लोकानी तो गजबजून गेलेला होता भेंडी बाजाराची किंवा साता-रच्या एस टी. स्टँडची अवकळा त्याला आली होती. परंतु ही सारी गर्दी भारताला जाणाऱ्याची होती एअर इंडियाने कितीही विमाने सोडली तरी उन्हाळ्यातली ही गर्दी कमी होणार नाही, असे लोक म्हणत होते जद्दाच्या विमानासाठी मात्र आम्ही फक्त नऊ उतारू होतो ! अर्थात बहुसंख्य अरबच होते कराचीहून येणारे विमान एक तास उशिरा आले यामुळे ११-२० ला सुटणारे विमान १२-३० ला सुटले. आणि मी सुटकेचा निःश्वास टाकला !

५८२ कृ.५ ५८९७

९

# सऊदी अरबस्तान

(६ मे ते १० मे)

मी सुटकेचा निःश्वास अशासाठी सोडला की, संयुक्त अरब अमीरातीतील माझ्या कार्यक्रमाचा चांगलाच बोऱ्या वाजला होता मला फारसे काहीच करिता आले नव्हते. आपला हा फजीतवाडा तीन दिवसातच उरकला याचे समाधान मला वाटत होते 'स्थानिक आतिथ्य' याचा अर्थ कार्यक्रमाचा विचका, याची कल्पना मला आधीच आली असती तर ओमान सरकारच्या विनतीला मान देऊन हे तीन दिवस मी तेथेच काढले असते, आणि तेथून सरळ जद्दाला गेलो असतो दुबई-अबूधाबीच्या मुक्कामात आपल्याला फारसे काही मिळणार नाही, असे मला आधीपासूनच वाटत होते परतु त्या बाबतीत पत्रव्यवहार करायला भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेने अवसरच ठेवला नव्हता. अर्थात माझ्या अभ्यासाच्या दृष्टीने तेथे काही नाही, हा माझा समज खरा असल्याचे अनुभवाने सिद्ध केले, हाही एक लाभच म्हटला पाहिजे

## इस्लामी राजवटीचा पहिला हिसका!

तसे पाहिल्यास सर्वच आखात देशात इस्लाम हा सरकारी धर्म असून तेथील सर्व सरकारी सुट्या मुसलमानीच असतात परंतु सऊदी अरबस्तान हा त्या सर्वांचा दादा. तेथील इस्लामी राजवट भयकरच कट्टर व कडक. कारण उघड आहे मक्का व मदीना ही जागतिक मुसलमानाची पवित्र तीर्थक्षेत्रे या देशात असून इस्लामच्या सर-क्षणाची जबाबदारी आपल्यावर आहे, असे या देशाचे राज्यकर्ते समजतात, आणि आखात देशातील जनतेने व राज्यकर्त्यांनीही त्याचे हे पुढारीपण मान्य केले आहे सऊदी अरबस्तानाखेरीज इतर देशात आधुनिक काळाला अनुसरून सामाजिक सुधारणा करण्याची आकाक्षा अधूनमधून डोके वर काढते परतु जोपर्यंत सऊदी

शासक त्या दिशेने हालचाल करणार नाहीत तोपर्यंत आपण एखादे पाऊल उचलणे धोक्याचे ठरेल, असे त्याना वाटते कारण सामान्य जनता अजूनही परपरेच्या जोखडाखाली दबलेली आहे त्यामुळे या इतर देशानी काही सामाजिक सुधारणा केल्यास जनता उठाव करील आणि तिला सऊदी राज्यकर्त्यांचा पाठिंबा मिळेल, अशी भीतीही त्याना वाटते अर्थात या इतर देशातही राजेशाहीच असल्याने जनता अज्ञानात व परंपरागत रूढीच्या बधनात राहिली तर ते राज्यकर्त्यांच्या पथ्यावरच पडणारे आहे अर्थात नव्या जगाचे वारे कसे वाहात आहेत याची कल्पना त्यानाही आहे त्यावर उपाय म्हणून त्यानी जनतेला आपल्या समृद्धीत व वैभवात वाटा मिळेल अशी तरतूद केली आहे संपत्तीत वाटा मिळाल्यास जनता सत्तेत वाटा मागणार नाही अशी त्याची अपेक्षा आहे, आणि ती पुष्कळ अशी खरीही आहे या सर्वच देशातील जनता नव्या समृद्धीत इतकी खूष आहे की सत्तेत वाटा मागण्याची इच्छाच जणू कोणाला होत नाही राजा, सुलतान किंवा शेख यानी सारी सत्ता आपल्या हातात ठेवली असली तरी कायदेमडळे, मन्त्रिमडळे वगैरेचा देखावाही त्यानी उभा केला आहे त्यामुळे आपण लोकशाहीतच वावरत आहोत, असा आभास जनतेला होत राहतो ही राजेशाही पसंत नसलेले लोक एक टक्काही नसतील त्यानाही आपले विचार उघडपणे व्यक्त करता येत नाहीत. वृत्तपत्रावर प्रत्यक्ष बधने काहीच नाहीत. परंतु पत्रकार व लेखक याना आपल्या मर्यादा ठाऊक असल्याने त्याचे उल्लघन करण्याचे साहस ते करीत नाहीत तसे या प्रदेशात लेखक–पत्रकार फारच थोडे आहेत अरबीचे साहित्य मुख्यत. इजिप्त, जॉर्डन, लेबॅनॉन, इराक वगैरे देशातून येते पण सऊदी अरबस्तानात त्याची कडक तपासणी होते भारतीय दूतावासात येणाऱ्या साहित्याचीही तपासणी होते. बुद्धिवादाला प्रोत्साहन देणारे साहित्य देशात येणार नाही, याची खबरदारी घेतली जाते सऊदी अरबस्तानात 'वाईन' व 'सेक्स' याचा फार बाऊ केला जातो त्यामुळे अश्लील पुस्तके व चित्रे याच्या आयातीवर करडी नजर असते अर्थात अशी पुस्तके व चित्रे चोरट्या मार्गांनी फार मोठ्या प्रमाणावर देशात येतात व हातोहात विकली जातात, हा भाग वेगळा

हे सारे विचार मनात येण्याचे कारण दहरा येथे झालेली कडक तपासणी हे होय

सऊदियाचे हे विमान तसे चागले प्रशस्त होते कारण ते लॉकहीड एल् १०११ ट्रिस्टार होते (आत बसल्यानतर जगभर गाजलेले लॉकहीड प्रकरण माझ्या नजरेसमोर तरळून गेले) माझ्या मागल्या बाजूस एक लठ्ठ अरब बसला होता त्यामुळे मला खुर्ची मागे पाडता येत नव्हती, व ताठ बसावे लागत होते हवाई सुदऱ्याही अगदीच सामान्य होत्या वाटेत प्रचड विद्युद्दीपानी झगमगणारे एक शहर दिसले ते बहुधा बहरीन किंवा दोहा असावे

दहरान या विमानतळावर आमचे ट्रिस्टार विमान रात्री दीड वाजता उतरले या शहराच्या नावाचा अरबी उच्चार जहरान ' असा आहे पण विमानातून त्याच्या आगमनाची सूचना देणाऱ्या महिलामात्र त्याचा उच्चार ' दारॉ असा करीत होत्या सऊदी अरबस्तानात उत्तरेकडून प्रवेश करणाऱ्या विमानाचा हा पहिला मुक्काम म्हणून येथे उतारूंची फार कसून तपासणी केली जाते पासपोर्ट, आरोग्यपत्र, वगैरे तपासून घेण्यासाठी सर्वांनाच विमानातून खाली उतरून तळावर जावे लागते जे लोक दहरानला उतरणार असतात त्याचे सारे सामान तपासले जाते जे लोक पुढे जाणार असतात त्याच्याबरोबर असलेले हातबॅगा, पिशव्या वगैरे सामान तपासले जाते. सऊदी अरबस्तानात दारूबदी भयकर कडक असल्याने ही तपासणी मुख्यत. दारू, गाजा वगैरे मादक पदार्थांसाठी व आक्षेपार्ह साहित्यासाठी केली जाते वस्तुत: हे काम झटपट होऊन जाते पण अव्यवस्थेमुळे येथे खूपच वेळ वाया जातो प्रवाशाना योग्य त्या सूचना न दिल्या गेल्यामुळे कोठून कोठे जावयाचे तेच त्याना कळत नाही, आणि ते गोंधळून इकडे-तिकडे भटकू लागतात अखेर मेंढराप्रमाणे दुसऱ्याकडे पाहून ते एके ठिकाणी गोळा होतात सऊदी अरबस्तानच्या अनागोंदीचा मासला येथे पाहावयास मिळाला

## पाकिस्तानचा सिद्दीकी

मधल्या रिकाम्या वेळाचा काय उपयोग करावा असा विचार करीत मी इकडे–तिकडे पाहू लागलो. शेजारी एक तरुण संकोचाने बसला होता मी त्याची चौकशी सुरू केली तो सिद्दीकी नावाचा एक पाकिस्तानी विद्यार्थी असून सी ए. ( चार्टर्ड अकाउटन्सी )च्या अभ्यासासाठी कॅनडाला चालला होता जद्दाला एक दिवस थाबून उम्रा[1] करावयाचा व पुढे जावयाचे असा त्याचा कार्यक्रम होता जद्दाहून मक्का फक्त ७२ कि मी दूर असल्याने एका दिवसात उम्रा करता येतो परतु मदीना ४२४ कि. मी. दूर असल्याने तेथे एका दिवसात जाऊन येता येत नाही हजच्या वेळी मक्का व मदीना या दोन्ही ठिकाणी जावयाचे असते अर्थात बिगर हिंदूना मक्का–मदिनेच्या परिसरातही प्रवेश करता येत नाही त्यामुळे मला उम्रा करण्याचा विचारही मनात

१ मक्का-मदिनेची तीर्थयात्रा विशिष्ट दिवसामध्ये केली की तिला ' हज असे म्हणतात या काळाव्यतिरिक्त मक्केला जाऊन काब्याला प्रदक्षिणा घातली जाते या विधीला उम्रा ' असे म्हणतात आषाढी-कार्तिकी एकादशींच्या वेळी पढरपूरला जाणे म्हणजे ' वारी ' होय ते दिवस सोडून पढरपूरला गेल्यास ती साधी तीर्थयात्रा होते, तसाच हा प्रकार आहे

आणणे शक्य नव्हते चार्टर्ड अकाउंटंट होण्यासाठी कॅनडाला जाणाऱ्या तरुणाला उम्रा करण्याची इच्छा व्हावी, यावरून त्याची धर्मभावना किंवा धर्मभोळेपणा केवढा सखोल असेल याची मला कल्पना आलीच होती तरीपण धर्म आणि समाजसुधारणा यांच्या परस्परसंबंधाविषयी त्याचे काय मत आहे ते जाणून घेण्यासाठी मी त्याला अनेक प्रश्न विचारले पण त्या चर्चेत उतरण्याची त्याची तयारीच दिसली नाही तथापि त्याला बोलता करण्याचा प्रयत्न मी चालूच ठेवला मी त्याला विचारले, " तुमच्या देशात सी ए च्या शिक्षणाची चांगली सोय असताना तू कॅनडाला कशाला चालला आहेस ? " यावर त्याने सरळपणे सांगून टाकले, " परदेशी पदवी किंवा पदविका असली की माणसाची प्रतिष्ठा वाढते शिवाय माझे चुलते तिथे असल्यामुळे माझी राहण्या-जेवण्याची सोयही होणार आहे जमल तर मी कदाचित तिथेच स्थायिक होईन " मी मनात म्हणालो, " तुझ्या काकाला मुलगी असेल तर तो तुला जावई करून घेऊन तिथेच ठेवून घेईल " भारत-पाक संबंधाच्या बाबतीत तो म्हणाला, " हे दोन्ही देश संरक्षणावर इतका अफाट खर्च करतात की, विकासकार्यांना पुरेसा पैसाच उरत नाही त्यांनी जर हा लष्करी खर्च कमी केला तर दोघांचेही भले होईल " मी त्याला विचारले, " ही सदिच्छा चांगली आहे पण दोन्ही राष्ट्रांना शस्त्रास्त्रांवर इतका खर्च करायची गरजच का भासते ? " या प्रश्नाचे उत्तर त्याला देता आले नाही ते स्वाभाविकच होते. भुट्टो किंवा इंदिराजी तरी या प्रश्नाचे उत्तर देऊ शकतील काय, असा विचार माझ्या मनात येऊन गेला

अखेर एकदाचा प्रतीक्षाकाल संपला आणि आम्ही पुन विमानात जाऊन बसलो सुमारे दोन तास वाया गेले होते दहरानला उतरलेल्या लोकांत काही कोकणी मुसलमान होते ते आपसात मराठीत बोलत होते कुणा कंत्राटदाराने त्यांना मजूर म्हणून आणले होते

पहाटे सव्वातीन वाजता विमान पुढे निघाले व सुमारे पाऊण तासात ५०० कि मी दूर असलेल्या रियाझ या राजधानीच्या शहरी पोचले तेथे जाताच उकडू लागले. कारण रियाझ हे देशाच्या मध्यभागी वाळवंटी प्रदेशात आहे तेथे तासभर थांबावे लागले पण खाली उतरावे लागले नाही. तेथून पाचला निघून १ हजार कि मी चे अंतर एक तास काढून सहा वाजता आमचे विमान जद्दाच्या विमानतळावर उतरले दुबईहून जद्दाचे एकूण अंतर सुमारे २५०० कि मी ( १५०० मैल आहे ) त्यावरून लॉकहीडचा वेग आमच्या बोइंगपेक्षा जास्त असावा, असा माझा समज झाला खरेखोटे देव जाणे !

जद्दाची वेळ दुबईपेक्षा एका तासाने मागे आहे त्यामुळे तेथे पहाटेचे पाच वाजले होते परंतु चांगले फटफटले होते वेळापत्रकाप्रमाणे आमचे विमान ३–५५ लाच

पोचावयास हवे होते पण ते एक तास उशिरा पोचले होते. इतक्या भल्या पहाटे मला उतरवून घेण्यास कोणी येईल की नाही अशी काळजी मला वाटत होती पण भारतीय दूतावासाचे प्रेस ॲटॅची श्री मुहम्मद लुत्फुर्रहमान जाफरी दूतावासाची गाडी घेऊन हजर होते तो गोरागोमटा, हसतमुख व उमदा तरुण पाहून माझे मन प्रसन्न झाले सुदैवाने येथील दूतावासाजवळ ड्रायव्हर होता त्याचे नाव अब्दुल रहमान तो केरळचा आहे जकात अधिकाऱ्यानी फारसा त्रास न देता बाहेर जाऊ दिले इतर कागदपत्राची तपासणी दहरानलाच झाली होती यामुळे अपेक्षेपेक्षा लौकर सुटका झाली

विमानतळ शहरापासून जवळच आहे आता शहरापासून दूर अद्ययावत विमानतळ बाधण्याच्या योजना सुरू झाल्या आहेत त्यामुळे हा जुना विमानतळ अगदीच भिकार अवस्थेत आहे कदाचित हजच्या यात्रेकरूनी आपल्या गर्दीने त्याची अशी दुर्दशा करून टाकली असेल मस्कत, दुबई व कुवैत येथील विमानतळ याच्या मानाने कितीतरी उत्कृष्ट वाटले

शहराच्या मध्यवस्तीत असलेल्या खय्याम हॉटेलमध्ये माझी उतरण्याची सोय करण्यात आली होती म्हणून आम्ही तेथे गेलो तेव्हा हॉटेलवाला म्हणाला, " तुमच्यासाठी राखून ठेवलेली १०१ नबरची खोली तीन तासानी रिकामी होईल तोपर्यंत तुम्हाला थाबाव लागेल " वस्तुतः मी पहाटे चार वाजताच खोली ताब्यात घ्यावयाची असे हॉटेलच्या वहीत नोंदलेले होते पण हॉटेलात जागा मिळविणे हे महाकर्म कठीण असल्यामुळे हॉटेलवाल्याना गिऱ्हाइकाची मुळीच पर्वा नसते शात स्वभावाच्या जाफरींनी त्याच्याशी हुज्जत घालण्याऐवजी मला म्हटले, " आता इथ बसून तुम्ही काय करणार ! त्यापेक्षा माझ्या घरी चला तिथ आघोळ करा, न्याहारी करा आणि मग इथ या " त्याच्या स्वरातील ओलावा माझ्या अत:करणाला स्पर्श करून गेला औपचारिकतेच्या भिंती त्या ओलाव्याने ढासळून टाकल्या मी लगेच त्याचे म्हणणे मान्य केले आणि त्याच्या बरोबर सुमारे दोन मैल अतरावर असलेल्या त्याच्या बिऱ्हाडी रवाना झालो

# १०

# असे हे सऊदी अरबस्तान !

भारतीय उपखंडाप्रमाणे अरबस्तान हेही एक उपखंड किंवा द्वीपकल्प आहे ज्याप्रमाणे भारताच्या तीन बाजूंना समुद्र आहे, त्याप्रमाणे अरबस्तानाच्या तीन बाजूंनाही समुद्र आहे पूर्व व दक्षिण या दिशांना अरबी समुद्र आहे दक्षिण-पश्चिमेला तांबडा समुद्र आहे वस्तुत तो अरबी समुद्राचाच फाटा म्हणता येईल असा आहे पूर्वोत्तर दिशेला इराणचे व ओमानचे आखात आहे. या इराणच्या आखातालाच आता अरबस्तानचे आखात म्हणतात हा अरबांच्या संपत्तीचा प्रभाव ! पश्चिमोत्तर भाग भूमीचा आहे भारतीय उपखंडात भारत, पाकिस्तान, बांगला देश, नेपाळ, भूतान ( आणि अफगाणिस्तानला राग येणार नसल्यास तोही ! ) इतके देश आहेत त्याप्रमाणे या अरबी उपखंडात सऊदी अरबस्तान, ओमान, यमन, संयुक्त अरब अमीरात, कुवैत, इराक, जॉर्डन, सीरिया, लेबॅनॉन व पॅलेस्टाइन हे अरबीभाषी देश आहेत सऊदी अरबस्तानने इस्राईलचे अस्तित्वच मान्य केलेले नसल्यामुळे त्या देशाच्या प्रकाशनांतील नकाशात ' इस्राईल ' हा देशच नसतो त्याऐवजी ते ' पॅलेस्टाईन ' किंवा फलस्तीन ' हा शब्द इस्रायलच्या जागी छापतात ! एखाद्या देशाचे अस्तित्व नाकारण्याची ही नामी युक्ती मला एकदम पसंत पडली या देशात क्षेत्रफळाने सर्वांत मोठा असा देश म्हणजे सऊदी अरबस्तान त्याचे क्षेत्रफळ १० लाख चौरस मैल किंवा सुमारे २२ लाख चौरस कि मी आहे ( भारतातील मध्यप्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान, उत्तर प्रदेश, आंध्र, जम्मू व काश्मीर, कर्नाटक व गुजरात एवढी राज्ये त्यात मावतील ! ) मात्र त्याची लोकसंख्या जेमतेम ८० लाखाच्या आसपास आहे ( तर तेवढ्याच क्षेत्रफळाच्या भारतीय राज्यांची लोकसंख्या ३० कोटींच्या आसपास आहे ! ) याचे कारण एवढेच की या देशाचा अधिकांश भाग वाळवंटांनी व्यापलेला आहे

आधुनिक सऊदी अरबस्तानाचा जन्म विसाव्या शतकाच्या प्रारंभी झालेला असून 'अल मम्लका अल अरबीया अल सऊदिया' (किंवा अल मम्लकतुल अरबीयतुल सऊदिया) म्हणजेच 'किंग्डम ऑफ सऊदी अरेबिया' हे त्याचे नामकरण गुरुवार ता. २३ सप्टेंबर १९३२ रोजी राजे अब्दुल अजीज अल सऊद यांनी केले. त्यापूर्वी या देशाला सामान्यतः 'अरबस्तान' किंवा नज्द व त्याच्या ताब्यातील प्रदेशांचे राज्य (किंग्डम ऑफ नज्द ॲंड इट्स डिपेंडन्सीज) असे म्हणत असत. खरे म्हणजे अरबस्तानच्या वाळवंटातील टोळीवाल्यांची ती राज्ये होती. मक्का व मदीना या तीर्थ-क्षेत्रांचा समावेश असलेला हिजाज हा तांबड्या समुद्राच्या किनाऱ्यावरील प्रदेशच बाहेरच्या लोकांना माहीत होता. कारण जगातील मुसलमान तेथे हज करण्यास जात असत. त्यामुळे हिजाज म्हणजेच अरबस्तान अशी काहींशी लोकांची समजूत होती.

इ. स. १९०१ च्या अखेरीस कुवैतहून अब्दुल अजीज अल सऊद हा निधड्या छातीचा तरुण आपल्या चाळीस सहकाऱ्यांसह रियाझ शहरावर चालून गेला आणि १५ जानेवारी १९०२ रोजी त्याने ते शहर जिंकून घेतले. त्यानंतर त्याने भटक्या टोळीवाल्यांना एकत्र आणून संघटित केले, आणि सभोवतालचे प्रदेश जिंकून नज्दचे राज्य निर्माण केले. यालाच त्याने आपल्या घराण्याचे 'सऊदी' हे नाव बहाल केले.

राजे अब्दुल अजीज यांचे चिरंजीव राजे फैसल (जन्म : १९०६) यांनी वडिलांच्या हाताखाली लढाईचे व राज्यकारभाराचे शिक्षण घेऊन जबाबदारीची कामे केली आणि २ नोव्हेंबर १९६४ रोजी ते सर्वसंमतीने सऊदी अरबस्तानचे राजे बनले. ता. २५ मार्च १९७५ रोजी त्यांच्या पुतण्याने रियाझ येथे त्यांचा खून केला तेव्हा त्यांचे सावत्रबंधू खालिद इब्न अब्दुल अजीज हे गादीवर आले. आता तेच या देशाचे राजे आहेत.

## खनिज तेलाने आणलेली समृद्धी

इस्लामी धर्मक्षेत्रांचा संरक्षक म्हणून सऊदी अरबस्तानचे महत्त्व पुरातन काळा-पासून होतेच. परंतु ते फक्त मुसलमानांपुरते मर्यादित होते. इतर जगाच्या दृष्टीने तो एक मागासलेला देशच होता. परंतु १९३४ साली तेथे तेल सापडले, आणि १९३९ साली दररोज १०,७७८ बॅरल खनिज तेल निघू लागले. त्याचे प्रमाण वाढत-वाढत १९७२ साली वार्षिक सुमारे २ अब्ज बॅरल इतके तेल निघाले. अमेरिका व रशिया यांच्यानंतर खनिज तेलाच्या उत्पादनात सऊदी अरबस्तानचा क्रमांक लागतो. या तेलाने या देशाला समृद्धीच्या शिखरावर नेऊन पोचविले. १९७३ च्या ऑक्टोबर-मधील अरब-इस्राईल युद्धानंतर अरबांनी तेलाच्या किंमती तिपटीने वाढविल्या आणि तेल उत्पादन करणाऱ्या देशांचे उखळच पांढरे झाले. तेलाने मिळवून दिलेल्या या समृद्धीचे दर्शन बहुतेक सर्वच आखात देशांत घडते. परंतु सऊदी अरबस्तानची

खनिज तेलाची संपत्ती विपुल असल्याने तेथे ती समृद्धी विशेषच डोळ्यात भरते

## धर्माधिष्ठित राज्य

सऊदी अरबस्तान हे धर्माधिष्ठित राज्य आहे, ही गोष्ट त्याच्या राष्ट्रध्वजावरूनच लक्षात येते हिरव्या रंगाच्या ध्वजावर 'ला इलह इल्लिल्लह मुहम्मद उर्रसूलल्लह' (एका परमेश्वराशिवाय दुसरा ईश्वर नाही, आणि मुहम्मद त्याचा प्रेषित आहे) हा कलिमा पांढऱ्या रंगाने लिहिलेला असतो व त्याच्या खाली नंगी तलवारही पांढऱ्या रंगातच चित्रित केलेली असते कोणालाही इस्लामची दीक्षा घ्यावयाची असल्यास हा कलिमा (किंवा कलमा) उच्चारावा लागतो कारण ते इस्लामचे ब्रीदवाक्य आहे तलवार हे शौर्याचे प्रतीक समजता येईल काही लोक इस्लामच्या प्रचाराचे साधन म्हणूनही तिच्याकडे बोट दाखवू शकतील इतर देशामध्ये दुखवटा व्यक्त करण्यासाठी राष्ट्रध्वज अर्ध्यावर खाली उतरविण्याची प्रथा आहे, पण सऊदी अरबस्तानात त्याचा ध्वज केव्हाही खाली उतरविला जात नाही या देशाच्या राजचिन्हात दोन तलवारी एकमेकींना छेदण्याच्या स्थितीत (crossed swords) असून त्याच्या मधोमध खजुराचे झाड आहे यावरून या देशाची तलवारीवर बरीच भिस्त असावी असा ग्रह होतो

या देशाची वेगळी अशी राज्यघटना नाही शरीअत म्हणजे इस्लामी धर्मशास्त्र हीच त्याची राज्यघटना आहे मुख्यत: कुराण व हदीस (पैगंबराची वचने) यावर ही शरीअत आधारलेली आहे (शरीअतचा उच्चार आपण शरियत असा करतो तर अरबीमध्ये तो शरीआ किंवा शरिया असा होतो ) त्यामुळे वेगवेगळ्या गुन्ह्याना ज्या शिक्षा कुराणात सांगितल्या आहेत त्या आजही सऊदी अरबस्तानात दिल्या जातात उदाहरणार्थ, चोरी करणाऱ्याचा हात तोडला जातो, व्यभिचार करणाऱ्याला संगसार केले जाते (दगडानी ठेचून मारले जाते), खून करणाऱ्याची गर्दन उडविली जाते (राजे फैसल याचा खून करणारा राजपुत्र फैसल इब्न सआद इब्न अब्दुल अजीज हा राजघराण्यातील असल्यामुळे त्याची गर्दन सोन्याच्या तलवारीने उडविण्यात आली, असे मी ऐकले !)

पोषाख, आचरण, वगैरे बाबतींतील नियम कुराणात सांगितले आहेत त्या नियमाचे पालन येथे सक्तीने करविले जाते विशेषत. स्त्रियाच्या बाबतीतील नियम फार कडक आहेत स्थानिक स्त्रियाना बुरखा घेतल्याखेरीज घराबाहेर पडता येत नाही परदेशी स्त्रियानाही पोषाखाच्या बाबतीत काही बंधने पाळावी लागतात उदाहरणार्थ, युरोप–अमेरिकी स्त्रियाना मिनी स्कर्ट घालून घराबाहेर पडता येत नाही त्याना मॅक्सी घालावी लागते भारतीय स्त्रियाना पोट व हात उघडे टाकणाऱ्या चोळ्या–ब्लाउझ घालून

बाहेर वावरता येत नाही पोट व हात झाकणारे कपडेच वापरावे लागतात स्त्रीपुरुषानी एकत्र येणे इस्लामला मान्य आहे किंवा नाही, हा मुद्दा विवादास्पद आहे सऊदी अरबस्तानात मात्र स्त्री-पुरुषाना जाहीरपणे एकत्र येण्यास बदी आहे त्यामुळे तेथे नाटक–सिनेमाना स्थान नाही अर्थातच नाट्यगृहे व चित्रपटगृहे याचा तेथे पूर्ण अभाव आहे मात्र जागजागी लपूनछपून सिनेमा पाहण्याची सोय आहे, आणि तिकडे पोलिस कानाडोळा करतात, असेही ऐकण्यात आले शृगार व प्रणय वर्णन करणारी पुस्तके आणि तसली चित्रे देशात येणार नाहीत, याची विशेष खबरदारी घेतली जाते त्यामुळे लैंगिक साहित्य व अश्लील चित्रे याचा प्रचड चोरटा बाजार तेथे चालू असतो, असे म्हणतात लोकशाही, समाजवाद, साम्यवाद या साऱ्याच कल्पना इस्लामशी विसगत समजण्यात आल्या आहेत त्यामुळे असल्या कल्पनाचा प्रसार करणाऱ्या साहित्यावरही कडक निर्बंध घालण्यात आले आहेत स्त्री-पुरुषाच्या संयुक्त नाचगाण्याना बदी आपण समजू शकतो, परतु सर्कशीमध्ये बायका काम करतात म्हणून सर्कशींनाही बदी आहे, ही गोष्ट आपल्याला चमत्कारिक वाटते एका भारतीय सर्कशीला सऊदी अरबस्तानने निमत्रण दिले मात्र एक अट घातली बायकाना आणता कामा नये, फक्त पुरुष व जनावरे यानाच आणावे सर्कसवाले म्हणाले, “ आमच्या या मुलींना आम्ही कुठ ठेवणार ? ” आणि त्यानी ते निमत्रण साभार नाकारले टेलिव्हिजनवर लोकनृत्ये पाहावयास मिळतात परतु त्यातही स्त्रिया व पुरुष एकत्र नाचू गाऊ शकत नाहीत सगीतावर बदी कशी काय घातलेली नाही, याचे आश्चर्य वाटते परतु सऊदी रेडिओवरील सगीत अगदी सामान्य दर्जाचे असते, त्यामुळे बरेचसे लोक इतर अरब देशाच्या आकाशवाणीवरील संगीत ऐकतात एकदा तर एक टॅक्सीवाला इस्राईलच्या रेडियोवरील सगीत ऐकत असलेला मी पाहिला ! अर्थात ते केंद्र तेलअव्हीव्ह असल्याचे माझ्याबरोबर असलेल्या मित्राने मला सागितले तेव्हाच मला कळले मला तर सगळेच अरबी संगीत आपल्याकडील लोकसंगीता-सारखेच वाटले चित्रकलेची तर फारच कुचबणा होते मानवी शरीराचे चित्रण इस्लाममध्ये निषिद्ध असल्याने चित्रकलेचा विकास जणू अवरुद्ध झाला आहे

## धर्मबंधनातून दभ

धर्माची बधने नैतिक असावीत, आध्यात्मिक असावीत त्याचा स्वीकार अंत:करणा-तून आलेल्या प्रेरणेने झालेला असला पाहिजे याच्या उलट जेव्हा धर्मसत्ता अथवा राजसत्ता बलपूर्वक ही बधने लादते व त्याची अमलबजावणी सक्तीने करवून घेते तेव्हा समाजात दभ बोकाळतो अशा दभाचे जे दर्शन सऊदी अरबस्तानात होते त्याने विचारवताचे डोळे उघडल्याशिवाय राहात नाहीत दंडुकेशाहीच्या जोरावर जनतेत

शिस्त निर्माण करू इच्छिणाऱ्या हुकूमशहानाही यापासून बोध घेता येईल परंतु हुकूमशाही ही नेहमीच अदूरदर्शी किंवा ऱ्हस्वदृष्टी असल्याने तिला ही गोष्ट प्रत्यक्ष डोळ्यानी पाहूनही दिसणार नाही ही बाब वेगळी

याचे एक उदाहरण म्हणून दारूबंदी घेता येईल इस्लाममध्ये मद्यपान निषिद्ध आहे त्यामुळे सऊदी अरबस्तानात दारू बनविणे, बाहेरून आणणे, विकणे व पिणे या सर्वांवरच कडक बंदी आहे परंतु दारूचा चोरटा व्यापार तेथे सर्रास चालतो परदेशी दारू तर येतेच, परंतु खजुरापासून बनविली जाणारी स्थानिक हातभट्टीची दारूही मुबलक मिळते, असे समजले मात्र दारू पिऊन झिंगणारे लोक येथे रस्त्यावर दिसत नाहीत, कारण अशा दारुड्याना येथे फार कडक शिक्षा होते दारू पिण्याचे प्रमाण उच्च पदस्थामध्ये अधिक आहे, असेही म्हणतात

स्त्रियाच्या बाबतीतही असाच दंभ आढळतो वस्तुत इस्लामने स्त्रियावर घातलेली बंधने ही तिच्या संरक्षणासाठी होती परंतु तीच आता तिच्या गुलामगिरीला कारणीभूत झाली आहेत स्त्री ही शोभेची व उपभोग्य वस्तू बनली आहे स्त्रियाचा व्यापार ही तर सर्वांना माहीत असलेली वस्तुस्थिती आहे चार बायकाची परवानगी असूनही पुरुषाचे तेवढ्यावर समाधान होत नाही त्याना रोज नवा माल हवा असतो व पैसा भरपूर असल्याने तो मिळविण्याची शक्यताही असते त्यातून ही दुर्दैवी परिस्थिती निर्माण झाली आहे मुलींना व स्त्रियाना शिक्षण देण्यासाठी सरकार पुष्कळ पैसा खर्च करीत आहे पण या मुलींना नतर नोकरी करता येत नाही अथवा समाजात मिसळताही येत नाही लग्न झाल्यावर तर तिची गुलामी जास्तच दृढ होते दूतावासातील एका अधिकाऱ्यानी एक गमतीदार गोष्ट सांगितली- ते म्हणाले, " आम्ही जेव्हा पार्टी किंवा मेजवानी देतो, तेव्हा इथले पुरुष बायकाना घेऊन येतात पण जेव्हा आम्ही त्याच्याकडे जातो, तेव्हा त्याच्या बायका पडद्यात दडून बसतात असे हे डबल स्टँडर्ड आहे ! "

## शेतीवरील वाढता खर्च

सामाजिक व राजकीय जीवनातील हा मागासलेपणा किंवा प्रतिगामीपणा वगळल्यास सऊदी अरबस्तानच्या विकासाकडे पाहिल्यास पुष्कळच उज्ज्वल चित्र आपल्याला दिसते आपल्या जनतेच्या भौतिक उन्नतीसाठी सऊदी सरकार खूपच प्रयत्न करीत आहे तेलापासून मिळणारे दरसाल २५ अब्ज डॉलरचे उत्पन्न ज्या वेळी घटलेले असेल त्या वेळी आपल्याला इतरापुढे हात पसरावा लागू नये या दृष्टीने सरकारची खटपट चालू आहे तेलाच्या किमती वाढल्यामुळे पाश्चात्त्य देशाकडून येणारी मागणी घटल्याने सऊदी अरबस्तानला आपले तेल-उत्पादन आताच कमी करावे लागले

आहे १९७४ साली जो सऊदी अरबस्तान रोज ८१ लाख बॅरल तेलाचे उत्पादन करीत होता त्यालाच १९७५ च्या पहिल्या सहामाहीत रोज ६६ लाख बॅरलवर आपले तेल-उत्पादन आणावे लागले यावरून तेलाचा पैसा बेभरवशाचा असल्याची जाणीव त्यालाही झाली असली पाहिजे पाश्चात्त्य देशानी तेलाला पर्यायी ऊर्जा निर्माण करण्यात यश मिळविले तर हा धोका आणखी जवळ येईल. म्हणून तत्पूर्वीच आपल्या देशाला जास्तीत जास्त बाबतीत स्वावलबी बनविण्याचे सऊदी सरकारने ठरविले आहे त्या दिशेने त्याने टाकलेले पाऊल म्हणून सीमेंट व वीज उत्पादनातील त्याच्या प्रगतीकडे पाहता येईल १९७३ साली तेथे सुमारे १० लाख टन सीमेंट तयार झाले होते आणि सुमारे १ कोटी किलोवॅट विजेचे उत्पादन त्याने केले होते परतु सऊदी सरकारचा मुख्य भर शेतीच्या उत्पादनावर आहे कारण जगात शेवटी अन्नच निर्णायक ठरणार आहे म्हणून सऊदी सरकारने आपल्या पचवार्षिक विकास योजनेत शेतीच्या विकासा-वर सुमारे १५ अब्ज डॉलर खर्च करण्याची तरतूद केली आहे त्यापैकी सुमारे सव्वाअब्ज डॉलर पूर्वेकडील वाळवटाचे शेतीत रूपातर करण्यासाठी आहेत सऊदी अरबस्तानात सध्या फक्त १४ लाख एकर जमीन शेतीखाली आहे. ती वाढवीत वाढवीत १ कोटी १० लाख हेक्टर ( सुमारे अडीच कोटी एकर ) वाळवटाचे शेत-जमिनीत रूपातर करण्याचे प्रचड उद्दिष्ट या देशाने आपल्यासमोर ठेवले आहे हे उद्दिष्ट तावडतोब साध्य होणार नाही, त्याला किमान पन्नास वर्षे लागतील, याची त्याला पूर्ण कल्पना आहे परतु त्या दिशेने मार्गक्रमण चालू झाले आहे, यात शका नाही १९६३ ६४ साली शेती व पाणीपुरवठा यासाठी सऊदी सरकारने सुमारे साडे-तीन कोटी रियाल ( सात कोटी रुपये ) खर्च केले होते तीच रक्कम १९७३-७४ साली १ अब्ज रियालाहून अधिक झाली होती शेतीसाठी पाण्याची तरतूद करण्याचे जे प्रयत्न सऊदी सरकारने चालविले आहेत ते विशेष उल्लेखनीय आहेत कूपनलिका-द्वारे भूगर्भातील पाणी वर काढण्याचे प्रकल्प सर्वच देशानी हाती घेतले आहेत वाळवटाखाली पाणीही भरपूर असल्याचे आढळून आले आहे परतु सऊदी अरब-स्तानाने पावसाचे पाणी अडविण्याचा जो विक्रम केला आहे तो खरोखरीच कौतुकास्पद आहे आजपर्यंत दऱ्याखोऱ्यात पडणारे पावसाचे पाणी वेगाने समुद्राकडे वाहून जात असे त्या पाण्याच्या सपाट्यात उभी शेतेही वाहून जात आता या पाण्याला बाध घालून मोठमोठी जलाशये तयार करण्यात आली आहेत वादी जयझान धरण, वादी निमार धरण, दिरीया खोऱ्यातील तीन धरणे, वादी अग्रामा धरण वादी आभा धरण वगैरे अनेक धरणे बाधून झाली आहेत यापैकी जयझान खोऱ्यातील धरणात ७ कोटी घन मीटर पाणी राहू शकते. त्यासाठी साडेचार कोटी रियाल खर्च झाला आहे, तर आभा धरणाला अडीच कोटी रियाल खर्च झाले आहेत शेतकऱ्याना कर्ज जमिनी व

रासायनिक खते देण्याचीही सोय करण्यात आली आहे

नवीन सुधारलेली व संकरित बियाणे व रासायनिक खते वापरून गहू, बार्ली, तांदूळ वगैरे धान्ये, फळे व भाज्या याचे उत्पादन सध्याच मोठ्या प्रमाणावर वाढवण्यात आलें आहे

दूध, मास व मासळी याच्या उत्पादनासाठीही आधुनिक तंत्रे व यंत्रे याचा पद्धतशीर वापर सुरू झाला आहे

## समाजकल्याणावरील खर्च

शिक्षण व समाजकल्याण याच्याकडेही सऊदी सरकार विशेष आस्थेने लक्ष देत आहे १९७३ साली शिक्षणावर १ अब्ज ६० कोटी रियाल तर सार्वजनिक आरोग्यावर ५० कोटी रियाल व समाजकल्याणावर ३ अब्ज रियाल खर्च करण्यात आले शिक्षणामध्ये तत्रज्ञान, तैलविज्ञान याच्यावर एकीकडे भर दिला जातो तर दुसरीकडे धार्मिक शिक्षणासाठी भरपूर पैसा खर्च केला जातो मदीना येथे इस्लामी विद्यापीठच आहे १९६१ साली सुरू झालेल्या या विद्यापीठाचा वार्षिक खर्च त्या वर्षी फक्त ३० लाख रियाल होता, तो १९७३–७४ साली अडीच कोटी रियाल झाला या विद्यापीठात ७२ वेगवेगळ्या देशातून आलेले १७३५ विद्यार्थी उच्च शिक्षण घेतात. त्याच्यापैकी अनेकाना चागल्या शिष्यवृत्त्याही दिल्या जातात याखेरीज रियाझ व जद्दा विद्यापीठातही धर्मशिक्षणाची सोय करण्यात आली आहे

असे आहे हे सऊदी अरबस्तान !

११

# जद्दात भेटलेली देवमाणसे

राजदूताना भेटण्याचा कार्यक्रम हा काहीसा औपचारिक असला तरी तो अत्यावश्यक असतो मस्कतला श्री निर्मल जीत सिंग यानी विशेष आस्था दाखविल्यामुळे त्याच्या भेटीत औपचारिकता जाणवली नाही जणू दोन समवयस्क व समान पातळीवरील मित्रानी एकमेकाना भेटावे, तितक्या सहजपणे आमच्या गाठीभेटी झाल्या होत्या इतरत्र मात्र औपचारिकतेची लक्ष्मणरेषा कायम राहिली

जद्दा येथे पहिल्याच दिवशी राजदूत श्री मजूर आलम कुरेशी याना मी त्याच्या घरी जाऊन भेटलो ते म्हातारे, निवृत्त आय् सी एस् अधिकारी आहेत. पण सौजन्यशील वाटले. ते नुकतेच तीन आठवड्यापूर्वी तेथे आले असल्यामुळे त्याना अजून एकूण परिस्थितीच्या खाचाखोचा कळलेल्या नव्हत्या शिवाय त्याच्या आगमनापूर्वी या दूतावासाकडे भारत सरकारचे काहीसे दुर्लक्ष झाल्याने बराच गोंधळ माजला होता. ती मागली खरकटी काढण्यातच त्याची सगळी शक्ती खर्च होणार होती

तरीपण तेथे गेल्या-गेल्या त्याना सऊदी अरबस्तानातील नव्या शेतीयोजना पाहण्यास जाण्याची संधी मिळाली होती. शेती, पाणीपुरवठा, पशुपालन वगैरे क्षेत्रात त्या वाळवटी देशाने अल्प मुदतीत केलेली प्रगती पाहून ते प्रभावित झाले होते ते म्हणाले, " भारताशी सऊदी अरबस्तानचे संबध आतापर्यंत फारसे चागले नव्हते, ते आता बरेच सुधारले आहेत तरीपण इथल्या लोकाना आणि सरकारला भारतीयापेक्षा पाकिस्तानी अधिक जवळचे वाटतात त्यामुळ या देशात भारतीयाची संख्या फार कमी आहे भारतीय व्यापारी तर हाताच्या बोटावर मोजता येतील एवढेच आहेत इथल वातावरण मुसलमानाना अधिक अनुकूल असल्यान भारतातून हिंदूंपेक्षा मुसलमानच अधिक येणार हे उघड आहे सीमेंट, लोखड, मास, शेळ्या-मेंढ्या वगैरे

भारतीय मालाला वाढती मागणी येऊ लागली आहे त्यातून आर्थिक संबंध सुधारण्याची जास्त शक्यता निर्माण झाली आहे इथल्या राजेसाहेबांना भारतभेटीचं निमंत्रण आपल्या राष्ट्रपतींनी माजी राजेसाहेबांच्या दफनविधीच्या वेळी समक्ष दिलं होतं त्याचं स्मरण मी माझी अधिकारपत्रं सादर करताना दिलं तरीपण सध्या तरी ते भारताला भेट देतील असं दिसत नाही ते भारताला जाऊन आले तर आपले संबंध फार लौकर सुधारतील आपल्या पंतप्रधान इथं आल्या तर त्याचाही फार चांगला परिणाम होईल पण त्यासाठी शिष्टाचाराचे सारे औपचारिक विधी पुरे झाले पाहिजेत त्याला थोडा वेळ लागेल "

## जाफरी बावनकशी सोने

माणसाचे नाव आणि त्याचे गुण याचा मेळ आपल्याला क्वचितच पाहायला मिळतो 'खरे' हे आडनाव लावणारे पुष्कळदा खोटारडे असतात आणि बहादुरसिंग भेकड असतो जाफरी यांच्याशी बोलताना त्यांच्या कुटुंबाची जी हकीगत समजली ती ऐकून 'जाफरी' हे अरबी नाव त्यांनी सार्थ केले असल्याची खात्री पटली 'जअफरी' म्हणजे शुद्ध, शभर नंबरी किंवा बावनकशी सोने त्यांच्या घराण्यासारखी शुद्ध, शभर नंबरी घराणी क्वचितच पाहायला मिळतात श्री जाफरी आपल्या मुलांशी बोलताना त्यांना 'आप' म्हणून संबोधतात स्वतःच्या लहान मुलांनाही अहो 'जाहो' म्हणण्याची प्रथा जुन्या खानदानी सरदार घराण्यात होती, हे खरे, परंतु आजच्या काळात सुशिक्षित, पांढरपेशा घरातही ती अजून टिकून असेल, याची मला कल्पना नव्हती मी जाफरींना विचारले, "तुम्ही मुलांना अहो–जाहो का म्हणता ?"

"मी तर त्यांना 'तुम'च म्हणतो ! मला ते जास्त जवळचं वाटतं " जाफरी हसून म्हणाले, "आपले आपले संस्कार ! आमच्या घरात सर्वांनीच एकमेकांना 'अहो' म्हणायची प्रथा आहे फक्त बरोबरची मंडळी एकमेकांना 'तुम' म्हणतात नवराही बायकोला 'आप'च म्हणतो. घरच्या नोकरांनाही आम्ही 'दादा' (आजोबा) म्हणत असू त्यांचा मान ठेवीत असू इतकंच काय पण गावातल्या सगळ्या वडील-धाऱ्या माणसांना 'आप' म्हटलं पाहिजे, अशी आमच्या घराण्याची शिस्त आहे अगदी आमच्या रयतांना, कुळांनाही आम्ही 'आप' म्हणत असू "

"तुमची कुळंही होती ?" मी विचारले

"हो ना ! चार गावांत आमची जमीनदारी होती जेव्हा जमीनदारी निर्मूलनाचा कायदा पास झाला तेव्हा आमच्या कुळांनी आपापल्या ताब्यातील जमिनींचे राजीनामे टपालानं आमच्या आजोबांकडे पाठवून दिले इतकं त्यांचं आजोबांवर प्रेम आणि आमच्यावर विश्वास पण आजोबांनी आणि वडिलांनी ते राजीनामे न स्वीकारता त्या

जमिनी कायद्याप्रमाण कुळाच्या मालकीच्या करून दिल्या ”

“ तुमचे आजोबा खरोखरीच देवमाणूस असले पाहिजेत ” मी म्हणालो.

“ खर आहे तुमच म्हणण असा पुरुष माझ्याही पाहण्यात अन्यत्र आला नाही. आम्ही अलाहाबादजवळचे राहणारे आमच्या घरी सदैव पाहुण्याची वर्दळ असे रात्री अपरात्रीही अनोळखी पाहुणे येत आणि त्याना स्वयंपाक करून वाढलं जाई. गावात कुणीही परस्थ आला की गावचे लोक त्याला आमच घर दाखवीत आजोबाना त्यात भूषणच वाटे ” जाफरी म्हणाले

“ खूप कनवाळू असतील नाही ते ? ” मी विचारले

“ कनवाळूही होते आणि आपल्या तत्त्वाच्या बाबतीत वज्रापेक्षा कठोरही बनत. आमच्या घरी शिकारीची परंपरा होती घरात बदुका होत्या पण त्याचा उपयोग निरागस पाखराना मारण्यासाठी केला जाऊ नये, असा आजोबाचा कटाक्ष असे माणसाना व गुराना त्रास देणाऱ्या हिंस्र पशूचा बदोबस्त करण्यासाठीच बदूक वापरावी अस ते सागत ते म्हणायचे, ‘ या बदुकीन तुम्ही गरीब पक्षी मारलेत तर तो भयकर क्रूरपणा ठरेल त्या पक्ष्याचा जोडीदार किंवा पिल तिकडे शोक करतील आणि तुम्हाला शिव्याशाप देतील ज्या पक्ष्याला नात्यागोत्याच कुणीही नसेल त्याला तुम्ही मारा पण हे कसं कळणार तुम्हाला ? म्हणून पक्षी न मारणच बरं ! अन् हे असले छोटे पक्षी मारून तुमचा फायदा तरी काय होणार ? त्याच्यापासून अदपाव मास तरी मिळेल काय ? त्यान तुमच पोट भरेल काय ? मग ही नाहक हिंसा कशासाठी ? ’ हा झाला त्याचा कनवाळूपणा पण तत्त्वाच्या बाबतीत ते फार प्रखर होते

“ फाळणी झाल्यानतर माझा थोरला भाऊ पाकिस्तानला जाण्याचा विचार करू लागला तेव्हा माझ्या आजोबानी त्याला सागितल, ‘ तू पाकिस्तानात गेलास तर कब्रस्तानात गेलास अस आम्ही समजू तुझ्याशी कसलाही सबध आम्ही ठेवणार नाही.’ आणि ही काही नुसती शाब्दिक धमकी नव्हती पाकिस्तानला गेलेल्याच नावच आजोबानी टाकल अर्थात माझे वडिलही माझ्या आजोबाच्या विचाराशी पूर्ण सहमत होते त्यामुळ आमच्या घराण्यातल कुणीही पाकिस्तानला गेल नाही माझ्या पत्नीच्या घराण्यातलही कुणी तिकडे गेलेल नाही एवढ मानसिक सामर्थ्य असल्यामुळ फाळणीच्या ऐन धामधुमीतही आम्हाला कधी असुरक्षित वाटल नाही आम्ही मुल आमच्या खेडेगावातून २ मैल दूर असलेल्या शहरात शाळेला जात असू पण आम्हाला मुसलमान म्हणून कधीच भीती वाटली नाही ” श्री जाफरी यानी सागितले

“ इतर मुसलमानापेक्षा तुम्ही जरा वेगळे वाटता ” मी म्हणालो

“ असेलही किंवा आमच्यासारख्या मुस्लिम घराण्याच्या संपर्कात न आल्यामुळ तुम्हाला तस वाटत असेल तस थोड वेगळेपण आमच्यात आहेही. मुसलमानामध्ये

उष्ट्याचा विधिनिषेध पाळला जात नाही पण आमच्या घरी आम्ही लहान मुलाचा उष्टा पेलाही धुतल्याशिवाय वापरीत नाही तसे आम्ही मुसलमानामधले ब्राह्मणच आहोत म्हणा !" असे म्हणून ते मिस्किलपणे हसले. बहुधा तो टोमणा माझ्या आहार-विहारातील सोवळेपणाला असावा !

या खानदानीपणाचा दृश्य परिणाम श्री जाफरी याच्या दैनदिन जीवनातही पाहावयास मिळतो श्री पुरोहित नावाचे एक भूदान कार्यकर्ते काही दिवसापूर्वी जद्दाला गेले असता सुमारे तीन आठवडे श्री जाफरी याच्या घरी राहिले होते त्या मुदतीत त्यानी आपल्या घरी मास शिजवलेही नाही मला त्याचा हा त्याग फार मोठा वाटला. म्हणून मी त्याना विचारले, " मासाशिवाय तुम्ही इतके दिवस कसे राहिलात ? "

" तुम्हाला वीस-एकवीस दिवस हा फार मोठा काळ वाटतो ? अहो, मी अरबीच्या उच्च शिक्षणासाठी कैरोच्या विद्यापीठात राहात होतो तेव्हा माझ्या खोलीत चौधरी नावाचे एक हिंदू विद्यार्थी भागीदार होते ते शाकाहारी होते त्याना त्रास होऊ नये म्हणून मी दोन वर्षं मासाहार केला नाही " श्री जाफरी यानी सागितले.

अशा प्रकारच्या त्यागी, तत्त्वनिष्ठ जीवनातून माणसामध्ये एक प्रकारची तेजस्विता निर्माण होते श्री जाफरी यानी आपल्या वडिलाची एक मजेदार आठवण सागितली. तिच्यातून त्याची ही तेजस्विता दिसून येते नेहरू घराण्याशी जाफरी घराण्याचे स्नेहाचे संबध होते शिवाय श्री जाफरी याच्या वडिलानी स्वतःला ग्रामसेवेस वाहून घेतले होते त्यामुळे पडित जवाहरलाल नेहरू याच्याशी त्याचा घनिष्ठ सबध होता एकदा पडितजींच्या हातात त्याना परदेशी सिगारेट दिसली यावर ते पडितजींना म्हणाले " तुम्हीच जर परदेशी सिगारेट ओढू लागलात तर जनतेचा तुमच्या शब्दावर विश्वास कसा बसेल ? आणि ती स्वातत्र्यलढ्याला पाठिंबा कशी देईल ? " असा हा राम-शास्त्री बाणा !

## अरबीची हेळसांड नको

परदेशी भाषाच्या, विशेषतः अरबीच्या बाबतीत भारतामध्ये जी एक प्रकारची उदासीनता दिसते ती अंती त्रासदायक ठरेल. याबाबतीत श्री जाफरी म्हणाले, " गेल्या तीस वर्षात २०–२५ अरब देशासाठी फक्त ४–५ अरबीचे जाणकार आमच्या मत्रालयान तयार केले यावरून या भाषेविषयी आम्ही किती बेफिकीर आहोत याची कल्पना येईल आतापर्यंत इग्रजीच वर्चस्व या देशात असल्यामुळ कस–बसं भागल पण आता त्यानी इग्रजीच्या जागी अरबी आणण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणावर सुरू केला आहे तेव्हा यापुढ इग्रजीच्या साह्यान वेळ मारून नेता येणार नाही शिवाय जे अरबीचे जाणकार आहेत, त्याना साभाळून ठेवायचाही खास प्रयत्न झाला पाहिजे

इथलच एक उदाहरण सागतो अरबीचा एक जाणकार इथ होता पण त्याला खालची जागा देण्यात आली म्हणून तो इथली नोकरी सोडून दुसरीकडे गेला त्याला इथं १२०० रियाल ( २४०० रुपये ) मिळत होते आता तो दरमहा ४ हजार रियाल ( आठ हजार रुपये ) मिळवतो माणसं काही नुसत्या पैशान टिकवता येत नाहीत. त्याना प्रतिष्ठाही दिली पाहिजे त्याच्या सुखसोयींचाही विचार केला पाहिजे. नुसत्या देशप्रेमाखातर ती फार काळ टिकाव धरू शकत नाहीत, हे ओळखल पाहिजे खर म्हणजे, अरबीच एक केडरच निर्माण करण्यात आल पाहिजे त्यामध्ये आपल्या सर्वसामान्य विद्यापीठातून शिक्षण घेतलेल्या लोकाचाच समावेश करावा लखनौच्या नद्वासारख्या धार्मिक विद्यापीठातील अरबीतज्ज्ञ त्यात नसावेत याच कारण अस की, सेक्युलर विद्यापीठातून तयार झालेल्या विद्यार्थ्यांची दृष्टी धर्मनिरपेक्ष बनलेली असते परराष्ट्र खात्यातील कर्मचाऱ्यामध्ये ही धर्मनिरपेक्षता असण फार आवश्यक आहे इथले लोक धर्माचा पुकारा कितीही करीत असले तरी तो वरवरचा असतो प्रत्येक देश आपल्या हितसबधाची जपणूक कशी होईल हेच पाहात असतो इस्लामी देशापेक्षा हिंदू किंवा खिस्ती देशाकडून आपले हितसंबध अधिक सुरक्षित राखले जातील अस त्याला दिसून आल तर इस्लामी देशाला दूर सारून बिगरइस्लामी देशाला जवळ करण्यास तो मुळीच मागपुढ पाहात नाही म्हणून धार्मिक नि सकुचित दृष्टीच्या लोकाचा या कामी कसलाच उपयोग होत नाही शिवाय सेक्युलर विद्यापीठातून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांच सामान्य ज्ञानही धार्मिक विद्यापीठातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा अगदी ताज अन् व्यापक असत त्याची इथ फार जरूर असते या आखात देशात जपानन किती वर्चस्व बसवलय, हे तुम्ही पाहिल असेलच मोटारी, आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरण याची जणू मक्तेदारीच त्यान इथ मिळवलीय त्यासाठी जपान अरबीच्या शिक्षणावर किती भर देतोय, हे पाहण्यासारख आहे जपानी लोक नुसती पुस्तकी अरबीच शिकत नाहीत, तर अरबीच्या ज्या विभिन्न बोलीभाषा वेगवेगळ्या देशात बोलल्या जातात त्याचाही पद्धतशीर अभ्यास ते करतात इतक प्रावीण्य कदाचित आपल्याला मिळवता येणार नाही. परतु प्रत्येक अरब देशातील भारतीय दूतावासात एक-दोन अरबी तज्ज्ञ असतील अशी व्यवस्था करण आपल्याला खात्रीनच जड जाणार नाही. तसं आजही आपल्या अनेक विद्यापीठातून अरबी शिकवल जात त्यांच्याकडेच जास्त लक्ष पुरवल, आणि अरबीच शिक्षण इस्लामशी संबंधित न राहता आधुनिक अरब जीवनाशी त्याची सागड घातली जाईल असा प्रयत्न केला तर बिगर मुस्लिम तरुणही या क्षेत्रात उत्साहान येतील तसं होण फार आवश्यक आहे. भारताच्या धर्मनिरपेक्ष धोरणाला त्यामुळ बळकटी येईल ”

## कडुलिंबाचे गुणकारी झाड

पहिल्याच दिवशी (ता ६ मे रोजी) रात्री एका सार्वजनिक समारंभाला हजर राहण्याची संधी मिळाली नुकत्याच आलेल्या राजदूताच्या स्वागताचा तो कार्यक्रम होता दूतावासाच्या आवारात दूतावास क्लबातर्फे तो आयोजित करण्यात आला होता. राजदूताच्या स्वागतपर उर्दू कविता व भाषणे झाली राजदूतानी फार थोडक्यात आभार मानून सहकार्याचे आवाहन केले त्यानतर डबलक्रॉस' नावाचा एक भिकार सिनेमा दाखविण्यात आला परतु भारतीय पद्धतीचा फराळ मिळाल्यामुळे मी त्याबद्दल तक्रार केली नाही

दूतावासाच्या आवारात कडूलिंबाची डेरेदार झाडे आहेत रसरशीत, हिरव्यागार पानानी डवरलेली ती झाडे पाहून मन प्रसन्न होते रखरखीत उन्हापासून रक्षण करण्याची निसर्गाने कृपाळूपणे करून ठेवलेली ती सोय आहे चिचेचीही झाडे या देशात आहेत कडुलिंबमात्र भारतातूनच आला असावा असे दिसते कारण त्याचे अरबी नाव 'नीम' असेच आहे त्या झाडाखाली बसून गप्पागोष्टी करीत असता श्री जाफरी यानी कडुलिंबाचे माहात्म्य वर्णन करणारी एक लोककथा सागितली ती अशी.

दोन दूरच्या गावात दोन निष्णात वैद्य राहात होते एकदा एका गावातील वैद्याला दुसऱ्या गावातील वैद्याची परीक्षा घेण्याची इच्छा झाली त्याने एका इसमाला त्याच्या-कडे पाठविले त्याला त्याने सागितले, "तू त्या गावाला जाताना रोज रात्री आब्याच्या झाडाखाली झोपत जा, आणि आपला स्वयपाक आब्याच्या लाकडाच्या अग्नीवर कर" त्याप्रमाणे करीत तो इसम दुसऱ्या गावी पोचला तेथे जाईपर्यंत तो अगदी मरतुकडा होऊन गेला त्याने त्या वैद्याला आपली तब्येत दाखविली आणि औषध मागितले. वैद्याने त्याला विचारले, "तू इकडे येताना काय काय केलस ?" त्या इसमाने सगळी हकीगत सागितली. त्यावर तो वैद्य म्हणाला, "आता परत जाताना तू कडूलिंबाच्या झाडाखाली वस्ती कर, आणि त्याच्या लाकडावर स्वयपाक कर दुसरं कसल औषध द्यायची जरूर नाही" त्या इसमाने त्याप्रमाणे केले, आणि तो आपल्या गावी पोचे-पर्यंत खडखडीत बरा होऊन चागला टुणटुणीत झाला परीक्षा घेणाऱ्या वैद्याने त्या दुसऱ्या वैद्याचा मोठेपणा मान्य केला असे आहे कडुलिंबाचे महत्त्व !

## फलाहाराचे पुण्य

खय्याम हॉटेलात दोन वेळचे व्यवस्थित जेवण घेतले तर ६० रियाल (सुमारे १२५ रुपये) खर्च येतो मला चार दिवसाचा भत्ता म्हणून सुमारे १७० रियाल मिळाले होते त्यात दोन वेळचे जेवण घेणे शक्यच नव्हते शिवाय शाकाहारी जेवण मिळण्याची सोय नव्हतीच म्हणून बरोबर आणलेला चिवडा-लाडू आणि फळे यावर भागविण्याचे

मी ठरविले ४ रियालाना एक किलो ( पाच-सहा ) केळी व ५ रियालाना एक किलो ( चार-पाच ) सफरचंदे मिळत होती. तीन केळी व दोन सफरचंदे यानी पोट चांगले भरत असे दोनदा श्री जाफरी याच्या घरी भरपूर फराळ झाला एकदा दूतावासाच्या स्नेहसंमेलनात फराळ मिळाला. त्यामुळे मिळालेल्या भत्त्यात भागविणे शक्य झाले मात्र जद्दामध्ये मनासारखे जेवण कोठेच मिळाले नाही

## चित्रवाणी केंद्रावर

ता ७ मे रोजी शुक्रवार असल्याने तो सुटीचा दिवस होता त्या दिवशी काहीच काम होण्याची शक्यता नव्हती- एखादा गाडीवाला मित्र असता तर जरा भटकून आलो असतो पण श्री जाफरीशिवाय माझ्याकडे लक्ष देणारे कोणीच नव्हते· आणि त्याना आठवड्यातून मिळणाऱ्या एका दिवसाच्या सुट्टीच्या आनदापासून मी वचित करू इच्छित नव्हतो म्हणून तो दिवस मी वाचनात लेखनात घालविला माझा संपूर्ण दिवस असा वाया जावा हे श्री जाफरी याना बहुधा पसंत पडले नसावे त्यानी जद्दा चित्रवाणी ( टी व्ही ) केंद्राला रात्री भेट देण्याचा कार्यक्रम ठरविला. त्याप्रमाणे आम्ही चित्रवाणी केंद्रावर गेलो आणि केंद्राचे उपसचालक श्री अमीन जमाल याना भेटलो त्याच्या माणसाने आम्हाला सगळे स्टुडिओ आत नेऊन दाखविले

सऊदी अरबस्तानात रियाज, जद्दा, दम्माम, मदीना व कसीम ही पाच चित्रवाणी किंवा दूरदर्शन केंद्रे आहेत सध्या फक्त साधीच चित्रे दाखविली जातात परतु लौकरच जद्दाहून रंगीत चित्रवाणी सुरू होणार आहे त्याची तयारी चाललेली पाहिली येथील चित्रवाणीचा मुख्य उद्देश धर्मप्रचार, नीतिशिक्षण, समाजशिक्षण हा असून मनोरंजनाला दुय्यम स्थान आहे कुराण पठण, त्यावरील उलमाची प्रवचने, इस्लामी जीवनाचे धडे वगैरे कार्यक्रमावर विशेष भर दिला जातो नाटके, गाणी, लोकनृत्ये वगैरे मनोरंजनाचे कार्यक्रमही होतात, परतु त्यातून इस्लामच्या नियमाचे उल्लघन होणार नाही, याची खबरदारी घेतली जाते. इतर अरब देश व युरोप-अमेरिका येथूनही काही कार्यक्रम घेतले जातात. परतु ते दाखविण्यापूर्वी त्यातील चुबन-आलिंगनादी आक्षेपार्ह दृश्ये कापली जातात. मुख्यतः लोकशिक्षणाचे माध्यम म्हणूनच चित्रवाणीचा वापर केला जातो.

## महानगरपालिकेची बेपर्वाई

रियाझ ही राजधानी असली तरी जद्दा हे व्यापार, उद्योग वगैरे इतर सर्व दृष्टींनी महत्त्वाचे शहर आहे जुनी घरे पाडून नव्या इमारती उभारण्याचे व रस्तारुंदीचे काम फार जोरात चालू आहे हजच्या यात्रेला जाण्यासाठी येथेच यावे लागते. यात्रेकरूना

उतरण्यासाठी बंदराजवळच मोठमोठ्या धर्मशाळा बांधण्यात आल्या आहेत अशा या शहरात मध्यवर्ती बाजारपेठेत फुटलेले ड्रेनेज चार-चार दिवस वाहात राहावे, रस्त्याला त्यामुळे गुडघागुडघा खोल खड्डे पडावेत आणि कोणीच तिकडे लक्ष देऊ नये, ही स्थिती नक्कीच विचित्र होती की जगातल्या सगळ्याच नगरपालिका सारख्याच भोंगळ असतात ?

## ' अल् बिलाद 'च्या कचेरीत

८ मे रोजी पत्रकारांच्या भेटी-गाठी झाल्या सकाळी प्रथम ' अल् बिलाद ' या अरबी दैनिकाचे मुख्य संपादक श्री अब्दुल मजीद शुबुक्शी यांना भेटलो. ( 'बलद' म्हणजे शहर, नगर, राष्ट्र, ' बिलाद ' हे त्याचे अनेकवचन नगरे, राष्ट्रे ) ' अल् बिलाद ' हे क्रमांक २ च्या पातळीवरील पत्र आहे प्रथम क्रमांकाचे पत्र ' ओकाझ ' * हे असून ते एका कंपनीचे नाव आहे ( आपल्याकडील किर्लोस्कर 'प्रमाणे ! ) श्री शुबुक्शी गोरेपान व मोठे रुबाबदार, वयस्क गृहस्थ आहेत एवढ्या मोठ्या पत्राचे संपादक असून त्यांना इंग्रजी येत नाही त्यामुळे त्यांच्याशी श्री जाफरी यांच्या मध्यस्थीने बोलावे लागले सऊदी अरबस्तानातील पत्रकारांची व बुद्धिमंतांची एकमेव चिंता म्हणजे भारतातील मुसलमानांची तथाकथित दयनीय स्थिती भारतीय मुसलमानांना भयंकर कष्टात दिवस काढावे लागतात, त्यांच्या सरसहा कत्तली केल्या जातात, त्यांना नोकऱ्या मिळत नाहीत, त्यामुळे तेथे आता फारच थोडे मुसलमान उरले आहेत, असा सर्वांचा समज दिसला पाकिस्तानी प्रचाराचा तो परिणाम आहे, यात शंका नाही. परंतु हा समज तरी प्रामाणिक आहे की मुस्लिमेतरांविषयी वाटणाऱ्या तिरस्कारामुळे त्यांनी तो गैरसमज जाणूनबुजून जोपासला आहे ? संशय येण्यासारखी स्थिती नक्कीच आहे त्यामुळे श्री शुबुक्शी यांनी भारतातील मुसलमानांसंबंधी पहिलाच प्रश्न केल्याबद्दल मला आश्चर्य वाटले नाही इंडोनेशिया व बांगला देश यांच्यानंतर मुस्लिमांची प्रचंड संख्या असलेला भारत हा जगातला तिसरा देश आहे तेथे मुसलमान अत्यंत सुखासमाधानात आहेत अर्थात त्यांच्या हिंदू देशबांधवांना जेवढी दुःखे सोसावी लागतात तेवढी त्यांनाही सोसावी लागतातच, आणि संसदेत व विधिमंडळात त्यांना त्यांच्या लोकसंख्येप्रमाणे प्रतिनिधित्व मिळते एवढेच नव्हे तर मंत्रिमंडळात त्यांना वाजवीपेक्षा जास्त प्रतिनिधित्व मिळते आमचे एक माजी राष्ट्रपती मुसलमान

---

* ' ओकाझ ' या नावाचे एक ऐतिहासिक शहर मक्केपासून जवळच असून ते अरबी साहित्याचे केंद्र होते तेथे दरसाल काव्याच्या स्पर्धा होत असत ओकाझ कंपनीने आपले नाव या ऐतिहासिक महत्त्वाच्या शहरावरून ठेवले असण्याची शक्यता आहे.

होते व सध्याचे राष्ट्रपतीही मुसलमानच आहेत जातीय दगली होतात, पण त्याचे प्रमाण फारच अल्प आहे, इतर समाजात जशा दगली होतात तशाच त्या समजल्या पाहिजेत, अनेकदा या दगलीत मुसलमानापेक्षा हिंदूचीच प्राणहानी व वित्तहानी अधिक होत असते बॅ अतुले याच्यासारखे मुसलमान हिंदू मतदाराच्या पाठिब्यावर निवडून येतात, वगैरे नेहमीच्या गोष्टी मी त्याना सागितल्या पण त्याची काही फारशी गरज नव्हती, ती त्याची राजकीय 'पोझ होती, हे नतर माझ्या लक्षात आले कारण माझे सगळे बोलणे शातपणे ऐकून घेतल्यावर ते म्हणाले, "अहो भारताशी आमच्या देशाचे फार प्राचीन संबध आहेत ते चागलेच राहावेत, अस आम्हाला वाटत. मौलाना आझाद आमचेच होते. त्यानी कुराणावर लिहिलेला तफ्सीरुल कुरान' हा भाष्यग्रथ किती मोलाचा आहे, याची आम्हाला कल्पना आहे ते जगले वाचले असते तर नेहरूच्या नतर तेच भारताचे पतप्रधान झाले असते, यात शका नाही पण तुमच सरकार कधी-कधी चुकीची पावल उचलत म्हणून आम्हाला त्यावर हल्ला करावा लागतो आता या आणीबाणीचच पाहा ना आणीबाणीचा आणि जमाते इस्लामीचा काय सबध ? पण ती आर. एस एस की काय हिंदू जातीय सस्था आहे, तिच्यावर बदी घालायची होती तुमच्या सरकारला, पण आपल्यावर पक्षपाताचा आरोप यायला नको म्हणून त्यानी त्या सघटनेबरोबर जमाते इस्लामीवरही बदी घातली आणि तिच्या पुढाऱ्याना तुरुगात टाकल आता ती मडळी आमच्या चागली परिचयाची नेहमी हजला येणारी. त्याना पकडल्याच समजताच आमच्या वृत्तपत्रानी भारताविरुद्ध जोरदार प्रचारमोहीम सुरू केली इथल्या जागतिक इस्लामी सस्थाही त्यामुळ खड-बडून जाग्या झाल्या, आणि त्यानी भारत सरकारवर जमाते इस्लामीच्या लोकाना तुरुगातून सोडून देण्यासाठी जोरदार दडपण आणल आमचा रुद्रावतार पाहताच तुमच सरकार नमल आणि त्यान घाईघाईन जमाते इस्लामीच्या लोकाना सोडून दिल आता आम्ही भारत सरकारच्या आणीबाणीविरुद्ध एक ब्रही काढीत नाही अहो, आम्हाला करायचय काय तुमच्या देशाशी ? तो तुमचा अतर्गत प्रश्न आहे. पण जगातल्या कुठल्याही मुसलमानावर अन्याय झालेला आम्हाला खपायचा नाही इस्लामच्या संरक्षणाची जबाबदारी अल्लान आमच्यावरच सोपवलेली नाही काय ?"

त्याचे हे प्रवचन ऐकून मी सर्दच झालो एका नव्याच प्रकरणाचे रहस्योद्घाटन त्याच्या या वक्तव्यातून झाले होते त्यात सत्याचा अंश किती होता कोण जाणे पण आणीबाणी जाहीर झाल्यानतर एक-दोन महिन्यातच जमाते इस्लामीचे लोक सुटल्याचे मात्र मी ऐकले-वाचले होते त्यामुळे ही माहिती अगदीच निराधार नसावी, असे मी मानले मला राजकारणात उतरावयाचे नसल्याने मी त्याना म्हणालो, "आमच्या देशाविषयी इथ फार अपुरी आणि विपर्यस्त माहिती असल्याच मला आढळून आलय

कदाचित तुम्हाला बातमी पुरविणारे मुसलमानाचे जातीयवादी पुढारी आणि पाकिस्तानी प्रचारक याला कारणीभूत असतील त्याच्यावर अवलबून राहण्याऐवजी तुम्ही स्वत'च आमच्या देशात येऊन तिथली वस्तुस्थिती का पाहात नाही ? आपले पत्रकार एक-मेकाच्या देशात आले-गेले तर ते उपयुक्तच ठरेल नाही ? ''

" अहो, नाही कोण म्हणतय ? आम्ही तुमच्या देशात जायला एका पायावर तयार आहोत. पण तुम्ही आम्हाला बोलवायला तर हव ! गेली १३ वर्षं मी या सपादकीय खुर्चीवर आहे पण मला अजून एकदाही तुमच्या सरकारच निमत्रण मिळालेल नाही '' ते हसत म्हणाले पण त्यातील टोमणा आणि कडवटपणा मला जाणवला

पाकिस्तान सरकार अरब देशातील पत्रकाराना आग्रह कर करून आपल्या देशात नेते त्याची उत्तम बडदास्त ठेवते आणि भारतविरोधी प्रचाराचा डोस त्याच्या गळी उतरविते यामुळे हे पत्रकार स्वदेशी परत गेल्यावर आपोआपच पाकिस्तानचे प्रचारक बनतात. भारताने मात्र अजून आपली नजर गोऱ्या पत्रकारापुरतीच मर्यादित ठेवली असावी असे आजवरच्या पतप्रधानाकडून गोऱ्या पत्रकाराना दिल्या गेलेल्या खास मुलाखतीवरून दिसते

## " खरं बोललो असतो तर काफर ठरलो असतो ''

' अल् बिलाद च्या कचेरीतून आम्ही माहिती मत्रालयाच्या आलिशान इमारतीतील सऊदी प्रेस एजन्सी या सरकारी ' समाचार ' सस्थेच्या कचेरीत गेलो या ' सऊदी समाचार ' संस्थेचे सचालक श्री अब्दुल वहाब काशिफ हे मोठे हुशार व सत्यनिष्ठ गृहस्थ आहेत त्याच्याशी मनमोकळी चर्चा झाली त्याना इग्रजी येत असल्याने सभाषणाचा प्रवाह अखडपणे चालू शकला कचेरीत इतरही काही इग्रजी जाणणारी अधिकारी मडळी होती, त्यानीही त्या संभाषणाला आपापल्या परीने हातभार लावला त्यामुळे तेथील चर्चा चागलीच रगली

श्री काशिफ हे स्वत' धर्मनिरपेक्ष वृत्तीचे असून धर्माचा सबध व्यक्ती व तिचा ईश्वर एवढ्यापुरताच मर्यादित असावा दैनदिन भौतिक व्यवहारात धर्म आणू नये, हे भारताचे धोरण त्याना मान्य आहे ते म्हणाले, " बागला देश प्रकरणात सारा दोष भुट्टोंचाच होता खर म्हणाल तर भुट्टो काही सच्चा मुसलमान नव्हे त्याच संपूर्ण अमेरिकीकरण झालय ! त्यानी शेख मुजीबना पतप्रधान बनू दिल असतं—ज्याचे ते हक्कदार होते—तर बागलाकाड घडलच नसत ''

" एवढ सार तुम्हाला माहीत होत, तर त्या वेळी तुम्ही ते स्पष्टपणे तुमच्या लोकाना का सागितल नाही ? '' मी विचारले

यावर ते हसून म्हणाले, " मी खरं बोललो असतो तर लोकानी मला काफर

ठरवल असत, आणि मला दगडानी ठेचून ठार मारल असत आमच्च जाऊ द्या. इथ तर राजेशाही आहे, तुमच्या देशात लोकशाही आहे म्हणता पण आणीबाणी-विरुद्ध तुम्ही ब्र तरी काढू शकता काय ?" त्यानी माझ्या वर्मावरच बोट ठेवले म्हणून मी तो विषय बदलण्याचा प्रयत्न करू लागलो, पण एकदा चर्चेला जे वळण लागले होते ते बदलून ती गाडी दुसऱ्या रुळावर नेणे काही केल्या मला जमेना इतक्यात तेथे बसलेल्या एका गृहस्थानी मला विचारले, "भारतात राष्ट्राध्यक्ष हा नामधारी असतो, त्यामुळ मुसलमानाला राष्ट्राध्यक्ष बनविण फार सोप आहे पण तुमच्या देशाचा पतप्रधान कधीकाळी मुसलमान होईल, अस तुम्हाला वाटत काय ?"

मी क्षणभर विचारात पडलो एवढ्यात श्री जाफरी माझ्या मदतीला धावले ते म्हणाले, "सत्ताधारी पक्षान निवड केली तर नक्कीच एखादा मुसलमान भारताचा पतप्रधान होईल. मौलाना आझाद किंवा रफी अहमद क्दिवाई भारताचे पतप्रधान सहज होऊ शकले असते. राजस्थान आणि बिहारचे मुख्यमत्री मुसलमान होतेच काश्मीरचा मुख्यमत्री नेहमीच मुसलमान असतो"

दुसरे एक गृहस्थ मध्येच एकदम म्हणाले, "आमच्या देशात राजेशाही आहे म्हणून तुम्ही नाक मुरडता आपण फार मोठे लोकशाहीचे पुरस्कर्ते आहोत, असा आव आणता पण तुमच्या देशात तरी काय चाललय ? तीस वर्षांपैकी एकदोन वर्षे वगळली तर भारताची सत्ता नेहरू घराण्याच्या हातीच नाही काय ? तेच घराण भारतावर चिरकाल राज्य करीत राहाव म्हणून सजय गाधींना पुढ आणण्याचे पद्धतशीर प्रयत्न तिथ चालू नाहीत काय ? आम्ही उघडउघड राजेशाही मान्य करतो; तुम्ही तिच्यावर लोकशाहीचा बुरखा चढवू पाहता, एवढाच फरक पण तो बुरखा आता पार विर-विरीत झालाय त्याच्या आतली राजेशाही स्पष्ट दिसू लागलीय"

हा सारा पाश्चात्त्य प्रचाराचा परिणाम आहे, हे माझ्या लक्षात लगेच आले कारण या देशात ब्रिटिश व अमेरिकी पत्राचा खूपच प्रभाव आहे परतु अशा वेळी चिडून भागत नाही मी शातपणे त्याना म्हणालो, "तुम्ही वस्तुस्थितीचा फारच विपर्यास करताहात. इदिराजींना पडित नेहरूनी पतप्रधान बनवल नाही, त्याच्या कॉंग्रेस पक्षान बनवलं. उद्या सजय गाधींना त्याच्या पक्षान पतप्रधान बनवायच ठरवल तर तेही बनतील पण इदिराजींचे चिरजीव म्हणून नव्हे ती लोकशाहीची प्रक्रिया आहे"

सभोवर बसलेली मडळी मिस्किलपणे हसली जणू त्याना माझे म्हणणे अगदीच पोकळ वाटले असावे

इतक्यात आणखी एक गृहस्थ म्हणाले, "कशाला बिचाऱ्या लोकशाहीचे धिडवडे काढता तुम्ही ? ती गरीब देशाना परवडणारी चैन नव्हे खरोखरी तुमच्या देशात हुकूमशाहीच आहे एका व्यक्तीचीच सारी सत्ता आहे, हे सत्य कबूल करून मोकळे

का होत नाही ? ”

मी जरा चिडून म्हणालो, “ तुम्ही मडळी नीट समजून का घेत नाही ? इंदिरा गांधींनी भारतीय राज्यघटनेच्या चौकटीबाहेर एक पाऊलही टाकलेलं नाही त्यानी देशाच्या हितासाठी जी काही उपाययोजना केली ती सारी घटनेच्या चौकटीत बसणारीच होती त्या बाबतीतले सारे वटहुकूम मुसलमान राष्ट्रपतींनीच काढले होते, हे विसरू नका ”

“ देशाच्या हितासाठी की स्वतःच आसन टिकविण्यासाठी ? ” त्या गृहस्थानी खोचक प्रश्न केला

दुसरे एकजण म्हणाले, “ ते सार घटनेच्या चौकटीत बसणार असेलही पण ते नैतिक होत काय ? विरोधी पक्षाची आणि वृत्तपत्राची मुस्कटदाबी ही काय लोकशाहीची रीत झाली ? ”

त्याच्या त्या हल्ल्याने मी चक्रावून गेलो इतक्यात एकजण म्हणाले, “ पाकिस्तानला धमकावण्यासाठी तुम्ही अणुस्फोट केला, हे खोट आहे काय ? ”

“ होय, साफ खोट आहे. अणुशक्तीचा वापर विकासकार्यासाठी करण्याच्या प्रयत्नाचा तो एक भाग होता आम्ही अणुबॉब बनविणार नाही, असं जाहीर वचन दिल आहे. पण जर कधीकाळी भारतान अणुबॉब बनवलाच तर तो पाकिस्तानविरुद्ध वापरला जाणार नाही, याची खात्री बाळगा कारण पाकिस्तानशी आमची सरहद्द इतकी भिडलेली आहे की त्या बॉबहल्ल्यात पाकिस्तान्याबरोबर आमचेही लोक बळी पडतील. चीनच्या अणुबॉबला तोंड देण्यासाठी म्हणूनच कदाचित भारताला अण्वस्त्र तयार करावी लागतील ” मी म्हणालो माझा हा खुलासा त्याना पटला असावा, असे त्याच्या चेहऱ्यावरून मला वाटले

एका गृहस्थानी विचारले, “ भारत साम्यवादी बनेल अस तुम्हाला वाटत नाही काय ? साम्यवादी राष्ट्राशी तुमची जी चुंबाचुबी चाललीय त्यावरून आमची तर तशी खात्री झालीय ”

मी म्हणालो, “ भारतात इतक्या जाति-जमाती, इतक्या भाषा, इतके परस्पर विरोधी नि गुतागुतीचे हितसंबंध एकत्र नादत आहेत की सबध राष्ट्र साम्यवादीच काय पण समाजवादीही बनू शकणार नाही गरिबी नाहीशी करण्यासाठी जी आणीबाणी अवतरली तिच्यामुळ धनिकाचच हित अधिक झालय कारखानदार, उद्योगपती वगैरे खासगी भांडवलवालेच तिच्यावर जास्त खुष आहेत, हे तुम्हाला माहीत नाही काय ? साम्यवादी राष्ट्राशी आमची दोस्ती एवढ्यासाठीच आहे की त्यानी आम्हाला सकटाच्या वेळी मदत केली. जर त्या वेळी स्वतःला लोकशाहीचे पुरस्कर्ते म्हणविणारे देश आमच्या मदतीला धावून आले असते तर आम्ही त्यांच्याशी दोस्ती केली असती हा साधा व्यवहाराचा प्रश्न आहे. त्यातून तुम्ही तत्त्वनिष्ठा वगैरे शोधून काढण्याचा प्रयत्न

करू नये, हे बरं ”

तरीपण पाकिस्तानविषयी त्याना वाटणारा जिव्हाळा लपून राहिला नाही त्यानी स्पष्टपणेच सागितले की, “ पाकिस्तान हे छोटे व दुबळे राष्ट्र असल्यामुळे आमची सहानुभूती नेहमी त्याच्याकडेच राहील. उद्या पुन्हा युद्ध सुरू झाल तर आम्ही पकिस्तानचीच बाजू घेऊ ”

यावर श्री जाफरी म्हणाले, “ तसं करण्यात पाकिस्तानपेक्षा जास्त सख्या असणाऱ्या भारतीय मुसलमानावर अन्याय होईल, हे तुमच्या लक्षात येत नाही काय ? ”

ही सारी गरमागरम चर्चा चालू असताना श्री अब्दुल वहाब काशिफ मात्र गप्प बसून गालातल्या गालात हसत होते.

भारतातील वस्तुस्थिती पाहण्यासाठी त्या मडळींनी स्वत' भारतात यावे असे आवाहन मी त्याना केले, आणि त्यानीही ते निमत्रण आनदाने स्वीकारले

## आकाशवाणीतील फेरफटका

तेथून आम्ही जद्दा रेडियो स्टेशनवर गेलो, आणि केद्र-संचालक श्री हुसेन अस्करी याना भेटलो त्याच्याशी झालेल्या चर्चेत परस्परपरिचय वाढविण्याच्या कल्पनेचे त्यानीही स्वागत केले त्याच्या माणसाने आकाशवाणीच्या इमारतीतून फिरवून आणले तेथील बादशाही थाटाचे सात स्टुडिओज पाहून मी थक्क झालो या केद्रावरून मुख्यतः अरबी, इग्रजी व फ्रेंच या भाषातून प्रसारण होते कुराण-पठण, धर्मप्रसार, अरबी भाषेत पाठ वगैरे कार्यक्रम येथून होतात

भारतीय उपखडातील व बाहेरील उर्दू भाषी श्रोत्यासाठी उर्दूतून कार्यक्रम प्रसारित करण्याचीही सोय येथे आहे त्या विभागाचे प्रमुख श्री निसार अहमद हे लखनौचे असून गेली २४ वर्षे ते तेथे काम करीत आहेत त्याना सऊदी नागरिकत्वही मिळाले आहे पूर्वी हे नागरिकत्व अगदी सहज मिळे, आता मात्र ते मिळविणे फार अवघड झाले आहे, असे त्यानी सागितले हजसाठी आलेल्या यात्रेकरूपैकी उर्दू भाषी लोकाच्या मुलाखती ध्वनिक्षेपित करणे, हे त्या विभागाचे मुख्य काम आहे तरीपण भारत-पाकिस्तानातून येणाऱ्या कवींचे व साहित्यिकाचे कार्यक्रमही ते आपल्या श्रोत्यासाठी प्रसारित करतात माझी ही मुलाखत ध्वनिमुद्रित करण्याचे त्यानी ठरविले.

“ तुमचे कार्यक्रम देशाबाहेर किती लोक ऐकतात ? ” मी विचारले

ते म्हणाले, “ भारत-पाक-बागला देशाच्या श्रोत्याकडून पत्र येतात, त्यावरून बरेच लोक ते कार्यक्रम ऐकत असावेत असं दिसत तरीपण खरोखरी किती लोक आपले कार्यक्रम ऐकतात हे जाणून घेण्यासाठी आम्ही आता काही चढाओढी जाहीर केल्या आहेत आम्ही आमच्या श्रोत्याना पाच प्रश्न—मुख्यत. धार्मिक—विचारतो सर्व प्रश्नाची

उत्तर बरोबर असणाऱ्याना आम्ही १ हजार रियाल बक्षीस देतो. त्याखेरीज ८००, ५००, ३०० वगैरे रकमाची इतर बक्षिसही आम्ही ठेवली आहेत याशिवाय आणखी एक योजना आहे आमचे प्रतिनिधी जगाच्या वेगवेगळ्या भागात जातील आणि त्या त्या ठिकाणी आमच प्रक्षेपण नीट ऐकू येत किंवा नाही, याची पाहणी करून आम्हाला अहवाल सादर करतील त्यावरून त्या त्या देशातील स्थानिक प्रसारणामुळ आमच्या प्रसारणात काय अडथळे येतात याची कल्पना आम्हाला येईल आणि ते कसे दूर करावयाचे याचा विचार आमचे तज्ज्ञ करतील ''

त्याची ती अभिनव कल्पना मला फार आवडली

श्री निसार अहमद याना मी विचारले, '' इथले स्थानिक लोक भारतीयाशी कसे काय वागतात ? ''

ते म्हणाले, '' सामान्य लोक भारतीयाना तुच्छ लेखतात पोटापाण्यासाठी आलेले ते भिकारी आहेत, असच ते समजतात पण वरच्या लोकाना भारतीयाच महत्त्व पटल आहे बाहेरच्या लोकाच्या तज्ज्ञानाचा फायदा आपण करून घेतला नाही तर आपल्याला झपाट्यान प्रगती करता येणार नाही, याची कल्पना त्याना असल्यामुळ ते आमच्याशी चागले वागतात अर्थात मी स्वतः आता भारतीय राहिलो नाही पण ते लोक मला भारतीयच समजतात ''

## सैयद श्रीपाद जोशी

ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी ( ता ९ मे रोजी ) श्री जाफरी मला जद्दा रेडिओवर घेऊन गेले ५–६ मिनिटाची उर्दू मुलाखत मीच लिहून काढली होती तुम्ही येथे कशासाठी आलात ? ' ' तुमचा हेतू कितपत सफल झाला ?' येथील वातावरण तुम्हाला कस काय वाटल ? ' वगैरे तीन-चार प्रश्न मी घेतले होते. त्याची उत्तरे एक प्रकारे औपचारिकच होती श्री निसार अहमद यानी त्याला जे प्रास्ताविक जोडले होते, त्यात माझ्या उर्दू सेवेचा उल्लेख होता ती ध्वनिमुद्रित मुलाखत ऐकल्यावर मलाही बरे वाटले माझ्या उर्दू अध्ययनाचा असा उपयोग कधीकाळी होईल, याची मला स्वप्नातही कल्पना आली नव्हती माझा परिचय करून देताना श्री निसार अहमद यानी ' सैयद श्रीपाद जोशी ' असा उल्लेख केला. मला गमत वाटली पण अरबीत 'सैयद' हा शब्द श्रीयुत या अर्थाने वापरला जात असल्याने त्यात इतराना चमत्कारिक वाटण्यासारखे काही नव्हते मला वाटले, जद्दा रेडिओवरून अशा प्रकारची मुलाखत देणारा बहुधा मी पहिलाच हिंदू असेन अर्थात उर्दू साहित्याच्या कार्यक्रमात भारतीय लोक भाग घेतात त्यामुळे एखाद्या हिंदूचा सबध त्यात आला असण्याची शक्यता होती पण हिंदूच तिकडे फार कमी जात असल्याने मीच पहिला हिंदू असल्याचे श्री

निसार अहमद यानी मला सांगितले.

या मुलाखतीचा विशेष आनंद श्री जाफरी याना झाला ते म्हणाले, "जोशीजी, हा जसा तुमचा गौरव आहे, तसा माझाही विजय आहे इथल्या सरकारी गोटात शिरायचा आजवर आम्ही खूप प्रयत्न केला पण पाकिस्तान्याच्या अडथळ्यामुळ तो सफल झाला नाही आता आम्ही इथ वारंवार येत जाऊ, आणि आमच्या सदिच्छा जनतेपर्यंत पोचविण्याचा प्रयत्न करू तुमच्यामुळ ही गोष्ट साध्य झाली, आणि त्या कामी मी थोडाफार हातभार लावू शकलो, याचा मला आनंदही वाटतो आणि अभिमानही"

या निमित्ताने आपण थोडीफार देशसेवा करू शकलो, या कल्पनेने मलाही बरे वाटले.

## 'अल् मदीना'च्या संपादकांशी भेट

रात्री ८-३० वाजता अल् मदीना' या अरबी दैनिकाचे सपादक श्री उस्मान हाफिझ याना भेटावयास गेलो कचेरी अगदी अद्ययावत इमारतीत असून तेथील फर्निचर कोरे करकरीत व झोकबाज होते 'अल् मदीना' हे दैनिक 'अल् बिलाद'च्या श्रेणीचे व त्याच्यासारखेच कट्टर मुसलमानी आहे. त्यामुळे या दोन्ही संपादकाशी भारतीय दूतावासाचा सपर्क पूर्वा जमू शकला नव्हता माझ्या निमित्ताने ती भिंत ढासळण्यास मदत झाली आता त्याच्याकडे वारवार जाता येईल, असे श्री जाफरी म्हणाले श्री उस्मान हाफिझ याच्याशीही श्री जाफरी याच्या मध्यस्थीनेच बोलावे लागले कारण त्याना अरबीशिवाय दुसरी भाषा येत नव्हती त्यानी भारतातील मुसलमानाच्या तथाकथित हलाखीची ध्वनिमुद्रिका लावली, आणि मीही त्याना सकाळचेच उत्तर दिले त्याना आणखी एक जादा गोष्ट सांगितली ती अशी की सगळ्याच भारतीय पक्षात मुसलमान आहेत आणि मुस्लिम लीगमध्येही हिंदू आहेत आमच्या देशातील मतदारसंघ संमिश्र असल्याने सर्वानाच एकमेकाची मदत घ्यावी लागते, वगैरे त्यानाही मी भारतभेटीचे व तेथील परिस्थिती प्रत्यक्ष पाहण्याचे निमत्रण दिले

येथे एक गमत झाली जेथे जावे तेथे चहाचे पेले समोर येत मी तर आयुष्यात चहा कधी घेतलाच नाही त्यामुळे मला ते मोठे संकट वाटे परतु चहाचा अव्हेर करणे उद्धटपणाचे समजले जाईल, म्हणून श्री जाफरी याच्या आग्रहावरून तो घ्यावा लागे 'अल् मदीना'च्या कचेरीत आम्ही बसलो असता दुसरा एक गृहस्थ श्री उस्मान हाफिझ याना भेटावयास आला ते दोघे बोलण्यात गर्क झाल्याचे पाहून मी जाफरींना हळूच म्हटले, "तुमचा चहा चटकन संपवा, अन् मग हा माझाही घ्या" त्याप्रमाणे त्यानी आपला पेला रिकामा करताच मी माझा भरलेला पेला त्याच्यापुढे सरकवला

आणि त्याचा रिकामा पेला माझ्यासमोर ठेवला !

येथील एकूण जनतेत वृत्तपत्र-वाचनाची गोडी अजून निर्माण व्हावयाची आहे. त्यामुळे वड्या समजल्या जाणाऱ्या वृत्तपत्रांचा खपही फारच मर्यादित आहे ' ओकाझ ' या सर्वांत अधिक लोकप्रिय दैनिकाचा खप २० हजार असून इतर पत्राचा १०–१२ हजाराच्या आसपास आहे अरब न्यूज ' या इंग्रजी पत्राचा खप तर ५–६ हजारच आहे तरीपण सुशिक्षित व अधिकारी वर्गात त्याचे वाचन होत असल्याने त्यालाही महत्त्व आहे त्याच्या ता २६–१–७६ च्या अकात भारतविषयक पुरवणी असून भारताने केलेल्या प्रगतीचे आकर्षक चित्र त्यात रेखाटले आहे अशी पुरवणी काढावयाची हे निश्चितच फार खर्चाचे काम असते परंतु त्यायोगे काही लोकापर्यंत पोचता येते तो फायदा लक्षात घेतल्यास हा खर्च सरकारणी लागतो असेच म्हणावे लागते

## नासरची दोस्ती भारताला भोवली

भारतीय दूतावासातील प्रथम सचिव श्री अन्सारी याच्याशी श्री जाफरी याच्या-प्रमाणेच माझी तार चटकन जुळली

अबूधाबीला राजदूत म्हणून त्याची नेमणूक झाली होती त्यामुळे दुबई-अबूधाबी-तील माझे अनुभव जाणून घेण्याची त्याना उत्सुकता होती त्याप्रमाणे मी त्याना माझा अनुभव सागितला त्यानाही ते विचित्र वाटले ते म्हणाले, " तुमच्यासारख्या तटस्थ व्यक्तींचा आम्हाला फार उपयोग होतो आता इथंच पाहाना तुमच्यामुळ आम्ही अशा ठिकाणी जाऊ शकलो जिथ यापूर्वी आम्हाला जाता आल नव्हत तुमच्या खाद्यावर आम्ही आमच्या बंदुका ठेवून त्या उडवल्या, असंच म्हणाना का !" त्याच्या त्या उपमेची मला गमत वाटली आम्ही दोघेही खळखळून हसलो

श्री अन्सारी बरीच वर्षे या भागात असल्याने त्याचा तेथील परिस्थितीचा अभ्यास चागला आहे मी त्याना विचारले, " सऊदी अरबस्तानातच भारताविषयी इतका अविश्वास आणि दुजाभाव का आढळतो ? केवळ आम्ही हिंदू म्हणून ?"

यावर ते म्हणाले, " तसं नाही तुमच्याही लक्षात आल असेल की तुम्ही हिंदू असूनही इथले लोक तुमच्याशी फार चागले वागले अर्थात साऱ्या जगात हिंदू धर्माचा प्रसार करण्याची भूमिका असणारे जसे सनातनी हिंदू आहेत तसे सार जग इस्लाममय बनल पाहिजे, असं प्रामाणिकपणानं मानणारे लोक या देशात आहेत. माझा एक मजेदार अनुभव तुम्हाला सागतो मी एकदा विमानतळावरून टॅक्सीन गावात येत होतो टॅक्सीवाल्यानं मला विचारल, तुम्ही कुठले ?' मी म्हणालो, हिंदुस्थानचा !' यावर त्यान विचारल, ' हिंदू की मुसलमान ?' मी म्हणालो, 'मुसलमान'. तेव्हा त्यान विचारल, ' हिंदुस्थानात अजून हिंदू आहेत ? ' मी म्हटल, ' पुष्कळच

आहेत ' यावर एक उसासा टाकून तो म्हणाला, ' इन्शाअल्ला, सब मुसलमान हो जायेंगे ! ' अशी आहे इथल्या लोकांची वृत्ती पण ती अडाणीपणातून आलेली तिचा सरकारी पातळीवरील भारतविद्वेषाशी काही संबध नाही त्याच कारण वेगळच आहे. इजिप्तचे अध्यक्ष नासर यांच्याशी भारत एकरूप झाला, आणि तेव्हापासून इथले अरब लोक बिथरले कारण नासर पुरोगामी होते ते या देशाना प्रतिगामी, जुनाट, राजशाहीत गुरफटलेले म्हणून हिणवीत होते दक्षिण यमनसारख्या साम्यवादी देशाना शेजारच्या अरब देशावर आक्रमण करण्यास त्यानी सक्रिय मदत केली होती त्यामुळे नासर हा सगळ्या आखात देशातील राज्यकर्त्यांना आपला क्रमाक १ चा शत्रू वाटत होता त्याचा मित्र भारत, म्हणून भारतही त्याचा शत्रू बनला सऊदी अरबस्तान हा सर्वांत मोठा देश असल्यामुळ या शत्रुत्वाची जबाबदारीही प्रामुख्यान त्यानच उचलली पुढे नासरचा इस्रायलन दणदणीत पराभव केला तो चागलाच नरमला, आणि त्यान राजे फैसल याच्याशी समेट केला ज्याच्यामुळ भारताला शत्रुत्व पत्कराव लागल ते एक झाले, आणि भारतमात्र एकाकी पडला त्याच्याबद्दलची अरबाच्या मनातली अढी कायमच राहिली तिच्यावर तेल ओतून ती आग पेटत ठेवण्याच काम पाकिस्तानन चोख बजावल बागला देशनिर्मितीच्या वेळी त्याचा भडका उडाला. भारतद्वेष शिगेला पोचला परतु नतर पाकिस्ताननच भारताशी जुळत घेण्याच ठरविल्या-मुळ त्याचा द्वेषज्वर हळूहळू ओसरू लागला सध्या शत्रुत्वही नाही व मित्रत्वही नाही अशी तटस्थ वृत्ती या देशाची आहे ही एक प्रकारे प्रगतीच आहे अस आम्ही समजतो आता त्यानी पाकिस्तानला सोडून बागला देशाला हाताशी धरल आहे अर्थात त्यात काही नवलही नाही १९७१ साली भारतान ज्याचे ज्याचे दात त्याच्या घशात घातले ते सारेच देश अमेरिका, पाकिस्तान, चीन वगैरे—आज बागला देशात भारता-विरुद्ध कारवाया करण्यात मग्न आहेत त्याना सऊदी अरबस्तानची फूस आहे बागला देशात त्यान खूप संपत्ती ओतायला सुरुवात केली आहे ''

ही चर्चा ऐकणारे एक जबाबदार अधिकारी मधेच म्हणाले, '' शेख मुजीब याची हत्या होताच भारतान बागला देशात घुसून खुनी इसमाच पारिपत्य करायला हवं होत हे बागला देशी लोक मासळीसारखे असतात जरा ढील दिली की निसटलेच तुमच्या हातातून '' त्याच्या त्या उपमेची मला गमत वाटली परतु बागला देशाचा विषय काढून चर्चेला फाटे फोडण्याची माझी इच्छा नव्हती म्हणून मी श्री अन्सारी याना म्हणालो, '' पण आता या देशाशी मैत्री कशी वाढवायची हा खरा प्रश्न आहे ''

श्री अन्सारी म्हणाले, '' खर म्हणजे या देशाला भारताच्या मैत्रीची मुळीच गरज नाही पण भारतात प्रचड संख्येन असलेल्या मुसलमानाच्या संरक्षणाची जबाबदारी आपल्यावर आहे, असं हा देश समजतो त्यासाठी त्याने भारताशी सबध ठेवला आहे

आपल्याला भारतीय मुसलमानांविषयी काही माहिती नाही, असं जरी इथले संपादक तुम्हाला सांगत असले तरी ते खरं नाही. त्यांना सारं काही माहीत आहे- पण पाकिस्तानी प्रचाराच्या आहारी जाऊन ते अज्ञानाचा आव आणतात त्यांची अंतर्यामीची इच्छा हीच असते की, सारा भारत इस्लाममय झाला पाहिजे परंतु सुदैवानं आधुनिक धर्मनिरपेक्ष दृष्टिकोण बाळगणारे, इंग्रजी-फ्रेंच जाणणारे नवशिक्षित आता हळूहळू पुढं येत आहेत धार्मिक कट्टरतेच्या आवरणातून ते समाजाला बाहेर काढतील अशी लक्षणं दिसत आहेत आधुनिक तंत्रज्ञान व तंत्रविज्ञान यांचं महत्त्व त्यांना कळलं आहे त्यामुळं भारताच्या मैत्रीचीही कदर त्यांना आहे त्यांच्या सहकार्यानं भारतीय तंत्रज्ञ या देशात मोठ्या प्रमाणावर येतील अशी आशा वाटते आपल्या देशात हिंदु-मुसलमान जातीयवादी मंडळी जशी कालौघात काठावर फेकली गेली, तशीच इथलीही प्रतिगामी मंडळी पुरोगामी प्रवाहापासून दूर फेकली जातील असं मला वाटतं ”

“ या प्रक्रियेला आपणही हातभार लावू शकू, नाही ? ” मी विचारले

“ नक्कीच ! ” श्री अन्सारी उद्‌गारले, “ तुमच्यासारखी अपक्ष बिनसरकारी मंडळी वारंवार इकडे येत राहिली तर इथल्या पुरोगामी शक्तींना त्याचा मोठा आधार वाटेल इकडील बुद्धिमंतानाही आपण भारतात नेलं पाहिजे मात्र इकडे येणाऱ्यामध्ये नुसतेच मुसलमान असणार नाहीत, याची काळजी घेतली पाहिजे इकडे सरकारी पातळीवरून बहुधा मुसलमानच येतात ते पढवून पाठविलेले असतात, असा समज इथं पसरला आहे तुमच्या भेटीमुळं मला जो आनंद झाला त्याचं कारण हेच तुम्ही ज्या मोकळेपणानं इथल्या लोकांशी बोलला त्यावरून तुम्ही त्या तथाकथित पढवून पाठविलेल्या लोकांपैकी नाही, याची त्यांना खात्री पटली असेल सर्वच जातिजमातींचे, वेगवेगळ्या पक्षांचे आणि अपक्ष असे स्त्रीपुरुष इथं येत राहतील तर परस्पर स्नेहभाव निर्माण होऊन तो वाढीस लागेल, असं मला वाटतं ”

श्री अन्सारी यांच्या स्पष्टवक्तेपणाने मी खूपच प्रभावित झालो

मी त्यांना विचारले, “ इथल्या सरकारी व बिनसरकारी नोकऱ्यांमध्ये पाकिस्तानी लोक मोठ्या संख्येनं आहेत, असं समजतं त्याचं कारण ते मुसलमान आहेत, एवढंच आहे काय ? ”

यावर श्री अन्सारी म्हणाले, “ त्याचं कारण एवढंच की पाकिस्तानी लोक इथल्या राज्यकर्त्यांच्या दृष्टीनं निरुपद्रवी आहेत आणि आर्थिक दृष्ट्या ते फार स्वस्त आहेत. इंग्रज किंवा अमेरिकी तंत्रज्ञ फार महाग पडतात शिवाय त्यांच्या कपड्यालत्त्याच्या, खाण्यापिण्याच्या सवयी इस्लामी कल्पनांशी मेळ खात नाहीत म्हणून अगदी अपरिहार्य असेल तिथंच त्यांना घेतलं जातं ईजिप्त, लेबॅनॉन, जॉर्डन वगैरे पुढारलेल्या देशातील अरब यांना धोक्याचे वाटतात त्यांना स्थानिक लोकांची भाषा येत असल्या-

मुळ त्याच्या द्वारे लोकशाही, मुक्त जीवन, आणि नवनवे विचार याचा प्रसार होण्याची भीती असते शिवाय येथील कपड्याच्या किंवा दारू-सिनेमाच्या बाबतीतील नियम ते पाळीत नाहीत म्हणून त्याना दूर ठेवल जात तसच, कालातरान त्याची बहुसंख्या होण्याचीही सुप्त भीती असतेच या सगळ्या दृष्टींनी पाकिस्तानी फार सोयीचा तो वाटेल तेवढ्या कमी पैशात नोकरी करायला तयार असतो स्थानिक भाषा येत नसल्यान स्थानिक जनतेत मिसळून नव्या विचाराचा प्रसार तो करील, असा धोका नसतो इस्लामच्या बाबतीतील या देशाच श्रेष्ठत्व त्यान मनोमन मान्य केलेल असत त्यामुळ तो स्वामिनिष्ठ आणि आज्ञाधारक असतो एवढ सार असूनही वरच्या जागा-वर २।४ पाकिस्तानीच असतील बहुतेक सारे सामान्य जागावरच काम करतात. पाकिस्तानला भारतद्वेषाशिवाय दुसरं कसलच तत्त्वज्ञान नाही, हुकूमशाहीच वावड नाही, सत्ता टिकवण्यासाठी धर्माचा वापर करण्यात तो मागपुढ पाहात नाही या सर्व कारणामुळ सऊदी अरबस्तानला तो अत्यत भरवशाचा मित्र वाटतो ''

श्री अन्सारी याच्याशी झालेली चर्चा अशा प्रकारे खूपच माहितीपूर्ण होती

## गाढवाची गाडी

जद्दामधून फिरताना पुष्कळदा गाढवाच्या गाड्या दिसतात ब्यूक, कॅडिलॅक, रोल्सरॉइस, वगैरे गाड्याची इतकी गर्दी रस्त्यावर असताना ही पुरातन काळातील गाढवाची गाडी कशासाठी लागते, याची चौकशी केली असता असे समजले की, गल्लीबोळातील जुन्या घरामध्ये पाण्याचे नळ पोचलेले नाहीत तेथे पाणी पुरविण्याचे काम या गाढवाच्या गाडीतून केले जाते अधून-मधुन कावडीही दिसतात येथील गाढवे पाढरीशुभ्र व खेचराइतकी उच आहेत आता जुनी घरे पाडून नवी घरे बाधण्याचा सपाटा सुरू झाला आहे थोड्याच दिवसात जुने शहर स्मृतिशेष होऊन नवे झगझगीत, सिमेंट कॉंक्रीटचे शहर उभे राहील मग गाढवाच्या गाडीची जरूर उरणार नाही

## सौम्य व प्रेमळ अहमद बशीर

ता. ९ मे रोजी माहिती मत्रालयाने शहर दाखविण्याची जबाबदारी घेतली होती, त्याप्रमाणे त्या मंत्रालयाच्या प्रेस विभागात काम करणारा अहमद बशीर हा सूदानी तरुण सकाळी दहा वाजता मत्रालयाची गाडी घेऊन आला वस्तुतः त्याची स्वतःची गाडी होती पण ती थोडी लहान होती शिवाय मी त्या दिवशी सरकारी पाहुणा असल्याने सरकारची गाडी व सरकारी ड्रायव्हर असणे योग्यच होते काळाकुळकुळीत रग, हसरा हबशी चेहरा, कुरळे केस, तरतरीत नाक-डोळे, आणि सहा सव्वासहा फूट

उची दोन दिवस तो माझ्याबरोबर होता त्याच्या मनमोकळया व प्रेमळ स्वभावामुळे त्याची माझी चागलीच गट्टी जमली सूदान हा अरबी भाषीच देश आहे. पण सूदान हा अरबस्तानात नसून आफ्रिकेत आहे तसा ईजिप्तही आफ्रिकेतच आहे पण ईजिप्तच्या लोकामधे अरब रक्त जादा व आफ्रिकी रक्त कमी आहे. याच्या उलट सूदानमध्ये अरब रक्त क्वचितच पाहावयास मिळते या काळ्या अरबाना अरबस्तानात कसे वागविले जाते हे जाणून घेण्यासाठी मी अहमद बशीरला विचारले, " इथ काळ्या आणि गोऱ्या अरबात भेदभाव केला जातो की नाही ? " यावर तो म्हणाला, " तस थोड डाव-उजव केल जात खर, परंतु ज्याला तुम्ही भेदभाव म्हणता तसा इथ केला जात नाही आता गोरा रग सर्वांनाच आवडतो. मला स्वत लाही आवडतो म्हणून मी गोरी वधूच पसत करणार होतो, पण माझी भावी वधू काळीच आहे कारण ती हुशार आणि सुस्वभावी आहे ती कैरोच्या अजहर विद्यापीठात शिकते आहे तिच शिक्षण पूर्ण झाल्यावर आम्ही लग्न करणार आणि सूदानमध्येच राहणार, तोपर्यंत इथ राहून भरपूर पैसा साठविण्याचा माझा विचार आहे "

सूदानमधे भारतीयाची संख्या बरीच आहे, आणि स्थानिक लोकाशी त्याचे फार स्नेहाचे संबध आहेत धार्मिक कट्टरतेचा अभाव व स्त्रीस्वातन्त्र्य या गोष्टींमुळे तेथील वातावरण भारतीयाना परके वाटत नाही ही पार्श्वभूमी माहीत असल्यामुळे अहमद बशीरशी माझी तार कशी जुळली याचे आश्चर्य मला वाटले नाही

## राजकुमार विद्यालय ?

सर्वांत प्रथम आम्ही अल सक्र मॉडेल स्कूल्स ' ही शिक्षणसस्था पाहावयास गेलो ' सक्र ' म्हणजे कपाळ, तोंड, बदर वगैरे मुखपत्राप्रमाणे हे मुखविद्यालय म्हणता येईल त्याचे आवार, त्याच्या इमारती, तेथील सुखसोई हे सारे पाहिल्यानतर ते राजकुमाराचे विद्यालय असावे, असाच भास होतो सऊदी सरकार आपल्या मुलाच्या शिक्षणावर इतका खर्च करीत आहे की इतर देशात विशेषतः आशिया-आफ्रिकेतील गरीब देशात तेथील राजकुमाराच्या शिक्षणावरही इतका खर्च केला जात नसेल

प्राथमिक ( ६ वर्षे ), माध्यमिक ( इटरमीजिएट, ३ वर्षे ) व उच्च माध्यमिक ( सेकडरी, ३ वर्षे ) अशा तिन्ही शाळा एकत्र आहेत

## शिक्षणाचे माध्यम अरबी

अरब देशामध्ये सामान्यतः मानव्य ( humanities ) विषयापेक्षा विज्ञानाकडे विशेष लक्ष दिले जाते अल सक्र ही शाळा तर प्रामुख्याने विज्ञानावरच भर देणारी आहे भाषा, इतिहास, भूगोल वगैरे विषयही येथे शिकविले जातात. परंतु त्याना गौण

स्थान आहे मोझ्या नजरेत जी गोष्ट विशेषत्वाने भरली ती म्हणजे या देशात शिक्षणाचे माध्यम कटाक्षाने अरबी हेच ठेवण्यात आले आहे, ही होय या शाळेतील विज्ञानाच्या प्रत्येक शाखेच्या प्रयोगशाळा इतक्या सुसज्ज व आधुनिक आहेत की, तशा प्रयोगशाळा आपल्याकडील उत्तमोत्तम महाविद्यालयातही नसतील प्रत्येक प्रयोगशाळेत प्रवेश केल्यावरोबर आपण लुटुपुटीची प्रयोगशाळा पाहात नसून खरीखुरी मोठ्या संशोधकाची प्रयोगशाळा पाहात आहोत अशी छाप आपल्यावर पडते मला अर्थातच शिक्षणाच्या माध्यमाविषयी जाणून घेण्याची विशेष उत्सुकता होती म्हणून मी तेथील शिक्षकाना विचारले, “ तुम्ही अरबीतून विज्ञान शिकवता हे चागलच आहे, पण वैज्ञानिक परि-भाषेचे तुम्ही काय करता ? ”

यावर ते म्हणाले, “ खर म्हणजे जुन्या काळी अरबीतून पुष्कळ वैज्ञानिक साहित्य निर्माण झालेल आहे, त्यामुळे बरेचसे पारिभाषिक शब्द आमच्या भाषेत आधीपासूनच तयार आहेत. आधुनिक विज्ञानातील शब्दाच्या बाबतीतच प्रश्न असतो त्यापैकी काही शब्दाच आम्ही अरबीकरण केल आहे उच्चार व अर्थ याच्याशी साम्य असणारे जुने अरबी शब्द घेऊन त्याच्यापासून नवे शब्द बनविले आहे ( आपण नायट्रोजनसाठी जसा नत्रवायू बनविला आहे तसे ) परतु जिथ असे शब्द बनविता आले नाहीत तिथ आम्ही आतरराष्ट्रीय वैज्ञानिक पारिभाषिक शब्द जसेच्या तसे स्वीकारले आहेत त्यामुळ उच्च शिक्षणाच्या वेळी विद्यार्थ्यांना अडचण पडत नाही.”

“ पण विद्यापीठात तर तुम्ही इग्रजीतून विज्ञान शिकवता शिवाय तुमचे विद्यार्थी इग्लड–अमेरिकेला उच्च शिक्षणासाठी जातात. त्याना अरबीतून शिकल्यामुळ काही त्रास होत नाही ? ” मी विचारले

“ मुळीच नाही ” ते शिक्षक उत्तरले, “ कारण आमचे विद्यार्थी इग्रजीत चागले तयार झालेले असतात आमच्या इथ दुसऱ्या इयत्तेपासूनच इग्रजी शिकवल जात. ते चागल पक्क व्हाव म्हणून आम्ही ध्वनिग्राहक यत्राचा ( डिक्टॅफोन ) फार मोठ्या प्रमाणावर वापर करतो त्यामुळ विद्यापीठात गेल्यावर त्याना इग्रजीतून विषय समजण्यास कसलीच अडचण पडत नाही. ”

इग्रजीचे अध्यापकही तेथेच होते ते मला म्हणाले, “ चला, मी तुम्हाला आमचा इग्रजी शिक्षणाचा वर्ग दाखवितो ” त्याच्याबरोबर जाऊन मी तो वर्ग पाहिला, आणि थक्क झालो प्रत्येक बाकावर ध्वनिग्राहक यत्र होते त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतंत्र-पणे मार्गदर्शन करिता येते आम्हीही ती यत्रे कानाना लावून कसे शिक्षण दिले-घेतले जाते त्याचा पदार्थपाठ घेतला ज्या मुलाचे इग्रजी कच्चे असते त्याना सुटीच्या दिवशी किंवा शाळा सुटल्यावर जादा वेळ देऊन त्याचा विषय पक्का करून घेतला जातो

पूर्वी या देशात फ्रेंचही मोठ्या प्रमाणावर शिकवीत असत परतु आता सारा भर

इग्रजीवरच आहे एका वर्गात जाऊन आम्ही थोडा वेळ तेथील शिकविण्याची पद्धत पाहिली अरबी व्याकरणाचा तास चालला होता या देशात शिक्षक बहुधा सारा वेळ उभेच असतात कारण खडू व फळा याचा उपयोग येथे मोठ्या प्रमाणावर केला जातो व्याकरणासाठीही फळ्याचा उपयोग केलेला होता सबध फळा डौलदार अरबी अक्षरातील वाक्यानी भरलेला होता त्याची लिपी उर्दूसारखीच असल्याने त्या मजकुराचा अर्थ जरी मला समजला नाही तरी मला तो वाचता आला, आणि संदर्भाने, काय शिकविले जात आहे त्याचा थोडासा अदाजही आला

## चुणचुणीत विद्यार्थी

शाळेतील बहुतेक विद्यार्थी रगाने गोरे, गुटगुटीत व तरतरीत दिसले. प्रश्नाची उत्तरे देण्यातील त्याची तत्परता पाहून ते चुणचुणीत असले पाहिजेत, हेही लक्षात आले स्वच्छ व व्यवस्थित गणवेशातील ती हसतमुख मुले पाहून मन प्रसन्न झाले गणवेश, पुस्तके, स्टेशनरी, वगैरे सारे काही सरकारकडूनच दिले जाते शिवाय प्रत्येक विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती मिळते आईबापानी आपल्या मुलाना पैसा कमावण्यासाठी कामाला लावू नये, त्याना नियमाने शाळेत पाठवावे, यासाठी त्याना मिळणारी ती नुकसानभरपाईच समजण्यास हरकत नाही ज्या मुलाचे आईबाप सरकारी नोकरीच्या निमित्ताने परगावी किंवा परदेशी असतात त्याच्यासाठी एक छात्रालय असून त्याचा रुबाब तर काही औरच आहे डॉक्टर, न्हावी, धोबी, पोहण्याचा तलाव, मशीद वगैरे सगळ्या सोयी आवारातच असून त्या सर्व मोफत आहेत आपल्यासारख्याना खटकणारी गोष्ट एकच, ती म्हणजे शाळेत फक्त मुलेच आहेत मुली नाहीत सहशिक्षणाला या देशात पूर्ण बदी आहे मुलींसाठी अशीच वेगळी विद्यालये आहेत अर्थात ती पाहण्याची सधी मला मिळण्याची शक्यता नव्हतीच मुले-मुली एकत्र वावरताना पाहण्यात जो एक आल्हाद असतो तो फक्त कुवैतमध्येच अनुभवावयास मिळतो

## परकीय शिक्षक

१८०० विद्यार्थी असलेल्या या शाळेत एकूण ९९ शिक्षक आहेत त्यातील फक्त १० सऊदी असून बाकीचे सारे ईजिप्त, जॉर्डन, लेबॅनॉन वगैरे देशातून आणलेले आहेत हे सऊदी शिक्षकही बहुधा धर्मशिक्षण देणारे असावेत कारण या देशात धार्मिक शिक्षण सक्तीचे आहे, आणि त्याच्या शाळा पूर्वीपासून चालत आलेल्या आहेत स्थानिक युवकाना प्रशिक्षण देऊन शिक्षक बनविण्याचे प्रयत्न चालू आहेत परंतु विज्ञानाचे शिक्षण घेतलेल्याना तेलउत्पादन व शोधन आणि इतर कारखाने यामध्ये इतका वाव आहे की, मास्तरकी करायला त्याच्यापैकी कितीजण तयार होतील याची

शकाच आहे त्यामुळे सध्यातरी अरबीभाषी परकीय शिक्षकाना बेकारीच्या सकटाला भिण्याचे कारण दिसत नाही

## बंदरातील गर्दी

तेथून आम्ही जद्दा बदर पाहावयास गेलो आधुनिक यत्राच्या साह्याने माल उतरविण्याचे काम येथे जोरात चालू होते सीमेट व आटा उतरवून घेतला जात होता आट्यामुळे निम्माशिम्मा धक्का पाढराफेक झाला होता अनेक बोटी किनाऱ्यापासून दूर नागर टाकून सहा-सहा महिने आपली पाळी केव्हा येते याची वाट पाहात उभ्या आहेत यावरून केवढ्या प्रचड प्रमाणावर आयात चालू असावी, याची कल्पना येते

## भारतीय दूतावासाचे विद्यालय

अल सक विद्यालय पाहून आल्यावर भारतीय दूतावासाचे विद्यालय पाहिले, आणि श्रीमती व गरिबी यातील शब्दश' जमीन अस्मानाचे अतर जाणवले दूतावासाच्या आवारातच पत्र्याच्या खोल्या बाधून त्यात ही शाळा चालविली जाते इयत्ता पहिली ते आठवीपर्यतच्या शिक्षणाची सोय असून विद्यार्थ्यांची सख्या २०५ आहे १५ शिक्षक त्याना शिकवितात येथे मुख्यत भारतीय विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जात असला तरी बागला देश, नाइजीरिया, ग्रीस वगैरे देशाचे विद्यार्थीही अल्प प्रमाणात आहेत

श्री अन्सारी याना मी विचारले, "हे परक्या देशाचे विद्यार्थी आपल्या शाळेत का येतात ?"

यावर ते म्हणाले, "सऊदी शाळात धार्मिक शिक्षणावर जो भर दिला जातो तो अनेकाना पसत नाही शिवाय आपल्या मुलानी अरबीतून शिक्षण घेतल तर स्वदेशी परत गेल्यावर त्याना ते त्रासाच जाईल, अस त्याना वाटत आम्ही इग्रजीतून शिक्षण देत असल्यामुळ ते सर्वानाच सोयीच जात "

"पण मग ते आपल्या मुलाना ब्रिटिश किंवा अमेरिकन दूतावासाच्या शाळात का पाठवीत नाहीत ?" मी विचारले

"त्याच कारण असं की, अमेरिकी शाळा फार महाग आहे तिथ प्रत्येक विद्यार्थ्याला ६००-७०० रियाल (१२०० ते १४०० रुपये) खर्च येतो ब्रिटिश शाळा थोडी स्वस्त आहे पण ती मुख्यतः ब्रिटिश विद्यार्थ्यांसाठीच आहे तिथ बिगरब्रिटिश विद्यर्थ्याला घेतल तरी नतर एखादा ब्रिटिश विद्यार्थी आल्यास त्या बिगरब्रिटिश विद्यार्थ्याला जाव लागत फ्रेन्च शाळेत इतराना प्रवेशच दिला जात नाही " त्यानी सागितले

१९६९ साली फक्त २ विद्यार्थी घेऊन ही शाळा सुरू करण्यात आली होती ती दिल्लीच्या सेंट कोलबस विद्यालयाला जोडलेली असून आता ती भारत सरकारच्या

सेंट्रल स्कूलला जोडण्याचा विचार चालू आहे दुबई-अबूधाबीप्रमाणे जद्दाला भारतीयांची संख्या फार मोठी नाही अगदीच थोडे भारतीय आतापर्यंत तेथे होते. यामुळे विद्यार्थ्यांचे दडपण शाळेवर नव्हते भारतीय व्यापाऱ्यांची संख्याही या देशात फारच थोडी असल्याने त्यांच्याकडून आर्थिक मदत होण्याची शक्यता नाही फीतून शाळेचा खर्च चालतो प्रत्येक विद्यार्थ्याला सरासरी १०० रियाल ( २०० रुपये ) फी द्यावी लागते. तरीपण बांधकाम, फर्निचर वगैरेसाठी पैसा लागतोच म्हणून काही दिवसापूर्वी पालकांची सभा घेऊन त्यांच्याकडे देणगी मागण्यात आली होती त्या वेळी जागच्या जागी १५–१६ हजार रियाल गोळा झाले होते यावरून पालकांना या शाळेचे महत्त्व पटले आहे, असे दिसते आता जमीन किंवा घर मिळविण्याची खटपट चालू आहे सरकारी पातळीवरून फारसे काही होऊ शकेल अशी आशा नाही. कारण सहशिक्षण व धर्मनिरपेक्ष स्वरूप यांना सरकारचा विरोध आहे तरीपण आपल्या दूतावासातील काही अधिकाऱ्यांचे बादशाही कुटुंबातील काही व्यक्तींशी घनिष्ठ संबंध आहेत त्या स्नेहाचा फायदा या कामी घेता येईल असे दिसते

## हजच्या गर्दीत येऊ नका

दूतावासात लखनौचे एक मुसलमान गृहस्थ भेटले ते गेली वीस वर्षे तेथे आहेत पूर्वी दूतावासात होते. आता एका मोठ्या कंपनीत आहेत साऱ्या नातेवाइकांना त्यांनी तेथे आणले आहे, यामुळे भारतात जाण्याची त्यांना गरज उरलेली नाही या देशातील मुसलमान इतर देशातील मुसलमानांपेक्षा अधिक चांगले व धार्मिक वृत्तीचे आहेत असे त्यांनी सांगितले. ते म्हणाले, " तुम्ही हजचा काळ वगळून इथं आलात ते फार चांगलं केलंत कारण हजच्या गर्दीत इथं कुणालाच दुसऱ्याकडे लक्ष द्यायला फुरसत नसते त्या काळातील भेटीगाठी अगदीच औपचारिक आणि घाईगर्दीच्या होतात पण भारतातून येणारी शिष्टमंडळे मुख्यतः मुसलमानांचीच असल्यानं ती त्याच वेळी येत असतात त्यांना हजची यात्रा घडते, पण महत्त्वाचं असं काहीच काम होत नाही "

## पासपोर्ट ठेवून घेण्याची पद्धत

माझ्या आखलेल्या कार्यक्रमाप्रमाणे मला सऊदियाच्या विमानाने कुवैतला जावयाचे होते ते विमान दुपारी २ वाजता निघून रात्री आठला पोचणार होते कारण ते वाटेत अनेक ठिकाणी थांबणार होते त्याऐवजी कुवैत एअरवेजने गेल्यास दोन तासात कुवैतला पोचता येणार होते म्हणून कुवैती कंपनीत जाऊन मी माझे तिकीट बदलून घेतले त्या वेळी त्या लोकांनी माझा पासपोर्ट ठेवून घेतला ही एक वेगळीच पद्धत होती पासपोर्ट ठेवून घेतला की उतारू नक्की होतो, हा कंपनीचा फायदा, आणि बहिर्गमनाचे

सारे सोपस्कार परस्पर कंपनीतर्फे करवून घेतले जातात, हा उतारूचा फायदा हा पासपोर्ट विमानतळावर उतारूला परत दिला जातो मला ती पद्धत आवडली

## नि:क्षारीकरण संयंत्र

ता १० मे रोजी माझे विमान दुपारी २ वाजता सुटणार होते त्यासाठी मला १२ वाजताच विमानतळावर हजर व्हावयाचे होते म्हणजे सकाळचा थोडासा वेळ माझ्यापाशी होता त्याप्रमाणे ९–३० वाजता अहमद बशीर सरकारी गाडी घेऊन आला त्याला मी माझ्या ' महात्मा माय बापू 'ची एक प्रत भेट म्हणून दिली त्याला फार आनद झाला ड्रायव्हर कालचाच होता त्याला उदबत्तीचा एक पुडा दिला तोही खुष झाला येथील लोकाना भरपूर पैसा मिळत असल्याने ते खुष होतील इतक्या रकमेची टिप देणे आपल्याला परवडत नाही पण अशा काही वेगळ्या वस्तू भेट दिल्या की त्याना बरे वाटते

आखात देशात सर्वांत दुर्मिळ वस्तू म्हणजे पिण्याचे पाणी. उन्हाळ्यात बाटलीभर पाण्याला २–३ रुपये पडतात याच्या उलट एक-दीड रुपयात गॅलनभर पेट्रोल मिळते म्हणून समुद्राच्या पाण्याचे निःक्षारीकरण करून ते पिण्यायोग्य बनविण्यासाठी प्रत्येक देशाने मोठमोठी सयत्रे बसविली आहेत अशा प्रकारचे एक सयत्र ( प्लँट ) पाहाण्याची सधी जद्दा येथे मिळाली

सऊदी अरबस्तानात आतापर्यंत अशी सहा यत्रे काम करू लागली आहेत त्यापैकी जद्दा, उम्म लुज्ज, अल वजह व दुबा ही चार तांबड्या समुद्रावर असून अल खबर व अल खफजी ही अरबी आखातावर आहेत. या संयत्राकडून दररोज सुमारे १४ कोटी गॅलन गोडे पाणी तयार केले जाते. येत्या दहा वर्षांत दररोज सुमारे ५०० कोटी गॅलन पाणी तयार करण्याच्या योजना तयार करण्यात आल्या असून त्याच्यावरील कामेही सुरू झाली आहेत या योजना पूर्ण झाल्यानतर देशातील लोकाना भरपूर पिण्याचे पाणी मिळू लागेल, एवढेच नव्हे तर शेतीसाठीही त्याचा उपयोग होऊ शकेल

सहा वर्षांपूर्वी तयार झालेले जे संयत्र मी पाहिले त्याला ९ कोटी रियाल ( १८ कोटी रुपये ) खर्च आला होता त्याच्या दुप्पट मोठे संयत्र त्याच्या शेजारीच उभारले जात असून त्याला ६० कोटी रियाल खर्च येणार आहे तिसऱ्या संयत्राच्या उभारणीसंबधी एका जर्मन कपनीशी मी तेथे गेलो त्याच दिवशी व त्याच वेळी करार झाला ( म्हणजे करारावर सह्या झाल्या ) असल्याचे मला सागण्यात आले अरब देशाना पाण्यासाठी केवढा प्रचड खर्च करावा लागत आहे हे पाहिल्यानतर निसर्गाने मोफत व भरपूर पाणी देऊन आपल्यावर केवढी कृपा केली आहे याची कल्पना आपल्याला येते व आपल्या मनात कृतज्ञतेची भावना आपोआप निर्माण होते.

तसे हे संयंत्र फार अवाढव्य किंवा गुतागुतीचे नाही त्यामुळे ते चटकन् पाहून झाले. समुद्रातील पाणी आत घ्यावयाचे, ते प्रचड नळात उकळावयाचे आणि त्याची वाफ गोळा करावयाची की झाले पाणी तयार या देशाजवळ स्वतःचे स्वस्त इंधन ( खनिज तेल ) असल्यामुळेच त्याना हे महाग पाणी परवडते

हे सयत्र चालविणाऱ्या सलाइन वॉटर कॉझर्व्हेशन कॉर्पोरेशनचे उपमहासचालक श्री अब्दुल अझीझ ओ नासीफ याना मी भेटलो फारच भले गृहस्थ वाटले त्यानी संयत्राचे कार्य कसे चालते ते रेखाकृतीच्या साह्याने समजावून सागितले या सयत्रा-कडून नि क्षार पाणी तर मिळतेच, शिवाय त्यातून भरपूर वीजनिर्मितीही होते त्यासाठी तयार होणाऱ्या वाफेचा वापर केला जातो. मी त्याना विचारले. “ पाण्यातल्या क्षारा-पासून मीठही बनवता येत असेल ना ? ”

यावर ते हसून म्हणाले, “ मीठ बनविता अवश्य येईल पण त्यामुळ संयत्रच बिघडून जाईल म्हणून खाली राहिलेल पाणी अधिक जड किंवा क्षारयुक्त होण्यापूर्वीच ते बाहेर ( समुद्रात ) फेकून दिल जात ”

“ हे तयार होणारं नि क्षार पाणी जसंच्या तस पिण्यासाठी वापरल जात काय ? ” मी विचारले

“ ते पाणी फार बेचव असत शिवाय ते साठवून ठेवल जात त्यामुळे त्यात किडे होण्याची शक्यता असते म्हणून प्रथम त्यात आम्ही क्लोरीन मिसळतो. त्यामुळ ते निर्जंतुक राहत नतर त्यामध्ये खनिज पाणी म्हणजे झऱ्याच किंवा नलिकाकूपाच नैसर्गिक पाणी सुमारे ३०–३५ टक्के मिसळण्यात येत, त्यामुळ त्याला चवही येते ”

“ किनाऱ्याजवळच पाणी गलिच्छ असत तेच तुम्ही वापरता काय ? ” मी विचारले

“ छेः छे. ! किनाऱ्यापासून बरच आत जाऊन आम्ही तिथून पाणी आणतो. तिथल पाणी चागल स्वच्छ असत ” ते म्हणाले

त्या ठिकाणाहून समुद्राचे दृश्य छान दिसत होते ते पाहून अहमद बशीर म्हणाला, “ पाहा, कसा निळाशार समुद्र आहे पण या गोऱ्यानी त्याला निष्कारणच तांबडा ठरवून बदनाम केलाय ”

मी समतिदर्शक स्मित केले

## अंधेरनगरीचा न्याय

नि क्षारीकरण संयंत्र पाहण्याचा कार्यक्रम लौकर आटोपल्यामुळे थोडा वेळ शिल्लक उरला होता. म्हणून आम्ही जद्दा विश्वविद्यालय पाहावयास गेलो परतु अजून तेथे बाधकामच चालू असल्याने पाहण्यासारखे फारसे काही आढळले नाही थोडा वेळ

विद्यापीठाच्या आवारात भटकून आम्ही सरळ विमानतळावर गेलो ऐनवेळी गोंधळ होऊ नये म्हणून हॉटेलमधून निघताना माझे सामान मोटारीत बरोबर घेतले होते परंतु आमच्याजवळ भरपूर वेळ असल्याचे नंतर आढळून आले विमानतळावर १२ वाजताच पोचलो अहमद बशीरला निष्कारण खोळंबावे लागू नये, म्हणून त्याला मी परत जाण्यास सांगितले पण शिष्टाचार म्हणून म्हणा, की माझ्याविषयीच्या स्नेहभावनेने म्हणा, तो शेवटपर्यंत थांबला श्री जाफरीही निरोप देण्यासाठी आले होते. आतापर्यंतच्या प्रवासात निरोप देण्यासाठी आलेले श्री जाफरी हे पहिलेच दूतावास कर्मचारी ! अर्ध्या तासाने पासपोर्टही मिळाला आणि मी आत गेलो कसलाच त्रास झाला नाही विमानतळभाडेही द्यावे लागले नाही

आत गेल्यावर एक मजेदार दृश्य पाहावयास मिळाले. एक मुंबईचा व एक कराचीचा असे दोन मुसलमान पोलिस पहाऱ्यात बसले होते मुंबईवाला चाभार होता तो नोकरीसाठी आला होता, परंतु त्याच्या भावानेच दगलबाजी करून मालकाचे कान भरल्यामुळे त्याला नोकरी मिळाली नाही मालकाने त्याला मुंबईचे तिकीट काढून दिले, हीच मेहेरबानी त्याच्याजवळ व्हिसा असूनही त्याला पोलिस कस्टडीत बंद करण्यात आले त्याचे कारणही त्याला सांगण्यात आले नव्हते कराचीवाला असाच कामगार होता त्याच्या व्हिसाची मुदत संपल्यावर तो राहिला होता म्हणून त्याला कच्च्या तुरुंगात जावे लागले होते त्या गुन्ह्याबद्दल दंड भरण्याची त्याची तयारी होती. पण पोलिसवाले काही ऐकून घ्यायला तयार नव्हते लॉकप्मध्ये खाणे-पिणे स्वत.च्या खर्चाने करावे लागते अंथरूणपांघरूणही घरचे न्यावे लागते विमानात बसण्यापूर्वी त्या पोलिसानी त्या दोघांचे काढून घेतलेले पासपोर्ट त्यांच्या हवाली केले तेव्हा कुठे त्यांच्या जिवात जीव आला " असली अंधेरनगरी जगात कुठं नसेल ! " ते दोघे उद्गारले

कुवैतचे ७८२ बोइंग विमान उशिरा आल्यामुळे आम्ही २–३० ला विमानात बसलो आणि विमान २ ऐवजी ३ वाजता सुटले.

# १२

# कुवैत

## (१० मे ते १४ मे)

कुवैती विमानाने अतराळात झेप घेतली तेव्हा ३ वाजले होते हवा स्वच्छ, निरभ्र होती खालची भूमी अगदी स्पष्ट दिसत होती जद्दाहून कुवैत १९६३ कि मी दूर आहे वाटेत कोठेही न थांबता आमचे विमान ४–४५ ला कुवैतच्या विमानतळावर उतरले जद्दा तांबड्या समुद्रावर तर कुवैत अरबी आखाताच्या किनाऱ्यावर म्हणजे संपूर्ण सऊदी अरबस्तान ओलांडावयाचे प्रथम नुसतेच प्रचड वाळवट व डोंगर दिसत होते डोंगर म्हणजे खडकाचे मोठे ढीगच त्यावर गवताचे पातेही उगवलेले नव्हते मध्येच एखादे झाडी असलेले गाव दिसे त्याला म्हणावयाचे मरूद्यान (ओॲसिस) वाटेत एकही शहर लागले नाही या डोंगरामधून घळी होत्या त्याना अरबीत ‘ वादी ’ असे म्हणतात वरून त्या नदीसारख्या दिसतात परतु अरबस्तानात नदी नाहीच पाऊस पडला की याच ‘ वादी ’मधून पाणी वाहते व त्याना तात्पुरते नदीचे रूप प्राप्त होते मधून–मधून काळेभोर लाबच लाब डाबरी रस्ते दिसत काळी नागीण सरपटत जावी, तसा भास होई काही वेळानतर पाढरे निर्जल ढग दिसू लागले पुढे पुढे या ढगानी इतकी दाटी केली की काहीच दिसेना. सर्वत्र पिवळा अधार पसरला मी खिडकीतून पाहणे बद केले व नजर आत वळवली खिडक्यावर पडदे ओढण्यात आले, आणि ‘ दि ब्रिज हा रहस्यपट दाखविण्यात आला

विमानात बसल्यावर जेवण देण्यात आले ते मासाहारी होते मी विचारले, “ शाकाहारी जेवण नाही काय ? ” यावर हवाई सुदरी उद्गारली, “ सॉरी ! आमच्याकडे शाकाहाराची सोय नाही ” कदाचित शाकाहार मागणारा मीच तिला भेटलो असेन तरीपण पाव, लोणी, चीज, कॉफी एवढ्या पदार्थांवर माझे थोडेफार क्षुधाशमन झाले

४–३० च्या सुमारास तेलाच्या विहिरी, टाक्या, धुराने काळवंडलेली जमीन दिसू लागली ही कुवैतची तेलक्षेत्रे होती. धुरकटलेली काळी जमीन म्हणजे तेल संपलेल्या विहिरी त्याच्या आसपासचे रस्ते काळे दिसण्याऐवजी पिवळे का ते मात्र कळले नाही कुवैतचा विमानतळ चांगला प्रशस्त वाटला स्वागतासाठी एअरइंडियाचे एक केरळीय कर्मचारी श्री थॉमस आणि भारतीय दूतावासाचे ॲटॅची श्री मुहम्मद अब्दुल माजिद आले होते गर्दी फारशी नव्हती, आणि तपासणीही कडक नव्हती यामुळे चटकन सुटका झाली श्री अब्दुल माजिद जुन्या पद्धतीचे, साधेभोळे मौलाना आहेत त्याना अरबी येत असल्यामुळे निवृत्तीनतरही ते काम करीत आहेत आपल्या परराष्ट्र खात्यात अरबी जाणणाऱ्याची किती चणचण आहे, ते पुन. एकदा जाणवले.

फहद सालेम स्ट्रीट हा कुवैतचा पॉश व व्यापारी विभाग जिकडे-तिकडे मोठ-मोठी दुकानेच दुकाने या मार्गावरील कार्लटन हॉटेलच्या ३१० क्रमाकाच्या खोलीत माझी सोय करण्यात आली एका खाटेच्या खोलीला रोज ८ दिनार (सुमारे २५० रुपये) भाडे पडते; आणि दोन खाटाच्या खोलीला १२ दिनार माझी खोली दोन खाटाची असल्याने दूतावासाला निष्कारण शभर-सव्वाशे रुपये जादा भुर्दंड भरावा लागला

हॉटेलपासून जवळच रीगल रेस्टॉरंट नावाचे एका केरळीय मुसलमानाचे उपाहारगृह होते. त्यात भारतीय खाद्यपेये मिळतात असे समजल्यामुळे हॉटेलातील खाण्यापिण्याची मी चौकशीच केली नाही पण बाहेर खावयाचे म्हणजे स्थानिक चलन हवे माझ्या-जवळ ते नव्हते म्हणून हॉटेलवाल्याला मी दोन सऊदी रियाल दिले व त्याचे दिनार मागितले त्याने हसून १५० फिल्स दिले कारण एक दिनारची किंमत सुमारे १५ रियाल होती तो म्हणाला, " तुम्ही बँकेतून चलन बदलून घ्या म्हणजे तुम्हाला जादा पैसे मिळतील " परतु त्या वेळी कुठली बँक उघडी असणार ?

१५० फिल्स म्हणजे सुमारे साडेचार रुपये तेवढ्यात निदान मसाला डोसा तरी मिळेल अशी माझी कल्पना होती म्हणून डोसा व कॉफी घेतली एका प्लेटमध्ये दोन डोसे येतात तेवढ्याने चागले पोट भरले बिल आले ते ३५० फिल्स, म्हणजे सुमारे दहा रुपये ! आता काय करावयाचे ? मी गल्ल्यावरील इसमाला म्हटले, "माझ्याजवळ फक्त १५० फिल्स आहेत पण तुम्ही रियाल घेत असाल तर मी ते देतो " त्याने एकदा मला निरखून पाहिले आणि म्हणाला, " काही फिकीर करू नका उरलेले पैसे उद्या आणून द्या " मी कोण, कुठला, कोठे उतरलो आहे, याचीही त्याने चौकशी केली नाही त्याच्या दृष्टीने २०० फिल्स ही अगदीच क्षुद्र रक्कम असावी

कार्लटन हॉटेल बाहेरून भपकेबाज वाटते पण आतून अगदीच जुनाट व सामान्य आहे टॉवेल चादरीएवढे मोठे शभर वर्षांपूर्वीचे असावेत—व्हिक्टोरिया राणीच्या काळातील !

# १३

# असा हा कुवैत !

तसे पाहिले तर कुवेत हा अरबस्तानचा किंवा अरबी द्वीपकल्पाचाच एक भाग आहे त्याच्या उत्तरेस व पश्चिमेस इराक देश असून दक्षिणेस सऊदी अरबस्तान व पूर्वेस अरबी आखात आहे त्याचे क्षेत्रफळ १७८१८ चौ कि मी आहे त्यामध्ये काही वर्षांपूर्वी कुवेत व सऊदी अरबस्तान याच्या समाईक आधिपत्याखालील तटस्थ प्रदेशाचा अर्धा भाग समाविष्ट आहे भारतातून इराककडे जाण्याच्या जलमार्गावर हा देश असल्यामुळे प्राचीन काळापासून येथील संस्कृती विकसित झाली असावी असे फैलका या बेटावर सापडलेल्या उत्खननातील अवशेषावरून दिसते सम्राट शिकदर व ग्रीक संस्कृती याचाही कुवेत व बहरैन याच्याशी घनिष्ठ संबंध आला होता असे या अवशेषावरून दिसून येते

परंतु कुवेतच्या आधुनिक इतिहासाची खरी सुरुवात इ स १७१० साली झाली मध्य अरबस्तानात पडलेल्या भयंकर दुष्काळापासून स्वतःचे प्राण वाचविण्यासाठी शुद्ध अरबी रक्ताचे बदुची, बदू किंवा बेदू नावाचे भटके टोळीवाले पाणी व चारा याच्या शोधात कुवेतला पोचले तेथे त्याना भरपूर गोडे पाणी मिळाल्यामुळे ते तेथेच राहिले त्याच्यापैकी अल सबाह घराण्याने कुवेतवर आणि अल हलीफा या घराण्याने बहरैन या जवळच्या–दक्षिणेस २५० मैलावर असलेल्या–बेटावर आपापली सत्ता स्थापन केली

## कुवैत ' म्हणजे लहान किल्ला !

अरबी भाषेत ' कुत ' या शब्दाचा अर्थ किल्ला असा असून ' कुवेत हे त्याचे लघुत्वदर्शक रूप आहे. त्याचा अर्थ लहान किल्ला किंवा गढी असा होतो शत्रूपासून

सरक्षण व्हावे म्हणून या गावच्या लोकानी गावाभोवती जो तट उभारला होता त्याला उद्देशून हे नाव देण्यात आले; आणि तेच पुढे रूढ झाले कुवैतच्या उत्तरेला खाडीचा बराचसा भाग आत घुसला आहे त्यामुळे जहाजाना वादळापासून नैसर्गिक सरक्षण मिळते या भागाला कुवैतची खाडी असे म्हणतात या सोयीमुळे या स्थानाचे महत्त्व आपोआपच वाढत गेले शिवाय अरबी आखातात मोती सापडतात, आणि मच्छीमारीही चागली चालते त्यामुळे १७५६ च्या सुमारास या शहराची लोकसख्या १० हजाराच्या वर गेली होती, याचे आपल्याला आश्चर्य वाटत नाही दुबई अबूधाबीप्रमाणे कुवैत हेही जुन्या काळापासून मोत्याच्या व्यापाराचे मोठे केद्र समजले जात होते परंतु या वैभवामुळेच कुवैतला आक्रमकाच्या हल्ल्याचे लक्ष्य बनावे लागले. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारभी मध्य अरबस्तानातील ( म्हणजे सध्याच्या सऊदी अरबस्तानातील ) धर्मवेड्या वहाबींनी कुवैतवर हल्ले करण्यास सुरुवात केली इस्लामचे खरे मूळ स्वरूप आपल्यालाच समजले आहे व त्याप्रमाणे आपल्याप्रमाणेच इतरानीही आचरण केले पाहिजे असा आग्रह धरणारा इस्लामचा जो कट्टर पथ आहे त्याच्या अनुयायाना वहाबी असे म्हणतात कुराणातील आज्ञाचे शब्दश. पालन करण्याचा व करविण्याचा अट्टाहास करणारे आजचे सऊदी लोक प्रामुख्याने वहाबी पथाचेच आहेत आपल्या या मतप्रसारासाठी तलवारीचा वापर करणे आणि इतर धर्मोच्याच नव्हे तर मुसलमानातील इतर पथाच्या लोकानाही सक्तीने आपला पथ स्वीकारण्यास भाग पाडणे, यात वहाबी लोकाना काहीच गैर वाटत नाही, किंबहुना ते आपले धार्मिक व पवित्र कर्तव्य आहे, असेच त्याना वाटते

सुदैवाने या सुमारास ब्रिटिश ईस्ट इडिया कपनीने कुवैतमध्ये आपली वखार उघडली होती त्यामुळे त्या वखारीच्या रक्षणासाठी कपनीने भारतीय सैनिकाची मोठी तुकडी तेथे ठेवली होती शिवाय बदरापासून जवळच कपनीची एक युद्धनौका तयारीत होती शहराबाहेरील विहिरीचे पाणी जेव्हा वहाबींनी तोडले तेव्हा कपनीच्या शिपायानी त्याच्यावर हल्ला करून त्याना पिटाळून लावले कुवैतचा त्या वेळचा अमीर शेख अब्दुल्ला अल सबाह याच्याजवळ एक प्रचड तोफ होती ती डागताच ५०० वहाबी आक्रमक पळून गेले अशीही दतकथा प्रचलित आहे परतु जमिनीवरून होणारी आक्रमणे आणि समुद्रावर चालणारी चाचेगिरी याचा कुवैतच्या वैभवावर विपरीत परिणाम होऊन १८३१ च्या सुमारास त्याची लोकसख्या घटत-घटत ४ हजार झाली आणि शभर वर्षापूर्वी त्याच्याजवळ असलेल्या ८०० होड्या व गलबते याचीही संख्या नाममात्र राहिली.

परतु जसजसा ब्रिटिशाचा प्रभाव वाढत गेला तसतसे कुवैतचे भाग्यही उदयाला येत गेले १८९९ साली वहाबींचा धोका उरला नव्हता, पण तुर्की साम्राज्य कुवैतला

गिळकृत करण्यास टपून बसले होते ते लक्षात येताच शेख मुबारक अल सबाह याने ब्रिटनशी मैत्रीचा तह केला त्यामुळे कुवैतला परकीय आक्रमणाचे भय उरले नाही. हा तह १९६१ साली संपुष्टात येईपर्यंत कायम टिकून राहिला मात्र या कालात कुवैत ब्रिटिशांचा गुलाम नव्हता तो स्वतंत्र सार्वभौम देश म्हणूनच वावरत होता मात्र हा तह रद्द झाल्यानंतरच कुवैतला अरब लीग व संयुक्त राष्ट्रसंघ यांचे पूर्ण सभासदत्व मिळाले

१९१४ साली कुवैतची लोकसंख्या २० हजार झाली या वेळी जहाजवाहतूक, जहाजबांधणी, मच्छीमारी, मोती काढणे व उंटाची पैदास हे कुवैतचे प्रमुख उद्योग होते सुमारे ५०० नौका मोती काढण्याच्या कामासाठी वापरल्या जात होत्या प्रत्येक नौकेवर १५ ते ५० लोक गुंतलेले असत ३० ते ४० मोठी जहाजे भारताशी व आफ्रिकेशी व्यापार व मालवाहतूक करीत असत जहाजबांधणीच्या कामात सुमारे ३०० कुशल कारागीर गुंतलेले होते या जहाजासाठी लागणारे लाकूड भारतातून जात असे बहुतेक सर्वच अरब देशांची जहाजे खजूर, फळे, मासळी वगैरे घेऊन भारतात जात आणि भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरून लाकूड, तांदूळ, गरम मसाले, चंदन, अत्तरे वगैरे भरून परत जात

१९१९ साली सऊदी अरबस्तानच्या फैसल अल दुविश या सरदाराने वहाबी सैनिकासह कुवैतवर जोरदार हल्ला केला परंतु जहरा येथील लाल किल्ल्याच्या ( कस्र अल अहमरच्या ) आधाराने कुवैती सैन्याने वहाबी सैन्याची धुळधाण उडविली. आजही जहराची ही लढाई अत्यंत गौरवशाली घटना समजली जाते

## जुन्या तटांचे अवशेष

या नेहमी–नेहमी होणाऱ्या वहाबींच्या-हल्ल्यापासून कायमचे संरक्षण करण्यासाठी कुवैती लोकांनी आपल्या शहराभोवती १४ फूट उंचीचा व ५ मैल लांबीचा एक भक्कम तट उभारला सारी जनता या कामात सामील झाली आणि तिने एवढे प्रचंड काम दोन महिन्यात पूर्ण केले. तेव्हापासून वहाबींचे हल्ले बंद झाले. आता हा तट नामशेष झाला आहे; कारण कुवैत शहराचा व्याप खूपच वाढला आहे परंतु या तटामधील चार प्रचंड वेशी आजही सुरक्षित ठेवण्यात आल्या आहेत त्यांच्या उंच भिंती व अजस्र दरवाजे पाहिल्यानंतर हा तट किती भक्कम असेल याची कल्पना येते जुने कुवैत आता उरलेले नाही. जुन्या घरमालकांना भरपूर नुकसानभरपाई देऊन सरकारने त्यांची घरे पाडून टाकली, आणि त्यांच्या जागी नव्या सीमेंट कॉंक्रीटच्या भव्य इमारती उभारल्या घरमालकांना इतरत्र चांगल्या जागा देऊन तेथे घरे बांधण्यासाठी सरकारने भरपूर आर्थिक साह्य दिले त्यामुळे कुवैतच्या उपनगरात अत्याधुनिक

वास्तुशिल्पाचे नमुने असणारे वातानुकूलित बंगले जिकडे–तिकडे पाहावयास मिळतात.

कुवैतमध्ये खेडी किंवा शहरे अशी फारशी नाहीतच. त्यामुळे कुवेत देश व कुवैत शहर या समान अर्थानेच तो शब्द वापरला जातो कुवैतची लोकसंख्या १९५७ साली सुमारे २ लाख होती, ती १९७० साली साडेसात लाख झाली आता ती दहा लाखावर गेली असावी, असा अदाज आहे या लोकसंख्येचे वैशिष्ट्य असे की, तिच्यातील कुवैती लोकाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत असून बिगरकुवैती लोकाचे प्रमाण वाढत आहे १९५७ साली कुवैती ५५ टक्के होते ते १९७० साली ४७ टक्के झाले याच्या-उलट बिगरकुवैतींचे याच काळातील प्रमाण ४५ टक्क्यावरून ५३ टक्क्यावर गेले आता बहुधा कुवैती व बिगरकुवैती याचे प्रमाण ४० : ६० असे झाले असावे परतु याची भीती कुवैती लोकाना वाटत नाही कारण सर्वच नोकऱ्यात त्याना प्राधान्य दिले जात असल्याने त्याच्यावर बेकारीचे सकट कोसळण्याची शक्यता नाही

कमी उत्पन्नाच्या लोकासाठी कुवैती सरकारने जी घरे बाधली आहेत ती आपल्या-कडील श्रीमताच्या बंगल्यापेक्षा झोकदार आहेत प्रत्येक घराभोवती सुंदरसा बगीचाही असलाच पाहिजे, असा नियम आहे अशा प्रकारे मातीची ओबडधोबड घरे असलेले कुवैत आता स्मृतिशेष झाले असून अत्याधुनिक शिल्पानी नटलेले नखरेल कुवैत उभलले आहे

## जगातील सर्वांत श्रीमंत देश

दरडोई उत्पन्नाच्या दृष्टीने कुवैत हा जगातील सर्वात श्रीमत देश असून त्याने स्वित्झर्लंडचा या बाबतीतील पहिला क्रमाक हिरावून घेतला आहे. इ स १९७४ साली कुवैतचे दरडोई उत्पन्न ११ हजार डॉलर होते स्वित्झर्लंडचे हेच उत्पन्न ७२५० डॉलर होते. कतार व सयुक्त अरब अमीरात याचे दरडोई उत्पन्न त्या वर्षी १० हजार डॉलरपेक्षा जास्त असावे असा अदाज आहे. त्या मानाने सऊदी अरबस्तानचे त्या वर्षीचे दरडोई उत्पन्न २६५० डॉलर होते अर्थात त्याची लोकसख्या मोठी असल्याने हे प्रमाण इतके खाली घसरले आहे, हे उघड आहे ( त्या वर्षी भारताचे दरडोई उत्पन्न सुमारे ७० डॉलर असावे ! )

या श्रीमतीचे श्रेय अर्थातच कुवैतच्या खनिज तेलाच्या भाडाराला आहे. १९७४–७५ साली कुवैतला तेलापासून ८ अब्ज १० कोटी डॉलर मिळाले राज्याचे एकूण महसुली उत्पन्न त्या वर्षी ८ अब्ज ८५ कोटी होते. त्यावरून तेलाच्या उत्पन्नाचा सिंहाचा वाटा लक्षात येईल

## काळ्या प्रवाही सोन्याची किमया

खनिज तेलाचा शोध कुवैतमध्ये १९२४ सालापासूनच सुरू झाला होता परंतु १९३८ साली मोठ्या प्रमाणावर तेल सापडेपर्यंत चाचपडणेच चालू होते पुढे दुसरे महायुद्ध सुरू झाल्यावर तेलाच्या उत्पादनात खंड पडला. कुवैतने या युद्धात मित्र राष्ट्रांना सर्वतोपरी मदत केली असली तरी तो युद्धात सामील न होता तटस्थच राहिला त्यामुळे त्याला युद्धाची झळ लागली नाही तरी पण तेलउत्पादनाच्या कामाला खरा वेग १९४५ नंतरच आला १९५७ साली क्रूड तेलाचे उत्पादन ४३ कोटी बॅरल होते ते १९७० साली १०९ कोटी बॅरल झाले, आणि १९७४–७५ साली तेलाच्या किंमतीतील वाढीमुळे उत्पादन घसरून ९० कोटी बॅरलवर आले तरी त्यापासून मिळणारे उत्पन्न मात्र दुप्पट अडीचपट झाले

कुवैत हा तेलउत्पादनाच्या बाबतीत जगातील चौथ्या क्रमांकाचा देश आहे (अमेरिका, रशिया व सऊदी अरबस्तान हे पहिले तीन क्रमांक होत काही वर्षांपूर्वी व्हेनेझुएलाचा क्रमांक चौथा होता ) मात्र तेलाच्या निर्यातीच्या बाबतीत सऊदी अरबस्तान पहिल्या क्रमांकावर असून कुवैत दुसऱ्या क्रमांकावर आहे. ( कारण अमेरिका व रशिया आपल्या तेलाचा स्वतःच बहुतेक वापर करून टाकतात ) कुवैतमधील तेलासाठी फार खोलवर जावे लागत नाही शिवाय ते बंदरापासून फार जवळ आणि समुद्रात मिळते यामुळे कुवैती तेलाचा उत्पादनखर्च फार कमी येतो एक बॅरल तेलाचा उत्पादनखर्च सुमारे ४ रुपये असून आज तेवढ्या तेलाची किंमत ८८ रुपये आहे याचरून तेलापासून मिळणाऱ्या अफाट नफ्याची कल्पना यावी

आपल्या या अमाप संपत्तीचा उपयोग गरीब व मागासलेल्या देशांना करून देण्यात कुवैत हा आघाडीवर आहे आपल्या राष्ट्रीय उत्पन्नापैकी किमान १ टक्का भाग श्रीमंत व विकसित देशांनी गरीब व अविकसित देशांच्या विकासासाठी खर्च करावा, ही गरीब देशांची मागणी मान्य करण्यास श्रीमंत देश काकू करीत आहेत अशा वेळी आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाचा ८ टक्के भाग कर्ज व साह्य म्हणून देणारा कुवैत खरोखरीच प्रशंसेस पात्र आहे यापैकी अधिकांश मदत तेलसंपदा नसलेल्या गरीब अरब देशांना मिळत असली तरी बिगर अरब व बिगर मुस्लिम देशांनाही कुवैतने मुक्त हस्ताने साह्य केले आहे भारतातील कर्नाटकाच्या काली नदीवरील जलविद्युत् प्रकल्पासाठी कुवैतने ५ कोटी डॉलरचे कर्ज ४ टक्के व्याजाने दिले असून ते २५ वर्षांत फेडावयाचे आहे या करारावर २७–१–७६ रोजी नव्या दिल्लीत सह्या झाल्या भारत व कुवैत यांच्यातील स्नेहाचेच ते प्रतीक समजले जाते

## शिक्षण व समाजकल्याण यावरील खर्च

इतर आखात देशाप्रमाणे कुवैतही आपल्या जनतेच्या कल्याणावर भरपूर पैसा खर्च करीत आहे १९३६–३७ साली कुवैतमध्ये २ शाळा, ६०० विद्यार्थी व २६ शिक्षक होते, हीच संख्या १९७३–७४ साली २६० शाळा, १ लाख ७० हजार विद्यार्थी व १२ हजार ६ शे शिक्षक अशी झाली एकूण विद्यार्थ्यांमध्ये विद्यार्थिनींची संख्या जवळ जवळ निम्मी असून विद्यापीठातील विद्यार्थ्यांमध्ये मुलापेक्षा मुलीच जास्त आहेत शिक्षणाबरोबर खेळाकडेही लक्ष पुरविले जाते कुवैतच्या राष्ट्रीय फुटबॉल संघाने अरेबियन गल्फ सॉकर टूर्नामेंट १९७४ साली लागोपाठ तिसऱ्यादा जिंकली यावरून खेळाकडे किती लक्ष दिले जाते, याची कल्पना येईल

कुवैतमधील सारी घरे, उपाहारगृहे, कचेऱ्या, कारखाने, इतकेच नव्हे तर मोटारीही वातानुकूलित आहेत १९६५ साली खासगी मोटारींची संख्या ५१ हजार होती, ती १९७४ साली १ लाख ६६ हजार झाली यात टॅक्सीज, ट्रक्स, बसेस याचा समावेश नाही. तो केल्यास वाहनाची संख्या अडीच लाखापर्यंत जाते, म्हणजे चार माणसाना एक वाहन असे प्रमाण पडते कुवैतचे रस्ते मोटारींनी कसे गजबजलेले असतात ते पाहिले की देशाच्या समृद्धीचे व ती समृद्धी लोकापर्यंत कशी पोचली आहे त्याचे दर्शन घडते

कुवैती सरकार आपल्या लोकाच्या आरोग्याकडेही खूप आस्थेने लक्ष पुरविते १९७४ पर्यंत कुवैतमध्ये ११ सरकारी इस्पितळे होती व त्यात ३७३१ खाटा होत्या त्याखेरीज प्रसूतिगृहे, दतचिकित्सालये व इतर दवाखाने आहेत येथील सर्व इस्पितळा-तून अद्यतन उपकरणे असून ती वापरणारे सुमारे ७५० डॉक्टर आहेत सुमारे हजार माणसाना एक डॉक्टर असे प्रमाण पडते ज्याप्रमाणे कुवैतमध्ये संपूर्ण शिक्षण मोफत आहे, एवढेच नव्हे तर लायक विद्यार्थ्यांना परदेशातील उच्च शिक्षणासाठीही सरकार आपल्या खर्चाने पाठविते, त्याप्रमाणे औषधपाण्यासाठीही कुवैती माणसाला पदरचा पैसा खर्च करावा लागत नाही

## सांस्कृतिक विकासाला वाव

इतर आखात देशापेक्षा कुवैतमध्ये धर्माचे दडपण फार कमी आहे वेशभूषा व भाषा याच्या बाबतीत तेही तितकेच आग्रही आहेत परंतु अनेक बाबतींतील त्याचा दृष्टिकोण फार उदार आहे उदाहरणार्थ, सहशिक्षणावर कुवैतमध्ये बदी नाही उलट सहशिक्षणाला प्रोत्साहनच दिले जाते एवढेच नव्हे तर शाळा-कॉलेजातील मुली स्कर्ट घालून फिरल्या तरी कोणाच्या डोळ्याना ते खुपत नाही नाटके, चित्रपट याना पूर्ण मोकळीक आहे त्यासाठी आलिशान चित्रपटगृहेही आहेत चित्रकलेवरही मानवी

शरीराचे रेखाटन न करण्याचे इस्लामी बंधन कुवैती लोकानी स्वीकारलेले नाही स्त्री व पुरुषाना एकत्र मिसळण्यास तेथे बदी नाही यामुळे जीवनाच्या विविध क्षेत्रात पुरुषाच्या बरोबरीने स्त्रियाही काम करीत असलेल्या दिसतात या सर्व कारणामुळे येथील वातावरण कसे मुक्त, आनदी वाटते

भारतीयाच्या दृष्टीने कुवैत हा विशेष लोकप्रिय देश असावा असे दिसते कारण येथे भारतीयान्ची सख्या इतर आखात देशातील भारतीयाच्या सख्येपेक्षा सर्वात जास्त म्हणजे सुमारे ४० हजार आहे, आणि धार्मिक कट्टरतेला तेथे स्थान नसल्यामुळे तेथील भारतीयामध्ये बिगर मुस्लिमाची संख्याही बरीच आहे व्यापार, उद्योग व नोकरी या सर्वच क्षेत्रात भारतीयानी प्रवेश मिळविला आहे येथे हिंदूची देवळे, शिखान्चे गुरुद्वारे व ख्रिश्चनाची गिरजाघरे याना मुक्तद्वार आहे येथील एकूण वातावरणच धर्मनिरपेक्षतेचे असल्याचा प्रत्यय येतो

## अन्नस्वावलंबनाच्या दिशेने वाटचाल

कुवैत हा प्रामुख्याने वाळवटी प्रदेश आहे परतु देशाच्या अतर्भागात लहान मरूद्याने ( ओॲसिस ) असून पाण्याच्या विहिरीही आहेत. थोडाबहुत ( सरासरी १०४ मिलिमीटर ) पाऊसही पडतो या सर्वांचा वापर शेती व फळबागा यासाठी केला जातो अर्थात अधिक वस्तीच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न नि:क्षारीकरण संयत्रे बसवून करण्यात आला आहे. ( काही वर्षांपूर्वीपर्यंत कुवैतमध्ये पिण्याचे पाणी शेजारच्या इराकमधून आयात करावे लागत होते ! )

एकेकाळी येथील लोकाचे जीवन मुख्यत. शेळ्या-मेंढ्या व उट याचे पालन करण्यावर अवलबून होते त्याची निर्यातही होत असे परतु अलीकडील काळात शहरीकरणाची प्रक्रिया वेगाने होऊ लागल्यावर वाळवटातील लोक कुवैत या शहरात गोळा होऊ लागले पशुपालनाचा धदा संपुष्टात आला. आता शेती व पशुपालन याना आधुनिक रूप देण्याचा प्रयत्न सरकारने चालविला असून त्यासाठी अद्ययावत उपकरणे, सुधारलेली बी-बियाणे, रासायनिक खते व शास्त्रीय सशोधन याची मदत घेतली जाते या कामी जपानी तंत्रज्ञाचे सहकार्य सरकारला मिळत आहे या सर्व खटपटीमुळे आता कुवैतला लागणारा १३ टक्के भाजीपाला, ६ टक्के दूध, २० टक्के अडी व ४५ टक्के कोंबड्या याचे उत्पादन देशातच होऊ लागले आहे. टोमॅटो, मुळा, काकडी व कलिगड याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते गुराना लागणारे लसूणघास गवत ( ल्यूझर्न ) ही बऱ्याच मोठ्या प्रमाणात उगवले जाते कुवैतमधील एकूण भूमीपैकी सुमारे ३ टक्के जमीन ( सुमारे २७ हजार दोनुम किंवा दीड लाख एकर ) शेतीखाली आणण्यात आली आहे अर्थात लोकाचे मुख्य अन्न तादूळ हेच आहे व येथे तादूळ

पिकत नसल्याने तो बाहेरूनच आणावा लागतो.

मासळीच्या बाबतीत कुवैत हा नेहमीच स्वावलंबी होता आता तर यांत्रिक होड्यांचा वापर सुरू झाल्यामुळे मासळीचे उत्पादन दरसाल १० हजार टनाहून अधिक होते. त्यापैकी निम्मी मासळी देशात खपते व उरलेली निर्यात केली जाते हल्ली दरसाल सुमारे ५० लाख दिनार ( दीडशे कोटी रुपये ) किमतीची मासळी निर्यात केली जाते.

सध्या देशातील शेळ्या-मेंढ्या व उंट यांची संख्या २५८,५०० असून कोंबड्यांची संख्या ३२ लाख आहे. १९७४ साली कुवैतमध्ये १२ टन द्राक्षे, १५ टन डाळिंबे, ३३ टन संत्री व ६०० टन खजूर पिकला. यावरून अन्नस्वावलंबनाच्या दिशेने कुवैतची वाटचाल किती झपाट्याने चालली आहे याची कल्पना येईल

## मर्यादित लोकशाहीचा प्रयोग

तसे पाहिल्यास कुवैत हे एक अमीरात ( संस्थान )च आहे सारे प्रशासनिक अधिकार अमीराच्या ( राजाच्या ) हातात आहेत परंतु इतर आखात देशाच्या मानाने येथे थोडी अधिक लोकशाही आहे देशाला एक राष्ट्रीय विधिमंडळ ( नॅशनल असेंब्ली ) असून तिचे पन्नास सभासद जनतेने निवडलेले असतात २१ वर्षांवरील प्रत्येक पुरुषाला मतदानाचा अधिकार आहे राजकीय पक्षाचे अस्तित्व नसल्यामुळे प्रत्येक उमेदवार स्वतःच्या लोकप्रियतेच्या आधारावरच निवडून येतो या पक्षरहित निवडणुकीमुळे उमेदवार व मतदार यांच्यात प्रत्यक्ष संबंध येतो भाषण-स्वातंत्र्य, लेखन-स्वातंत्र्य व संघटना-स्वातंत्र्य याच्यावर कसलेही बंधन नसल्याने एक प्रकारचे मोकळे वातावरण देशात अनुभवावयास मिळते पंतप्रधान व इतर मंत्री यांची नेमणूक अमीर करतो एक वेगळी गोष्ट म्हणजे विधिमंडळाचा सभासद नसलेल्या इसमालाही तो मंत्री म्हणून नेमू शकतो. विधिमंडळाचे सभासद आपल्यापैकी दोघांची अध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणून निवड करतात विधिमंडळात मोकळेपणाने चर्चा केली जाते सरकारवर टीका करण्याचे स्वातंत्र्यही सभासदांना आहे अंतिम अधिकार अमीराच्या हातात असले तरी विधिमंडळाच्या द्वारे आपले म्हणणे त्याच्या कानावर घालण्याची संधी सभासदांना मिळते सरकारी विधेयक फेटाळून लावणे, मंत्रिमंडळाच्या कामाविषयी चौकशी समिती नेमणे, एवढेच नव्हे तर त्याच्यावर अविश्वासाचा ठराव आणून त्याला राजीनामा द्यावयास भाग पाडणे, वगैरे गोष्टीही हे सभासद करू शकतात. देशाच्या राज्यघटनेमध्ये जनतेला लोकशाही, राजकीय स्वातंत्र्य, समानता व सामाजिक न्याय मिळत राहील याची हमी देण्यात आली आहे जनता हीच सार्वभौम आहे, हे तत्त्वही राज्यघटनेने मान्य केले आहे अमीर गादीवर आल्यानंतर त्याने एक वर्षाच्या आत आपला वारस नियुक्त करावयाचा असतो त्याला राष्ट्रीय विधिमंडळाची मान्यता

मिळवावी लागते अमीराने आपल्या वारसाची अशी निवड केली नसल्यास त्याने ठर-विलेल्या तीन वारसदारांपैकी एकाची निवड भावी अमीर म्हणून विधिमंडळ करते सध्या शेख सबाह अस्सालिम अस्सबाह हे कुवैतचे अमीर असून शेख जाबिर अल अहमद अल जाबिर हे त्याचे वारसदार व पंतप्रधान आहेत आपल्याकडे औंधच्या राजेसाहेबांनी ज्या प्रकारची लोकशाही आपल्या जनतेला दिली होती तशाच प्रकारची ही कुवैत लोकशाही आहे, असे म्हणता येईल *

असा आहे हा कुवैत !

* २९ ऑगस्ट १९७६ रोजी कुवैतचे अमीर शेख सबाह अल सालिम अल सबाह यांनी कुवैतचे राष्ट्रीय विधिमंडळ बरखास्त करून देशाच्या राज्यघटनेचा काही भागही स्थगित केला. त्यामुळे वृत्तपत्रीय व अन्य स्वातंत्र्ये बरीच मर्यादित झाली आहेत

# १४

# 'अल अरबी'ची कामगिरी

ता १० मे रोजी सकाळी भारतीय दूतावासात जाऊन राजदूत श्री रॉय ॲक्सल खान याना भेटलो. नाव जरा विचित्र वाटले. चौकशी केल्यावर समजले की, मुस्लिम पिता व ख्रिस्ती माता याचे ते बगाली सुपुत्र आहेत. परंतु त्याच्याशी बोलताना आपण मैसूरचे असल्याचे त्यानी सागितले गृहस्थ फारच सज्जन वाटले त्याना श्री अप्पासाहेब पत याचे पत्र दिले. त्यानी अप्पासाहेबाची आस्थेने चौकशी केली. श्री खान अविवाहित असून देशसेवेलाच त्यानी आपले जीवन अर्पण केले आहे दूतावासाचे डेकोरेशन त्यानी स्वतःच्या खर्चाने केले असल्याचे समजले तेव्हा त्याच्याबद्दलचा आदर दुणावला दूतावासाचे प्रेस ॲटॅची श्री ओमप्रकाश खन्ना यानी माझा जो कार्यक्रम तयार केला होता त्यात मुख्यत. वृत्तपत्राच्या कचेऱ्याना भेटीच होत्या. भारतीय सास्कृतिक सबध परिषदेने माझी माहिती पाठविताना मी पत्रकार असल्याचे कळविल्याने त्यानी तसा कार्यक्रम आखला, हे स्वाभाविकच होते (वस्तुतः मी माझी जी माहिती दिली होती तिच्यात मी पत्रकार असल्याचा कोठेही उल्लेख नव्हता) म्हणून मी त्याना म्हणालो, "मी पत्रकार नसून लेखक आहे मला फक्त वृत्तपत्रात रस नसून सपूर्ण जीवनाची ओळख करून घेण्याची उत्सुकता आहे त्या दृष्टीने कार्यक्रम आखायला हवा " श्री खन्ना थोडे गडबडले. मला कुणावर तरी सोपवून देऊन स्वतः अग झटकण्याची त्याची इच्छा असावी. पण मी आता अनुभवाने थोडा शहाणा झालो होतो मी म्हणालो, "माझ्याबरोबर कुणी जबाबदार इसम असल्याशिवाय मला इथ काहीच करिता येणार नाही तुम्ही मला वाऱ्यावर सोडून देऊ शकणार नाही " माझा हा रुद्रावतार पाहून श्री खन्ना सावरले; आणि जरा मन लावून माझा कार्यक्रम तयार करू लागले

परतु त्याच्यापेक्षा राजदूत खान यानी माझ्या कार्यक्रमात अधिक लक्ष घातले. माझ्या दौऱ्यातील अभिनवता त्याना समजली होती थोड्याच वेळात श्री खन्ना यानाही माझे म्हणणे पटले; आणि पुढील चार दिवसात ते माझे चागलेच मित्र बनले कुवेतमधील सरकारी व बिन सरकारी मडळींशी श्री खन्ना याचे चागले स्नेहसबध असल्याचे मला आढळून आले

ते मला घेऊन माहिती मंत्रालयात गेले तेथे लोकसंपर्क अधिकारी श्री हातिम अब्दुल गनी याची ओळख त्यानी करून दिली श्री गनी यानी मत्रालयातर्फे प्रकाशित प्रचार साहित्य मला दिले, आणि शक्य तेवढे सहकार्य देण्याचे आश्वासन दिले

मत्रालयातर्फे ‘ अल अरबी ’ नावाचे एक सुदर अरबी मासिक प्रकाशित होते आर्ट-पेपरवर मोहरेदार छपाईत प्रकाशित होणाऱ्या, अनेक रगी चित्रे असणाऱ्या सुमारे १६० पृष्ठाच्या त्या मासिकाची किंमत फक्त १०० फिल्स (३ रुपये) आहे त्याचा खप तीन लाखावर असून ते बहुतेक सर्व अरब देशात जाते त्याचे उपसंपादक श्री मुहम्मद हुस्नी जकी याच्याशी श्री खन्ना यानी माझी ओळख करून दिली. श्री जकी यानी ‘ अल अरबी ’ चे दोन अक मला दिले त्यापैकी जानेवारी १९७६ चा अक हा विशेषाक असून तो २२६ पृष्ठाचा आहे खास अक असूनही तो नेहमीच्या किमतीत दिला जातो या अकात श्री जकी यानी भारतीय मुसलमानासंबधी लिहिलेला ३१ पानाचा एक सविस्तर लेख आहे त्याचे शीर्षक आहे ‘ अल् मुस्लिमून फिल हिंदी ( भारतीय मुसलमान ) यात ४६ साधी व रंगीत छायाचित्रे असून ती सलाह आदम या कुशल छायाचित्रकाराने टिपलेली आहेत तसा या लेखात प्रत्यक्ष प्रचार काही नाही. भारतात ऐतिहासिक काळापासून मुसलमान कसे राहात आले आहेत व त्यानी भारतातील सास्कृतिक जीवनाला कसा हातभार लावला आहे, याचे केवळ वस्तुनिष्ठ वर्णन छायाचित्राच्या आधारे केलेले आहे भारतीय स्थापत्य, शिल्प, कला, साहित्य, प्रशासन वगैरे क्षेत्रातील मुसलमानाच्या कामगिरीचे त्यातून दर्शन घडते कुतुब मिनार, ताजमहाल, अहमदाबादचे हलते मनोरे, जामा मशीद, लाल किल्ला, नद्वतुल उलमा ( लखनौ ) या संस्थेच्या दारुल उलूम या विद्यापीठाची इमारत वगैरे नव्या-जुन्या अनेक स्थापत्याचा त्या कामी उपयोग करण्यात आला आहे भारतीय मुसलमानानी भारताच्या स्वातन्त्र्यसंग्रामात केवढा भाग घेतला तेही विस्ताराने नमूद केले आहे हा सचित्र लेख वाचल्यानतर भारतात मुसलमानाची स्थिती चागली असून अरबानी त्याची चिंता करण्याचे कारण नाही, असा स्पष्ट ठसा वाचकाच्या मनावर उमटतो श्री जकी याना भारतात पाठवून त्याना असा लेख लिहिण्यास प्रवृत्त करणे ही अत्यत मोलाची कामगिरी कुवेतच्या दूतावासाने केली आहे त्याचा सारा प्रवासखर्च व भारतातील खर्च भारत सरकारने केला शिवाय अल अरबी च्या अकराशे प्रती

विकत घेतल्या परंतु याच्या बदल्यात भारताला जे मिळाले त्याचे मूल्य पैशात मोजता येण्यासारखे नाही माहिती मंत्रालयाने या अंकाच्या जादा प्रती काढून त्या अरबी वाचकापर्यंत पोचविल्या त्यामुळे अरब वाचकासमोर भारतीय मुसलमानांचे एक उज्ज्वल व मोहक चित्र उभे राहिले असाच आणखी एक लेख श्री जकी यांनी अल अरबी ' च्या एप्रिल १९७६ च्या अंकात प्रसिद्ध केला असून तो १६ पानांचा आहे त्याचे शीर्षक काश्मीर हिमालयाच्या पायथ्याशी फुललेले एक वनफूल ( कश्मीर . जहरा बरीया अली सफूह अल हिमाल्या ) असे आहे या लेखात २३ रंगीत चित्रे आहेत या लेखातही तसा प्रत्यक्ष प्रचार नाही काश्मीरच्या सौंदर्याची दृश्येच प्रमुख्याने आहेत परंतु एकूण लेख वाचल्यावर काश्मीरी लोक भारतात सुखासमाधानाने नांदत आहेत, अशी छाप वाचकावर पडते हे सारं घडवून आणण्यात श्री खन्ना यांचा फार मोठा हात असावा, कारण ओमानचे राजदूत श्री निर्मल जीत सिंग याच्याप्रमाणेच श्री खन्ना हेही कुवैतमध्ये खूप लोकप्रिय असून त्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात उत्तम स्नेहसंबंध जोडले आहेत, असे मला दिसून आले जद्दामध्ये संपादकाशी बोलताना जी गोष्ट घडून यावी अशी इच्छा मी व्यक्त केली होती ती कुवैतमध्ये प्रत्यक्षात घडल्याचे पाहून मला फार बरे वाटले

तेथून परत आल्यावर रीगल रेस्टॉरंटमध्ये जाऊन परोठा–भाजी व लस्सी असे भोजन घेतले परोठा थोडा वातड होता परंतु लस्सी मात्र चांगली व भरपूर होती येथे लस्सी तुम्हाला एका मोठ्या मगमधून देतात किमान तीन पेले तरी भरतात अर्थात एवढ्या जेवणाचा खर्चही तसाच भरपूर म्हणजे १२ रुपये आला. कालच्या बिलापैकी उरलेले २०० फिल्स मी हॉटेलवाल्याला दिले. ( कारण येथील भत्त्याचे २४ दिनार (६७२ रुपये ) मला मिळाले होते ) ते त्याने इतक्या मक्खपणे स्वीकारले की जणू मी ते दिले नसते तरी त्याला काही वाटले नसते ! थंकलेस प्रामाणिकपणा म्हणतात तो हा !

## फिलिस्तीनी तरुणाचे मनोगत

भारतीय दूतावासातील भाषांतरकार श्री रगदान अदल बशीर हे फिलिस्तीनी ( पॅलेस्टीनियन ) असून त्यांची स्वतःची गाडी आहे व ते फहद सालेम स्ट्रीट जवळच राहात असल्याने मला त्यांच्या गाडीचा वापर करिता आला. त्यांचे शिक्षण इंग्लंडमध्ये बी. ए पर्यंत झाले असून ते लेखक व कवी आहेत २७ वर्षांचे आहेत परंतु अजून अविवाहित आहेत मी त्यांना विचारले, " तुम्ही अजून लग्न का केलं नाही ? " यावर ते हसून म्हणाले, " अहो, लग्न करणं इतकं सोपं का आहे ? त्यासाठी आधी घर पाहिजे. सध्या मी काकाच्या बिऱ्हाडी राहतो ते एकटेच असल्यामुळे ते शक्य

झाल आहे पण लग्न केल्यावर स्वतत्र बिऱ्हाड कराव लागेल त्याच्या सजावटीला किमान ३ हजार दिनार ( ३० हजार रुपये ) लागतील शिवाय पत्नीला २०० ते ५०० दिनार एवढा हुडा ( मेहेर ) द्यावा लागतो एवढे पैसे जमल्याशिवाय मला लग्नाचा विचारही करता यायचा नाही आधी थोडे पैसे मिळवून इग्लडला जायच आणि पीएच डी करायची असा माझा विचार आहे ते झाल्यावर मग लग्नाचा विचार !"

पी एल ओ (पॅलेस्टाइन लिबरेशन ऑर्गनायझेशन) या संघटनेशी आपला काही संबध नाही, परंतु त्या लोकाविषयी आपल्याला सहानुभूती वाटते असे त्यानी सागितले इस्राईलने देशोधडीला लावलेल्या अरबाची कशी दुर्दशा झाली आहे व त्याचे किती हाल होत आहेत, हे पाहिले की त्याच्याविषयी आपल्यालाही खूप सहानुभूती वाटू लागते

## कुवेती पत्राचे भारतीय संपादक

सायकाळी श्री खन्ना याच्या बरोबर 'कुवैत टाइम्स' या इग्रजी दैनिकाच्या कचेरीत गेलो त्याचे संपादक श्री दारा कडवा हे भारतीय पारशी आहेत हे पत्र भारताला अनुकूल आहे भारताविरुद्ध प्रचार करणारे 'डेली न्यूज हे आणखी एक इग्रजी दैनिक येथे होते परतु ते अलीकडेच बद पडले आहे त्या पत्राची मालकी ज्या सस्थेकडे होती तिचेच एक अरबी दैनिक असून ते भारताविरुद्ध जोरदार प्रचार करीत असते त्याला मुस्लिम ब्रदरहुड या जातीय सस्थेचा व पाकिस्तानचा पाठिंबा आहे

श्री कडवा याच्याशी मनमोकळी चर्चा झाली ते म्हणाले, "कुवेती लोक बिगर-कुवेती लोकाशी सबध ठेवू इच्छित नाहीत त्यामुळ इतर अरबानाही कुवेतच नागरिकत्व सहजासहजी मिळत नाही इतर अरब देशापेक्षा इथ पुष्कळच लोकशाही आहे. विचारस्वातत्र्य हा लोकशाहीचा आत्मा तो अजून तरी टिकून आहे इथ स्त्रियाना मतदानाचा अधिकार नाही तो मिळावा म्हणून त्याची खटपट चालू आहे वृत्तपत्रातून त्यावर चर्चाही चालते परंतु इथले पुरुष अथवा सरकार तिकडे फारस लक्ष देत नाहीत याच कारण अस की, सामाजिक राजकीय सुधारणाच्या बाबतीत सऊदी अरबस्तानच्या फार पुढ जाण्याची इथल्या लोकाना भीती वाटते त्यामुळ इथले विचारस्वातत्र्यही कायम टिकून राहील अशी खात्री देता येत नाही इथ भारतीयाची संख्या खूप मोठी आहे पण इथल्या लोकाना भारताच महत्त्व फारस वाटत नाही त्याच सार लक्ष पाश्चात्त्य देशाकडे असत त्याच्या एवढी तरी निदान भौतिक प्रगती आपण केली पाहिजे, असं त्याना वाटत "

कुवैत टाइम्स 'च्या कार्यालयात आम्ही बसलो असता दैनिकाच्या छायाचित्रकाराने आमची काही छायाचित्रे घेतली तिसरे दिवशी माझ्या छायाचित्रासह माझी माहिती देणारी बातमीही प्रसिद्ध झाली पण ती शेवटच्या पानावर व अगदी तळाला होती. त्यामुळे मला ती पाहून 'केसरी 'तील गृह्यसंस्कार ' या शीर्षकाखालील जाहिरातीची आठवण झाली त्या बातमीचा एकच फायदा झाला श्री रवींद्र नावाचे एक केरळीय गृहस्थ मला शोधत होते त्यानी त्या बातमीतील छायाचित्रावरून मला ओळखले, ( अर्थात त्याचा मला काहीच उपयोग झाला नाही. ही गोष्ट वेगळी ' ) आणि मुंबईचे श्री कारखानीस नावाचे गृहस्थ टाटाच्या कोणत्याशा प्रकल्पासाठी कुवैतला आले होते, त्यानी मला फोन करून माझ्या उपयोगी पडण्याची तयारी दाखविली परंतु त्याच्या सहकार्याचाही मला काही उपयोग करून घेता आला नाही.

## ' अल सियासा 'च्या संपादकाशी भेट

'कुवैत टाइम्स 'च्या मालकाचे ' अल सियासा ( सियासत=राजकारण ) हे अरबी दैनिक त्याच इमारतीतून प्रकाशित होते त्याचे संपादक श्री अहमद जारल्ला याना आम्ही भेटलो ते गृहस्थ भारतात जाऊन आले असल्यामुळे त्याना भारतातील परिस्थितीची चागली माहिती आहे. ते स्वतः भारताला अनुकूल आहेत. 'अल सियासा '-चा खप ४० हजार असून त्याच्या १६ पानी अंकाची किंमत ५० फिल्स ( सुमारे दीड रुपया ) असते इतर आखात देशामध्ये लोकाना वृत्तपत्रवाचनाची आवड किंवा सवय फारशी नाही कुवैती लोक त्या मानाने अधिक वाचनप्रिय आहेत शिवाय बातम्यावर निर्बंध नसल्याने कुवैती वृत्तपत्रे अधिक वाचनीय असतात येथील पत्रात प्रामुख्याने ईजिप्त, लेबॅनॉन, जॉर्डन वगैरे देशाच्या बातम्या असतात कारण त्या देशाचे नागरिक या पत्राचे वाचन अधिक प्रमाणावर करतात धार्मिक कट्टरतेपासून कुवैत अलिप्त असल्यामुळे ' अल सियासा ' सारख्या तटस्थ पत्राना मोठा वाचकवर्ग मिळतो हे पत्र प्रसगविशेषी पाकिस्तानवरही टीका करते

आखात देशापैकी कुवैत हाच देश पत्रकारितेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे तेथे १२ अरबी दैनिके व ४० साप्ताहिके–मासिके निघतात ती साऱ्या आखात देशात जातात म्हणून कुवैती प्रेस महत्त्वाचा समजला जातो या प्रेसचे वैशिष्ट्य असे की, यातील बहुतेक तत्रज्ञ भारतीय आहेत विशेषतः इग्रजी प्रेस तर भारतीयाच्याच हातात आहे भारताविरुद्ध प्रचार केला तर येथील वृत्तपत्रे बद पाडण्याचे सामर्थ्य भारतीय तत्रज्ञात आहे. मध्यतरी ' अल सियासा 'मध्ये पाकिस्तानच्या चिथावणीमुळे भारताविरुद्ध चार लेख प्रकाशित झाले होते तेव्हा तात्रिक बिघाडाच्या कारणावरून ते पत्र दोन दिवस बद ठेवावे लागले होते त्यानतर अशी चूक घडणार नाही, याची खबरदारी ते पत्र

घेऊ लागले भारतीय दूतावासाचे सरकारशी स्नेहसंबध असल्यामुळे काही गोष्टी सरकारतर्फेही घडवून आणल्या जातात एक अरबी साप्ताहिक भारताविरुद्ध फारच खोटानाटा प्रचार करू लागले तेव्हा सरकारच्या मार्फत त्याचे पाक्षिकात रूपातर करविण्यात आले वृत्तपत्रातून जेव्हा भारताविरुद्ध प्रचार केला जातो तेव्हा भारतीय दूतावासाला त्याचा प्रतिवाद करण्याची गरज भासत नाही कारण स्थानिक भारतीय लोक व काही कुवैती मित्र परस्परच त्या प्रचाराला उत्तर देतात स्थानिक जनतेशी स्नेहसबध जोडण्यात कुवैतचा भारतीय दूतावास यशस्वी झाला आहे, त्यामुळेच हे शक्य होते त्याबाबतीत पाकिस्तानने काहीच प्रयत्न केला नसावा, असे दिसते त्याचा सारा भर धार्मिक भावनेवरच असतो

## गझल-गायक सिंग व चित्रकार अनीता

या सदर्भातील दोन घटना येथे नमूद करण्यासारख्या आहेत- प्रख्यात गझलगायक श्री जगजित सिंग व त्याच्या पत्नी श्रीमती चित्रा सिंग याच्या गझलगायनाचा दौरा येथे आयोजित करण्यात आला होता या प्रदेशात गझलगायनाची गोडी अरबामध्ये विशेषत्वाने दिसून येते त्यामुळे या दापत्याच्या कार्यक्रमाना खूप श्रोते मिळाले त्या वेळी पाकिस्तानी नागरिक व अधिकारी यानी या कार्यक्रमाना हजर राहू नये असा गुप्त फतवा पाक दूतावासातर्फे काढण्यात आला होता परतु त्याला न जुमानता पाक जनता व अधिकारी मोठ्या संख्येने या कार्यक्रमाना हजर राहिले; एवढेच नव्हे तर काही अधिकाऱ्यानी आपल्या निवासस्थानीही त्याचे कार्यक्रम करविले या कार्यक्रमामुळे भारताविषयी कुवैती लोकामध्ये चागलीच आपलेपणाची व आदराची भावना निर्माण झाली

असाच काहीसा परिणाम कुमारी अनीता खन्ना या तरुण चित्रकर्त्रीच्या चित्रप्रदर्शनामुळे घडून आला अनीता ही श्री ओमप्रकाश खन्ना याची कन्या १९५० साली स्टॉकहोममध्ये जन्मलेली. तिने कुठल्याही कलाविद्यालयात रीतसर शिक्षण घेतलेले नाही दिल्ली विद्यापीठातून समाजकार्य हा विषय घेऊन ती १९७४ साली एम ए झाली, आणि त्यानतर तिने चित्रकलेला वाहून घेतले तिच्या चित्राचे प्रदर्शन कुवैतमध्ये ता ५ ते १० मार्च १९७५ या मुदतीत भरले होते कुवैतच्या अमीराचे विशेष सल्लागार शेख अब्दुल्ला अल जाबर अस्सबाह यानी प्रदर्शनाचे उद्घाटन केले प्रदर्शनात ७५ चित्रे होती सर्व वृत्तपत्रानी या प्रदर्शनाची मुक्त कंठाने प्रशसा केली अरब देशात, विशेषतः कुवैतमध्ये आपल्या चित्राचे प्रदर्शन भरविणारी अनीता ही बहुधा पहिलीच भारतीय चित्रकार असावी परपरागत भारतीय चित्रकला व आधुनिक चित्रकला याचा सुरेख संगम अनीताच्या चित्रात पाहावयास मिळतो श्री खन्ना

यानी यातील काही प्रमुख चित्रावर भाष्य करून त्याच्या मुळाशी असलेल्या भारतीय संस्कृतीचे दर्शन शब्दात घडविल्यामुळे प्रेक्षकाना चित्राचे रसग्रहण करणे सोपे गेले हे प्रदर्शन कुवैतच्या नॅशनल कौन्सिल ऑफ कल्चर, आर्टस अँड लिटरेचर या सस्थेच्या वतीने तिच्याच दालनात भरविण्यात आले होते यामुळे साहजिकच कुवैती चित्र-कारानी त्यात विशेष रस घेतला प्रदर्शनातील 'फिलिस्तीन (पॅलेस्टाइन) या चित्राने स्थानिक पॅलेस्टीनियन पुढारी इतके प्रभावित झाले की, त्यानी अनीताच्या घरी जाऊन तिला पॅलेस्टीनियन पोषाख देऊन तिचा गौरव केला एकूण प्रतिक्रिया पाहता हा कार्यक्रम कुवैती लोकाना खूपच आवडला असे दिसते

## मराठी पाहुणचार

भारतीय दूतावासात एक नवीन तरुण नुकतेच कामावर रुजू झाले होते त्याचे नाव श्री तलमीज अहमद श्री खन्ना यानी मला सागितले की, "तुमच्या पुण्याचे एक तरुण तुम्हाला भेटू इच्छितात चला, मी तुम्हाला त्याच्याकडे घेऊन जातो" आणि ते श्री तलमीज अहमद याच्याकडे घेऊन गेले ते गोरे, हसतमुख, देखणे तरुण आहेत मी त्याच्याशी मराठीत बोलू लागलो ते अडखळत एखादा शब्द बोलून उत्तर देऊ लागले मी ओळखले, ही स्वारी पुण्याची नाही! नतर समजले की ते मुबईचे असून पुण्यात फर्ग्युसन कॉलेजात शिकायला होते कारण त्या वेळी त्याचे वडील फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये काम करीत होते फर्ग्युसनमध्ये कु मुकुल तावडे या देखण्या मुलीची ओळख झाली ओळखीचे रूपातर प्रेमात, व प्रेमाचे लग्नात. ठरल्या-प्रमाणे मुकुलच्या घरच्या लोकाचा विरोध परंतु ती आपल्या निश्चयाला चिकटून राहिली कौतुकाची व अभिनदनीय गोष्ट म्हणजे दोघापैकी कुणीही धर्मपरिवर्तन केले नाही. एक गोडसा छोकरा झाला आहे त्याचे नाव आश्विन (कारण त्याचा जन्म आश्विन महिन्यात झाला आहे)

श्री तलमीज अहमद म्हणाले, "मी तसा पुण्याचा नव्हे पण माझी बायको पुण्याची आहे. तुम्ही तिला भेटलात तर तिला फार आनद होईल. इथ मराठी बोलणारी पुष्कळ मडळी आहेत म्हणे; पण अजून आमची त्याच्याशी ओळख झालेली नाही"

त्यानी रात्रीच्या जेवणाचे निमत्रण दिले; आणि मी भटजी अधाशीपणाने ते तात्काळ मान्य केले त्याप्रमाणे श्री खन्ना यानी मला त्याच्या घरी पोचविले खास मराठी बेत होता परतु चपाती मात्र बाजारची नान! स्वयपाक छान झाला होता सौ मुकुल अहमद साडी, कुकू, मगळसूत्र यासह पुणेरी ब्राह्मण असल्याचे चटकन कळून येत होते त्याच्या प्रेमळ आतिथ्याबद्दल आभार मानून मी त्याना भारतीय

मुसलमान ' हे माझे पुस्तक भेट दिले व त्याचा धर्मसमन्वयवादी संसार सुखाचा होवो असा आशीर्वाद दिला

श्री अहमद यानी भारतातून एक नोकर ( नेपाळी मुलगा ) नेला आहे त्यासंबंधी बोलणे चालू असता सौ. मुकुलताई म्हणाल्या, " इथ नोकराची फार चणचण असते आश्विनसाठी आम्हाला नोकर आणावा लागला त्याला आम्ही जेवणखाण, कपडालत्ता वगैरे सारा खर्च करून तीनशे रुपये पगार देतो इथ याच्या तिप्पट-चौपट पगार मिळतो शेजार-पाजारचे नोकर अशा कमी पगारवाल्या नोकराना फितवून पळवून दुसरीकडे नेतात. पण-आम्ही आमच्या नोकराला सर्व परिस्थितीची कल्पना दिली आहे तोही समजूतदार आहे शिवाय त्याला आश्विनचा लळा लागलाय त्यामुळं तो सोडून जाणार नाही, अस वाटतय "

## जामिया कुवैत

ता १२ रोजी सकाळी माहिती मत्रालयाची गाडी घेऊन गाझी जसीम हा तरुण आला कुवैत शहर दाखविण्याची जबाबदारी त्याच्यावर होती श्री अब्दुल मजिदही बरोबर आले आम्ही प्रथम कुवैत विद्यापीठ ( जामिया कुवैत ) पाहावयास गेलो आम्ही लोकसपर्क अधिकाऱ्याच्या कचेरीत गेलो शिरस्त्याप्रमाणे चहाचे पेले येत होते आणि रिकामे होत होते एक तास त्यातच गेला जसीम व माजिद याना बहुधा आपण चहा पिण्यासाठीच आलो आहोत असे वाटले असावे. अखेर मी वैतागलो आणि माजिदला म्हणालो, " अहो, आपण विद्यापीठ पाहायला आलोत ! " तेव्हा कुठे त्यानी जरा हालचाल केली, आणि विद्यापीठाचा माणूस बरोबर घेऊन आम्ही विद्यापीठ पाहायला निघालो

सर्वांत प्रथम माझे लक्ष वेधून घेतले सभोवतालच्या वनश्रीने नाना प्रकारच्या लहान-मोठ्या झाडानी या परिसराचा बराच मोठा भाग व्यापला आहे वाळवटातील ती हिरवीकच्च झाडे डोळ्याना सुखवितात तसे हे विद्यापीठ नवीनच आहे नवनवीन इमारती अजून उभारल्या जात आहेत त्यात मला भपक्यापेक्षा साधेपणाच अधिक दिसला व मला तो आवडलाही विद्यापीठाच्या या आवारात सध्या फक्त विज्ञानविभाग सुरू करण्यात आला आहे त्यामुळे विभिन्न विज्ञानशाखाच्या प्रयोगशाळा, वर्ग व ग्रथालय एवढ्याच वस्तू पाहण्यासारख्या आढळल्या कला व विधी ( कायदा ) याचे वर्ग जुन्या शुवेख माध्यमिक विद्यालयात भरतात जसीम या विद्यालयाचा माजी विद्यार्थी त्यामुळे त्याने तेथील इमारती व बागा आस्थेने दाखविल्या शुवेखच्या आवारात तर दाट झाडी आहे तेथील जुन्या इमारतीही मोठ्या प्रशस्त व राजेशाही वाटल्या या ठिकाणी जुन्या कुवैती गलबताचा ( ' बूम 'चा ) नमुना पाहावयास

मिळाला त्यात वैशिष्ट्य असे काही दिसले नाही

या विद्यापीठात ६००० विद्यार्थी असून ४००० प्राध्यापक आहेत विद्यार्थिनींची संख्या जवळजवळ निम्मी आहे स्कर्टसारखा आधुनिक पोषाख केलेल्या तरुणी मुला-बरोबर मोकळेपणाने हिंडता-फिरताना पाहिल्या—आणि मनाला बरे वाटले

काही वर्षांपूर्वी कुवैत विद्यापीठात बरेच भारतीय प्राध्यापक होते, परंतु आता त्याची संख्या बोटावर मोजता येण्याइतकीच राहिली आहे याचे कारण मात्र समजू शकले नाही कदाचित विज्ञानाशिवाय इतर सर्व विषय अरबीत शिकविले जाऊ लागल्याने हा फरक घडून आला असावा कारण भारतीयाना इग्रजीखेरीज अन्य माध्यमातून शिकविण्याची सवयच नाही

तेथून सार्वजनिक इस्पितळ, प्रसूतिगृह, बदर वगैरे पाहावयास गेलो इस्पितळ व प्रसूतिगृह याच्या इमारती उत्कृष्ट असून तेथे आधुनिक उपकरणाचा वापर कुशलतेने केला जातो असे समजले मुख्य म्हणजे अरबाना प्रसूतिगृहाचा वापर करण्याची सवय लागली आहे, हे महत्त्वाचे बदरामध्ये नेहमीप्रमाणेच आगबोटींची गर्दी दिसली

## एका भारतीय अरबाची भेट

त्याच दिवशी दुपारी श्री खन्ना हे मला श्री खालिक अब्दुल रज्जाक याच्या घरी घेऊन गेले श्री रज्जाक याचे एक कुटुब मुबईतही आहे आणि त्याना उत्कृष्ट उर्दू येते एवढेच नव्हे तर उर्दू साहित्याचा त्याचा व्यासंगही चागला आहे त्याच्या दिवाणखान्यात उर्दूची बरीच पुस्तके मला दिसली म्हणूनच मी त्याना भारतीय अरब म्हटले आहे ते पूर्वी कुवैतचे मत्री होते; आणि स्थानिक राजघराण्याशी त्याचे चागले स्नेहसबध आहेत ते कुवैतचे मोठे व्यापारी असून अर्थातच लक्षाधीश आहेत त्यामुळे कुवैतमधील एक प्रतिष्ठित व वजनदार असामी म्हणून ते प्रसिद्ध आहेत ते आता सुमारे ७० वर्षांचे असून त्याचे चिरंजीव त्याचा व्यापार पाहतात एक चिरजीव कुवैतच्या सैन्यात मोठ्या हुद्द्यावर आहेत

प्रसिद्ध गझलगायक श्री जगजितसिंग व त्याच्या पत्नी श्रीमती चित्रा सिंग याना भारतातून बोलावून घेण्यात श्री रज्जाक याचाच पुढाकार होता ह्याना त्यानी आप-ल्याच आलिशान बगल्यात ठेवून घेतले होते त्याच्या बगल्याचे वैभव त्याच्या दिवाण-खान्यातील मौल्यवान वस्तूवरूनच माझ्या लक्षात आले

श्री रज्जाक याच्याशी गप्पा मारताना त्यानी एक महत्त्वाची सूचना केली ते म्हणाले, " इथले बरेचसे शेख व श्रीमत लोक भारतात जातात; परतु त्याच्याकडे कोणी लक्ष देत नाहीत वस्तुतः त्याची योग्य ती वास्तपुस्त भारतीयानी केली तर त्याच्याकडून भारताला पुष्कळच साह्य होऊ शकेल. त्याच्याजवळ भरपूर पैसा

असल्यामुळ त्याच्यासाठी पैसा खर्च करण्याची काही जरूर नाही पण युरोपीय लोकाची तुम्ही जशी आस्थेन चौकशी करता तशी त्याची करीत नाही याच त्याना वैषम्य वाटत भारतात थड हवेची पुष्कळ ठिकाणे आहेत त्यासाठी युरोपात जाण्याची काही गरज नाही, हे मी इथल्या श्रीमताना समजावून सागत असतो त्यानाही ते पटू लागलय शिवाय युरोपपेक्षा भारत जवळ आहे आणि तिथल जीवनमानही खूपच स्वस्त आहे त्यामुळ कुवैती लोकाना भारतात जाण अधिक सोयीचं आहे. त्या दृष्टीनं भारताच्या पर्यटन विभागान प्रयत्न मात्र केले पाहिजेत "

मी म्हणालो, " यापुढ पुण्याला तुमच्यापैकी कुणी आल तर तिथल्या थोरा-मोठ्याच्या भेटी घडवून आणण्याचा मी प्रयत्न करीन मात्र त्याची पूर्वसूचना मला वेळेवर मिळाली पाहिजे. "

महाराष्ट्राचे मत्री श्री झकेरिया व त्याची इडो-अरब असोसिएशन याच्याविषयी श्री रज्जाक याचे मत खूपच प्रतिकूल दिसले ते म्हणाले, " ही मडळी भारत-अरब मैत्रीसाठी काहीच करीत नाहीत इकडे येतात आणि भेटी गोळा करून घेऊन जातात त्यानी वैयक्तिक स्वार्थासाठीच ही संस्था आतापर्यंत वापरली आहे "

## कुमारी अनीता खन्नाची चित्रकला

सायकाळचा वेळ श्री खन्ना याच्या घरी घालविला त्याची कन्या कुमारी अनीता हिची चित्रे मी पाहिली आणि चागलाच प्रभावित झालो तिचा परिचय-लेख लिहिण्याच्या दृष्टीने तिची मुलाखतही घेतली 'अविभक्त विभक्तेषु' हे आतरभारतीचे ब्रीद साकार करणारी १६० सें मी × १६० सें मी या आकाराची तिची दोन चित्रे स्थानिक एअर इडियाच्या नव्या कचेरीत लावण्यात आली आहेत मैसूरचे स्वामी गणपती सच्चिदानद आणि बुद्ध ही तिची दोन चित्रेही अशीच प्रभावशाली आहेत वडिलाबरोबर वेगवेगळ्या देशात राहण्याची संधी मिळाल्यामुळे तिच्या चित्र-कलेत खूपच विविधता आली आहे स्वभावाने फारच सालस मुलगी वाटली

थोडा वेळ चौपाटीवर भटकण्यात घालविला तेथील कारंजे आधुनिक शिल्पकलेचा एक आगळा नमुना या दृष्टीने प्रेक्षणीय वाटले. तिकडे जाताना सालेमिया भागात एका भारतीय शिल्पाने बाधलेली आधुनिक मशीद पाहिली मशिदीच्या बाबतीत एक ठराविक 'पॅटर्न' प्राचीन काळापासून चालत आला आहे त्या नमुन्याबाहेर सहसा कोणी जात नाही परतु या मशिदीत अद्यतन शिल्प वापरण्यात आले आहे तिचे मनोरे गोल असण्याऐवजी चौकोनी आहेत लाल राजस्थानी दगडात बाधलेली ती मशीद खरो-खरीच प्रेक्षणीय वाटली कुवैती लोक जुन्या कल्पनातून बाहेर पडून नव्याचा स्वीकार करण्यास किती उत्सुक आहेत, हेच तिच्यावरून दिसून येते

## कुवैत डेअरी कंपनीला भेट

ता १३ मेची सकाळ फुकटच गेली परंतु दुपारनंतरचा वेळ चांगला सत्कारणी लागला राजदूत श्री रॉय अॅक्सल खान यांच्या प्रयत्नामुळे मला कुवेत डेअरी कंपनी ही मध्यपूर्वेतील सर्वात मोठी डेअरी कंपनी पाहावयास मिळाली ही कंपनी वेगवेगळ्या डेअरी फार्मांची युनियन आहे सरासरी ५० ते १०० गाई असलेले ९ फॉर्म कुवैतमध्ये आहेत त्यातून दररोज १४ टन दूध निघते ते पाश्चराइझ करून बाटल्यात भरून विकतात मुख्यत: इस्पितळानाच दूध दिले जाते परंतु खासगी ग्राहकानाही ते पुरवितात ओमानच्या लोकाना गाईच्या दुधाची सवय आहे परंतु कुवैतमध्ये जपानप्रमाणे गाईचे दूध ही नवीच वस्तू आहे हळूहळू दुधाची आवड कुवैती लोकामध्येही निर्माण होईल, अशी चिन्हे दिसत आहेत

१९६० साली ही कंपनी सुरू झाली त्या वेळी एका लिटरला २०० फिल्स ( ६ रुपये ) ही जी किंमत ठरविण्यात आली होती, तिच्यात अजून वाढ करण्यात आलेली नाही इतर वस्तूच्या किंमती पाहता दुधाचा हा भाव फारच स्वस्त आहे असे मला वाटले

या कंपनीचे व्यवस्थापक श्री कुट्टी नावाचे एक भारतीय गृहस्थ आहेत. परंतु मी गेलो त्या वेळी ते घरी गेले होते म्हणून त्याची भेट झाली नाही त्याच्या हाताखाली काम करणारे डॉ ए सलमान या पॅलेस्टीनियन गृहस्थानी मला डेअरीची माहिती दिली, आणि डेअरी फार्म दाखवून आणण्यासाठी आपला माणूस माझ्याबरोबर दिला डॉ सलमान हे दुग्धविषयातील जागतिक तज्ज्ञ असून यूनोने त्याना नेपाळमध्ये या विषयाचे सल्लागार म्हणून पाठविले होते ते म्हणाले, " कुवैतची खरी समस्या पाण्याची आहे इथल्या भूगर्भात पाण्याचा साठा फार थोडा आहे त्यामुळ सारं पाणी समुद्रा-तून शुद्ध करूनच घ्याव लागत त्यासाठी जागजागी नि:क्षारीकरण संयत्र बसविण्यात आली आहेत पण नैसर्गिक पाण्याची सर या कृत्रिम पाण्याला येत नाही "

या फार्ममध्ये काळ्या-बाळ्या रंगाच्या जर्सी जातीच्या गाई आहेत इंग्लड, अमेरिका व ऑस्ट्रेलिया येथून त्या आणल्या आहेत डॉ सलमान याना मी विचारले,

" इथल्या हवामानाशी जुळणार हवामान भारतातल्या पंजाब, राजस्थान, कच्छ, सौराष्ट्र या भागात आहे तिथल्या गाई इथ आणण जास्त फायदेशीर ठरणार नाही काय ? "

यावर ते म्हणाले, " तुमचा मुद्दा बरोबर आहे पण भारतीय गाई जर्सी गाई-इतक दूध देत नाहीत आमच्या गाईंचा दुधाच्या बाबतीत जगात तिसरा क्रमाक आहे. . "

सुरू सारख्या उंच झाडांची सावली असलेल्या उघड्या आवारात या गाई ठेवलेल्या आहेत त्यांचे शेणमूत तेथेच पडते ते वर्षातून फक्त तीनदा हलवितात आणि खत म्हणून त्याचा वापर करतात फक्त पहिल्यादाच नैसर्गिक गर्भधारणा होऊ दिली जाते. त्यानतर कृत्रिम प्रजनन चालू होते पाडी ( कालवड ) १८ महिन्याची झाल्यावर तिला वळू दाखवितात परतु त्याची पद्धतही जरा वेगळी आहे अशा कालवडींना एका बदिस्त आवारात ठेवतात आणि त्यात एक किंवा दोन उत्तम वळू सोडतात त्यांच्या सहवासात कालवडींना दोन महिने राहू देतात, आणि मग गर्भधारणा झाली आहे किंवा नाही याची तपासणी डॉक्टराकडून करवून घेतात भाकड गाईसाठी एक वेगळे आवार आहे लहान वासराना बदिस्त छपरीत ठेवतात. तेथे पखे लावून कूलरच्या साह्याने हवा थड राहील अशी व्यवस्था केलेली असते दुभत्या गाईंना दिवसातून तीनदा गोठ्यात नेऊन यत्राच्या साह्याने त्याचे दूध काढतात

या गाईसाठी इराकमधून गवत व पेंढा आणला जातो इतर खाणेही असतेच शास्त्रशुद्ध खाणे तयार करणारे एक यत्रही येथे आहे त्याखेरीज फार्मच्या आवारात हिरवे ल्यूसर्न गवत ( घास ) उगविले जाते

हे डेअरी फार्म पाहिल्यानतर भारतातील दुग्ध-उत्पादकाच्या कर्तृत्वाला येथे चागला वाव आहे, असा विचार माझ्या मनात येऊन गेला

## कुवेती माणसाचे वैशिष्ट्य

सायकाळी राजदूत श्री खान याच्या निवासस्थानी गेलो तेथे त्याच्याशी मनमोकळे-पणाने गप्पा-गोष्टी झाल्या ते म्हणाले, " अरब लोकाविषयी आपल्याकडे फारच चुकीच्या कल्पना रूढ आहेत अरब हे आडमुठे व मठ्ठ आहेत असं आपण आजवर समजत आलो पण ते अगदी चूक आहे ते आपल्यासारखेच हुशार आहेत किंबहुना प्राचीन काळापासून व्यापारामुळ जगाशी सबध आल्यान ते आर्थिक व्यवहाराच्या बाबतीत आपल्यापेक्षा खूपच चाणाक्ष आणि तरबेज आहेत अरबामध्येही कुवेती लोक जास्त बुद्धिमान आहेत त्याचा जगाचा अनुभव इतरापेक्षा अधिक आहे

" इथल्या तरुणामध्ये भारताचं आकर्षण वाढत आहे पाश्चात्त्य देशातील विश्व-विद्यालयात प्रवेश मिळविण सहज शक्य असूनही इथले विद्यार्थी भारतीय विद्यापीठात जाऊ इच्छितात गतवर्षी आम्ही २५ तरुणाना भारतीय विद्यापीठात प्रवेश मिळवून दिला सास्कृतिक जवळीक असल्यान त्याना भारतात मोकळेपणा वाटतो पाश्चात्त्य देशात त्याना परक्यासारखं, एकाकी वाटत तसा कुवेती माणूस धर्मवेडा—फॅनॅटिक—नाही इतरानी आपला धर्म स्वीकारावा, अशी खटपट तो कधी करीत नाही ज्यान-त्यान आपापला धर्म आचरावा, अशीच त्याची भूमिका असते. किंबहुना धर्माविषयीची

त्याची ओढ फारच मर्यादित आहे कलेच त्याला आकर्षण आहे, पण इतर अरबा-प्रमाण तो नुसत्या इस्लामी कलेतच गुरफटून राहात नाही त्याची नजर भविष्यकाळा-कडे आहे त्याला पुराणवस्तुसशोधनात फारसा रस नाही काही वर्षांपूर्वी डॅनिश लोकानी फैलका बेटावर उत्खनन सुरू केल होत त्याच्या सरकारची मदत बद झाल्यावर त्यानी कुवैत सरकारकडे मदत मागितली पण ती न मिळाल्यामुळ पुरा-तत्त्वसंशोधकाना आपल काम थाबवाव लागल खरं म्हणजे कुवैती लोक आपला भूतकाळ विसरू पाहात आहेत म्हणून तर त्यानी जुन्या कुवैतच नावनिशाणही शिल्लक ठेवलेल नाही

" कुवैती लोकाना भारताविषयी खास आत्मीयता वाटत असल्यामुळच त्यानी कुवैत फडाची सर्वात मोठी रक्कम काली नादीवरील जलविद्युत् प्रकल्पासाठी दिली आहे "

## फैलका सफरीचा फज्जा

कुवैतला गेल्यानतर प्रामुख्याने दोन ठिकाणाना भेट देण्याची इच्छा मी व्यक्त केली होती पहिले म्हणजे कुवैत शहरापासून ५० कि मी. दूर असलेले अहमदी हे कुवैत ऑईल कपनीचे मुख्यालय असलेले तेलक्षेत्र एक लहानसे गावच तेथे वसले असून त्याला मिळालेले, ' वाळवटातील फिनिक्स पक्षी हे नाव तेथील रम्य वनश्रीने सार्थ बनविले आहे परतु वाहनाच्या अभावी ते शक्य झाले नाही

कुवैतच्या किनाऱ्यापासून थोड्या अंतरावर असलेले फैलका हे बदर तेथील पुराण-वस्तुसंशोधनाच्या उत्खननामुळे प्रसिद्ध झाले आहे कुवैतचे लोक सुटीचा आनद लुटण्यासाठी या बेटावर सहलीला जातात तेथे जाण्याची इच्छा मी व्यक्त केली आणि कुवैत सरकारच्या माहिती खात्याने ती तत्काळ मान्य केली- त्यासाठी १४ मे चा शुक्रवार मुकर करण्यात आला कुवैतमधील व आखात देशातील माझ्या वास्त-व्याचा तो शेवटचा दिवस. आपल्या प्रवासाची सागता अशा उत्कृष्ट कार्यक्रमाने होणार म्हणून मनातल्या मनात मी फार खुष होतो.

सकाळी बरोबर साडे आठ वाजता श्री अब्दुल माजिद याच्याबरोबर मी ' अल अबाज ' या नौकेवर जाऊन पोचलो. गाझी जसीम हा मत्रालयाचा इसम आमच्या बरोबर येणार होता परतु त्याने त्या बदराला अनेकदा भेटी दिल्या असल्यामुळे त्याने कटाळा केला असावा. त्याने आम्हा दोघाची तिकिटे पाठवून दिली होती- दर माणशी तिकीट ५ दिनारचे ( १५० रुपयाचे ) असते त्यामध्ये सकाळची न्याहारी, दुपारचे जेवण आणि तेथील फिरणे याचा समावेश असतो

हवा ढगाळ होती अधून-मधून पावसाचे थेंबही पडत होते तरीपण आम्ही त्या

धाऊ ( बूम )च्या आकाराच्या पण वस्तुतः यन्त्रचलित असलेल्या होडीवर जाऊन आरामात बसलो वसायला सतरज्या व टेकायला उशा होत्या हवेत चागलाच गारवा असल्याने मोठे प्रसन्न वाटत होते होडीवर सुमारे ८० स्त्री-पुरुष व मुले होती त्यामध्ये स्थानिक लोक दिसले नहीत युरोपियन, ईजिप्शियन, पाकिस्तानी व इतर अरब लोकच होते त्याच्या नाचगाण्याचा जल्लोष चालू झाला न्याहारी उरकली परतु वादळाचा जोर कमी होण्याची चिन्हे दिसेनात एकदा तर होडी चालू करून समुद्रात जाण्याचा प्रयत्नही नौकाचालकाने करून पाहिला, परंतु लाटा इतक्या जोरात उसळत होत्या आणि त्यामुळे होडी इतकी हेलकावे खात होती की तो धोका पत्करण्यास त्याचे मन तयार झाले नाही हवा अनुकूल होईल म्हणून ११ वाजेपर्यंत वाट पाहिली परंतु तशी शक्यता न दिसल्यामुळे सहल रद्द झाल्याचे जाहीर करण्यात आले अर्थात सर्वांचे जेवण आणलेले होते, ते वाया गेले असते तर होडीवाल्याला तो भुर्दंड सोसावा लागला असता म्हणून प्रत्येकाने आपापले जेवण घेऊन जावे व पुढील शुक्रवारी याच तिकिटा-वर फैलकाला जाण्यासाठी येथे यावे, असे सर्वांना सागण्यात आले मात्र त्या वेळी या लोकाना न्याहारी व जेवण मिळणार नाही, असाही खुलासा करण्यात आला

माझा फारच विरस झाला पण निसर्गाच्या लहरीपुढे कोणाचे काय चालणार ?

आम्ही आमच्या जेवणाचे कागदी डबे घेऊन परतलो हॉटेलवर जाऊन त्यातील मासाहारी व अंड्याचे पदार्थ अब्दुल माजिदना देऊन टाकले उरलेला चिवडा व विड्याची पानेही त्याना देऊन टाकली त्याना पानाचेच कौतुक विशेष वाटले कारण येथे एका विड्याला जवळजवळ १ रुपया पडतो

## लकेत सोन्याच्या विटा

आखात देशाच्या या दौऱ्यात मी खरेदी अशी काही केलीच नव्हती. कारण आपल्याजवळ किती परकीय चलन शिल्लक राहील याची मला कल्पना नव्हती वस्तुतः सगळा खर्च सरकारनेच केल्यामुळे मला माझ्या जवळील परकीय चलनाचा वापर करावाच लागला नव्हता तरीपण अडीअडचणीला पैसा जवळ असावा, म्हणून मी कजूष माणसाप्रमाणे जवळची रक्कम जपून ठेवली होती शिवाय दुकानात जाऊन खरेदी करण्याची मला मुळातच नावड सगळे दुकानदार आपल्याला फसविण्या-साठीच टपून बसलेले असतात, अशी भावना म्हणूनही खरेदीपासून शक्य तर दूर राहणारा अखेर शेवटच्या दिवशी बाजारात जाऊन काही खरेदी करिता येईल किंवा काय याचा मी अदाज घेतला. कायद्याप्रमाणे ५०० रुपयापर्यंतच मी खरेदी करू शकत होतो एखादा लहानसा ( पोर्टेबल ) टाइप रायटर मिळाला तर पाहावा, म्हणून चौकशी केली एक जपानी टाइप रायटरचा विक्रेता ६०० रुपयाना

टाइप रायटर द्यायला तयार होता परंतु मला ५०० रुपयापेक्षा जास्त रक्कम खर्च करावयाची नव्हती म्हणून तो सौदा होऊ शकला नाही माझ्या कॅमेऱ्यासाठी मी एक साधा फिल्म रोल विकत घेतला होता तो मला भारतापेक्षाही महाग पडला होता टेप रेकॉर्डर, टी व्ही सेट वगैरे इलेक्ट्रॉनिक्सच्या वस्तू तसेच कापड-चोपड, साड्या, घड्याळे, अत्तरे वगैरे चैनीच्या वस्तू तेथे स्वस्त मिळतात असे मी ऐकले होते परंतु अशा वस्तू भारतात नेणे बेकायदेशीर असल्याचे मला माहीत होते मला त्याचे आकर्षणही नव्हते म्हणून मी त्याची चौकशीच केली नाही आखात देशात रंगीत चष्मे ( सन गॉगल्स) चांगले मिळतात, असे ऐकले होते म्हणून त्याची चौकशी केली माझ्या नंबरचा चष्मा दुसऱ्या दिवशी मिळाला असता, आणि त्याला सुमारे तीनशे रुपये पडले असते म्हणून त्याचाही नाद मी सोडला आणि एक साधा रंगीत चष्मा घेतला त्याला दीडशे रुपये पडले नंतर थोडे बदाम–पिस्ते घेतले त्याचे दरही प्रत्येक दुकानात वेग-वेगळे ! आपण बनविले गेलो ही भावना मनात घेऊनच मी हॉटेलात परतलो

## हॉटेलवाल्याची अरेरावी

निघायची वेळ झाली एव्हाना हॉटेलच्या काउंटरवरील इसम बदलला होता तो म्हणू लागला, “ तुमच्या दूतावासाचं पत्र मिळालेलं दिसत नाही तुम्हाला हॉटेलचं बिल भरल्याशिवाय जाता येणार नाही ” वस्तुत. सकाळीच ते पत्र काउंटरवरच्या माणसाकडे दिलेले मी स्वतः पाहिले होते. पण परोपरीने सांगूनही तो ऐकेना तेव्हा मी आवाज चढवला आणि त्याला म्हणालो, “ सकाळी जो इसम होता त्याला फोन करून विचारा मी स्वत' ते पत्र पाहिलेलं आहे ” मी आवाज चढवल्यावर तो गृहस्थ थोडा नरमला आणि त्याने सकाळच्या इसमाला फोन केला. तेव्हा ते पत्र तिथेच ठेवले असल्याचे त्याने सांगितले. ईजिप्शियन लोकांना भारतीय हे आपले प्रतिस्पर्धी आहेत असे वाटते; म्हणून ते भारतीयांशी उर्मटपणे वागतात, असे मी ऐकले होते त्याची प्रचीती ही अशी आली खरे म्हणजे तो काही मालक नव्हता, नोकरच होता पण हॉटेलमालकाची अरेरावी त्याच्यातही संचरली होती ! दुपारी दोन नंतर खोली तुमच्या ताब्यात राहिल्यास दुसऱ्या दिवसाचे संपूर्ण भाडे तुम्हाला द्यावे लागते अशा वेळी खोली रिकामी करून सामान बाहेर आणून ठेवतात परंतु दूतावासाने मला या बाबतीत काहीच सूचना दिली नसल्यामुळे मी काही हालचाल केली नव्हती माझ्या समोरच एक नवे गिऱ्हाईक आले, आणि हॉटेलवाल्याने माझ्या खोलीची किल्ली त्याला दिली याचा अर्थ त्याला फुकटात १२ दिनार ( ३६० रुपये ) मिळाले !

## एक भारतप्रेमी लेबॅनॉनी तरुण

माझे विमान १०–४० ला सुटणार होते म्हणून मी ९ वाजताच विमानतळावर

जाऊन हजर झालो. श्री अब्दुल माजिद मला निरोप देण्यासाठी विमानतळावर आले होते परतु तेथे दुसरेच एक तरुण गृहस्थ मला भेटले, आणि त्याच्याशी गप्पागोष्टी करण्यात मी रगून गेलो या गृहस्थाचे नाव आबिद ए झनतोत असे होते ते लेबॅनॉनचे नागरिक असून एअर इडियाचे विक्रीप्रतिनिधी होते मी कुणीतरी व्ही आय पी असावा, या समजुतीने एअर इडियाने माझ्या दिमतीला म्हणून त्याना पाठविले होते मला तो तरुण एकदम पसत पडला त्याच्याशी माझी तार छान जुळली त्याच्याकडून लेबॅनॉनसबधी बरीच माहिती मला मिळाली खलील जिब्रान हा माझा आवडता लेखक लेबॅनॉनचा त्याची मातृभूमी म्हणून लेबॅनॉनविषयी माझ्या मनात नेहमीच आत्मीयता राहिली आहे आबिद हा लेबॅनॉनच्या दक्षिण भागातील एका सुखवस्तू मुस्लिम घराण्यातील असून नुकताच आपल्या घरी जाऊन आला होता सध्या तेथे चालू असलेल्या यादवीसबधी तो म्हणाला, "आजचा लढा हा मुसलमान व ख्रिस्ती याच्यात चालू आहे, अस जे पाश्चात्त्य वृत्तपत्र भासवतात ते चूक आहे हा खरा श्रीमत व गरीब याच्यातला लढा आहे उजव्या गटात श्रीमत ख्रिश्चनाबरोबर श्रीमत मुसलमानही आहेत, आणि डाव्या गटात गरीब मुसलमानाबरोबर गरीब ख्रिश्चनही आहेत दगलग्रस्त भागातील श्रीमत मुसलमान आपली संपत्ती घेऊन, युरोपात व स्वित्झर्लंडला पळाले आहेत. आणि गरीब व मध्यम वर्गाय लोक इकडे अरब देशात आले आहेत त्यात धर्माचा काही संबध नाही "

आबिदला भारताविषयी फार प्रेम दिसले आपल्या अगावरील कपडे मला दाखवून तो म्हणाला, "मला भारतीय कापड फार आवडत माझ्या घरात भारतीय कपडेच तुम्हाला दिसतील तुमचे लोक परदेशी कापडासाठी इतका जीव का टाकतात तेच मला कळत नाही मी तर माझ्या घरातल सार फर्निचर मुबईला बनवून आणलय भारतीय कलाकुसर खरोखरीच उच्च दर्जाची आहे पण तुमच्या लोकाना ते पटत नसाव अस दिसत "

लेबॅनॉनमधील डाव्या गटाचा पुढारी कमाल जुम्बलात याच्याविषयी त्याला अत्यत आदर वाटतो. तो म्हणाला, "जुम्बलात हा ड्रुज जमातीचा आहे ड्रुज लोक मुसलमान असले तरी ते पुनर्जन्मावर विश्वास ठेवतात अवतारही मानतात. जुम्बलातला भारताच फार वेड आहे. त्याचा गुरू भारतीय आहे त्याच्या खोलीत गाधी, विवेकानद, रमण महर्षी, रामकृष्ण परमहस आणि त्याचे गुरू आत्मानद ( पी कृष्ण मेनन ) याची छायाचित्र असून तिथ भारतीय बैठक असते तो शाकाहारी असून त्याला योगाचा नाद आहे तो अधूनमधून भारताला भेटी देत असतो. डाव्याचा विजय होऊन जुम्बलात अधिकारावर येईल तेव्हा भारत आणि लेबॅनॉन याचे सबध फार स्नेहाचे होतील. सध्या लेबॅनॉन हा पूर्ण पाश्चात्त्य बनला आहे

तो पुनः पूर्ववत पौर्वात्य बनेल

" लेबॅनॉनी माणूस पक्का भौतिकवादी आहे तो फक्त आजचा विचार करतो दिवसभर भरपूर काम करायच, खूप पैसा मिळवायचा आणि तो एका रात्रीत उडवून टाकायचा उद्याचा विचार उद्या सकाळी उठल्यावर ! त्यामुळ तिथ नाटक, सिनेमा, नाइटक्लब याची अगदी रेलचेल आहे त्याचा धर्महो अगदी वरवरचा आहे ख्रिश्चनाशी स्पर्धा करण्यापुरताच ख्रिश्चनानी खडीभर दारू उडवली तर आम्ही कर्ज काढून का होईना दोन खंडी दारू उडवणार ! असल आमच धर्मप्रेम ! "

## संपन्नतेला विटलेला तरुण

विमानात १०–२० ला बसलो आबिदने अगदी शेवटपर्यंत सोबत केली त्याचा निरोप घेताना परम मित्राचा निरोप घेतल्यासारखे मला दुःख झाले

जम्बो ७४७ हे एअर इंडियाचे विमान होते नाव होते 'सम्राट अकबर' ते न्यूयॉर्कहून आले होते बरेचसे रिकामेच होते भारत सरकारचे विदेश सचिव श्री जगत मेहता याचा मुलगा उदय मेहता हा माझ्या शेजारी होता गणित व तत्त्वज्ञान हे विषय घेऊन तो अमेरिकेत अभ्यास करीत होता या दोन विषयाची जोडी मला जरा विचित्र वाटली. साधे कपडे, दाढी वाढलेली जवळ घड्याळ किंवा पेनही नव्हते प्रथम मला वाटले तो हिप्पी असावा म्हणून त्याच्याशी गप्पागोष्टी सुरू केल्या तो म्हणाला, " लहानपणापासून श्रीमतीत वाढल्यामुळ भारतातल्या गरिबीची मला काहीच कल्पना नाही ती गरिबी पाहायला, उपभोगायला मिळावी, असं मला फार वाटत अमेरिकेच्या वैभवाच मला मुळीच आकर्षण वाटत नाही त्यामुळ तिथ माझ मन लागत नाही पण आईवडिलाच्या आग्रहाखातर तिथ राहाव लागत "

मी त्याला म्हणालो, " शिक्षण पुर करून भारतात ये तिथ काम करू लागलास की तुला आपोआप खऱ्या भारताच दर्शन घडेल आणि मग इथल दारिद्र्य कस कमी करता येईल, याचा विचार तू करू लागशील "

विमानात सिनेमाही होता आणि संगीत ऐकण्याचीही सोय होती. पण संगीत ऐकण्यासाठी लागणारे उपकरण ज्याचे त्याला विकत घ्यावे लागते सव्वा–दीड पौंड किमतीचे तेवढे पैसे खर्च करून तो शोक करण्याची माझी तयारी नव्हती उदय मेहताने घेतलेले उपकरण त्याने मला दिले ते थोडा वेळ वापरून एक–दोन मराठी गाणी ऐकली, आणि मग कटाळा आल्यामुळे त्याचे उपकरण त्याला परत देऊन टाकले

बिचाऱ्याची एक रात्र विमानात गेली होती, आणि आता दुसरी रात्रही विमानात जाणार होती. त्यामुळे तो अगदी पेंगुळला होता मी त्याला म्हणालो, " लंडनला एक दिवस विश्रांती घेऊन पुढ निघाला असतास तर बर झाल नसत काय ? "

" त्या जगाचा अगदी कटाळा आल्यामुळ केव्हा एकदा भारतात जाऊन पोचेन अस मला झालय !" तो उद्गारला

रात्री १२-३० ला झकासपैकी जेवण झाले; आणि रिकाम्या खुर्च्यांवर जाऊन ( मधले हात पाडून ) उदयने ताणून दिली, मीही दोन खुर्च्यांवर आडवा होऊन झोपेची आराधना करू लागलो

विमान कुवैतच्या वेळेप्रमाणे ११-१५ ला सुटले. त्या वेळी दिल्लीत पहाटेचे १-४५ वाजले होते २१६० मैल किंवा ३४८० कि मी चे अतर वाटेत कोठेही न थांबता सामान्यत: ३ तास ४५ मिनिटात कापले जाते परंतु आमचे विमान १५ मिनिटे उशिरा पोचले पहाटे ३—१५ वाजता आम्ही दिल्लीला पोचलो त्या वेळी तेथे ५—४५ वाजले होते.

वीस दिवसानतर ताजे भारतीय वृत्तपत्र वाचायला मिळाले परतु त्यात वाचनीय मजकूर काहीच नव्हता !

दिल्लीत सुमारे तासभर मुक्काम करून आमचे विमान ६-२५ ला निघाले आणि ७०० मैल किवा १००० कि मी अतर दीड तासात कापून वाटेत कोठेही न थांबता रविवार ता १५ मे रोजी सकाळी ८-१५ वाजता मुबईच्या सांताक्रूझ विमानतळावर उतरले.

## कस्टम्सचा छळवाद

नेहमीप्रमाणे भारतात परतल्यावरोबर परदेश प्रवासाबद्दलचा पश्चात्ताप सुरू झाला. सामान मिळायलाच अर्धा-पाऊण तास लागला एवढा विलब या प्रवासात कोठेच लागला नव्हता, परंतु खरा छळवाद पुढेच होता

माझ्याजवळ जकात भरण्यासारखा काहीच माल नसल्यामुळे मी हिरव्या पट्ट्यात जाऊन उभा राहिलो तास गेला, दीड तास गेला तरी राग काही पुढे सरकेना परदेशातून येणारा प्रत्येक प्रवासी अट्टल स्मगलरच असतो अशी पक्की खात्री बाळगून उभे असलेले तपासनीस आपल्यासमोर येणाऱ्या प्रत्येक प्रवाशाचे सामान तपासत होते बारीकसारीक वस्तू तपासण्यात ते इतका वेळ घेत होते की, मी वैतागून गेलो अर्थात जकातवाल्याप्रमाणे प्रवासीही दोषी होतेच आपल्याजवळ भरपूर कापडचोपड, यात्रिक उपकरणे असतानाही ते हिरव्या पट्ट्यात येऊन उभे राहिले होते, आणि तपासनिसाकडून अपमानित होत होते ही मडळी सारी परिस्थिती माहीत असताना इतके सामान परदेशातून का आणतात, तेच कळत नाही इंपोर्टेड वस्तूचा सोस, हेच त्याचे कारण असावे कदाचित काही मडळी असल्या वस्तू आणून त्या येथे विकण्याचा धदाही करीत असतील

मी असहायपणे इकडे तिकडे पाहू लागलो इतक्यात एक महिला अधिकारी तपासणीच्या कामातून मोकळ्या झालेल्या मला दिसल्या त्यांच्याकडे जाऊन मी विचारले, " मी माझं सामान तपसायला तुमच्याकडे आणू काय ? "

" घेऊन या ना ! " त्यांनी सांगितले

मी माझे सामान घेऊन त्यांच्याकडे गेलो त्यांनी माझा पासपोर्ट पाहून मराठीत विचारले, " तुम्ही लेखक श्रीपाद जोशी ना ? "

मी स्मितपूर्वक मान लववली

त्यांनी चटकन माझे सामान तपासले आणि दोन मिनिटात मला मोकळे केले वरती त्या म्हणाल्या, " मराठी माणसं फार भित्री ती बेकायदेशीर सामान क्वचितच आणतात ! "

त्यांचा हा अनुभवजन्य अभिप्राय गौरवास्पद मानावा की अपमानास्पद ते मला समजले नाही मी माझ्या पासपोर्टवर माझ्या कॅमेऱ्याची नोंद जाताना करून घेतली होती तो परत आणल्याची नोंद त्यांच्याकडून करून घेतली, आणि त्यांना विचारले, " माझ्याजवळ थोडं परकी चलन आहे ते कुठं जाहीर करायचं ? " कारण जपानहून परत आल्यावर १९७२ साली मला ते जाहीर करावे लागले होते

" किती आहे ? हजार दोन हजार ? " त्यांनी विचारले

" छेः छेः " अंगावर पडलेली पाल झटकून टाकावी तसा मी उद्गारलो, " असेल शभर एक डॉलरच ! "

" मग त्याची काही नोंद करायला नको " त्या म्हणाल्या

तरी पण मला परकीय चलनाची गरज नसल्यामुळे मी ते स्टेट बँकेला परत केले. ज्या ६१ डॉलरना मी ५६६ रुपये दिले होते त्याचे मला ५३३ रुपये मिळाले ! माझ्या या बावळटपणाबद्दल माझ्या काही व्यवहारचतुर मित्रांनी माझी नंतर हेटाळणी केली त्यांच्या मते मी माझ्याजवळचे परकीय चलन परत न देता जवळ ठेवले असते तर माझा चांगलाच फायदा झाला असता ! मी नुसता हसलो मला काय ते कळत नव्हते ?

मी सुटकेचा निःश्वास सोडला ! एव्हाना १०-३० होऊन गेले होते. बाहेर पडून टॅक्सी केली आणि दादरला गेलो विमानतळावरील त्रासाने मी इतका वैतागलो होतो की, तेथे न थांबता सरळ टॅक्सी करून पुण्याला २ वाजता पोचलो टॅक्सीवाल्याच्या अडवणुकीमुळे आम्हा चारही उतारूंना प्रत्येकी ५ रुपये जादा द्यावे लागले आणीबाणीच्या अनुशासन पर्वाचा हा अनुभव काही सुखद वाटला नाही

❖

# १५

# उपसंहार

आखात देशाच्या या धावत्या दौऱ्याने अखेर काय साधले? या प्रवासाची फलनिष्पत्ती काय?

व्यक्तिशः माझा असा फायदा झाला की, ते देश पाहण्याच्याही लायकीचे नाहीत असा माझा जो गैरसमज होता तो दूर झाला, आणि ज्ञान व माहिती यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा भाग मला पाहावयास मिळाला इस्लामवरील आधुनिकतेच्या प्रभावाचा अभ्यास मी करू इच्छित होतो व त्यासाठी ईजिप्त, जॉर्डन, इराक, सीरिया व लेबॅनॉन या देशाना जाण्याची माझी इच्छा होती. परंतु आधुनिकतेच्या प्रभावापासून स्वतःला दूर ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्या या परंपरानिष्ठ देशाचे मनोगत जाणून घेणे हेही काही कमी महत्त्वाचे नसल्याचे मला समजून आले हे देश न पाहता मी केवळ वर उल्लेखिलेले देशच पाहिले असते तर माझा अभ्यास एकांगी झाला असता. स्वतःच्या अस्मितेला धक्का लागू न देता आधुनिकतेला सामोरे जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या या देशाचा अभ्यासही तितकाच महत्त्वाचा समजला पाहिजे किंबहुना त्यांची ज्वलंत राष्ट्रनिष्ठा, निःसीम संस्कृतिप्रेम व स्वभाषेच्या प्रतिष्ठापनेसाठी त्यांनी चालविलेली धडपड या गोष्टींपासून आपल्यालाही खूप काही शिकता येण्यासारखे आहे.

अरब लोक हुशार व बुद्धिमान असल्याचे इतिहासात नमूद आहे विज्ञानाच्या अनेक शाखांचे प्रारंभिक ज्ञान पाश्चात्त्यांना अरबांकडून मिळाले होते मानव्याच्या शाखांतील त्यांचे कर्तृत्वही जगाने वाखाणले आहे. परंतु कालचक्रानुसार हा सुवर्णकाल मावळला, आणि या अरब देशांवर अज्ञानाचा अंधकार पसरला जगाला त्यांचा व त्यांच्या गुणांचा विसर पडला जगातील मागास लोकांमध्ये त्यांची गणना होऊ लागली परंतु अंधारही कधी कायम राहात नसतो गेल्या दशकात अरबस्तानमध्ये पहाट झाली आणि हा हा म्हणता तो प्रदेश पुनः जगाच्या नकाशावर आपल्या तेजाने तळपू

लागला तेथील तैलसपत्तीने जगाचे डोळे दिपले, आणि त्याना तुच्छ समजणारे लोक त्याची कृपादृष्टी आपल्यावर पडावी, यासाठी धडपडू लागले हा सारा ' ट्रान्स्फर सीन ' पाहण्यासारखा होता. तो पाहण्याची संधी मला मिळाली-किंबहुना तो पाहणारा मी पहिलाच भारतीय लेखक होतो, याचा मला सार्थ अभिमान वाटतो

या देशाना भारताविषयी आपलेपणा वाटतो, भारताचा स्नेह मोलाचा आहे, असे ते समजतात, हे या दौऱ्यातून मला उमगले त्याची ती स्नेहाकाक्षा भारतीय जनतेपर्यंत नेऊन पोचविण्यात मला आनद होत आहे त्याच्या संपत्तीचा उपयोग आपल्यालाही व्हावा, असे वाटणे स्वाभाविक आहे त्याबद्दल आपल्याला कोणी दोष देणार नाही. परंतु आपली नजर केवळ त्याच्या संपत्तीवर असता कामा नये भौतिक सपत्ती आज आहे, उद्या कदाचित असणार नाही खनिज तेलाचा साठा संपुष्टात आल्यावर जगातील संपत्तीचा ओघ या देशाकडे आजच्याप्रमाणेच वाहात राहील, असे नाही कदाचित तोपर्यंत आपल्या देशात खनिज तेलाचे साठे सापडल्यामुळे तोच संपत्तीचा ओघ आपल्याकडेही वाहू लागेल परतु या देशाशी आज आपण जे स्नेहसंबध विकसित करू ते कायम टिकून राहतील, आणि कालातराने त्याचाच आपल्याला अधिक उपयोग होईल या भूमिकेतूनच आपण त्याच्याशी मैत्री करावी, त्याचे प्रेम संपादावे, असे मला वाटते

या देशाच्या धनाच्या मोबदल्यात आज आपण त्याना तत्रज्ञान व शरीरश्रम देत आहोत. डॉक्टर, इजिनियर, आर्किटेक्ट, व्यवस्थापक, कारकून, मजूर वगैरे तिकडे मोठ्या संख्येने जात आहेत, आणि तिकडून मौल्यवान परकीय चलन पाठवीत आहेत परतु हा साधा, सरळ सौदा आहे त्यात विशेष असे काही नाही पण त्याच्या स्नेहादराच्या मोबदल्यात आपण त्याना काय देणार आहोत ? सुदैवाने भारताजवळ असे अमाप विचारधन आहे की जे जगात क्वचितच आढळते आपल्या धार्मिक-आध्यात्मिक अनुभवाचा वारसा आज आपल्या भौतिक दारिद्र्यामुळे विसरला जात आहे पण त्याचे मोल जाणणारे लोक जगात वाढत आहेत ते आज मुख्यत' पाश्चात्त्य देशात आहेत परंतु अरबामध्ये आधुनिक शिक्षणाचा प्रसार जसजसा वाढत जाईल तसतसे त्या देशातूनही आपल्या या प्राचीन विचारधनाची कदर करणारे लोक मोठ्या संख्येने पुढे येतील, त्याचा धर्म या मार्गात अडथळा बनणार नाही, अशी छाप तेथील विचारवताशी बोलल्यावर माझ्यावर पडली तत्रज्ञानाच्या क्षेत्रात या देशातील लोक जसजसे तयार होत जातील तसतसे आपल्या तत्रज्ञाना येथे स्थान उरणार नाही, हे उघड आहे परतु त्या वेळी त्याच्याशी निर्माण झालेले स्नेहसंबध कायम टिकविण्याच्या कामी आपल्या या विचारधनाचा चागला उपयोग होणार आहे

या देशातील इस्लामवर आधुनिकतेचा प्रभाव कितपत पडला आहे, हा माझ्या

अध्ययनाचा एक विषय होता असा प्रभाव आपल्यावर पडू नये, अशी तेथील लोकांची इच्छा असल्याचे मला आढळून आले. आधुनिक यंत्रतंत्रज्ञान आणि उपकरणे यांचा भरपूर उपयोग ते करून घेत आहेत, भौतिक जीवनाची सर्व सुखे ते उपभोगीत आहेत परंतु एखाद्या परस्थाला जसे आपण बैठकीच्या खोलीपर्यंतच येऊ देतो, आपल्या देवघरात जाऊ देत नाही, त्याप्रमाणे या देशांनी या भौतिक सुधारणांना बाह्य जीवनापर्यंतच प्रवेश करू दिला आहे आपल्या धर्मजीवनाला त्यांचा स्पर्श होऊ दिलेला नाही सऊदी अरबस्तानासारख्या एखाद्या देशाने तर दीड हजार वर्षांपूर्वीची समाजव्यवस्था आजही टिकवून ठेवण्याचा अट्टाहास चालविला आहे त्यात त्याला यापुढेही कितपत यश येते ते पाहावे लागेल बहुपत्नीत्व व मनसोक्त तलाक यासारख्या दुष्ट रूढींतून सुशिक्षित अरब मुक्त होत असल्याचे मला दिसून आले हा आधुनिक संस्कृतीचाच परिणाम म्हणावा लागेल लोकसंख्यावाढीचे संकट या देशावर अजून कोसळलेले नसल्याने कुटुंबनियोजनाची समस्या त्यांच्या समोर नाही परंतु प्राप्त समृद्धीचा यथोचित उपभोग घ्यावयाचा तर ' कुटुंब लहान सुख महान ' हे तत्त्व आपल्यालाही स्वीकारावे लागेल, ही गोष्ट सुशिक्षित अरबांच्या लक्षात लौकरच येईल, अशी चिन्हे दिसत आहेत

या अरब देशामध्ये निर्माण झालेली प्रचंड संपत्ती अगदी खालच्या थरापर्यंत कशी पाझरत जाते, त्या श्रीमंतीचा लाभ अगदी गरिबानाही कसा मिळतो, हे जाणून घेण्यास मी उत्सुक होतो संपत्तीच्या वितरणाचे अनेक मार्ग मला या देशात आढळून आले सर्वांना रोजगार, भरपूर मजुरी, शिक्षण व आरोग्य यांच्या विनामूल्य सोयी, मुलांच्या शिक्षणाबद्दल पालकांना मिळणारा भत्ता, स्थानिक लोकांखेरीज इतरांना जमीन, घरे दुकाने खरेदी करण्यास अथवा त्यांच्या सहभागाशिवाय उद्योगधंदे करण्यास कायद्याने मनाई करून स्थानिक लोकांना घरबसल्या प्राप्ती होत राहील अशी करून देण्यात आलेली तरतूद, हमीदारी, वगैरे अनेक मार्गांनी संपत्तीचा ओघ समाजाच्या खालच्या थरापर्यंत नेऊन पोचविण्यात हे देश यशस्वी झाले आहेत जनतेला संपत्तीत वाटा मिळाल्याने सत्तेत वाटा मिळविण्याची उत्सुकता अरब जनतेत फारशी दिसत नाही त्यामुळे आधुनिक अर्थाचे राजकारण तेथे विकसित होण्याची शक्यता सध्या तरी दिसत नाही विषमतेमुळे निर्माण होणाऱ्या संघर्षांची बीजे तेथील वाळवंटात रुजतील अशी लक्षणे सध्यातरी तेथे दिसत नाहीत त्यामुळे तेथे जरी कधीकाळी राजकीय जागृती झाली तरी मध्यपूर्वेतील अरब राष्ट्राप्रमाणे तेथे समाजवाद-साम्यवाद उदयाला येण्याऐवजी अमेरिकेसारखा कल्याणकारी राज्यवादच पुढे येईल असे दिसते

अरब स्त्रीची गुलामगिरी हा एक चिंतेचा विषय होऊ शकतो. परंतु तिला स्वत:ला त्या गुलामीची जाणीव होऊन ती त्याविरुद्ध बंड करून उठेल असे सध्या तरी दिसत

नाही. शिक्षणामुळे तिच्यात स्वातंत्र्याची आकांक्षा निर्माण होईपर्यंत कदाचित अरब पुरुषांनाच सुविचार सुचेल आणि स्त्रीला तिचे जन्मसिद्ध स्वातंत्र्य फारसा संघर्ष न करिताच प्राप्त होईल. परंतु ती फार पुढची गोष्ट आहे. सध्यातरी रूढ चाकोरीतून जाणेच तिच्या नशिबी आहे, आणि त्यात ती सुखीही असावी!

आपला देश सृष्टिसौंदर्याने किती नटलेला आहे आणि त्या सौंदर्यात किती विविधता आहे, याचा अनुभव नसलेले लोक युरोप-अमेरिकेतील छापील सृष्टिसौंदर्यामागे वेड्या-सारखे धावत असतात. परंतु अरबांना भारताचे आकर्षण युरोप-अमेरिकेपेक्षाही अधिक वाटते. त्याची आपण योग्य वास्तपुस्त केली तर ते फार मोठ्या संख्येने भारतात येऊ लागतील. त्या दृष्टीने विशेष प्रयत्न केले गेले पाहिजेत. भारताची चांगली ओळख असलेले बिनसरकारी लोक या देशांना भेटी देतील तर त्यांचा या कामी चांगला उपयोग होईल, असे मला आढळून आले. आपल्या देशाचे मोठेपण परदेशात गेल्या-वरच आपल्याला अधिक कळते हेच खरे.

अशा प्रकारे आपल्या या प्रेमळ शेजाऱ्याची ओळख मला झाली, आणि त्याच वेळी आपल्या देशाच्या मोठेपणाचीही कल्पना आली. अरब देशात मी चार-पाच दिवसच राहू शकलो. हा काळ तसा फारच अपुरा म्हटला पाहिजे. तरीपण तेथील लोकजीवनाचे ओझरते दर्शन घेण्यास तो पुरेसा होता. यानंतरही त्यांच्यात वावरण्याची अधिक संधी आपल्याला मिळाली पाहिजे अशी इच्छा माझ्या मनात उत्पन्न झाली. याच भावनेतून अधिकाधिक भारतीय या अरब देशात जातील व तेथील लोकांना इकडे येण्यास प्रवृत्त करतील तर त्यातून एक चांगला संवाद आपल्यात निर्माण होईल, ही जाणीव मला झाली. हीच या दौऱ्याची फलनिष्पत्ती होय, असे मी समजतो.

REFBK-0021791

मराठी ... ग्रंथालय ...
दा. क्र.
ग्रंथ ...

# श्रीविद्या प्रकाशनाची आगामी प्रकाशने

**शोध : बाळ गोपाळांचा**
य दि. फडके

**बंगलोर ते रायबरेली**
वि स वाळिंबे

**मुरारिमल्लविरचित बाळक्रीडा**
रा चिं ढेरे
मोरेश्वर वाळिंबे

**अखेर सूर्य मावळला**
वि स वाळिंबे

**महात्मा ज्योतिराव फुले**
य दि फडके

**सार्थ श्रीज्ञानेश्वरी**
म श गोडबोले

**आशिया : अंधारातून प्रकाशाकडे**
वि स वाळिंबे

**संपर्क आणि संघर्ष**
वि स वाळिंबे

**मराठी लोकसाहित्य : सर्वांगिण अध्ययन**
रा चिं ढेरे